

# मराठी रंगभूमीचा
# ःकाल

REFBK-0016588

डॉ. मु. श्री. कानडे

किर्लोस्कर नाटक मंडळीचे व्यवस्थापक
कै. त्र्यंबकराव साठे यांनी अनुभवलेला

# मराठी रंगभूमीचा उषःकाल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना

लेखक
डॉ. मु. श्री. कानडे
पुणे विद्यापीठ, मराठी विभाग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

प्रस्तावना
श्री. केशवराव भोळे

REFBK-0016588

मूल्य पाच रुपये

व्हीनस बुक स्टॉल : पुणे

प्रकाशक
**सौ. सुलोचना लिमये, एम्. ए.**
व्हीनस बुकस्टॉल, पुणे.

●

प्रकाशन क्र. ६६

● ●

© **मु. श्री. कानडे**
१ ली आवृत्ती
११ फेब्रुवारी १९६८

● ●

मुद्रक
**स. म. खाडिलकर**
**आणि कंपनी,**
१२८६, सदाशिव,
चिमण्या गणपतीजवळ,
पुणें २.

# प्रस्तावना

इ. स. १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपली किर्लोस्कर संगीत नाटक मंडळी स्थापन केली. १८८४ पर्यंत संगीत शाकुंतल व संगीत सौभद्र या स्वतःच्या दोन नाटकांच्या प्रयोगांवर त्यांनी अमाप पैसा मिळविला. अण्णासाहेब नाट्यलेखक होते तसेच रंगभूमीवर आपले प्रयोग सुव्यवस्थित बसविण्यात ते अत्यंत कुशलही होते. त्यांचे विद्वान् स्नेही क. केरूनाना छत्रे तालमी चालू असताना अण्णांना नाटकाचे रहस्य समजावून देऊन उपयुक्त सूचना करीत असत. ते एक रसिक विद्वान् असून त्यांनी अनेक नाट्यप्रयोग पाहिले होते. मग ते प्रयोग विष्णुदासी नाटकांचे असोत अथवा 'बुकिश' नाटकांचे असोत. अण्णांनी शाकुंतल सौभद्रातील पात्रांची निवड फार बारीक नजरेनें केली होती. कोणता नट कोणत्या भूमिकेला शोभून दिसेल येथपासून त्याच्या गळ्याच्या नैसर्गिक गुणधर्मानुसार त्याला पदांच्या चालींची निवड करीपर्यंत ते बारकाईने बघत असत. एकूण ते रंगभूमीचे एक उत्तम संघटक कलावंत होते.

परंतु त्यांच्या मंडळीची एकंदर अंतगत व्यवस्था पद्धतशीर त्यांनी कधीच केली नाही. स्वभावाने उदार असल्याने 'येईल ती जमा अन् ते करतील तो खर्च ' असा त्यांचा खाक्या होता. हे सर्व त्यांना कळत होते, हे त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून कळून येते. ते म्हणत, "मी हे केशराचे शेत लावले आहे पण इथे गाढवे चरत आहेत." योग्य घटनेच्या अभावी त्यांच्या मंडळीचा कारभार असा अस्ताव्यस्त अनिर्बंध चालला होता. या कारभाराला सुधारून त्याला योग्य संघटना व नियमबद्धता यांची जोड देणारा कुशल, चोख, सचोटीचा, शिस्तप्रिय कारभारी त्यांना हवा होता. त्याच्याच शोधात ते होते, आणि दैववशात असा चतुरस्त्र बुद्धीचा आणि कर्तृत्वाचा मनुष्य त्यांना त्यांचे स्नेही विठोबा खंडाप्पा गुळवे यांनी दिला. वयाच्या चौदाव्या वर्षापासून तलाठ्याची–मोजणीदाराची सरकारी कामे करून साठे हे अनुभवाने कर्तबगार झाले होते. पुढे गुळव्यांच्या पेढीची कामे करीत असताना गुळव्यांच्या हिशेबी चोखपणाचा, व्यापारी दूरदर्शित्वाचा त्यांना धडा मिळाला होता. गुळवेशेठ व्यापारी व्यवहार कसे धोरणाने पुढील अंदाज बांधून करीत हे तो होतकरू पुरूष पाहात होता. त्याचे मोडी अक्षर वळणदार होते. हा मनुष्य आपले स्नेही अण्णा यांना देऊन त्यांची उणीव आणि गरज गुळवे यांनी पुरी केली. असा हा संघटनाकुशल मनुष्य म्हणजेच साठे. नाटकाचे शौकीन असले तरी साठे नवीन प्रकारचे हे काम अंगावर घेताना जरा चाचरलेच. आपण अशिक्षित खेडवळ आहोत असे उद्‌गार त्यांनी काढताच गुळवे म्हणाले, "साठ्या, तूच या कामास लायक आहेस. यश मिळवशील आणि अण्णांच्या संस्थेचा सैरभैर चाललेला कारभार नीट सांभाळशील." गुळव्यांचा हा अंदाज आणि विश्वास यथार्थ होता. कारण ते काम साठ्यांनी इतके चोख केले की अण्णा त्यांच्या कर्तृत्वावर खुष झाले, आणि ते या बाबतीत साठ्यांवर विसंबून राहात. साठ्यांना अण्णांच्याबद्दल कलावंत म्हणून फार आदर होता. त्यांच्या संस्थेचे इतर नाटक मंडळ्याप्रमाणे औट घटकेचे राज्य ठरू नये म्हणून ते झटले. संस्थेबद्दल त्यांना अतिशय आपुलकी वाटू लागली. त्यांच्या संघटनाकौशल्याचे, हिशेबी व्यवहाराचे, चोख जमाखर्चाचे, करड्या शिस्तीचे वर्तन या चरित्रात अनेक उदाहरणांसह आलेच आहे. त्यांच्या शिस्तीची कदर पुढे

भाऊराव कोल्हटकरांसारखे मालक, उत्तम गायक नटही किती साक्षेपाने करीत याचेही एक बोलके उदाहरण वाचकांना. आढळेल. संस्थेचे मालक आणि चालक यांच्यामध्ये एकमेकांबद्दल असा विश्वास, सलोखा असेल तरच ती संस्था सुस्थितीत चालते, एरवी नाही. हा सलोखा, ही संस्थाप्रियता, हा विश्वास नसला तर संस्थेचे कारभार कसे आणि किती बिघडतात याचा अनुभव सरकारी कारभारात सध्याच्या काळात आपण घेतच आहोत. म्हणूनच साठ्यांचे हे चरित्र चालू काळात सर्वांनाच उद्बोधक ठरेल, मार्गदर्शन करील इतके ते प्रभावी आहे.

नऊ वर्षे किर्लोस्कर मंडळीचा गाडा व्यवस्थित हाकल्यावर साठ्यांनी कंपनी सोडली. नंतर ते मिरजेस जमखंडीला निरनिराळ्या हुद्द्यावर गेले. मिरजेला श्रीमंतांच्या साहाय्याने त्यांनी एक उत्तम नाटयगृह उभें केले. जेथे जेथे साठे गेले तेथे तेथे त्यांनी आपल्या चौफेर कर्तृत्वाचा ठसा त्या त्या कामावर उमटविला. गंधर्व मंडळीतही साठे वर्षभर होते.

साठे किर्लोस्कर मंडळीत कायम राहते तर तिच्यातून फुटून गंधर्व मंडळीची स्थापना झाली नसती. त्यांच्या विधायक कर्तृत्वाच्या, संस्थाप्रियतेच्या अभावी ही फाटाफूट झाली. अशा फुटीर वृत्तीचा शाप नाटक कंपन्यांना, चित्रपट संस्थांना महाराष्ट्रांत भोवला. जो तो वैयक्तिक मान-मान्यतेचा, महत्त्वाकांक्षेचा लोभी झाला. त्यात कांही नाटककारही सामील झाले, हेही एक नवलच ! गंधर्व नाटक मंडळीचा, प्रभात फिल्म कंपनीचा, हंस पिक्चर्सचा इतिहास हेच सांगतो, की संस्थेपेक्षा व्यक्ती स्वतःला मोठ्या समजू लागल्या की तेथे विनाश आलाच.मागाहून या व्यक्ती स्वतःच्या फुटीर वृत्तीचे समर्थन –अत्यंत केविलवाणे समर्थन- भाडोत्री लेखणीच्या साहाय्याने करवितात तेव्हा तर ते हास्यापदच ठरतात. आज भारताच्या राजकीय सृष्टीत अशा दुष्ट घटना रोजच्याच झाल्या आहेत. म्हणूनच साठ्यांप्रमाणे संस्थाप्रिय, शिस्तप्रिय, कर्तबगार पुरुषांची चरित्रे लिहिली गेली पाहिजेत, प्रसिद्ध केली गेली पाहिजेत, असे माझे स्पष्ट पण आग्रहाने सांगणे आहे. साठ्यांच्या चरित्राचे महत्त्व याच दृष्टीने आहे. त्यांच्या उलट स्वभावाचे शंकरराव

मुजुमदार. त्यांच्याचमुळे गंधर्व मंडळी निघाली. त्यांच्याचमुळे किर्लोस्कर थिएटर दुसऱ्याच्या मालकीचे झाले. आता तर ते सिनेमा थिएटर झाले आहे. याच्या उलट कोल्हापूरचे थिएटर कायम नाटकाकरताच राहावे अशी योजना त्या वेळचे कल्पक कलेक्टर श्री. वाम यांच्यामुळे झाली, आणि त्याचे नाव केशवराव भोसले थिएटर ठेवण्यात आले हेही यथायोग्य कार्य त्यांनीच केले. कुठे नाममात्र किर्लोस्कर थिएटर आणि कुठे भोसले थिएटर ! पुणे महानगरपालिकेने गंधर्व थिएटर नवे बांधले हे उत्तमच झाले. पण इतक्या वर्षांच्या कारभारात किर्लोस्कर थिएटर विकत घेऊन नाटकाकरता खुले ठेवणे तिला जमले नाही. अजूनही हे कार्य करून अण्णासाहेबांचे खरे स्मारक तिला करता येईल. कारण एका नाट्यगृहाने पुण्याची गरज भागणार नाही. तसेच भानुविलास थिएटरही. ही दोन नाट्यगृहे नाटकांकरता मिळणे प्रेक्षकांच्या व अनेक नाट्यसंस्थांच्या सोयीचे होणार आहे. पण साठ्यांप्रमाणे 'योजकस्तत्र दुर्लभः' हेच खरे

या पुस्तकाच्या दुसऱ्या खंडात किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपासूनचा इतिहास आला आहे. त्यात अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाचे वर्णन यथातथ्य आले असून नाटककार अण्णा काही योगायोगाने झाले नसून त्यांनी ह्या कार्याकरता व्यासंग आणि तपश्चर्या आमरण केली म्हणूनच ते एक महान नाटककार, नाट्य व रंगभूमीचे संस्थापक झाले. किर्लोस्कर मंडळीची स्थापना हा त्यांचा दुसरा महान प्रयत्न होय ! यापूर्वी त्यांनी १८७५ साली बेळगाव येथे 'भरत शास्त्रोत्तेजक बेळगावकर मंडळी' ची स्थापना केली होती. आणि त्या वर्षी चार सप्टेंबर रोजी (शनिवारी) आपण भाषान्तर केलेल्या कालिदासाच्या संगीत शाकुंतलाच्या पहिल्या चार अंकांचा प्रयोग करून, पुढील महिन्याच्या चार तारखेला राहिलेल्या तीन अंकांचा प्रयोग केला होता. म्हणजे अण्णा हे त्रिलोकेकरांच्या आधीचे संगीत नाटककार ठरतात. त्यांनी अनेक संगीतिका लिहून त्यांचेही प्रयोग करून, पडदा पडल्यावर वाद्यवृंदाचे संगीतही श्रोत्यांच्या मनोरंजनाकरता ठेवले होते हे तत्कालीन नाविन्य !

१८८० साली पुण्यात येऊन त्यांनी आपल्या रसिक विद्वान स्नेह्यांच्या साहाय्याने या नव्या संगीत मंडळीची स्थापना केली. पहिले नाटक शाकुंतलच ! साठ्यांप्रमाणे अण्णांना मोरोबांसारखा उत्तम देखणा गायक नट त्यांच्या रसिक धनाढ्य स्नेह्याकडूनच म्हणजे गुळव्यांकडूनच मिळाला. बाळकोबा नाटेकरांसारखा गवई नट पुण्यातच मिळाला. पुढील काळात असामान्य आवाजाचे व रूपाचे भाऊराव कोल्हटकर, नंतर भास्कर बखले असे गुणी नट मिळाले. साठ्यांच्यासमोर या साऱ्या गोष्टी घडत असल्यामुळे त्यांनी आपल्या रोजनिश्यांच्या साहाय्याने किर्लोस्कर मंडळीचे इतिवृत्त लिहून ठेवले आहे. ते साठ्यांनी लिहिले असल्यामुळे विश्वसनीय मानायला हरकत नाही. त्यांना आधीची माहिती देणारे गुळवेशेठ होते. पुढे अण्णासाहेबांचा प्रत्यक्ष सहवासच लाभला. साठ्यांनी हे सारे 'श्रुत' आपल्या रोजनिश्यांत लिहून ठेवले होते. त्यामुळे त्यांत घोटाळे होण्याचा संभव फारच कमी. साठे स्वभावाने साक्षेपी आणि सत्यप्रिय होते; याची अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनात सापडतात. ते तसे नसते तर त्यांना मिरज जमखंडीसारख्या संस्थानिकांनी जबाबदारीच्या जागा दिल्या नसत्या. त्यांचे नाव एक "नाटक्या" म्हणून फार तर लोकांनी घेतले असते. पण तसे झाले नाही. नाट्यव्यवसायातला कोणताही दुर्गुण अगर व्यसन त्यांच्याजवळसुद्धा यायला भीत असावे. असा त्यांच्या थोर निष्कलंक चारित्र्याचा दरारा नाटक कंपन्यांत तर होताच पण ते जेथे जेथे गेले तेथे तेथे होता.

साठ्यांनी (पृष्ठ २८) म्हटल्याप्रमाणे पूर्वीच अनुवादित केलेले संगीत शाकुंतल पुण्यात किर्लोस्कराच्या रंगभूमीवर नव्या नटसंचासह पुढे आणले. बेळगाव समाचारच्या अंकात शाकुंतलाच्या बेळगावच्या त्या प्रयोगाचे वर्णन आलेच आहे त्यामुळे त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल शंका घेण्याचे कारणच नाही. अण्णासाहेबांच्या एकंदर आयुष्याचा विचार केला तर ते जणू काय नाटक आणि रंगभूमीच्या उन्नतीकरता, उत्कर्षाकरताच जन्माला आले होते असे वाटते. ते जर आणखी जगते वाचते तर त्यांनी रामराज्यवियोगाचे राहिलेले दोन अंक पुरे केले असते. आणि आणखीही नवी नाटके आपल्या कंपनीकरता लिहिली असती. प ऽ ऽ ण– ! अण्णांचे नाट्यप्रेम द्रव्यनिरपेक्ष

मुजुमदार. त्यांच्याचमुळे गंधर्व मंडळी निघाली. त्यांच्याचमुळे किर्लोस्कर थिएटर दुसऱ्याच्या मालकीचे झाले. आता तर ते सिनेमा थिएटर झाले आहे. याच्या उलट कोल्हापूरचे थिएटर कायम नाटकाकरताच राहावे अशी योजना त्या वेळचे कल्पक कलेक्टर श्री. वाम यांच्यामुळे झाली, आणि त्याचे नाव केशवराव भोसले थिएटर ठेवण्यात आले हेही यथायोग्य कार्य त्यांनीच केले. कुठे नाममात्र किर्लोस्कर थिएटर आणि कुठे भोसले थिएटर ! पुणे महानगरपालिकेने गंधर्व थिएटर नवे बांधले हे उत्तमच झाले. पण इतक्या वर्षांच्या कारभारात किर्लोस्कर थिएटर विकत घेऊन नाटकाकरता खुले ठेवणे तिला जमले नाही. अजूनही हे कार्य करून अण्णासाहेबांचे खरे स्मारक तिला करता येईल. कारण एका नाट्यगृहाने पुण्याची गरज भागणार नाही. तसेच भानुविलास थिएटरही. ही दोन नाट्यगृहे नाटकांकरता मिळणे प्रेक्षकांच्या व अनेक नाट्यसंस्थांच्या सोयीचे होणार आहे. पण साठ्यांप्रमाणे ' योजकस्तत्र दुर्लभः ' हेच खरे

या पुस्तकाच्या दुसऱ्या खंडात किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपासूनचा इतिहास आला आहे. त्यात अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाचे वर्णन यथातथ्य आले असून नाटककार अण्णा काही योगायोगाने झाले नसून त्यांनी ह्या कार्याकरता व्यासंग आणि तपश्चर्या आमरण केली म्हणूनच ते एक महान नाटककार, नाट्य व रंगभूमीचे संस्थापक झाले. किर्लोस्कर मंडळीची स्थापना हा त्यांचा दुसरा महान प्रयत्न होय ! यापूर्वी त्यांनी १८७५ साली बेळगाव येथे 'भरत शास्त्रोत्तेजक बेळगावकर मंडळी' ची स्थापना केली होती. आणि त्या वर्षी चार सप्टेंबर रोजी (शनिवारी) आपण भाषान्तर केलेल्या कालिदासाच्या संगीत शाकुंतलाच्या पहिल्या चार अंकांचा प्रयोग करून, पुढील महिन्याच्या चार तारखेला राहिलेल्या तीन अंकांचा प्रयोग केला होता. म्हणजे अण्णा हे त्रिलोकेकरांच्या आधीचे संगीत नाटककार ठरतात. त्यांनी अनेक संगीतिका लिहून त्यांचेही प्रयोग करून, पडदा पडल्यावर वाद्यवृंदाचे संगीतही श्रोत्यांच्या मनोरंजनाकरता ठेवले होते हे तत्कालीन नाविन्य !

१८८० साली पुण्यात येऊन त्यांनी आपल्या रसिक विद्वान स्नेह्यांच्या साहाय्याने या नव्या संगीत मंडळीची स्थापना केली. पहिले नाटक शाकुंतलच ! साठ्यांप्रमाणे अण्णांना मोरोबांसारखा उत्तम देखणा गायक नट त्यांच्या रसिक धनाढ्य स्नेह्याकडूनच म्हणजे गुळव्यांकडूनच मिळाला. बाळकोबा नाटेकरांसारखा गवई नट पुण्यातच मिळाला. पुढील काळात असामान्य आवाजाचे व रूपाचे भाऊराव कोल्हटकर, नंतर भास्कर बखले असे गुणी नट मिळाले. साठ्यांच्यासमोर या साऱ्या गोष्टी घडत असल्यामुळे त्यांनी आपल्या रोजनिश्यांच्या साहाय्याने किर्लोस्कर मंडळीचे इतिवृत्त लिहून ठेवले आहे. ते साठ्यांनी लिहिले असल्यामुळे विश्वसनीय मानायला हरकत नाही. त्यांना आधीची माहिती देणारे गुळवेशेठ होते. पुढे अण्णासाहेबांचा प्रत्यक्ष सहवासच लाभला. साठ्यांनी हे सारे 'श्रुत' आपल्या रोजनिश्यांत लिहून ठेवले होते. त्यामुळे त्यांत घोटाळे होण्याचा संभव फारच कमी. साठे स्वभावाने साक्षेपी आणि सत्यप्रिय होते; याची अनेक उदाहरणे त्यांच्या जीवनात सापडतात. ते तसे नसते तर त्यांना मिरज जमखंडीसारख्या संस्थानिकांनी जबाबदारीच्या जागा दिल्या नसत्या. त्यांचे नाव एक "नाटक्या" म्हणून फार तर लोकांनी घेतले असते. पण तसे झाले नाही. नाट्यव्यवसायातला कोणताही दुर्गुण अगर व्यसन त्यांच्या-जवळसुद्धा यायला भीत असावे. असा त्यांच्या थोर निष्कलंक चारित्र्याचा दरारा नाटक कंपन्यांत तर होताच पण ते जेथे जेथे गेले तेथे तेथे होता.

साठ्यांनी (पृष्ठ २८) म्हटल्याप्रमाणे पूर्वीच अनुवादित केलेले संगीत शाकुंतल पुण्यात किर्लोस्कराच्या रंगभूमीवर नव्या नटसंचासह पुढे आणले. बेळगाव समाचारच्या अंकात शाकुंतलाच्या बेळगावच्या त्या प्रयोगाचे वर्णन आलेच आहे त्यामुळे त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल शंका घेण्याचे कारणच नाही. अण्णासाहेबांच्या एकंदर आयुष्याचा विचार केला तर ते जणू काय नाटक आणि रंगभूमीच्या उन्नतीकरता, उत्कर्षाकरताच जन्माला आले होते असे वाटते. ते जर आणखी जगते वाचते तर त्यांनी रामराज्यवियोगाचे राहिलेले दोन अंक पुरे केले असते. आणि आणखीही नवी नाटके आपल्या कंपनीकरता लिहिली असती. प ऽ ऽ ण– ! अण्णांचे नाट्यप्रेम द्रव्यनिरपेक्ष

होते. आपल्या मंडळीकरता पैसा खर्च करताना त्यांनी स्वतःच्या अगर आपल्या कुटुंबियाच्याहिताचा मुळीच विचार केला नाही. मंडळीच्या उत्पन्नातून मला काही मिळावे अशी कधीही अपेक्षा त्यांनी मरेपर्यंत ठेवली नाही. ती चिंता त्यांच्यानंतर मोरोबा, भाऊराव यांनी वाहून अण्णांच्या पत्नीकरता उत्पन्नाच्या नफ्यात हिस्सा ठेवला हे वाचकांना या पुस्तकात आढळेलच. संस्थेकरता कायावाचामने करून देह झिजविणाऱ्या या लोकोत्तर पुरुषाचे नाव आजही टिकून आहे ते याच त्यांच्या निर्लोभी संस्थाप्रियतेमुळें म्हणूनच त्यांचे जीवन लोकोत्तर आहे, असामान्य आहे, सद्य:परिस्थितीत अत्यंत स्फूर्तिदायक आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

याच त्यांच्या गुणाबद्दल आदर बाळगणारे साठे आणि भाऊराव मोरोबांसारखे नट तर अण्णांच्या कीर्तीला धक्का पोहोचेल असे काहीही करीत नसत. अण्णांच्या प्रतिमेची स्थापना साठ्यांनी मुद्दामच अत्यंत भक्तीभावाने कंपनीत केली. तिला ' गादी ' म्हणतात. कंपनीतील नट या गादीपुढे रोज रात्री पंचपदी म्हणत असत. नंतर ही गादी किर्लोस्कर मंडळीतून निघालेल्या मंडळ्यांनीही स्थापिली, आणि पंचपदीचा प्रघात सुरू केला.

अण्णांबद्दलचा भक्तिभाव आणि किर्लोस्कर मंडळीवरील नितान्त प्रेम भाऊरावांच्या मृत्यूनंतरही टिकून होते. पण ते नटमंडळीतच. शंकरराव मुजुमदारासारखे जेव्हा मालकीत शिरले तेव्हा नटमंडळीची कदर ते करीनासे झाले. त्यांचा आर्थिक कारभार–विशेषतः किर्लोस्कर थिएटर हे गोंधळाचे प्रकार होते. नाही तर गंधर्व मंडळी व बलवंत मंडळी निघाली नसती ! साठ्यांनी किर्लोस्कर थिएटरबद्दल व त्यांच्या गैरहिशेबी व्यवहाराबद्दल शंकररावांना बजावले होते. ते थिएटर जर किर्लोस्कर मंडळीच्या मालकीचे झाले असते तर शंकररावांचे कर्तृत्व सिद्ध झाले असते. पण तसे त्यांना करता आले नाहीत. ते एक आतबट्ट्याचे व्यवहार ठरले.

त्यांनी केलेली उत्तम कामे म्हणजे रंगभूमी मासिक सुरू करणे, अण्णासाहेब व भाऊराव यांची चरित्रे लिहिणे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. या कामाला जर संस्थेच्या प्रेमाची व नट मंडळी टिकवून धरण्याची जोड त्यांनी दिली असती तर साठ्यांप्रमाणेच शंकरराव हे एक कर्तवगार सेक्रेटरी आणि मालक म्हणून ठरले असते. परंतु अंगी कुवत नसतांना शेख महंमदी इमले चढविण्याची त्यांची फाजील महत्त्वाकांक्षा यामुळे त्याच्या हातून झाले ते वाईटच ! शंकररावांच्या अफाट उद्योगाला आवर घालण्याचे धैर्य मालक नानासाहेब जोगळेकरांजवळ नव्हते. त्यामुळेच शंकररावांना चरायला कुरण मोकळे पडले होते. भाऊरावांमध्ये ती धमक होती. आणि मोरोबांचा भाऊरावांवर पक्का विश्वास होता. म्हणून साठे निवृत्त झाले. तरी मंडळीचा कारभार व्यवस्थित होता. भाऊराव किर्लोस्कर मंडळीत येण्यापूर्वी एक कारकूनच होते. त्यामुळे येताना हिशेबी वृत्तीच ते घेऊन आले होते. पुढे साठ्यांच्या सहवासात ही वृत्ती जोपासली गेली, त्याबरोबरच त्यांची शिस्त आणि संस्थाप्रेम ! मोरोबा निवृत्त झाल्यावर भाऊरावांनी त्यांना जे पत्र लिहिले आहे. ते मी वारंवार ज्यावर भर देत आहे, त्या-संस्थाप्रियतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. (पृ. ६६ ) त्यातील अखेरचे वाक्य मी येथे देतो म्हणजे वाचकांना माझे म्हणणे पटेल, ते असे : " आपण ईशस्तवनातसुद्धा कै. अण्णासाहेबांचे स्मरण व त्यांच्या संस्थेची उत्तरोत्तर बढती होऊन ती दीर्घायुषी होण्याची प्रार्थना करण्यास विसरू नये ही विनंती. " केवढे हे संस्थेवरील गाढ आणि सदैव जागृत असलेले प्रेम !

मोरोबा भाऊरावांच्या चरित्रावरून हे स्पष्ट होते की आपण आपापल्या भूमिकांना विशोभित दिसूं लागलो की त्यांना जळवाप्रमाणे चिकटून न बसतां त्यांचा त्याग करणे आणि आपल्याला शोभतील अशाच भूमिका स्वीकारणे. भाऊराव मोरोबाप्रमाणे कृष्णराव गोरे, चिंतोबा गुरव यांनी तेच केले. पुढे ते पुरुषभूमिका उत्तम करू लागले. दत्तोबा भोसले, केशवराव भोसले यांनी तेच केले. हे नवलाचे नव्हते पण योग्य होते. पुढील नटसम्राटांनी मात्र हे केले नाही. म्हणून त्यांचे वर्तन नवलाचे होते तसेच अयोग्यही होते.

नटांच्या व्यसनासंबंधी फारच कटुता त्या काळी समाजात होती. डॉक्टर, वकील, प्रोफसर व्यसनी झाले तर ते खपत होते. पण नटांनी छ: ! अब्रह्मण्यम् ! पण भाऊरावांचे अगर केशवरावांचे व्यसन त्यांच्या कलेच्या आड कधीच आले नाही. नाट्यप्रयोगाच्या दिवशी दोघेही व्रतस्थ असत. पण एवढे मात्र वाटते की ते व्यसनी नसते तर जास्त काळ जगते, आणि त्यांच्याकडून नाट्य आणि संगीत कलांचे संवर्धन अधिक झाले असते !

किर्लोस्कर मंडळीने खूप प्रतिष्ठा व लोकप्रियता मिळविली तसाच प्रतिष्ठितांचा लोभही संपादन केला. त्यात प्रो. केरूनाना छत्रे, न्या. रानडे, आगरकरांपासून श्री शाहू महाराजांपर्यंत थोर व्यक्ती मोडत होत्या. त्यांनी अण्णांची कंपनी म्हणजे 'आपली' कंपनी मानली. आणि तिला वेळोवेळी साहाय्य केले. लोकमान्यांनी कंपनीला जोगळेकर आणि बालगंधर्व ही गायक नटरत्ने मिळवून दिली. प्रक्षकांची तर ही मंडळी आवडतीच होती. या सर्वांचे खुलासेवार वर्णन या ग्रंथात आले आहे. त्यावरून अशिक्षितांपासून विद्वानांपर्यंत, सामान्यापासून राजेरजवाड्यांपर्यंत किर्लोस्कर मंडळी सर्वांना अति प्रिय होती, हे कळून येईल.

ी. साठ्यांनी डायऱ्या लिहून ही माहिती त्यांत ग्रथित केली आहे. शिवाय टिपणे वाडेही लिहून ठेवली. त्यांच्या जमाखर्चाच्या वह्या पाहिल्या तर त्या काळातील आर्थिक सुबत्तेची कल्पना येते. हे सर्व लिखाण डॉ. मु. श्री. कानडे यांनी लक्षपूर्वक वाचून हा ग्रंथ लिहिला हे फार मोठेच कार्य त्यांनी केले आहे. त्याखेरीज उपलब्ध असलेले इतर सर्व ग्रंथ वाचून त्यांचेही संदर्भ आपल्या लिखाणात ठिकठिकाणी पुष्टयर्थ किंवा स्पष्टीकरणार्थ घातले आहेत. डॉ. कानडे यांच्या परिश्रमांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांची चिकाटी, सत्यान्वेषणबुद्धी, साक्षेपी वृत्ती प्रशंसेस पात्र अशीच आहे.

प्रकाशकांनी त्यांची या कार्याकरिता निवड केली यात त्यांची गुणग्राहक दृष्टीच दिसते. प्रकाशकांनी परिशिष्टात कै. भाऊरावांच्या मृत्युपत्राची अस्सल नक्कल श्री. रामभाऊ साठे (कै. त्रि. ना. साठ्यांचे चिरंजीव) यांच्याकडून मूळ मृत्युपत्र मिळवून छापली आहे ही करामत विशेष आहे. याबद्दल दोघांसही मी धन्यवाद देतो. एकंदर नाट्य व रंगभूमीवरील वाङ्मयात या ग्रंथाची फार मोलाची भर पडली आहे. वाचक या ग्रंथाचे चीज करतील अशी अपेक्षा करून ही प्रस्तावना पुरी करतो.

'स्वरवंदना'
पुणे ४.

– के. वा. भोळे.

# नम्र निवेदन

कै. त्र्यंबक नारायण साठे हे किर्लोस्कर नाटक मंडळीचे सहा वर्षे आणि गंधर्व नाटक मंडळीचे एक वर्ष व्यवस्थापक होते. ते दररोज आपली दैनंदिनी लिहीत आणि त्यांनी मृत्यूच्या दिवसापर्यंत लिहिलेल्या सर्व दैनंदिनी त्यांच्या चिरंजीवांनी सांभाळून ठेवलेल्या आहेत. त्याखेरीज नाट्यक्षेत्रातील विविध कलावंतांशी त्यांनी जो पत्रव्यवहार केला तोही त्यांच्या वारसांनी जपून ठेवलेला आहे. स्वतः कै. साठे यांनी आपल्या किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापकीय जीवनातील काही आठवणी लिहूनही ठेवलेल्या आहेत. या सर्व लेखनाच्या आधाराने मराठी रंगभूमीच्या १८८० ते १९०१ या सुरुवातीच्या काळाबाबतचे एका रेखाचित्र काढणे एवढाच या पुस्तकाचा मर्यादित असा उद्देश आहे. कै. साठे यांचे हस्तलिखित लेखन हीच या पुस्तकाची मुख्य सामग्री आहे. या काळासंबंधी आ. वि. कुलकर्णी, गणपतराव बोडस, इत्यादि मंडळींनी जे लेखन केलेले आहे, त्याचा अगदी जरूर तेवढाच उपयोग केलेला आहे.

१८८४ ते १९०१ या काळात कै. साठ्यांचे आणि किर्लोस्कर मंडळीचे संबंध अत्यंत निकटचे आणि जिव्हाळ्याचे होते. भाऊराव कोल्हटकरांच्या मृत्युनंतर ते पूर्वीइतके राहिले नाहीत. त्यामुळे १९०१ पर्यंतच्या काल-खंडाचाच या पुस्तकात प्रामुख्याने परामर्श घेतलेला आहे. १९१३–१४ मध्ये कै. साठे गंधर्व नाटक मंडळीचे व्यवस्थापक असल्याने त्या वर्षातील नाट्य-जीवनाच्याही काही आठवणी यात समाविष्ट केलेल्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

पुण्याचे नाट्यप्रेमी प्रकाशक श्री. अनंतराव लिमये यांचा मराठी नाट्य परिषदेचा इतिहास लिहिण्याच्या निमित्ताने परिचय झालेला होताच. तो या निमित्ताने दृढ झाला आहे. श्री. अनंतरावांनी हे लेखन करण्याचे काम मजकडे सोपविले त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. कै. साठ्यांचे द्वितीय चिरंजीव श्री. रामचंद्र त्र्यंबक साठे यांनी आपल्या तीर्थरूपांचे सर्व कागदपत्र माझ्या स्वाधीन केले आणि अन्यही पुष्कळ साहाय्य केले; त्यांनाहि धन्यवाद देणे आवश्यक आहे. कै. साठ्यांचे कनिष्ठ चिरंजीव कै. डॉ. ब. त्र्यं. साठे यांनी रंगभूमीविषयक पुष्कळ लेखन (प्रकाशित व अप्रकाशित) केले आहे. त्याचाहि या पुस्तकासाठी उपयोग झालेला असल्याने त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करणे अवश्य आहे.

श्री. केशवराव भोळे यांनी प्रस्तावना लिहून आम्हा सर्वांनाच उपकृत केले आहे.

शेवटी, या पुस्तकाचे निकडीने मुद्रण करून देणारे श्री. स. म. खाडिलकर, आणि पुस्तकाचे वेष्टन तयार करणारे श्री. सुधाकर खासगीवाले यांचे आभार मानून हे निवेदन संपवितो.

पुणे,
दि. १० फेब्रुवारी, १९६८

– मु. श्री. कानड

# अनुक्रमणिका

प्रस्तावना – श्री. केशवराव भोळे

खंड १ – कै. त्र्यं. ना. साठे :
चरित्र व व्यक्तिमत्त्व.

खंड २ – किर्लोस्कर संगीत मंडळी

खंड ३ – किर्लोस्कर मंडळी :
कला व व्यवसाय

खंड ४ – किर्लोस्कर मंडळी व लोकाश्रय

परिशिष्ट १ – श्री. रामचंद्र त्र्यंबक साठे
यांनी लिहिलेल्या आठवणी

परिशिष्ट २ – कै. भाऊराव कोल्हटकर
यांचे मृत्युपत्र

---

मुखपृष्ठावरील चित्र
( २० ऑक्टोबर १८८४ )

**रामराज्यवियोग** – तिसऱ्या अंकातील शेवटचा प्रवेश : पात्रे – डावीकडून
१ दासी : वसिष्ट ( मोरोबा वाघुलीकर ),
दशरथ (अण्णासाहेब किर्लोस्कर),
सुमंत ( त्र्यंबकराव साठे )
१ दासी कैकेयी ( भास्करबोवा बखले )



# मराठी
# रंगभूमीचा उषःकाल

# आदर्श मित्र



कै. गुळवे सावकार



कै. त्र्यंबकराव साठे



खालापूर येथील मंदिर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक ... वि: ...
... नों: दि: ...
क्रमांक ...

# कै. त्र्यंबक नारायण साठे

# चरित्र व व्यक्तिदर्शन

## चरित्र–परिचय

कुलाबा जिल्ह्यातील खालापूर गाव ही त्र्यंबकराव साठे यांची जन्मभूमी. साठ्यांचे घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील असले तरी गेली सुमारे दीडशे वर्षे साठे मंडळीचे वास्तव्य खालापूर येथेच आहे. त्र्यंबकरावांचे वडील श्री. नारायण मोरेश्वर साठे हे प्रथम बरीच वर्षे पुण्यास होते. उत्तरायुष्यात मात्र त्यांनी खालापूर येथेच आपला पुढील काळ व्यतीत केला. त्यांनी चरितार्थासाठी व्यवसाय असा फारसा कोणताच केला नाही. त्यामुळे प्रापंचिक जीवन हे ओढगस्तीचेच होते. त्र्यंबकरावांचा जन्म खालापूर येथे दि. २३ एप्रिल १८५९ या दिवशी झाला प्राथमिक शिक्षण खालापूरलाच झाले. तेथील मराठी शाळेत इयत्ता सातवीपर्यंतचे शिक्षण पुरे करून त्यांनी ( Departmental ) खात्याची परीक्षाही दिली होती. पुढे इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी श्री. त्र्यंबकराव काही काळ कल्याण येथे राहात होते. परंतु कौटुंबिक परिस्थितीमुळे आणि त्यातच वडिलांना अर्धांगवायू झाल्या-

मुळे श्री. त्र्यंबकराव यांना आपले इंग्रजी शिक्षण अर्धवटच टाकून देऊन प्रपंचाची जबाबदारी उचलणे भाग पडले. वयाच्या सोळाव्या वर्षापासूनच त्यांना नोकरीपेशा पत्करावा लागला. वडील श्री. नारायणराव यांनी आर्थिक दृष्टीने आपल्या मुलासाठी तरतूद करून ठेवलेली नसली तरी दुसरी एक देणगी मात्र श्री. त्र्यंबकराव यांना देऊन ठेवली होती ती म्हणजे संगीत व नाटक या कलांच्या विषयीची आवड. वडील संगीत व नाटकांचे शौकीन असल्यामुळे त्र्यंबकरावांच्या मनात या ललितकलांविषयी आवड निर्माण झाली व अनुकूल वातावरणात ती वाढत गेली. अगदी अल्पवयात प्रपंचाची ही जबाबदारी या कलांमुळे सुसह्य झाली.

### गुळवेशेठजींच्या सहवासात

१८७७ मध्ये साठे यांनी सरकारी महसूलखात्यात हंगामी व बदली तलाठ्याची नोकरी पत्करली. ती पुढे तीन वर्षे, म्हणजे १८८० पर्यंत ते करीत होते. मात्र ही नोकरी संपूर्ण वेळ नसून वर्षातले काही महिनेच ती मिळत असे. १८७७–७८ च्या सुमारास साठे यांच्या जीवनाला कलाटणी देणारी एक अत्यंत महत्त्वाची व त्यांच्या भावी जीवनातील उत्कर्षाला कारणीभूत ठरलेली घटना घडून आली. पनवेल येथील एक धनाढ्य व्यापारी, ललितकलांचे भोक्ते व विद्वानांचे चाहते श्री. विठोबा खंडाप्पा गुळवे आणि साठे यांचा प्रथम परिचय झाला. हा परिचय साठे यांना अत्यंत लाभदायक ठरला. त्या दोघांच्या स्वभावांतील परस्परानुकूलतेमुळे श्री. गुळवे यांच्या मृत्यूपर्यंत हा स्नेह वृद्धिंगत होत गेला. श्री. गुळवे हे व्यापारी असले तरी रसिक व बुद्धिमान असल्यामुळे, आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्वामुळे त्यांनी त्या काळच्या अग्रगण्य अशा मंडळींचा मोठा परिवार मित्रभावाने जोडलेला होता. केरूनाना छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर न्यायमूर्ती रानडे, महादेव चिमणाजी आपटे, बाळ मंगेश वागळे, डॉ. अ. मो. कुंटे, अण्णासाहेब किर्लोस्कर असे थोर थोर पुरुष त्यांचे जिव्हाळ्याचे स्नेही होते. प्रतिवर्षी, पावसाळ्याच्या दिवसांत श्री. गुळवे पुणे येथील आपल्या हवेलीत वास्तव्य करीत, त्या वेळी त्यांचा विद्वत्सहवास रात्रंदिवस चालू असे. श्री. गुळवे यांच्या साहाय्यामुळेच साठे यांची जी नोकरी हंगामी

स्वरूपाची होती तिचे कायम तलाठ्याच्या नोकरीत १८८० मध्ये रूपान्तर झाले. वळणदार मोडी हस्ताक्षर, जमाखर्च लिहिण्यातील प्राविण्य, आणि चोख वागणूक या गुणांमुळे साठे यांचा परिचय झाल्यानंतर अल्पावधीतच श्री. गुळवे यांना त्यांच्याविषयी आपुलकी निर्माण होऊन हळूहळू तिचे रूपान्तर पुढे जिव्हाळ्याच्या स्नेहात झाले. श्री. गुळवे यांच्यासारख्या प्रतिष्ठित व गुणज्ञ माणसाच्या सहवासात साठे यांच्या स्वभावाची घडण झाल्यामुळे विद्यालयीन शिक्षण बेताचे असतानासुद्धा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एखाद्या सुविद्य तरुणाच्या स्वभावातील सुसंस्कृतपणा आणि प्रतिष्ठितपणा प्राप्त झाला. इ. स. १८८४ मध्ये श्री. गुळवे हे कलकत्ता येथे भरलेले औद्योगिक प्रदर्शन पाहण्याच्या निमित्ताने उत्तर हिंदुस्थानचा दौरा करण्यास निघाले त्या वेळी त्यांनी आपल्याबरोबर साहाय्यक म्हणून साठे यांना घेतले होते. प्रदर्शन पाहून परत येताना श्री. गुळवे आपल्या मंडळीसमवेत इंदूर येथे उतरले. श्री. अण्णासाहेब किर्लोस्कर हे आपल्या नट-मंडळीसह त्या वेळी तेथेच श्रीमंत होळकर सरकारांचे पाहुणे कलाकार म्हणून इंदूर येथे कालक्रमणा करीत होते.

### किर्लोस्कर नाटक मंडळीचे सेक्रेटरी

अण्णासाहेबांच्या शाकुंतल व सौभद्र या नाटकांचे प्रयोग महाराष्ट्रात रसिकमान्य झालेले होते, आणि या प्रयोगांनी द्रव्यप्राप्तीही चांगली होत होती. परंतु त्यांच्या कंपनीला (समूहाला) कोणत्याही प्रकारचे घटनात्मक, नियमबद्ध अशा आचारपद्धतीचे बंधन नसल्यामुळे किर्लोस्कर मंडळीचा सर्व कारभार अत्यंत अस्ताव्यस्त स्वरूपाचा झालेला होता. नटांचे व अन्य नोकरवर्गाचे पगार निश्चित नव्हते. रोज जमाखर्च लिहिण्याची काहीच व्यवस्था नव्हती. आर्थिक व्यवहारावर देखरेख ठेवणारा कोणीच नसल्यामुळे नाट्यप्रयोगांना भरपूर उत्पन्न होत असले तरी मंडळीच्या जीवनाला स्थैर्य व पद्धतशीरपणा नव्हता. गुळवे व अण्णासाहेब यांनी या सर्व गोष्टींचा सर्व दृष्टींनी विचार करून किर्लोस्कर मंडळीचा नवीन कारभार हिशेबी व आखीव पद्धतीने करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांना व्यवहारदक्ष व प्रामाणिक अशा हिशेबी व्यवस्थापकाची प्रथम आवश्यकता होती. गुळव्यांनी त्या

जागेसाठी साठे यांचे नाव अण्णासाहेबांना सुचविले आणि त्यांनी संमती दिल्यामुळे मे १८८४ पासून साठे किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापकाच्या जागेवर रुजू झाले. सरकारी नोकरीत तलाठी म्हणून काम करणाऱ्या माणसावर एका प्रथम श्रेणीच्या नाट्यसंस्थेचा कारभार पाहण्याची जबाबदारी आकस्मिकपणे येऊन पडल्यामुळे तो थोडासा गांगरून जाणे स्वाभाविकच आहे. साठे त्या बाबतीत गुळवे यांना म्हणाले, "अप्पासाहेब, मी खेडवळ, अशिक्षित तलाठी. माझ्यावर हे केवढे संकट आपण घालीत आहां." गुळवे प्रेमाने उत्तरले, "साठ्या, तूच या कामाला लायक आहेस. यश मिळवशील व अण्णांच्या संस्थेचा कारभार नीट सांभाळशील." गुळव्यांचा हा विश्वास किती दूरदृष्टीचा होता, तो साठ्यांनी आपल्या कामगिरीने अक्षरशः खरा करून दाखवला. २१ मे १८८४ ते १५ एप्रिल १८९० या सहा वर्षांच्या कालावधीत साठे यांनी नाटक मंडळी सारखे अत्यंत गुंतागुंतीचे व अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्यांचे अंगावर येऊन पडलेले काम अत्यंत दक्षतेने व चोखपणे पार पाडले; आणि सर्वांचे धन्यवाद मिळवून १८९० मध्ये त्यांनी सन्मानपूर्वक किर्लोस्कर मंडळीचा निरोप घेतला.

साठ्यांचे कर्तृत्व अनुभवणाऱ्या किर्लोस्कर मंडळीच्या चालकांची साठ्यांनी संस्था सोडू नये अशी फार इच्छा होती. त्यासाठी साठ्यांना भागीदारी देण्याचीही त्यांनी तयारी दर्शविली होती. परंतु साठ्यांनी आपला विचार बदलला नाही. 'नाटक धंद्यातून मानाने व अब्रूने बाहेर पडण्याची ही संधी गमावू नको' असा सल्ला श्री. गुळवे यांनीच दिल्यामुळे साठ्यांचा विचार पक्का झाला. १७ एप्रिल १८९० या दिवशी त्यांनी किर्लोस्कर मंडळीतील नोकरी सोडली. किर्लोस्कर मंडळीने त्यानिमित्त एक लहानसा निरोपसमारंभ घडवून आणला. मंडळीने साठे यांना थाटाची मेजवानी दिली आणि त्यांच्या कामगिरीबद्दल रोख रुपये पाचशे आणि एक शालजोडी देऊन त्यांचा सत्कार केला.

किर्लोस्कर मंडळीचे व्यवस्थापक म्हणून त्यांनी केलेल्या कार्यात त्यांच्या अंगच्या अनेक गुणांच्या आविष्काराला चांगले क्षेत्र उपलब्ध झाले, आणि त्याचबरोबर त्यांचे अनुभवक्षेत्रही विस्तारले. किर्लोस्कर मंडळीसारख्या

समाजातील सर्वांच्या कौतुकाला पात्र ठरलेल्या नाटयसंस्थेतील नोकरीमुळे साठयांचे वैयक्तिक जीवनही समृद्ध झाले. अण्णासाहेब, भाऊराव, मोरोबा यांच्यासारख्या लोकोत्तर कलावंतांच्या सहवासाचे भाग्य, ठिकठिकाणच्या मुक्कामांत तेथील मान्यवर मंडळींशी जुळणारे स्नेहसंबंध, बडया सरकारी अधिकाऱ्यांच्या ओळखी, या गोष्टींमुळे आर्थिक गोष्टीपेक्षाही साठे यांना बौद्धिक व मानसिक दृष्टीने फार फायदा झाला. त्यांच्या हिशेबी, कर्तव्यदक्ष व कसोटीच्या कारभारामुळेच किर्लोस्कर मंडळीची भरभक्कम पायावर उभारणी झाली. हे ध्यानात घेतले म्हणजे साठे यांच्या या सहा वर्षांतील नोकरीचे मराठी रंगभूमीच्या इतिहासातील महत्त्व मनावर ठसल्याखेरीज राहात नाही. अण्णासाहेबांच्या कर्तृत्वामुळे भाऊराव, मोरोबा यांसारखे कलावंत एकत्रित येऊन महाराष्ट्राचे कलाजीवन संपन्न झाले हे त्यांचे श्रेय कोणीच अमान्य करणार नाही. परंतु त्यांनी प्रवर्तित केलेली ही दिव्य परंपरा चिरस्थायी करण्याच्या श्रेयात भाऊराव मोरोबा यांच्याप्रमाणे साठे यांच्या कारभाराचाही वाटा आहे हे विसरता येणार नाही. व्यवहारदक्षता, शिस्तप्रियता, निर्भीडपणा, सचोटी, हिशेबीपणा इत्यादी त्यांच्या गुणांमुळेच त्यांना हे शक्य झाले. मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांना त्यांच्या या कार्यपद्धतीची माहिती होणे हे याच दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या कारभाराची वैशिष्टये पाहण्यापूर्वी त्यांच्या पुढील जीवनाचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

### मिरज नगरपालिकेचे सेक्रेटरी

किर्लोस्कर मंडळीत असतानाच मिरज संस्थानचे कारभारी रा. ब. चित्रे यांचा व साठे यांचा परिचय झाला होता. साठयांच्या कार्यपद्धतीची व स्वभावाची चांगली माहिती असल्यामुळे चित्रे यांनी मिरजेचे अधिपती श्रीमंत बाळासाहेब पटवर्धन यांच्या संमतीने साठयांना आपल्याकडे बोलावून घेतले, व मिरज नगरपालिकेचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नेमणूक केली. १२ एप्रिल १८९० ते १५ जानेवारी १८९९ एवढा काळ साठयांनी ही नोकरी केली. या काळात गावातील रस्त्यांची देखरेख, साप्ताहिक बाजाराची व्यवस्था या नित्याच्या कामांबरोबरच वस्तुसंग्रहालय, प्राणिसंग्रहालय, ग्रंथालय, या

गोष्टींकडेही त्यांनी विशेष लक्ष दिले. मिरजेचे धन्वंतरी म्हणून ख्यातनाम झालेल्या डॉ. वॉनलेस यांच्या कार्याची सुरवात साठ्यांच्याच कारकीर्दीत झाली. १८९४ मध्ये डॉ. वॉनलेस यांनी स्थापन केलेल्या धर्मार्थ रुग्णालयाच्या कामात साठे यांचाही मोठा वाटा होता. डॉ. वॉनलेस व साठे यांचे परस्परसंबंध यामुळे फार आपुलकीचे झाले होते. मिरजेवर प्लेगची आपत्ती ओढवली, त्या प्रसंगी साठे यांनी प्लेग-अधिकारी म्हणून जी दक्षता घेतली त्याबद्दल डॉ. वॉनलेस यांनी पुढील उद्गार काढले, "I have seen much of his work as a plague officer and it gives me great pleasure to testify to his faithfulness, honesty and business-ability." ( 5th Nov. 1898)

त्यांचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या काही मत्सरी लोकांनी 'साठे यांनी हॉटेलात चहा व बिस्किटे घेतली' असा आळ घेऊन त्यांच्यावर बहिष्कार घालण्याची पराकाष्ठा केली. हे ग्रामण्य प्रकरण सतत चार वर्षे धुमसत होते. परंतु साठ्यांनी आपल्या निरपराधीपणाच्या खात्रीने कोणतेही प्रायश्चित्त घेण्याचे नाकारले. श्रीमंतांनीही साठ्यांचीच बाजू घेतल्यामुळे साठे या प्रसंगातून निष्कलंकपणे बाहेर पडले.

मराठी नाट्यकलेच्या व रंगभूमीच्या दृष्टीने साठे यांनी मिरजेच्या वास्तव्यात असताना एक चिरस्थायी स्वरूपाची कामगिरी पार पाडली. त्यांच्याच खटपटीने मिरजेच्या अधिपतींनी मिरज गावात एका पक्क्या व बंदिस्त नाट्यगृहाची उभारणी केली. १८८४ मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांची व मिरजेच्या अधिपतींची भेट झाली. त्या प्रसंगी मिरज येथे नाट्यगृह बांधवून घेण्याची सूचना अण्णांनी केली होती. साठे सेक्रेटरी झाल्यानंतर त्यांनी नाट्यगृहाच्या उभारणीचा प्रश्न नेटाने पुढे मांडून श्रीमंतांची मंजुरी मिळविली. ५ ऑक्टोबर १८९७ रोजी विजयादशमीच्या सुमुहूर्तावर रात्री १० वाजता श्रीमंत अण्णासाहेब मळेकर यांच्या हस्ते नाट्यगृहाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम दरबारी थाटाने साजरा झाला. साठे यांनी त्या बाबतीत जे परिश्रम घेतले होते त्याबद्दल मिरजेच्या अधिपतींनी त्यांना चांदीचे एक

बहुमोल घड्याळ त्याच समारंभप्रसंगी बक्षीस दिले. श्रीमंतांच्या इच्छेनुसार नाट्यगृहाची सुरवात करण्याचा मान किर्लोस्कर नाटक मंडळीलाच देण्यात आला. देवलांच्या शापसंभ्रम नाटकाच्या प्रयोगाने नाट्यगृहातील प्रयोगांचा शुभारंभ झाला.

साठे यांच्या मिरज येथील एकंदर कामाबद्दल तेथील कारभारी रा. ब. चित्रे यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.– " Shri. Sathe is very diligent and hard-working. He knows his work thoroughly and performs it carefully and expeditiously. He is thoroughly honest and he works to the satisfaction of oll concerned."

( 31st May 1893 )

### किर्लोस्कर मंडळीचे बोलावणे

मिरजेच्या नोकरीत असतानाच १८९१ मध्ये किर्लोस्कर नाटक मंडळीचे तारू जरा डळमळू लागल्यामुळे तिला अनुभवी कर्णधाराचे मार्गदर्शन हवे होते. संस्था कशी तरी चालू ठेवण्यापेक्षा ती आपणहून बंद करावी अशा विचाराने भाऊराव कोल्हटकरांनी मिरजेच्या कारभाऱ्यांना पत्र पाठवून किर्लोस्कर मंडळीचा पसारा व्यवस्थितपणे आवरण्यासाठी श्री. साठे यांना दोन महिन्यांची रजा द्यावी अशी विनंती केली होती साठे त्याप्रमाणे पुन्हा तीन महिने किर्लोस्कर मंडळीत गेले. तेथ गेल्यावर कारभाराला पुन्हा एकदा शिस्त लावून आणि मुख्य म्हणजे संस्था बंद न करता चालू ठेवण्याविषयी भाऊरावांचे मन वळवून ते परत आले.

### जमखंडी संस्थानातील मामलेदार

साठे यांचा मिरज येथील नोकरीचा लौकिक ऐकून जमखंडी सरकारने आपल्या पोलिटिकल एजंटामार्फत साठे यांना आपल्या संस्थानच्या सेवेत मागून घेतले. त्याप्रमाणे साठे मिरज नगरपालिकेच्या नोकरीतून निवृत्त होऊन जानेवारी १८९९ मध्ये जमखंडी संस्थानचे सेवक म्हणून आपल्या नव्या कामगिरीवर रुजू झाले. तेव्हापासून जुलै १९११ पर्यंत त्यांनी

जमखंडी संस्थानची विविध प्रकारे नोकरी बजावली. कुंदगोळ तालुक्याचे मामलेदार व सेकंड क्लास मॅजिस्ट्रेट म्हणून तेथेहि त्यांची नेमणूक झाली होती. काही काळ त्यांना मुख्य पोलीस अधिकारी म्हणून काम करावे लागले. आणि आपल्या कर्तव्यदक्ष स्वभावाला अनुसरून अंगावर पोलिसी गणवेष चढवून आणि कमरेला तलवार लटकावून साठे यांनी ते कामही यशस्वीपणे करून दाखवले. १९११ मध्ये १२ वर्षांच्या नोकरीचे निवृत्तिवेतन घेऊन ते जमखंडी संस्थानातून बाहेर पडले.

## किर्लोस्कर मंडळीकडून पुन्हा निमंत्रण

या वेळी किर्लोस्कर मंडळीत मालक व मुख्य नट असलेले श्री. नाना साहेब जोगळेकर यांनी साठे यांच्या जमखंडी संस्थानच्या निवृत्तीची वार्ता ऐकून पुन्हा एकदा त्यांचे अनुभवी व व्यवहारी मार्गदर्शन किर्लोस्कर मंडळीला मिळवण्याचा प्रयत्न केला. दि. १७ ऑक्टोबर १९११ या दिवशी जोगळेकर हुबळीहून मिरजेला आले व साठे यांच्याकडे उतरले. दोघांचा अनेक वर्षांचा परिचय व स्नेहभाव होता. त्या भेटीत त्या दोघांत पुढील-प्रमाणे संवाद झाला. —

**जोगळेकर–** साठे, आता तुम्ही रिकामेच आहांत. आता आमच्याकडे रहा व आम्हांला सांभाळा. आता दुसरी नोकरी करू नका

**साठे–** शंकरराव (मुजुमदार) आहेतच. मग माझा काय उपयोग ?

**जोगळेकर–** शंकरराव थिएटर, प्रवास वगैरे गोष्टी पाहतील, तुम्ही आमचा हिशेब साभाळा. तुम्हीच ते काम करू शकाल. मला तुम्ही व-शंकरराव दोघेही हवेत.

**साठे–** एका म्यानात दोन सुऱ्या राहणार कशा ?

**जोगळेकर–** (स्वतःच्या छातीवर हात ठेवून) ही म्यान खूप मोठी आहे !

या भेटीनंतर दुर्दैवाने अवघ्या २८ दिवसांनंतरच जोगळेकरांचे अकाली आणि आकस्मिक निधन झाल्यामुळे ही बोलणी निष्फळ ठरली.

यानंतर महिनाभर ते मुंबई येथे श्री. व्यंकटराव देवल यांच्या आग्रहावरून त्यांच्या सर्कसचे मॅनेजर म्हणून काम पहात होते. परंतु तेथे मन न रमल्या-

मुळे ते लगेच परत आले. त्या वेळी त्यांना मुंबईच्या सरदारगृहाचे मालक कै. विसुभाऊ जोगळेकर यांनी आपले मॅनेजर होण्यासाठी पुष्कळ गळ घातली, परंतु साठ्यांनी ते काम आभारपूर्वक नाकारले.

### गंधर्व नाटक मंडळी

या वेळी त्यांची पन्नाशी उलटून गेली होती. नित्याची जागरणे करणे त्यांच्या प्रकृतीला फारसे मानवणारे नव्हते. परंतु त्यांनी किर्लोस्कर मंडळीत असताना जे कर्तृत्व दाखविले होते आणि जे स्नेहसंबंध जुळविले होते, त्यांनी साठ्यांना परत नाट्यसृष्टीत ओढून नेले.

त्यांनी ज्या किर्लोस्कर मंडळीच्या कारभाराची अत्यंत पद्धतशीर आखणी करून दिली होती ती व्यवस्था भाऊराव कोल्हटकर हयात होते तोपर्यंत टिकली. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर शंकरराव मुजुमदारांच्या हाती संस्थेचे चालकत्व गेल्यानंतर ती व्यवस्था हळूहळू ढासळण्यास प्रारंभ झाला; आणि जोगळेकरांच्या निधनानंतर संस्थेची शकलेच उडाली. मुजुमदार व बालगंधर्व, टेंबे, बोडस यांच्यात संस्था चालविण्याच्या पद्धतीसंबंधी आणि परस्परांच्या हक्कांसंबंधी तीव्र स्वरूपाचे मतभेद होऊन १९१३ मध्ये वरील तिघांनी पुणे येथे आपल्या गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली. त्या तिघांपैकी गणपतराव बोडस आणि साठे यांचा परिचय फार पूर्वीचा आणि आपलेपणाचा होता. मुजुमदारांशी न पटल्यामुळे किर्लोस्कर मंडळीत पुन्हा पाऊल न घालण्याची प्रतिज्ञा केलेले देवल मास्तर नव्या संस्थेच्या पाठीशी होते. त्यांचे आणि साठ्यांचे संबंध तर फारच लोभाचे होते. बोडस आणि देवल या दोघांनीही किर्लोस्कर मंडळीची परंपरा नव्या संस्थेत निर्माण करणारा व्यवस्थापक असावा या दृष्टीने साठ्यांना अतिशय आग्रहाने गंधर्व मंडळीच्या कारभाराची सूत्रे हाती घ्यायला लावली. त्यांची भीड न मोडवल्यामुळे साठे यांनी एक वर्षाकरिता गंधर्व मंडळीचे मॅनेजर म्हणून काम करण्यास संमती दिली, आणि त्याप्रमाणे २३ ऑगस्ट १९१३ ते २२ ऑगस्ट १९१४ पर्यंत तेथे राहून गंधर्व मंडळीच्या उभारणीच्या कामी आपल्या अनुभवी कार्यपद्धतीचा शक्य तेवढा उपयोग केला. त्यामुळे किर्लोस्कर मंडळीच्या

जीवनातील अनेक वैशिष्टचे गंधर्व मंडळीच्या कारभारात अगदी प्रारंभापासून निर्माण झाली. जमाखर्च पद्धती निश्चित करणे, नटांच्या जेवणाखाण्याची अत्यंत समाधानकारक व्यवस्था ठेवणे, गुड-कॉंडक्ट निधीची तरतूद करणे, त्रिवर्ग मालकांचे भागीपत्र करणे, नट व नोकर यांच्या गुणदोषांची नोंद ठेवणे, इत्यादी अनेक गोष्टींमुळे गंधर्व मंडळीची उभारणी अत्यंत व्यवस्थित व काटेकोर पध्दतीने झाली. गंधर्व मंडळीत त्यांना दरमहा ९० रु. पगार मिळत असे.

तथापि पाव शतकापूर्वी किर्लोस्कर मंडळीचा कारभार करताना साठ्यांना त्या संस्थेतील समवयस्क असणाऱ्या व संस्थेविषयी निष्ठेने आणि एकदिलाने वागणाऱ्या नटवर्गाबरोबर सेक्रेटरीचे काम करताना जो हुरूप वाटत होता तो या नव्या संस्थेतील तरुण मालकांच्याबरोबर वागताना वाटला नाही. बदलत्या काळाबरोबर सहकारी व संस्था यांच्यासंबंधीच्या भावनाही बदलल्या होत्या. त्यामुळे वर्षभर काम केल्यानंतर साठ्यांनी गंधर्व नाटक मंडळीची सूत्रे खाली ठेवली. गंधर्व मंडळीतील आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या दिवसाचे ( दि. २२–८–१९१४ ) वर्णन करताना ते लिहितात, "आज सायंकाळी मंडळीत प्रेझेंट–नियमाप्रमाणे प्रेझेंट दिले. चांदीच्या चहा-दाणीतून चहा करून मला दिला. हार–तुरे, अत्तर, लव्हेंडर, पानसुपारी कै. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या तसबिरीसमोर गौरवाने देऊन माझी रवानगी केली. बोडस व टेंबे स्टेशनवर मला पोहोचविण्यास आले होते."

### मलवडीकर घाटगे यांचे कारभारी

साठे यांच्या आयुष्यातील ही अखेरची नोकरी. १९१४ ते १९२८ अशी चौदा वर्षे राजे घाटगे मलवडीकर यांच्या जहागिरीचे व्यवस्थापक या नात्याने नेहमीच्या चोख पद्धतीने व्यवस्था पाहून १९२८ मध्ये त्यांनी त्या नोकरीतून स्वतःला मुक्त करून घेतले.

साठे यांच्या आयुष्यातील ५२ वर्षे त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी नोकऱ्या केल्या, आणि प्रत्येक ठिकाणी आपल्या शिस्तशीर, प्रामाणिक व व्यवहारदक्ष कारभाराने सर्वांकडून धन्यवाद मिळवले. १९२८ मध्ये ते अखेरच्या नोकरी-

तून मोकळे झाले त्या वेळी त्यांचे वय सत्तरीला आले होते. तीनही चिरंजीव सुविद्य होऊन आपापल्या पायावर उभे राहिले होते. तेव्हा त्यानंतर कोणत्याही नोकरीच्या बंधनात न पडता आपले उर्वरित आयुष्य मुलां-नातवंडांच्या व लेकीसुनांच्या प्रेमळ सहवासात व्यतीत करण्याचे त्यांनी ठरविले. खालापूरच्या त्यांच्या जन्मभूमीविषयी त्यांच्या मनात अत्यंत आत्मीयतेची भावना असल्यामुळे तेथेही ते राहात असत. आपल्या कर्तृत्वामुळे, गरिबीत जन्माला येऊनही, त्यांनी 'विना दैन्येन जीवन' घालविले होते. त्यांना मरणहि अनायासेच येण्याचे भाग्य लाभले. १३ एप्रिल १९३४ या दिवशी नित्याप्रमाणे सकाळचे कार्यक्रम करून, हिशेब व डायरी लिहून ते स्नानाला गेले आणि स्नानानंतर नेहमीच्या पद्धतीने प्राणायाम करू लागले;--आणि प्राणायाम करता करताच त्यांनी मान टाकली ती कायमचीच !

• • •

# व्यक्तिदर्शन

**समसमा–संयोग**

साठे यांच्या जीवनकार्याला जे महत्त्व आहे ते त्यांनी किर्लोस्कर मंडळीचे व्यवस्थापक म्हणून जो आदर्श निर्माण करून ठेवला त्यामुळे आहे. अन्य ठिकाणी त्यांनी जी नोकरी केली ती अत्यंत यशस्वीपणे केलेली असली तरी त्याला फक्त साठे यांच्या वैयक्तिक जीवनातच महत्त्व आहे. परंतु किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापनाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी ज्या पद्धतीने नाट्यसंस्थेच्या दैनंदिन जीवनाची आचारसंहिता निर्माण केली तिला मराठी रंगभूमीच्या इतिहासात अपार महत्त्व आहे.

प्रापंचिक जीवनात प्रवेश केल्यानंतर साठे यांना श्री. गुळवे यांच्या-सारख्या यशस्वी माणसाचा निकटचा सहवास प्राप्त झाला ही घटना त्यांच्या भावी सफल जीवनाची नांदीच ठरली. त्यांच्याच मार्गदर्शनाने एखाद्या संस्थेचे नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असलेला गुणसंचय साठे यांनी करून घेतला. गुळवे यांच्या स्वभावातील व्यवहारपटुत्व, दूरदर्शीपणा, हिशेबीपणा, लोकसंग्राहकता, प्रामाणिकपणा, स्नेहभाव अशी अनेक वैशिष्ट्ये साठे यांनी अनेक वर्षांच्या सहवासाने अवलोकन केली होती. ती पाहिल्यानंतर यशस्वी जीवनाची गुरुकिल्लीच त्यांना गवसली असली

तर नवल नाही. अशाच परिस्थितीत किर्लोस्कर मंडळीसारख्या नामवंत नाट्यसंस्थेशी जुळलेला संबंध, अण्णासाहेब किर्लोस्करांसारख्या युगप्रवर्तक नाटककाराचे जवळून पाहिलेले स्वभावविशेष, मोरोबा, भाऊराव, बाळकोबा यांसारख्या लोकोत्तर कलावंतांचा लाभलेला सहवास, गावोगावच्या विद्वान, प्रतिष्ठित व सत्ताधारी माणसांशी येणारे संबंध, आणि फिरत्या व्यवसाया-मुळे ठिकठिकाणी मिळणारे अनंत प्रकारचे अनुभव– या सर्वांमुळे साठे यांच्या कर्तबगार जीवनाची घडण झाली. त्यांच्या कर्तबगारीला किर्लोस्कर मंडळी-तील अण्णासाहेब, भाऊराव, मोरोबा यांच्यासारख्या शिस्तप्रिय चालक मंडळीची जोड मिळाल्यामुळे त्यांच्या गुणांचे चीज झाले. या समसमा संयोगा-मुळेच मराठी नाट्य व्यवसायाची अगदी सुरवातीची अवस्था असतानाही किर्लोस्कर संगीत मंडळीला सर्व प्रकारच्या आपत्तींतूनही पुढे वाटचाल करणे शक्य झाले. साठ्यांच्या चरित्राला महाराष्ट्राच्या कलात्मक जीवनात जे महत्त्वाचे स्थान देणे अवश्य आहे ते याच दृष्टीने. किंबहुना मराठी रंगभूमीच्या इतिहासातील अविस्मरणीय अशा प्रभातकालाचे अवलोकन करताना, साठे यांच्या स्वभाववैशिष्ट्याचे व कार्यपद्धतीचे अवलोकनही रंगभूमीच्या पाइकांना आणि जिज्ञासूंना उद्बोधक वाटल्याशिवाय राहणार नाही.

### कलाप्रेमी व्यवस्थापक

किर्लोस्कर मंडळीच्या प्रपंचात साठे अतिशय रमलेले होते याचे एक कारण म्हणजे ते जातिवंत रसिक होते.

### जन्मजात रसिकता

साठे यांच्या डायरीतील नोंदी पाहणाऱ्या वाचकाला त्यांचा नाट्य–संगीत–वादन इत्यादी कलांविषयीचा जबरदस्त शोक नजरेस पडल्याशिवाय राहात नाही. लहानपणापासून नाटके पाहण्याचे त्यांना वेडच लागले होते, आणि ते पुढेही वाढत गेले. वार्षिक उत्सवांत होणारी खेड्यापाड्यातील हौशी लोकांची नाटके, दुय्यम प्रतीच्या नाट्यसंस्थांची नाटके, इतकेच नव्हे तर पारशी, बंगाली, युरोपियन या लोकांची नाटके– या सर्वांबद्दलच साठ्यांना आकर्षण होते; आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या थरांतील नटांची

नाटके पाहिल्याचे निर्देश त्यांच्या रोजनिशांतून आढळतात. लोकनाट्याच्या (त्या वेळच्या तमाशाच्या) कार्यक्रमासही ते वेळोवेळी आश्रय देत. त्यात कमीपणा मानत नसत. चांगल्या वादनाबद्दलही ते उत्सुक असत. जयपूरला गेले तेव्हा रजबअल्लीखाँचे सतार व दिलरुबावादन ऐकून आले. इंदूरला तर बंदेअल्लीखाँच्या घरी जाऊन त्यांनी बीनवादनाचा कार्यक्रम ऐकला. ग्वाल्हेरला अमीरखांचे सतारवादन ऐकल्यावर, 'अशी सतार पूर्वी फक्त इम्रतखांची ऐकली होती, फार उत्तम वाजवली.' असा अभिप्राय नमूद करून ठेवायला ते विसरले नाहीत.

लहानपणी खालापूरला होणाऱ्या ललिताच्या कार्यक्रमातील 'नारायण-रावांच्या वधाचा फार्स' झाला, त्यात साठ्यांनी 'नारायणरावांचा पार्ट' केला होता. पुढे किर्लोस्कर मंडळीत असतानाही त्यांना व्यवस्थापकाची भूमिका बाजूला ठेवून नटाच्या भूमिकेत प्रवेश करण्याचा प्रसंग येई. सौभद्र नाटकात बळरामाचे काम करण्याची त्यांच्यावर ४–५ वेळा पाळी आली होती. त्याबद्दल 'बळरामाचे सोंग मी घेतले होते' एवढाच त्यांनी निर्देश केलेला आहे. अण्णांच्या रामराज्यवियोग नाटकात तर सुमंताची भूमिका त्यांनी अनेक वेळा केलेली आहे. त्या नाटकाची जी छायाचित्रे आज उपलब्ध आहेत त्यांपैकी काही प्रवेशांत सुमंताच्या भूमिकेतील साठ्यांचे दर्शन घडते. संगीत व नाट्य या क्षेत्रांतील अनुभवी रसिकतेमुळेच प्रथम किर्लोस्कर मंडळीतील आणि नंतर गंधर्व मंडळीतील गायकांच्या व नटांच्या कलागुणांचे त्यांनी काही ठिकाणी उत्तम परीक्षण केलेले आहे.

### लोकसंग्रही वृत्ती

नाट्यव्यवसाय सुरळीत चालविण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींचे सहकार्य मिळवणे अवश्य असते. मामलेदार कचेरी, पोलीस कचेरी, म्युनिसिपालिटी, रेल्वे खाते, गावातील सन्मान्य गृहस्थ, संस्थानिकांचे कारभारी, व्यापारी, कलावंत, नाटककार– अशा अनंत प्रकारच्या माणसांशी प्रेमाचे संबंध ठेवणे हे एक दिव्यच आहे. यांतील कोणतीही नाराज झालेली व्यक्ती केव्हा नाटक मंडळीची अडवणूक करील याचा नेम नाही. साठ्यांनी

या बाबतीत कौतुकास्पद यश मिळवले होते. प्रत्येक लहान-मोठ्या गावातील चारदोन वजनदार माणसांशी लोभ जडलेला असला म्हणजे मुक्काम निर्विघ्नपणे पार पडतो हे अनुभवाने ध्यानात ठेवून साठे यांनी आपल्या वृत्तीला पहिल्यापासून मनमिळाऊ स्वरूप दिले. त्यांच्या स्वभावामुळे, कारभारातील टापटिपीच्या व्यवस्थेमुळे, आणि सचोटीच्या व्यवहारामुळे, त्यांनी किर्लोस्कर मंडळीच्या नोकरीत असताना शेकडो स्नेही जोडले व टिकवले. किर्लोस्कर मंडळीला तिच्या स्थापनेपासूनच जो दर्जा मिळाला होता त्यामुळे ठिकठिकाणची प्रतिष्ठित मंडळी किर्लोस्कर मंडळीच्या साहाय्याला नेहमीच सिद्ध असत. मुंबईला हरिभाऊंचे चुलते महादेव चिमणाजी आपटे वकील, डॉ. अण्णा कुंटे, गणपतराव किर्लोस्कर, बाळ मंगेश वागळे, गंगारामबुवा रेळे, सर महादेव चौबळ, दाजीसाहेब खरे, पुण्याला सुधारकाचे संपादक प्रो. गोपाळराव आगरकर, डॉ. गर्दे, माधवराव कुंटे; अमरावतीला दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, श्री. भि. जठार, (शिक्षणाधिकारी), कर्नाटकात शंकरराव आपटे, गोपाळराव सुळे; कोल्हापूरला न्या. जोशी, प्रो. मोडक; सातारला दादासाहेब करंदीकर वकील, इंदूरला माधवराव लेले, बडोद्याला शिरगावकर अशी त्या काळातली, आपापल्या क्षेत्रात अग्रगण्य असलेली मंडळी किर्लोस्कर मंडळीच्या मदतीला नेहमी तयार असत. इंदूरचे बाळासाहेब होळकर, मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन या संस्थानिकांचाही अण्णासाहेब व त्यांची नाट्यसंस्था यांच्यावर फार लोभ होता. साठ्यांनी आपल्या वागण्याने या सर्व मंडळीची आपुलकी सदैव जतन केली. दादासाहेब खापर्डे यांचे व त्यांचे संबंध तर इतके जिव्हाळ्याचे झाले होते की प्रत्येक वर्षी साठ्यांचे एक पत्र दादासाहेबांना जायचे व ते कितीही व्यापात गर्क असले तरी त्यांचे स्नेहपूर्ण सविस्तर उत्तर साठ्यांना यायचे. मिरजेला असताना त्यांच्या व इतिहासाचार्य वासुदेवशास्त्री खरे यांच्या अनेकदा बैठकी होत. नाटककार देवलांची आणि साठे यांची मैत्री फार घरोब्याची होती. देवल नेहमी हरिपुराहून मिरजेला साठ्यांच्या घरी उतरत, आणि एखाद-दुसरा दिवस गप्पागोष्टींत घालवून परत हरिपूरला रवाना होत. किर्लोस्कर मंडळीतून निवृत्त झाले तरी भाऊराव

नाटके पाहिल्याचे निर्देश त्यांच्या रोजनिशांतून आढळतात. लोकनाट्याच्या (त्या वेळच्या तमाशाच्या) कार्यक्रमासही ते वेळोवेळी आश्रय देत. त्यात कमीपणा मानत नसत. चांगल्या वादनाबद्दलही ते उत्सुक असत. जयपूरला गेले तेव्हा रजबअल्लीखाँचे सतार व दिलरुबावादन ऐकून आले. इंदूरला तर बंदेअल्लीखाँच्या घरी जाऊन त्यांनी बीनवादनाचा कार्यक्रम ऐकला. ग्वाल्हेरला अमीरखांचे सतारवादन ऐकल्यावर, 'अशी सतार पूर्वी फक्त इम्रतखांची ऐकली होती, फार उत्तम वाजवली.' असा अभिप्राय नमूद करून ठेवायला ते विसरले नाहीत.

लहानपणी खालापूरला होणाऱ्या ललिताच्या कार्यक्रमातील 'नारायण-रावांच्या वधाचा फार्स' झाला, त्यात साठ्यांनी 'नारायणरावांचा पार्ट' केला होता. पुढे किर्लोस्कर मंडळीत असतानाही त्यांना व्यवस्थापकाची भूमिका बाजूला ठेवून नटाच्या भूमिकेत प्रवेश करण्याचा प्रसंग येई. सौभद्र नाटकात बळरामाचे काम करण्याची त्यांच्यावर ४–५ वेळा पाळी आली होती. त्याबद्दल 'बळरामाचे सोंग मी घेतले होते' एवढाच त्यांनी निर्देश केलेला आहे. अण्णांच्या रामराज्यवियोग नाटकात तर सुमंताची भूमिका त्यांनी अनेक वेळा केलेली आहे. त्या नाटकाची जी छायाचित्रे आज उपलब्ध आहेत त्यांपैकी काही प्रवेशांत सुमंताच्या भूमिकेतील साठ्यांचे दर्शन घडते. संगीत व नाट्य या क्षेत्रांतील अनुभवी रसिकतेमुळेच प्रथम किर्लोस्कर मंडळीतील आणि नंतर गंधर्व मंडळीतील गायकांच्या व नटांच्या कलागुणांचे त्यांनी काही ठिकाणी उत्तम परीक्षण केलेले आहे.

### लोकसंग्रही वृत्ती

नाट्यव्यवसाय सुरळीत चालविण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तींचे सहकार्य मिळवणे अवश्य असते. मामलेदार कचेरी, पोलीस कचेरी, म्युनिसिपालिटी, रेल्वे खाते, गावातील सन्मान्य गृहस्थ, संस्थानिकांचे कारभारी, व्यापारी, कलावंत, नाटककार– अशा अनंत प्रकारच्या माणसांशी प्रेमाचे संबंध ठेवणे हे एक दिव्यच आहे. यांतील कोणतीही नाराज झालेली व्यक्ती केव्हा नाटक मंडळीची अडवणूक करील याचा नेम नाही. साठ्यांनी

या बाबतीत कौतुकास्पद यश मिळवले होते. प्रत्येक लहान-मोठ्या गावातील चारदोन वजनदार माणसांशी लोभ जडलेला असला म्हणजे मुक्काम निर्विघ्नपणे पार पडतो हे अनुभवाने ध्यानात ठेवून साठे यांनी आपल्या वृत्तीला पहिल्यापासून मनमिळाऊ स्वरूप दिले. त्यांच्या स्वभावामुळे, कारभारातील टापटिपीच्या व्यवस्थेमुळे, आणि सचोटीच्या व्यवहारामुळे, त्यांनी किर्लोस्कर मंडळीच्या नोकरीत असताना शेकडो स्नेही जोडले व टिकवले. किर्लोस्कर मंडळीला तिच्या स्थापनेपासूनच जो दर्जा मिळाला होता त्यामुळे ठिकठिकाणची प्रतिष्ठित मंडळी किर्लोस्कर मंडळीच्या साहाय्याला नेहमीच सिद्ध असत. मुंबईला हरिभाऊंचे चुलते महादेव चिमणाजी आपटे वकील, डॉ. अण्णा कुंटे, गणपतराव किर्लोस्कर, बाळ मंगेश वागळे, गंगारामबुवा रेळे, सर महादेव चौबळ, दाजीसाहेब खरे, पुण्याला सुधारकाचे संपादक प्रो. गोपाळराव आगरकर, डॉ. गर्दे, माधवराव कुंटे; अमरावतीला दादासाहेब खापर्डे, मोरोपंत जोशी, श्री. भि. जठार, (शिक्षणाधिकारी), कर्नाटकात शंकरराव आपटे, गोपाळराव सुळे; कोल्हापूरला न्या. जोशी, प्रो. मोडक; सातारला दादासाहेब करंदीकर वकील, इंदूरला माधवराव लेले, बडोद्याला शिरगावकर अशी त्या काळातली, आपापल्या क्षेत्रात अग्रगण्य असलेली मंडळी किर्लोस्कर मंडळीच्या मदतीला नेहमी तयार असत. इंदूरचे बाळासाहेब होळकर, मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन या संस्थानिकांचाही अण्णासाहेब व त्यांची नाट्यसंस्था यांच्यावर फार लोभ होता. साठ्यांनी आपल्या वागण्याने या सर्व मंडळीची आपुलकी सदैव जतन केली. दादासाहेब खापर्डे यांचे व त्यांचे संबंध तर इतके जिव्हाळ्याचे झाले होते की प्रत्येक वर्षी साठ्यांचे एक पत्र दादासाहेबांना जायचे व ते कितीही व्यापात गर्क असले तरी त्यांचे स्नेहपूर्ण सविस्तर उत्तर साठ्यांना यायचे. मिरजेला असताना त्यांच्या व इतिहासाचार्य वासुदेवशास्त्री खरे यांच्या अनेकदा बैठकी होत. नाटककार देवलांची आणि साठे यांची मैत्री फार घरोब्याची होती. देवल नेहमी हरिपुराहून मिरजेला साठ्यांच्या घरी उतरत, आणि एखाद-दुसरा दिवस गप्पागोष्टींत घालवून परत हरिपूरला रवाना होत. किर्लोस्कर मंडळीतून निवृत्त झाले तरी भाऊराव

व नंतर जोगळेकर हे वेळोवेळी साठ्यांना भेटून कंपनीच्या व्यवहाराबाबत सल्ला घेत. साठ्यांच्या रोजनिशीतून अशा नटवर्गाच्या भेटीगाठीचे अनेक उल्लेख सापडतात.

### आर्थिक व्यवहाराची पद्धत

आर्थिक स्थैर्य हा कोणत्याही व्यवसायाच्या उत्कर्षाचा मूळ आधार असल्याने साठे त्या बाबतीत फार जागरूक असत. अण्णासाहेबांनी मंडळीच्या उत्पन्नाच्या बाबतीत जरूर ती व्यवहारदक्षता न ठेवल्यामुळे किर्लोस्कर मंड ीचा प्रपंच १८८४ च्या सुमारास कसा डळमळू लागला होता त्याचा पूर्वी उल्लेख आलेलाच आहे. गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली साठ्यांनी पैशाच्या देवघेवीचे व्यवहार अत्यंत काटेकोरपणे व ठरीव नियमाप्रमाणेच होतील हे धोरण केव्हाही नजरेआड होऊ दिले नाही.

कोणत्याही सामानाची खरेदी झाल्यानंतर त्याची रक्कम वक्तशीरपणे पोचती करायची हा त्यांचा दंडक असे. त्यामुळे दूधवाला, भाजीवाला, फूलवाला, कापडवाला किंवा किराणा दुकानदार अशांपैकी कोणीही व्यापारी मंडळीच्या बिन्हाडी पैशाच्या तगाद्यासाठी आलेला साठ्यांच्या कारकीर्दीत दिसला नाही. खर्चाच्या सर्व खात्यांवर त्यांची करडी नजर असल्यामुळे मंडळीचा नित्याचा खर्च भागून बरीच रक्कम शिलकी उरे. ती रक्कम प्रत्येक मुक्कामाच्या शेवटी गुळवे यांच्याकडे बिनव्याजी ठेवीसारखी परंतु अत्यंत सुरक्षित अशा खात्रीने पाठविली जाई. प्रत्येक गावाहून साठे शिलकी रकमेची हुंडी गुळवे यांच्या पेढीवर किर्लोस्कर मंडळीच्या नावे जमा करीत. त्या रकमेतून नित्याच्या खर्चासाठी उचल करण्याचे प्रसंग किर्लोस्कर मंडळीवर अगदी अपवादानेच आलेले साठ्यांच्या नोंदीवरून दिसते.

गंधर्व मंडळीचे मॅनेजर असताना त्यांचे वय ५५ च्या सुमारास होते. परंतु नाट्यप्रयोगाच्या वेळी स्वतः तिकिटे तपासणे, तिकीट विक्रीचा हिशेब घेणे, प्रेक्षकांच्या लहानमोठ्या तक्रारींची दखल घेऊन त्यांचे निवारण करणे, आणि सर्व प्रयोग संपेपर्यंत दरवाजात खुर्ची टाकून चोहोकडे लक्ष ठेवणे; या नित्याच्या व महत्त्वाच्या गोष्टींचा त्यांनी केव्हाही कंटाळा केला नाही.

यामुळे डोअरकीपरवर वचक राही. नाटकाच्या वेळेत होणाऱ्या पैशाच्या सुरक्षितपणावरच मंडळीचे जीवित अवलंबून आहे याची ते कटाक्षाने जाणीव ठेवीत. नाट्यगृहांच्या कराराच्या बाबतीत साठ्यांची एक ठराविक पद्धती होती. नाट्यगृहाचे भाडे व प्रयोगाच्या तारखा निश्चित झाल्यानंतर नाट्यगृहाच्या मालकाला बयाणा म्हणून काही रक्कम द्यावी लागे. त्यानंतर प्रत्येक प्रयोगाच्या वेळी साठे पुढच्या प्रयोगाचे भाडे आगावू मालकाच्या स्वाधीन करीत. बुधवारच्या नाटकाच्या उत्पन्नाची पेटी शनिवारच्या प्रयोगाचे भाडे मालकाच्या हाती दिल्यानंतरच मंडळीच्या बिऱ्हाडी जाई. या पद्धतीमुळे शेवटच्या नाटकाच्या दिवशी मालकाला फक्त 'धन्यवाद' देण्याचे काम शिल्लक राही. या बिनचूक व रोखीच्या व्यवहारामुळे नाट्यगृहांचे मालकही विस्मयचकित होत. १९१३ मध्ये गंधर्व मंडळीची सेवा करताना त्यांचा मुंबईच्या एलफिन्स्टन नाटकगृहाचे पारशी मालक श्री. पेस्तनजी शेठ यांच्याशी संबंध आला. साठ्यांची ही वागण्याची पद्धत पाहिल्यानंतर ते म्हणाले, "माझ्या ३५ वर्षांच्या अनुभवात मी असा चोख व्यवहार करणारा साठे यांच्यासारखा मॅनेजर पाहिला नाही."

### संस्थानी थाटाची भोजन-व्यवस्था

आपल्या कुटुंबातील आप्तांना सोडून महिनोमहिने परगावी राहणाऱ्या नटवर्गासाठी जेवणा-खाण्याच्या व्यवस्थेबाबत काळजी घेणे किती अवश्य असते ते सांगायला नको. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या उदार स्वभावामुळे खाण्यापिण्याच्या बाबतीत हयगय नव्हती. तरी त्यात नियमबद्ध काटेकोरपणा नव्हता, त्यामुळे खर्चाच्या बाबतीत उधळपट्टी भरपूर होत असे. साठ्यांनी त्या आरामशीर व समाधानकारक परंपरेला शिस्तीच्या चौकटीत बसविले. किर्लोस्कर मंडळीतील सुग्रास भोजन हा त्या काळी सर्व परिचितांच्या कौतुकाचा विषय होता. साठे स्वतः भोजनाच्या बाबतीत चांगले रसज्ञ व चोखंदळ असल्यामुळे मंडळीच्या भोजनाच्या बाबतीतही त्यांनी नटवर्गाला संतुष्ट ठेवले होते.

२...

आज महाराष्ट्रात सर्वांच्या माहितीचा झालेला बटाटयाचा रस्सा हा किर्लोस्कर मंडळीच्या आचाऱ्यांनी उत्तर हिंदुस्थानातून आणलेला आहे. तूप चमच्याने न वाढता ते भांडयातून धारेने वाढण्याइतकी त्या वेळी किर्लोस्कर मंडळीची ऐपत होती. मात्र हे ऐषारामी भोजन घेणाऱ्या नटांना काही नियमही पाळावे लागत. जेवणाची पंगत बसली म्हणजे एका कारकुनाकडे हजेरी-पुस्तकात नोंद करण्याचे काम असे. त्या काळात चहाचे बंड नसल्या-मुळे दुधाच्या दोन कढया चुलीवर उकळत असत. या सुव्यवस्थेमुळे 'नित्य दुग्धपान व मिष्टान्न भोजन' यांचा लाभ नटवर्गाला नित्याचाच होई. त्या सुखविलासी आहारामुळे नटवर्गही चांगला सतेज व धष्टपुष्ट असल्याने त्याचे रंगभूमीवरील दर्शनही मोठे प्रसन्न वाटत असे. मोरोबा वाघुलीकरांच्या सारखे काही नट तर कलावंताचा व्यवसाय असतानाही नुसते लोळत न पडता, प्रत्यही जोर-जोडीचा व्यायाम करून शरीर नाटकाच्या भूमिकेला शोभेल असे भरदार व बांधेसूद ठेवीत.

### साठे व किर्लोस्कर मंडळीतील नटवर्ग

अण्णासाहेब किर्लोस्कर व साठे यांच्या वयांत बरेच अंतर होते शिवाय साठयांनी किर्लोस्कर मंडळीत प्रवेश केला त्या वेळेपर्यंत अण्णासाहेबांनी युगप्रवर्तक नाटककार म्हणून महाराष्ट्रभर मोठा लौकिक संपादन केलेला होता. यामुळे अण्णासाहेबांच्याबद्दल त्यांच्या मनात अत्यंत आदराची भावना होती. अण्णासाहेबांच्या निधनानंतर साठयांनी त्यांच्या प्रतिमेची किर्लोस्कर मंडळीत श्रद्धापूर्वक स्थापना केली. त्याला प्रेरक म्हणजे त्यांचा अण्णासाहेबां-विषयीचा आदरभाव हीच गोष्ट होती. किर्लोस्कर मंडळीचा निरोप घेण्याचा जो समारंभ झाला तो 'अण्णासाहेबांच्या तसबिरीसमोर' झाला असा आव-र्जून निर्देश करताना, ज्यांच्या प्रोत्साहनाने आपण नाटकधंद्यात प्रवेश केला त्यांच्याच आशीर्वादाने त्यातून मानाने व समाधानाने निवृत्त होत आहोत हीच त्यांची भावना होती.

अण्णासाहेबांच्यानंतर किर्लोस्कर मंडळीचे चालक झालेल्या भाऊराव कोल्हटकरांनी आणि मोरोबा वाघुलीकरांनी साठयांच्या कारभाराला सर्वस्वी

व मनःपूर्वक पाठिंबा दिल्यामुळे त्यानंतरही पाच वर्षे साठ्यांना निर्विघ्नपणे नोकरी करता आली. सर्वच नटांशी त्यांचे संबंध शेवटपर्यंत आपुलकीचे राहिले. साठे मनमिळाऊ होते तसेच निर्भीडही होते. एका प्रसंगी काही कारणामुळे चालक व साठे यांच्यात थोडी शाब्दिक चकमक उडाली. चालकांनी साठे यांना 'तुमचे हे बोलणे पायरीला पाय लावल्यासारखे होत आहे' असे उद्गार काढल्यानंतर 'पायरी स्वस्थानावरून घसरू लागली तर ती सावरून धरण्याचे काम माझे आहे!' असे परखड उत्तर त्यांनी चालकांना दिले.

दुसरा एक प्रसंग फारच उद्बोधक आहे. ज्या दिवशी रात्री नाटक नसेल त्या दिवशी रात्री १०॥ नंतर बिऱ्हाडाच्या बाहेरच्या दरवाजाला आतून कुलूप लावले जाई; आणि किल्ल्या साठ्यांच्या जवळ येत. त्यामुळे रात्री-अपरात्री बाहेर भटकणाऱ्या नटांना त्यांचा धाक असे. मिरजेच्या मुक्कामात एका रात्री खुद्द भाऊरावच अपरात्री बिऱ्हाडी आले. त्यांच्याबरोबरच्या इसमाने हळूच हाक मारून बिऱ्हाडातील एका नोकराला जागे केले. तो म्हणाला, 'किल्ल्या साठ्यांच्या ताब्यात आहेत, त्या घेऊन येतो' भाऊराव 'नको' म्हणाले, आणि तसेच मिरजेचे जुने नाट्यगृह आहे त्याच्या कट्ट्यावर बसून त्यांनी सारी रात्र काढली! 'किल्ल्या आणवल्या असत्या तर साठे रागावले असते; आणि त्याहिपेक्षा मीच शिस्त मोडली असे झाले असते' असे त्यांनी आपल्या त्या वागण्याबद्दल उद्गार काढले. आपल्या शिस्तीने मालकावरही वचक ठेवणारा व्यवस्थापक आणि शिस्तपालनासाठी नोकरालाही मान देणारा नाट्यसंस्थेचा मालक या दोन्ही गोष्टी आजच्या जमान्यात खऱ्यासुद्धा वाटणार नाहीत. असे प्रसंग उद्भवूनसुद्धा भाऊराव व साठे एकमेकांची योग्यता ओळखून असल्यामुळे अशा घटनांचे पर्यवसान त्यांचे संबंध कायमचे कलुषित होण्यामध्ये कधीच झाले नाहीत. मोरोबा-भाऊरावांच्या असामान्य नाट्यगुणांची जशी साठ्यांना जाणीव होती त्याचप्रमाणे साठ्यांच्या व्यवहारचातुर्याचा त्या नटांनाही मोठा भरवसा होता. साठे मंडळीत असताना आणि इतरत्र नोकरी करतानाही मोरोबा, भाऊराव, परचुरे या मंडळींनी जमीन, घर इत्यादी स्थावर मालमत्तेसंबंधीच्या देवघेवीचे जे व्यवहार केले त्या प्रसंगी साठे हेच त्यांचे प्रमुख सल्लागार होते.

१९०० च्या अखेरीस भाऊराव अत्यंत आजारी पडले; त्या वेळी त्यांनी आपले मृत्युपत्र करण्याचे ठरविले तेव्हा साठ्यांनाच मुद्दाम बोलावून घेतले आणि त्यांच्याचकडून आपल्या मृत्युपत्राचा मसुदा तयार करून घेतला.

भाऊरावांच्या मृत्यूनंतर किर्लोस्कर मंडळीचे मालक जोगळेकर असले तरी ते अननुभवी असल्यामुळे कारभाराची सारी सूत्रे शंकरराव मुजुमदारांच्याच हाती होती. शंकरराव कर्तबगार होते तसेच महत्त्वाकांक्षीही होते. अण्णासाहेब किर्लोस्करांचे पुण्यात कायम स्वरूपाचे स्मारक असावे अशा सद्धेतूने प्रेरित होऊन त्यांनी किर्लोस्कर नाटक-गृहाची उभारणी करण्याची, त्यांना किंवा किर्लोस्कर मंडळीला त्या स्थितीत न पेलणारी योजना हाती घेतली. त्या बाबतीत भावनात्मक दृष्टी थोडी बाजूला ठेवून व्यवहार्य दृष्टिकोण पत्करण्याबद्दल साठ यांनी मुजुमदारांना समक्ष व पत्रद्वारा अनेक वेळा सांगून पाहिले. जोगळेकरांना पाठविलेल्या एका पत्रात ते म्हणतात, अण्णांच्या नावाचा अभिमान मला आहे. किर्लोस्कर मंडळीचा वृक्ष वाढीस लावण्यासाठी मीही चार कावडी टाकल्या आहेत. परंतु थेटरची कल्पना अव्यवहारी आहे. शंकररावांची हौस भागविण्यासाठी तुमच्यासारख्या श्रेष्ठ कलावंताचे आयुष्य भारवाहकाप्रमाणे कर्ज फेडण्यात फुकट जाणार म्हणून वाईट वाटते." परंतु साठ्यांच्यासारख्या अनुभवी व हिशेबी मंडळींचे विचार दूर सारून मुजुमदारांनी किर्लोस्कर नाटकगृहाच्या उभारणीचा अट्टाहास खरा करून दाखवला. नाट्यगृह उभे राहिले खरे, परंतु त्या बाबतींतल्या आर्थिक व कायदेशीर गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्या नाट्यगृहाऱ्या पायात किर्लोस्कर मंडळीची मालमत्ता व अब्रू नाहीशी होण्याचा प्रसंग मात्र ओढवला !

किर्लोस्कर मंडळीच्या नटवर्गाप्रमाणेच शाहूनगरवासी नाटकमंडळीचे दोघे मुख्य नट गणपतराव जोशी आणि बाळाभाऊ जोग यांचे आणि साठ्यांचे संबंधही अत्यंत प्रेमाचे होते. 'गणू व बाळा हे दोघे आज आले होते. मुक्कामाला राहिले. भोजन करून रवाना झाले!' असे अनेक उल्लेख साठ्यांच्या रोजनिश्यांतून आहेत.

गंधर्व मंडळीचे एक मालक श्री. गणपतराव बोडस यांच्याविषयी साठ्यांना पुत्रवत प्रेम असे. त्यांच्या अत्याग्रहामुळे ते गंधर्व मंडळीत येण्यास कबूल झाले. परतु किर्लोस्कर मंडळीतील नटवर्गाचा परस्परांविषयी जो स्नेहाचा ओलावा होता आणि ज्यामुळे किर्लोस्कर मंडळीला एखाद्या एकत्र कुटुंबाचे स्वरूप आले होते त्याच्या अभावामुळें साठे गंधर्व मंडळीत आधी मान्य केलेल्या एक वर्षाच्या करारानंतर अधिक काळ राहिले नाहीत. गंधर्व मंडळीचा अंतर्गत कारभार मात्र त्यांनी किर्लोस्कर मंडळीतील अनुभवाने अत्यंत रेखीव व नियमबद्ध केलेला होता. गंधर्व मंडळीच्या स्थापनेनंतर अल्पावधीतच बडोद्याचे गुणज्ञ अधिपती सयाजीराव गायकवाड यांचे वर्षासन गंधर्व मंडळीला मिळाले. ते मिळण्याच्या बाबतीत बालगंधर्व, बोडस यांच्या नाट्यगुणांबरोबरच गंधर्व मंडळीच्या चोख कारभार पद्धतीचाही वाटा होता. कारण वर्षासन देण्यासाठी गंधर्व मंडळीला मान्यता देताना, 'ही मंडळी गुणी असून त्यांची व्यवस्थाही पद्धतशीर दिसते.' असे उद्गार सयाजीराव महाराजांनी काढले.

कलावंत या दृष्टीने मात्र साठ्यांना बालगंधर्व, गणपतराव व टेंबे या तिघांचेही फार कौतुक वाटत असे. बालगंधर्वांच्या कलेबद्दल ते म्हणत, "नारायणरावांनी मराठी रंगभूमीवर स्वतंत्र गंधर्वयुग निर्माण केले. स्त्री-भूमिकेची आकर्षक वेषभूषा, नेपथ्य, सुंदर अभिनय व स्वतंत्र गायनपद्धती यामुळे क्रान्ती करून ते रंगभूमीवरील युगप्रवर्तक नट ठरले." बालगंधर्वांच्या या गुणसंपदेइतकेच त्यांच्या रंगभूमीवरील निरलस सेवाभावाचेही साठ्यांना फार कौतुक वाटे. गंधर्व मंडळीच्या नगरच्या मुक्कामात जेमतेम १०० रु. उत्पन्न होईल एवढाच प्रेक्षकवर्ग नाट्यगृहात होता. साठे गमतीने म्हणाले, "नारायणराव, आता उरकून टाका लवकर. लोकांना पर्वा नाही तर तुम्ही तरी का व्यर्थ श्रम घेतां ?" नारायणराव म्हणाले, "नाही, नाही; साठेसाहेब, माझ्याकडून असे होणे शक्य नाही. जोपर्यंत गळ्यात गाण्याची शक्ती आहे तोपर्यंत रंगभूमीशी प्रतारणा नको. तिची सेवा भरपूर झाली पाहिजे." आणि त्यांनी त्या दिवशी गायनाची खरोखरच बहार केली.

गणपतराव बोडसांच्या वळणदार मोडी अक्षरावर ते अत्यंत खूष असत. त्याचप्रमाणे त्यांची कृष्णाची भूमिकाही साठ्यांना फार आवडत असे. त्या भूमिकेचे वर्णन करताना ते म्हणत, "बाळकोबा (नाटेकर) सारख्या गायनाचार्याची भूमिका हा केवळ आपल्या अभिनयकौशल्याच्या जोरावर अगदी स्वतंत्रपणे रंगवून दाखवतो." मुंबईच्या मुक्कामात गंधर्व मंडळीने देवलांच्या मार्गदर्शनाखाली तालमी घेऊन मृच्छकटिक नाटक रंगभूमीवर आणले; ते फार लोकप्रिय झाले. त्यातील टेंब्यांची चारुदत्ताची भूमिका स्वतः नाटककार देवलांना फार पसंत पडली होती. त्याबद्दल ते 'टेंब्या रडवतो लोकांना' असे कौतुकाचे उद्गार काढीत. त्या मुक्कामातील नाटकात मृच्छकटिकाचा उत्पन्नाच्या दृष्टीने वरचा क्रमांक लागला होता. त्याबद्दल साठे देवलांना म्हणाले, "मृच्छकटिकाला नवे दात बसविले आहेत त्याचा हा परिणाम!" (याच वेळी देवलांनी स्वतःसाठी दातांची कवळी नव्यानेच तयार करून घेतली होती.) पुढे टेंबे व इतर मालक यांच्यात दुरावा निर्माण होऊन टेंब्यांनी गंधर्व मंडळी सोडून स्वतःची नवीन शिवराज मंडळी स्थापन केली. त्याबद्दल साठे म्हणाले, "भागीदारपत्रातील कराराप्रमाणे मुदत पूर्ण होईपर्यंत गोविंदरावांना कंपनीत राहता आले असते. परंतु ते मानी वृत्तीचे असल्याने कंपनीचा संबंध तोडून टाकून ते मोकळे झाले व त्यांनी आपल्या स्वतःच्या गुणावर एक नवीन क्षेत्र निर्माण केले."

### साठे व सरकारी अधिकाऱ्यांचे नमुने

नाट्यसंस्थेवर कोणत्या ना कोणत्या कारणाने रुष्ट झालेले लोक त्रास देण्याचा प्रयत्न करीत. पोलीस खात्यातील लोक फुकट नाटके पाहणे हा आपला व्यवसाय-सिद्ध हक्कच आहे अशा थाटात वागत. साठे व्यवस्थापक असताना त्यांनाही अशा काही मंडळींचा बंदोबस्त करावा लागला. त्यांपैकी काही गोष्टी मोठ्या गमतीदार आहेत. ––

किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम बेळगाव येथे असताना (दि. २१-६-१८८६) भाऊरावांवर रागावलेल्या एका फौजदाराने तमन्ना नावाच्या हस्तकाला नाट्यप्रयोगाच्या वेळी प्रत्येक पदाला वन्समोअर देण्यास सांगून बराच धिंगाणा घातला. त्या मुलालाही 'वन्समोअर तम्या!' असेच नाव मिळाले.

मंडळी अमरावतीला असताना मंडळीतील दोन नट व पोलीस यांची प्रथम बाचाबाची आणि नंतर मारामारी झाली. त्याचा सूड घेण्यासाठी भाऊराव, मोरोबा, साठे इत्यादी मंडळी एका रात्री स्टेशनवरून शहरात येत असता त्या टोळीने या मंडळीवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला चढविला. साठे वगैरे मंडळींनी प्रथम गड्याजवळील कंदील विझवला व ते अंधारात बाजूला जाऊन उभे राहिले. त्यामुळे कोणासच फारशी इजा झाली नाही. नाही तर 'आयुष्याचा शेवटचा दिवस होता' असे त्याचे साठ्यांनी वर्णन केले आहे !

जळगाव येथील मुक्कामात तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी सहकुटुंब सह-परिवार नाटके पाहण्याच्या बाबतीत अगदी कहर केला. काही खेळ असे झाल्यावर एका प्रयोगाच्या वेळी तेथील एक वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. बापट यांना साठे यांनी पुढीलप्रमाणे चिठ्ठी पाठवली, "आज नाटकाच्या वेळी काही दंगा, अपघात होण्याचा संभव आहे काय? थेटर कच्चे असल्याने आम्हांस सामानाची जोखीम वाटते. थेटरवर बरेच पोलीस हजर आहेत." श्री. बापटांनी 'स्वस्थ असा, मी येतो' असा निरोप पाठवला व काही पोलीस बरोबर घेऊन ते लगेच नाट्यगृहात दाखल झाले. प्रयोग संपल्यावर दरवाजे रोखून नागरिकांना बाहेर जाऊ देण्यात येऊन फुकट्या पोलिसांना अडवण्यात आले त्या प्रत्येकाने तोपावेतो किती कुटुंबियांसह नाटके पाहिली हे विचारून टिपण तयार करण्यात आले, आणि पगाराच्या वेळी तेवढ पैसे कापून घेऊन ते किर्लोस्कर मंडळींच्या बिऱ्हाडी जाऊन चुकते करण्यात आले. अशाच प्रकारच्या शिस्तीच्या अधिकाऱ्याचा अनुभव साठ्यांना औरंगाबाद येथे आला. त्या वेळी ते गंधर्व मंडळीचे मॅनेजर होते. मंडळीने आपल्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे काही प्रतिष्ठित नागरिक व सरकारी अधिकारी यांना पहिल्या प्रयोगाला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित केले. निमंत्रितांपैकी एक सरकारी अधिकारी अत्यंत निःस्पृह स्वभावाचे होते. नाट्यगृहात आल्यानंतर साठ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना आत येण्याची विनंती केली. ते तेथेच थांबून म्हणाले, "माझे तिकिट मला द्या. मी नाटक फुकट पाहात नसतो." साठ्यांनी त्यांना मंडळीची प्रथा सांगून

गणपतराव बोडसांच्या वळणदार मोडी अक्षरावर ते अत्यंत खूष असत. त्याचप्रमाणे त्यांची कृष्णाची भूमिकाही साठ्यांना फार आवडत असे. त्या भूमिकेचे वर्णन करताना ते म्हणत, "बाळकोबा (नाटेकर) सारख्या गायनाचार्यांची भूमिका हा केवळ आपल्या अभिनयकौशल्याच्या जोरावर अगदी स्वतंत्रपणे रंगवून दाखवतो." मुंबईच्या मुक्कामात गंधर्व मंडळीने देवलांच्या मार्गदर्शनाखाली तालमी घेऊन मृच्छकटिक नाटक रंगभूमीवर आणले; ते फार लोकप्रिय झाले. त्यातील टेंब्यांची चारुदत्ताची भूमिका स्वतः नाटककार देवलांना फार पसंत पडली होती. त्याबद्दल ते 'टेंब्या रडवतो लोकांना' असे कौतुकाचे उद्‌गार काढीत. त्या मुक्कामातील नाटकात मृच्छ-कटिकाचा उत्पन्नाच्या दृष्टीने वरचा क्रमांक लागला होता. त्याबद्दल साठे देवलांना म्हणाले, "मृच्छकटिकाला नवे दात बसविले आहेत त्याचा हा परिणाम!" (याच वेळी देवलांनी स्वतःसाठी दातांची कवळी नव्यानेच तयार करून घेतली होती.) पुढे टेंबे व इतर मालक यांच्यात दुरावा निर्माण होऊन टेंब्यांनी गंधर्व मंडळी सोडून स्वतःची नवीन शिवराज मंडळी स्थापन केली. त्याबद्दल साठे म्हणाले, "भागीदारपत्रातील कराराप्रमाणे मुदत पूर्ण होईपर्यंत गोविंदरावांना कंपनीत राहता आले असते. परंतु ते मानी वृत्तीचे असल्याने कंपनीचा संबंध तोडून टाकून ते मोकळे झाले व त्यांनी आपल्या स्वतःच्या गुणावर एक नवीन क्षेत्र निर्माण केले."

### साठे व सरकारी अधिकाऱ्यांचे नमुने

नाट्यसंस्थेवर कोणत्या ना कोणत्या कारणाने रुष्ट झालेले लोक त्रास देण्याचा प्रयत्न करीत. पोलीस खात्यातील लोक फुकट नाटके पाहणे हा आपला व्यवसाय-सिद्ध हक्कच आहे अशा थाटात वागत. साठे व्यवस्थापक असताना त्यांनाही अशा काही मंडळींचा बंदोबस्त करावा लागला. त्यांपैकी काही गोष्टी मोठ्या गमतीदार आहेत. —

किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम बेळगाव येथे असताना (दि. २१-६-१८८६) भाऊरावांवर रागावलेल्या एका फौजदाराने तमन्ना नावाच्या हस्तकाला नाट्यप्रयोगाच्या वेळी प्रत्येक पदाला वन्समोअर देण्यास सांगून बराच धिंगाणा घातला. त्या मुलालाही 'वन्समोअर तम्या!' असेच नाव मिळाले.

मंडळी अमरावतीला असताना मंडळीतील दोन नट व पोलीस यांची प्रथम बाचाबाची आणि नंतर मारामारी झाली. त्याचा सूड घेण्यासाठी भाऊराव, मोरोबा, साठे इत्यादी मंडळी एका रात्री स्टेशनवरून शहरात येत असता त्या टोळीने या मंडळीवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला चढविला. साठे वगैरे मंडळींनी प्रथम गड्याजवळील कंदील विझवला व ते अंधारात बाजूला जाऊन उभे राहिले. त्यामुळे कोणासच फारशी इजा झाली नाही. नाही तर 'आयुष्याचा शेवटचा दिवस होता' असे त्याचे साठ्यांनी वर्णन केले आहे !

जळगाव येथील मुक्कामात तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी सहकुटुंब सहपरिवार नाटके पाहण्याच्या बाबतीत अगदी कहर केला. काही खेळ असे झाल्यावर एका प्रयोगाच्या वेळी तेथील एक वरिष्ठ पोलीस अधिकारी श्री. बापट यांना साठे यांनी पुढीलप्रमाणे चिठ्ठी पाठवली, "आज नाटकाच्या वेळी काही दंगा, अपघात होण्याचा संभव आहे काय? थेटर कच्चे असल्याने आम्हांस सामानाची जोखीम वाटते. थेटरवर बरेच पोलीस हजर आहेत." श्री. बापटांनी 'स्वस्थ असा, मी येतो' असा निरोप पाठवला व काही पोलीस बरोबर घेऊन ते लगेच नाट्यगृहात दाखल झाले. प्रयोग संपल्यावर दरवाजे रोखून नागरिकांना बाहेर जाऊ देण्यात येऊन फुकट्या पोलिसांना अडवण्यात आले त्या प्रत्येकाने तोपावेतो किती कुटुंबियांसह नाटके पाहिली हे विचारून टिपण तयार करण्यात आले, आणि पगाराच्या वेळी तेवढ पैसे कापून घेऊन ते किर्लोस्कर मंडळींच्या बिऱ्हाडी जाऊन चुकते करण्यात आले. अशाच प्रकारच्या शिस्तीच्या अधिकाऱ्याचा अनुभव साठ्यांना औरंगाबाद येथे आला. त्या वेळी ते गंधर्व मंडळीचे मॅनेजर होते. मंडळीने आपल्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे काही प्रतिष्ठित नागरिक व सरकारी अधिकारी यांना पहिल्या प्रयोगाला उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित केले. निमंत्रितांपैकी एक सरकारी अधिकारी अत्यंत निःस्पृह स्वभावाचे होते. नाट्यगृहात आल्यानंतर साठ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना आत येण्याची विनंती केली. ते तेथेच थांबून म्हणाले, "माझे तिकिट मला द्या. मी नाटक फुकट पाहात नसतो." साठ्यांनी त्यांना मंडळीची प्रथा सांगून

आपणाला आम्ही सन्माननीय पाहुणे म्हणून बोलावले वगैरे सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेरीस पाच रुपयांचे तिकिट घेतल्यावरच त्या अधिकाऱ्यांनी नाटयगृहात पाऊल ठेवले. साठे म्हणत, 'मोगलाई भांगेत ही एकच तुळस आम्हांस सापडली !' याच अधिकाऱ्याच्या स्वभावाचा आणखी एक पैलू बघण्यासारखा आहे. गंधर्व मंडळीचा मुक्काम औरंगाबादेहून हालल्यानंतर दुसऱ्या एका नाटक मंडळीने नाटयप्रयोगास परवानगी मागितली. ती नाकारताना या अधिकाऱ्यांनी सांगितले, "औरंगाबादच्या लोकांनी करमणुकीखातर नुकताच बराच पैसा खर्च केला आहे; आता एक वर्षभर मी कोणाही कंपनीस परवानगी देऊ शकत नाही."

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# किर्लोस्कर नाटक मंडळी

## आधुनिक मराठी रंगभूमीची नांदी

कै. बळवंत पांडुरंग ऊर्फ अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी लिहिलेल्या संगीत शाकुंतल नाटकाचा पहिला चार अंकी प्रयोग रविवार दि. ३१ ऑक्टोबर १८८० (आश्विन शुद्ध त्रयोदशी, शके १८०२) या दिवशी अमृतसिद्धी योगावर पुणेकर रसिकांसमोर करून दाखविण्यात आला. किर्लोस्कर संगीत मंडळीच्या वतीने करण्यात आलेल्या या प्रयोगातील सूत्रधाराची भूमिका स्वतः नाटककार अण्णासाहेबांनीच केलेली होती. त्या प्रयोगाच्या स्वरूपात त्या शुभदिनी मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एका नव्या युगाची प्रतिष्ठापना झाली. ज्यांच्या उपस्थितीमध्यें तो प्रयोग सादर करण्यात आला त्या भाग्यशाली रसिकांना त्या वेळी एका अद्‌भुतपूर्व अशा नाट्यानंदाचा लाभ घडला. परंतु त्या नाट्य प्रयोगाने एवढी अद्‌भुत कामगिरी करून ठेवली होती की त्या प्रयोगापासून मराठी रंगभूमीवर अवतरलेले संगीत नाटक आजही त्याच लोकोत्तर किर्लोस्कर परंपरेचा वारसा

घेऊन रसिकांचे मनोरंजन करीत आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात नाट्यकलेचे एक नव-युग निर्माण करणारी अण्णासाहेब किर्लोस्कर ही व्यक्ती तशाच युगप्रवर्तक गुणाचे वरदान घेऊन आलेली होती., मात्र अण्णासाहेबांच्या संगीत नाटकाला लाभलेले असामान्य यश हे काही चमत्काराने किंवा सहजासहजी लाभलेले नसून त्यामागे अण्णासाहेबांच्या अनेक वर्षांच्या खडतर परिश्रमांची ती पुण्याई होती. शाकुंतल नाटकाचे लेखन व प्रयोगाविष्करण हा अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाचा प्रारंभ नसून तत्पूर्वीच्या ३७-३८ वर्षांच्या आयुष्यांत त्यांनी वाङ्मयाची व नाट्यकलेचीं जी एकतानतेने व सातत्याने उपासना केली होती त्या उपासनेची संगीत शाकुंतल नाटकाचा प्रयोग ही अत्यंत रमणीय अशी फलश्रुती होती.

**काव्य-नाटकाची उपासना**

वयाच्या चौदाव्या वर्षी किरातार्जुन काव्यावर काव्यरचना करणे, सतराव्या वर्षापासून गुर्लहोसूर या जन्मग्रामी साजरा होणाऱ्या आद्य शंकराचार्यांच्या उत्सवासाठी प्रतिवर्षी पदे लिहून देणे, विष्णुदास भावे पद्धतीची नाटके करणाऱ्या नाटक मंडळ्यांना पौराणिक आख्यानांवर पदे तयार करून देणे अशा अनेक प्रकारच्या साहित्यिक उद्योगांतून अण्णासाहेबांच्या काव्यशक्तीची चांगली जोपासना झाली होती. नाट्याच्या आवडीमुळे लहानपणी बालमित्रांच्या साहाय्याने एक अल्पकालीन ठरलेली नाट्यसंस्था काढण्याचाही त्यांनी उपक्रम केलेला होता. परंतु तो फसल्यामुळे व पुढे चरितार्थासाठी नोकरी पत्करणे परिस्थितीने भाग पाडल्यामुळे अण्णासाहेब गुर्लहोसूर सोडून सरकारी नोकर म्हणून बेळगाव येथे येऊन राहिले. तेथील आठ वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी भारत शास्त्रोत्तेजक मंडळी स्थापन करून कालिदासाचे मराठीत भाषान्तर केलेले शाकुंतल, विक्रमचरित्र इत्यादी नाट्यप्रयोग १८७५ सालीच करून दाखविले होते. या प्रयोगावर बेळगाव समाचारात त्यावेळीच अभिप्राय आले असून त्या पत्राच्या फायली उपलब्ध आहेत. इतकेच नव्हे तर आणखी एक पाऊल पुढे टाकून, काही स्त्रिया मिळवून संमिश्र नाट्यप्रयोग करुन दाखविण्याचा धाडसी प्रयत्न करून पाहण्याचीही त्यांनी खटपट केली. परंतु ती यशस्वी होऊ शकली नसली तरी सर्व भूमिकांची

पदे एकट्या सूत्रधारानेच गाऊन दाखवायची या प्रचलित पद्धतीऐवजी विविध पात्रांसाठी पद्यरचना करून ती विविध नटांनी म्हणून दाखवायची ही कल्पना मात्र अण्णासाहेबांच्या मनात आलेली होती. ही गोष्ट त्यांच्या पुढील कामगिरीच्या दृष्टीने फार महत्त्वाची ठरली. संमिश्र नाट्यसंस्था काढण्याचा त्यांचा उद्योग प्रत्यक्षात उतरू शकला नाही, तथापि अन्य नाट्य-संस्थांना निरनिराळी आख्याने लिहून देण्याचा त्यांचा उद्योग पूर्वीप्रमाणे चालूच होता.

### गद्य नाटके

[१८६१ मध्ये श्री. वि. ज. कीर्तने यांचे 'थोरले माधवराव पेशवे' हे मराठी भाषेतील पहिले स्वतंत्र ऐतिहासिक नाटक प्रसिद्ध झाले आणि इचल-करंजीकर नाटक मंडळीने ते रंगभूमीवरही आणले.] त्याच्याच अनुकरणाने अण्णासाहेबांनीही 'अल्लाउद्दिनाची चितुरगडावर स्वारी' हे गद्य ऐतिहासिक नाटक* तयार केले. १८६७ ते १८७० या काळात केव्हा तरी हे नाटक लिहून झाले; आणि सांगलीकर नाटक मंडळी मुख्य नाटक संपल्यावर जोडनाटक म्हणून या नाटकाचा प्रयोग करीत असे.

शाङ्करदिग्जय (किंवा शाङ्करदिग्विजय) हे आद्य शंकराचार्यांच्या जीवनाला नाट्यरूप देणारे त्यांचे दुसरे गद्यनाटक १८७४ मध्ये तयार होऊन ते कोल्हापूरकर नाटक मंडळीच्या रंगभूमीवर लोकप्रियही झाले.]

### गद्याकडून संगीताकडे

नाटक मंडळ्यांच्यासाठी संगीत कथारचना आणि गद्य नाटके लिहिण्याच्या कार्यात मग्न असलेले अण्णासाहेब रेव्हेन्यू खात्यातील नोकरी पत्करून १८७८ मध्ये पुण्याचे रहिवासी झाले. त्यांनी स्थापन केलेली बेळगावची

---

* अण्णासाहेबांची ही पहिली नाट्यकृती आज समग्र उपलब्ध नाही. 'समग्र किर्लोस्कर' या ग्रंथामध्ये वरील नाटकाची संपादकांना उपलब्ध झालेली पहिली तीस पृष्ठे त्यांनी प्रकाशित केली आहेत. ( पृ. १२५-१५८ ).

भरत शास्त्रोत्तेजक मंडळी १८७५ ते १८७८ पर्यंत चालू होती. अण्णासाहेब पुण्यास आल्यावर तिचे कार्य बंद पडणे त्यांच्या अभावी स्वाभाविकच होते. पण तेच कार्य पुण्यासारख्या विद्वत्तेच्या व रसिकतेच्या माहेरघरी पुनः चालू करावे असा त्यांनी पुण्यास आल्यावर निर्णय घेतला. नाट्याची सेवा चालू असतानाच त्यांच्या लेखनाला आणि मराठी रंगभूमीलाही नवा जन्म देणारा दिव्य क्षण १८८० मध्ये प्राप्त झाला. वि. मो. महाजनींचे 'तारा' नाटक पहायला गेलेले अण्णासाहेब तेथे जागा न मिळाल्यामुळे जवळच्याच नाट्यगृहातील एका पारशी नाट्यसंस्थेचा 'इंद्रसभा' हा नाट्यप्रयोग पहात बसले. त्या नाटकातील संगीताच्या प्रभावाने ते इतके विलक्षण भारून गेले की तशाच प्रकारचे संगीतमय नाटक मराठीत आणण्याचा आपल्या मनात निर्णय घेऊनच ते नाट्यगृहाच्या बाहेर पडले. त्या निर्णयाचे दृश्य फल म्हणजेच त्यांनी पूर्वीच अनुवादित केलेले संगीत शाकुंतल. ते संगीत नाटक पुण्याच्या रंगभूमीवर जास्त प्रभावी रीतीने आणण्याची कल्पना मनात उद्भवून ती प्रत्यक्षात साकार होईपर्यंतच्या विविध अवस्थांत अण्णासाहेबांना पुण्यातील अनेक जाणकार रसिक जनांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले. विशेषतः त्यांचे पनवेल येथील स्नेही श्री. विठोबा खंडाप्पा गुळवे यांचे साहाय्य अगदी प्रारंभापासून मिळाले. त्यांच्याचप्रमाणे सुप्रसिद्ध गणिती व गायनकलेचे दर्दी श्री. केरूनाना छत्रे, श्री. कृष्णशास्त्री चिपळूणकर अशी नामवंत मंडळीही अण्णासाहेबांच्या या अभिनव उपक्रमात साहाय्यभूत झाली होती. गुळव्यांचे आश्रित असलेल्या श्री. मोरोबा वाघुलीकर या सुरेल गायकाकडे दुष्यंताची आणि बाळकोबा नाटेकर या बहुरंगी गवयाकडे कण्वमुनीची भूमिका सोपविण्यात आली. गोडबोले, जांभेकर यांसारख्या पदवीधर मित्रांनी नाट्यातील किरकोळ भूमिकाही मोठ्या हौसेने स्वीकारल्या. दि. ३१-१०-१८-८० या दिवशी पुण्याच्या आनंदोद्भव नाट्यगृहात झालेल्या त्या प्रयोगाने बुकिश नाटकांचे युग संपुष्टात आणून गद्यपद्य ( संगीतप्रधान ) नाटकांचे युग सुरू झाल्याची ललकारी दिली. त्या एकाच प्रयोगाने अण्णासाहेब, त्यांचे नाटक, त्यांतील कलावंत हे सर्वजण प्रसिद्धीच्या प्रकाशात

तळपू लागले. विशेषतः त्यातील संगीतयोजनेमुळे* तत्कालीन रसिकवर्गाला गंधर्वलोक अवतरल्याचाच भास झाला !

या नवीन संगीत योजनेमुळे पुण्याच्या प्रेक्षकांवर जी मोहिनी पडली तिचे पडसाद मुंबईतही उमटले आणि तेथील रसिकवृंदही संगीत शाकुंतल पाहण्यास उत्सुक झाला. २१ नोव्हेंबरला अण्णासाहेबांनी मुंबईकर रसिकांसमोर आपली नाट्यकृती सादर केली. त्या प्रयोगाला डॉ. रा. गो. भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग यांच्यासारखे विद्वज्जन उपस्थित होते. त्यांनी प्रयोगाची मुक्त कंठाने

---

* त्या वेळच्या अनेक समीक्षकांनी अण्णासाहेबांचे हे संगीतमय नाटक पाश्चात्य देशांतील ऑपेरा पद्धतीचेच नाटक आहे असे उद्‌गार काढलेले आहेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'केसरी 'मध्ये लिहिले की, " इंग्लंडात ऑपेरा या नावाचा एक नाट्यप्रकार आहे. त्याचाच नमुना हा वरील गृहस्थाने इकडे सुरू केला असे म्हणावयास हरकत नाही. त्याचा मासला आजपर्यंत एका पारशी खेळात मात्र दृष्टीस पडत असे. पण त्याहून हल्ली सुरू असलेले संगीत किती उत्तम आहे हे दोन्ही चिजा ज्याने पाहिल्या असतील त्यास सांगावयास नको. "

अण्णासाहेबांचा मृत्युलेख लिहिताना ज्ञानप्रकाशकारांनी, " इंग्लिश लोकांत ऑपेरा म्हणून जो एक संगीत नाटकाचा प्रकार आहे त्याच धर्तीवर त्यांनी हा प्रकार इकडे सुरू केला " असे उद्‌गार काढले. ( दि. १२-११-८५ )

पुढे काही वर्षांनी किर्लोस्कर मंडळीच्या संगीत मृच्छकटिक नाटकाच्या प्रयोगाचे रसग्रहण करताना मुंबईच्या 'Times of India' पत्रात पुढील मजकूर आलेला होता—" The opera being in the hands of the well-known company, it is needless to say was well performed. The hero Charudatta did his part esceedingly well. As a native opera–singer he is unrivalled not only in Bombay but throughout the presidency."

(20–Nov.–1896)

स्तुती करून अण्णासाहेबांना त्यांच्या नवोदित कृतीबद्दल धन्यवाद दिले. मुंबईच्या रसिकांनी आणखी काही प्रयोग व्हावे अशी इच्छा व्यक्त केली, परंतु स्वत: अण्णासाहेब व त्यांचे काही सहकारी हे सरकारी नोकर असल्यामुळे त्यांना परत आपल्या नोकरीवर रुजू होण्यासाठी रसिकांची मागणी मान्य करता आली नाही.

**संगीतसूर्याचा उदय**

१८८१ च्या पावसाळ्यात अण्णासाहेबांची कचेरी पुण्यात मुक्कामासाठी आल्यानंतर शाकुंतल नाटकाचे पुढील अंक बसविण्यास प्रारंभ झाला. ३ सप्टें. १८८१ ला सहा अंकी प्रयोग झाला. त्या वेळी उपस्थित असलेल्या, डेक्कन कॉलेजातील डॉ. कीलहॉर्न यांनी वैखानसाच्या भूमिकेतील अण्णासाहेबांची भव्य मूर्ती पाहिल्यानंतर, "I see before me the old rishees in their true garb" असे उद्‌गार काढले.

शाकुंतल नाटकाच्या यशानंतर अण्णासाहेबांच्या मनात पुढील नाटकाचे विचार घोळू लागले. त्याचबरोबर अण्णासाहेबांचे पुढील नाटक पहिल्यापेक्षा अधिक सरस कसे होईल याची चिंता श्री. महादेव चिमणाजी आपटे* यांच्यासारखे अण्णांचे मान्यवर स्नेही करू लागले.

**चिर-तरुण सौभद्र**

अण्णासाहेबांचे शिष्योत्तम देवल यांनी सुभद्रार्जुन आख्यान सुचविले. अण्णांना ते पसंतही झाले. परतु सुभद्रेची भूमिका करण्यासाठी अनुरूप गायक नट मिळविणे अवश्य होते. शाकुंतल नाटक संगीत असले तरी त्यातील शकुंतलेची भूमिका करणारे श्री. शंकरराव मुजुमदार गाणारे नसल्यामुळे त्या भूमिकेसाठी अण्णासाहेबांनी पदे केली नव्हती. परंतु सौभद्राची नायिका मात्र संगीतकुशल असलीच पाहिजे असा विचार करून त्यांनी त्या दृष्टीने

---

* या बाबतीत कै. आपटे यांनी अण्णासाहेबांना आपुलकीने ज्या सूचना केल्या त्यासंबंधीचे त्यांचे पत्र मोठे वाचनीय आहे. ( मुजुमदार कृत अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र. )

शोध सुरू केला. बडोदा येथे एका हरदासाची दोन देखणी व गाणारी मुले आहेत असे कळल्यानंतर त्यांनी मोरोबा वाघुलीकरांना बडोद्यास पाठविले. त्या प्रयत्नाला यश येऊन भाऊराव कोल्हटकर २२ सप्टेंबर १८८२ मध्ये किर्लोस्कर मंडळीत येऊन दाखल झाले. भाऊराव आल्याबरोबर अण्णासाहेबांनी सौभद्र नाटक लिहून पुरे केले. मोरोबा, बाळकोबा व भाऊराव यांच्या गायनाची वैशिष्ट्ये विचारात घेऊनच त्यांनी तदनुरूप संगीताची योजना केली होती. स्वत: अण्णासाहेब सूत्रधार व बलराम या भूमिका करीत. श्री. मजुमदारांकडे रुक्मिणीची भूमिका सोपविण्यात आली. १८ नोव्हेंबर १८८२ रोजी सौभद्र नाटकाचा तीन अंकी प्रयोग पुणे रसिकांना सादर करण्यात आला. त्या नाटकाने तर शाकुंतलपेक्षाही रसिकांवर अधिक मोहिनी टाकली. १८८३ च्या मार्चमध्ये सौभद्राचा संपूर्ण पाच अंकी प्रयोग झाला. भाऊरावांसारखा गायक उपलब्ध झाल्यामुळे शकुंतलेच्या भूमिकेसाठी पदे लिहून शाकुंतल नाटक नव्या थाटात रंगभूमीवर आणण्याचेही ठरले. ही पद्यरचना करण्याची कामगिरी देवलांच्याकडेच देण्यात आली.

शाकुतल-सौभद्राचे प्रयोग पुण्या-मुंबईला विलक्षण गाजल्यामुळे अन्य ठिकाणचे रसिकही अण्णासाहेबांना वारंवार निमंत्रणे देऊ लागले. त्यांची उत्सुकता पाहून अण्णांनी सहा महिन्यांची रजा घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह दौऱ्यावर निघण्याचे ठरविले त्याप्रमाणे प्रथम मुंबई व नंतर सोलापूर, इंदूर, देवास, नगर येथील रसिकांना शाकुंतल–सौभद्राची मेजवानी देऊन किर्लोस्कर मंडळी पुन्हा इंदूर येथे येऊन विसावली.

### नवी व्यवस्था - नवे व्यवस्थापक

१८८० पासून १८८३ पर्यंत तीन वर्षे किर्लोस्कर मंडळीला भरपूर पैसा मिळाला होता. महाराष्ट्रातीलच नव्हे तर बाहेरच्या नाट्यप्रेमी रसिकांच्या मनात अण्णासाहेब व त्यांची नाट्यसंस्था यांच्याविषयी ममत्व निर्माण झाले होते. उत्कृष्ट नाटके प्रथम श्रेणीचे गायक नट, अण्णांच्या स्नेहीमंडळींच्या समाजातील प्रतिष्ठितपणामुळे किर्लोस्कर मंडळीला मिळालेली विद्वन्मान्यता

या सर्व गोष्टींमुळे किर्लोस्कर मंडळी ही महाराष्ट्राच्या कलात्मक जीवनाचे एक भूषण झाली होती. परंतु संस्थेचा अंतर्गत कारभार अत्यंत बेशिस्तीचा असल्यामुळे बाह्यांगी वैभवशाली दिसणारा हा डोलारा कोसळून पडतो की काय अशी कुशंका अण्णासाहेबांच्या मनाला भेडसावू लागली. त्या कारभाराचे स्वरूप वर्णन करताना अण्णांचे सहकारी व चरित्रकार श्री. मुजुमदार * लिहितात, "तीन वर्षांत फक्त चार महिने मधून मधून खेळ होत होते तरी कमीत कमी २० हजार रुपये प्राप्ती झाली असेल. परंतु त्या मानाने मंडळीस फायदा मुळीच झाला नव्हता; त्यामुळे मंडळी जरा असंतुष्ट असे ... मंडळीस दरमहा पगाराची वगैरे व्यवस्था ठरलेली नव्हती. येईल ती जमा, होईल तो खर्च; ज्याला मिळेल त्याला मिळेल, नाही त्याला नाही असाच प्रकार चालला होता म्हटले तरी हरकत नाही. अण्णासाहेबांचे लक्ष खर्चाच्या बाबीकडे मुळीच नसे. एखाद्याला काही द्यायचे मनात आले की मग त्याच्या योग्यतेपेक्षाही जास्त देऊन टाकीत असत. अशामुळे स्वार्थसाधू व पुढेपुढे करणारांचा मात्र फायदा होत असे." या अव्यवहारी कार्यपद्धतीमुळे इंदूर येथेच मंडळीची समाप्ती होते की काय अशी भीती निर्माण झाली. परंतु मराठी रंगभूमीच्या सुदैवाने त्याच ठिकाणी मंडळीला संजीवनी देणारी नवीन व्यवस्था अमलात आणण्याच्या दृष्टीने विचारचक्र सुरू झाले.

इंदूर येथेच अण्णासाहेब व त्यांचे स्नेही श्री. गुळवे यांची भेट झाली. अण्णांना त्या वेळी इंदूर दरबारने दरमहा ६५ रु. ची नोकरी दिली होती. हा पगार म्हणजे तैनातच होती, परंतु अण्णांना त्या निष्क्रिय जीवनाचा लवकरच कंटाळा आला. अशाच वेळी गुळवे यांच्यासारख्या व्यवहारी मित्राची गाठ पडल्यामुळे अण्णासाहेब व त्यांची नाट्यसंस्था या दोघांच्याही जीवनाला नवीन व हितप्रद असे वळण मिळाले. त्या दोघांनी किर्लोस्कर मंडळीच्या पुढील व्यवस्थेबद्दल पुष्कळ विचार करून अण्णासाहेबांनी आपल्या

* अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे चरित्र, पृ. १२९, १३१, १३२. वरील मजकुरानंतर मुजुमदारांनी त्या वेळच्या बेशिस्त व बेफिकीरी खर्चाची अनेक उदाहरणे नमूद केली आहेत.

नटसंचासह गुळवे यांच्या गांवी पनवेल—येथे जाऊन रहावे असे ठरले. संस्थेच्या खर्चासाठी गुळवे यांनी द्रव्य-साहाय्य करण्याचे मान्य केले. प्रयोग सुरू झाल्यानंतर ती रक्कम परत करण्याचेही ठरविण्यात आले. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्या मुक्कामात अण्णासाहेबांनी आपल्या पुढच्या रामराज्यवियोग नाटकाचे लेखन करण्याचा संकल्प निश्चित करण्यात आला. कंपनीच्या पैशाची दक्षतेने देवघेव करणारा, खात्रीचा व सर्वांशी मिळून मिसळून वागणारा सेक्रेटरी मिळवून देण्याविषयी श्री गुळवे यांना विनंती करण्यात आली. गुळवे यांनी श्री. त्र्यंबक नारायण साठे ह्या आपल्या परिचयाच्या होतकरू व व्यवहारी तरुणाचे नाव सुचविले आणि मंडळीचा कारभार ते चोखपणे करतील याविषयी अण्णांना ग्वाही दिली. त्याप्रमाणे श्री. साठे यांनी मे १८८४ मध्ये किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापकाचा सूत्रे हाती घेतली.

### भागीदारीचा प्रारंभ

योजनेनुसार किर्लोस्कर मंडळी पनवेल येथे येऊन दाखल झाली. अण्णासाहेबांच्या संकल्पित नव्या रामराज्यवियोग नाटकाचे लेखनही सुरू झाले. याच वेळी मंडळीच्या उत्पन्नाची पद्धतशीर वाटणी व खर्च होण्याच्या दृष्टीने मंडळीचे भागीदार व त्यांचा उत्पन्नातील वाटा याविषयी विचार सुरू झाला. श्री. गुळवे यांनी अण्णासाहेबांना किती हिस्सा पाहिजे अशी विचारणा केल्यानंतर त्यानी ‘ मला स्वतःसाठी पैचाही हिस्सा नको. नाटक मंडळीने सध्याप्रमाणेच अखेरपर्यंत माझा कच्चा खर्च चालवावा आणि माझे जीवमानपर्यंत मी सहकुटुंब किर्लोस्कर मंडळीत रहावे. माझे निधन किर्लोस्कर मंडळीत होऊन मंडळीच्या हातूनच माझी प्रेतयात्रा व अंत्यविधी व्हावा. हाच माझा मालकी हिस्सा असे मी समजतो.’ असे लोकविलक्षण उत्तर दिले. परंतु भावनात्मक दृष्टीने हे विचार अविस्मरणीय असले तरी त्या बाबतीत थोडा व्यावहारिक विचारही केला पाहिजे असा श्री. गुळवे यांनी आग्रह धरल्यामुळे अण्णासाहेब व इतर ज्येष्ठ सहकारी यांच्याबरोबर अनेकदा

३...

चर्चा होऊन स्वत: अण्णासाहेब, मोरोबा, भाऊराव आणि अण्णांचे एक बालमित्र श्री. गोपाळराव दाते असे चार जण मंडळीचे भागीदार होण्याचे निश्चित झाले. त्यांचा अन्य गोष्टींचा उत्पन्नातील वाटा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला.

रु.–आ.–पै

० – १ – ० गुर्लहोसूर येथील श्री शंकराचार्य यांच्या जयंती उत्सवासाठी
० – ४ – ० अण्णासाहेब किर्लोस्कर
० – ३ – ९ मोरो बापूजी देव, वाघुळीकर
० – ३ – ६ लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर
० – १ – ० गोपाळ नारायण दाते
० – १ – ६ गुड कॉंडक्ट फंड.
० – १ – ३ राखीव फंड

रु. १ – ० – ०

यापैकी गुड कॉंडक्ट फंडाची तरतूद, मालकाच्या नफ्याची वाटणी होईल त्या वेळी पगारदार नोकरांचे सद्वर्तन, योग्यता व उपयुक्तता यांचा विचार करून त्यांना देण्यासाठी करण्यात आली होती मंडळी विश्रांतीसाठी सुटी घेईल त्या वेळी सामान ठेवणे व ते सांभळणे, नोकरांना पगार (काहींना पूर्ण तर काहींना निम्मा) यासाठी राखीव फंडाची सोय होती. (भागीदारांपैकी श्री दाते हे मंडळी मुंबई मुक्कामी असताना संस्थेबाहेर पडले. तेव्हा त्यांचा हिस्सा बाळकोबा नाटेकरांच्या भूमिका करण्यासाठी संस्थेत आलेले श्री. रामभाऊ किंजवडेकर यांना देण्यात आला. बाळकाबांची गुणवत्ता व लोकप्रियता ही अद्वितीय असतानाही त्यांच्या चचल स्वभावामुळे त्यांना मंडळीची भागीदारी लाभू शकली नाही.)

## रामराज्यवियोग

ही अण्णासाहेबांची तिसरी आणि अखेरची नाट्यकृती. तिची रचना करताना त्यांच्या मनात काही समकालीन घटना विशेष घोळत होत्या

नाटकाची प्रेरणा ते इंदूर येथे असतानाच झाली होती. इंदूरचे त्या वेळचे महाराज तुकोजीराव होळकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव युवराज ऊर्फ बाळासाहेब यांच्या सुविद्य व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वामुळे त्यांची व अण्णासाहेबांची घनिष्ट मैत्री जमली होती. युवराजांच्या मनातून अण्णासाहेबांनी सौभद्रानंतर भवभूतीचे मालतीमाधव नाटक अनुवादित करून रंगभूमीवर आणावे अशी उत्कट इच्छा होती. परंतु अण्णासाहेबांना त्या नाटकातील उग्ररस आवडत नसल्याने त्यांनी युवराजांच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. ते पनवेल यथे आल्यानंतर युवराजांचे कारभारी श्री. लेले यांनी अण्णासाहेबांना त्याचे पुन्हा स्मरण करून दिले. रामराज्यवियोग तयार झाला. श्री. लेले यांनी अण्णासाहेबांना लिहिले की, " His Highness said that he did not care much for the रामराज्यवियोग. He will see it leisurely in five or six days. He said he had asked you to prepare the मालतीमाधव in Sangita and that it was not right for you not to have done it so long. " युवराजांचा स्नेहसंबंध यामुळे दुरावेल अशी भीती असतानाही अण्णासाहेबांनी सच्च्या कलावंताच्या भूमिकेवर ठामपणे उभे राहून ते अप्रिय काम हाती घेतले नाही. युवराजही विचारी असल्यामुळे 'जे कवीस आवडत नाही ते त्याच्याकडून होणेही शक्य नाही' हे ध्यानात घेऊन अण्णासाहेबांना मालतीमाधवाबद्दल नंतर आग्रह केला नाही.

नाटक मंडळीतील नटवर्ग डोळयासमोर ठेवून नाटकरचना करावयाची अशी अण्णासाहेबांची पद्धती असल्यामुळे त्यांनी पहिल्या अंकाचे लेखन करताना सूत्रधार व दशरथ ( स्वतः अण्णासाहेब ), वसिष्ठ ( मोरोबा ), आणि मंथरा ( भाऊराव ) अशी योजना मनाशी ठरविली. ( अण्णांच्या पहिल्या दोन्ही नाटकांत महत्त्वाच्या भूमिका करणारे बाळकोबा नाटेकर या प्रसंगी काही कारणामुळे नाराज होऊन संस्थेच्या बाहेर गेलेले असल्यामुळे त्यांच्यासाठी अण्णांनी कोणतीच भूमिका रेखाटली नाही. पुढे ते मंडळीत परत आल्यानंतर या नाटकातील शंबूकाची भूमिका घेत.) रोज सकाळी अण्णासाहेब पेन्सिलीने नाटकाचे लेखन करीत आणि नंतर तोच भाग साठे शाईने गिरवून स्पष्ट करीत. पदे लिहिताना हातात चिपळ्या घेऊन पद

चर्चा होऊन स्वत: अण्णासाहेब, मोरोबा, भाऊराव आणि अण्णांचे एक बालमित्र श्री. गोपाळराव दाते असे चार जण मंडळीचे भागीदार होण्याचे निश्चित झाले. त्यांचा अन्य गोष्टींचा उत्पन्नातील वाटा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आला.

| रु.–आ.–पै | |
|---|---|
| ० – १ – ० | गुर्लहोसूर येथील श्री शंकराचार्य यांच्या जयंती उत्सवासाठी |
| ० – ४ – ० | अण्णासाहेब किर्लोस्कर |
| ० – ३ – ९ | मोरो बापूजी देव, वाघु ीकर |
| ० – ३ – ६ | लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर |
| ० – १ – ० | गोपाळ नारायण दाते |
| ० – १ – ६ | गुड कॉंडक्ट फंड. |
| ० – १ – ३ | राखीव फंड |
| रु. १ – ० – ० | |

यापैकी गुड कॉंडक्ट फंडाची तरतूद, मालकाच्या नफ्याची वाटणी होईल त्या वेळी पगारदार नोकरांचे सद्वर्तन, योग्यता व उपयुक्तता यांचा विचार करून त्यांना देण्यासाठी करण्यात आली होती मंडळी विश्रांतीसाठी सुटी घेईल त्या वेळी सामान ठेवणे व ते सांभ ळणे, नोकरांना पगार (काहींना पूर्ण तर काहींना निम्मा) यास ठी राखीव फंडाची सोय होती. ।भागीदारांपैकी श्री दाते हे मंडळी मुंबई मुक्कामी असताना संस्थेबाहेर पडले. तेव्हा त्यांचा हिस्सा बाळकोबा नाटेकरांच्या भूमिका करण्यासाठी सस्थेत आलेले श्री. रामभाऊ किजवडेकर यांना देण्यात आला. बाळकाबांची गुणवत्ता व लोकप्रियता ही अद्वितीय असतानाही त्यांच्या चचल स्वभावामुळे त्यांना मंडळीची भागीदारी लाभू शकली नाही.)

## रामराज्यवियोग

ही अण्णासाहेबांची तिसरी आणि अखेरची ना यकृती. तिची रचना करताना त्यांच्या मनात काही समकालीन घटना विशेष घोळत होत्या

नाटकाची प्रेरणा ते इंदूर येथे असतानाच झाली होती. इंदूरचे त्या वेळचे महाराज तुकोजीराव होळकर यांचे ज्येष्ठ चिरंजीव युवराज ऊर्फ बाळासाहेब यांच्या सुविद्य व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वामुळे त्यांची व अण्णासाहेबांची घनिष्ट मैत्री जमली होती. युवराजांच्या मनातून अण्णासाहेबांनी सौभद्रानंतर भवभूतीचे मालतीमाधव नाटक अनुवादित करून रंगभूमीवर आणावे अशी उत्कट इच्छा होती. परंतु अण्णासाहेबांना त्या नाटकातील उग्ररस आवडत नसल्याने त्यांनी युवराजांच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. ते पनवेल यथे आल्यानंतर युवराजांचे कारभारी श्री. लेले यांनी अण्णासाहेबांना त्याचे पुन्हा स्मरण करून दिले. रामराज्यवियोग तयार झाला. श्री. लेले यांनी अण्णासाहेबांना लिहिले की, " His Highness said that he did not care much for the रामराज्यवियोग. He will see it leisurely in five or six days. He said he had asked you to prepare the मालतीमाधव in Sangita and that it was not right for you not to have done it so long. " युवराजांचा स्नेहसंबंध यामुळे दुरावेल अशी भीती असतानाही अण्णासाहेबांनी सच्च्या कलावंताच्या भूमिकेवर ठामपणे उभे राहून ते अप्रिय काम हाती घेतले नाही. युवराजही विचारी असल्यामुळे 'जे कवीस आवडत नाही ते त्याच्याकडून होणेही शक्य नाही' हे ध्यानात घेऊन अण्णासाहेबांना मालतीमाधवाबद्दल नंतर आग्रह केला नाही.

नाटक मंडळीतील नटवर्ग डोळयासमोर ठेवून नाटकरचना करावयाची अशी अण्णासाहेबांची पद्धती असल्यामुळे त्यांनी पहिल्या अंकाचे लेखन करताना सूत्रधार व दशरथ ( स्वतः अण्णासाहेब ), वसिष्ठ ( मोरोबा ), आणि मंथरा ( भाऊराव ) अशी योजना मनाशी ठरविली. ( अण्णांच्या पहिल्या दोन्ही नाटकांत महत्त्वाच्या भूमिका करणारे बाळकोबा नाटेकर या प्रसंगी काही कारणामुळे नाराज होऊन संस्थेच्या बाहेर गेलेले असल्यामुळे त्यांच्यासाठी अण्णांनी कोणतीच भूमिका रेखाटली नाही. पुढे ते मंडळीत परत आल्यानंतर या नाटकातील शंबूकाची भूमिका घेत.) रोज सकाळी अण्णासाहेब पेन्सिलीने नाटकाचे लेखन करीत आणि नंतर तोच भाग साठे शाईने गिरवून स्पष्ट करीत. पदे लिहिताना हातात चिपळ्या घेऊन पद

तालबद्ध आहे किंवा नाही ते ठरवीत, आणि ते तसे पटले म्हणजे मोरोबा व भाऊराव यांना बोलावून तंबोरा व तबला यांच्या साथीवर ती पदे गाऊन दाखवीत. त्यांच्या अंगी काव्यलेखनाची शक्ती इतकी विलक्षण व हुकमी होती की अगदी गद्यभागाप्रमाणे एकाही अक्षराची खाडाखोड न करता, पाठ असल्याप्रमाणे ते पदे लिहीत. रोज एक तास या पद्धतीने नाट्यलेखनाचे काम चाले.

नाटकाच्या नांदी-प्रवेशात सूत्रधाराच्या सांगण्यावरून नटी 'वर्षाकालाल अनुसरून' गायन करते. त्यासाठी अण्णासाहेबांनी 'पंचकल्याणी घोडा अबलख' या लावणीच्या चालीवर,

सुटला पितृदिशेचा वारा। झाकी मेघ नभपथचि सारा।
घन गर्जत तोफेपरी वर्षती गारा। कडकडाट करती
विजा येति जलधारा ॥

हे पद लिहिलेले आहे. त्यांत त्यांनी वर्षाकाळाचे जे प्रत्ययकारी वर्णन केले आहे ते त्यांनी त्या वेळेला पनवेल येथे असताना मृग नक्षत्रातील मुसळधार पर्जन्यवृष्टीचे जे दर्शन स्वतः पाहिले होते. त्याचेच यथातथ्यपणे केलेले रेखीव चित्रण आहे.

पहिला अंक लिहून तयार झाल्यानंतर पात्र-योजनेप्रमाणे त्याच्या तालमीही सुरू झाल्या. तालमी घेण्यासाठी अण्णासाहेबांनी आपले नाट्यशिक्षण-पटू शिष्य श्री. गोविंदराव देवल यांना मुद्दाम पुण्याहुन बोलावून आणले. देवलांच्या अभिनयशिक्षणाचे वैशिष्ट्य सांगायचे म्हणजे नाटक बसविण्यापेक्षा नट व त्याची भूमिका तयार करण्याची त्यांची पद्धती होती. ते मुख्य पात्रांना निरनिराळ्या वेळी स्वतंत्रपणे भूमिका शिकवत. एकदम सर्वांकडून नाटक बसविण्याची पद्धती त्यानी केंव्हाही स्वीकारली नाही नाटक चाल असताना ते नटांची दृष्टी चुकवून मुद्दाम एका बाजूला बसत आणि नटांच्या उणीवा लक्षात ठेवून त्यांना त्या नंतर समजावून सांगत.

नाटकाच्या दुसऱ्या अंकात कैकयीचे पात्र होते. त्यासाठी अनुरूप मुलगा जवळ नसल्याने पुन्हा नाट्यलेखनाचे काम अडून त्या भूमिकेसाठी एखाद्या

गायक मुलाचा शोध सुरू झाला. बडोद्याचे श्री. गजाननराव भाटवडेकर यांच्या आश्रयाला भास्कर बखले या नावाचा गोड आवाजाचा होतकरू मुलगा आहे अशी बातमी लागल्यानंतर अण्णासाहेबांनी श्री. भाटवडेकरांच्या मध्यस्थीने भास्कराच्या वडिलांची संमती मिळवून त्याला आपल्या मंडळीत सामील करून घेण्याचा बेत केला, आणि तो सिद्धीस जाण्यासाठी खुद्द भाऊराव कोल्हटकरांची बडोद्याला पाठवणी करण्यात आली. या सर्व प्रयत्नांना यश येऊन भास्कर बखले हा मुलगा दि. १९ ऑगस्ट १८८४ या दिवशी पनवेलीस येऊन दाखल झाला. त्याला कैकयीची भूमिका शिकविण्याची जबाबदारी अर्थातच देवल मास्तरांच्यावर सोपविण्यात आली. कैकयीच्या भूमिकेला अनुरूप नट मिळाल्यामुळे पुढील दोन अंक झपाट्याने लिहून झाले आणि ४ सप्टेंबर १८८४ रोजी गुळवे यांच्या दिवाणखान्यात त्या तीन अंकांची रंगीत तालीम झाली.

### संगीत नाट्यवाचन

रामराज्यवियोग नाटकाच्या तीन अंकांचे हस्तलिखित तयार झाल्याचे वृत्त इंदूरच्या युवराजांच्या कानावर गेले. अण्णासाहेबांनी त्यांच्या इच्छेप्रमाणे मालतीमाधव रूपान्तरीत न करता रामराज्यवियोगच पुरे केले या गोष्टीबद्दल रुष्ट न होता त्यांनी आपल्या दिलदार स्वभावाला अनुसरून अण्णासाहेबांना नवीन नाटक घेऊन इंदूर येथे बोलावले. त्या आमंत्रणानुसार अण्णासाहेब आपले नाटक व भाऊराव बरोबर घेऊन १८८४ च्या सप्टेंबरमध्ये इंदूरला गेले. त्या ठिकाणी त्यांनी दररोज एक अंक याप्रमाणे युवराजांना तीन दिवसांत तीन अंक वाचून दाखविले. अण्णासाहेब प्रथम अंकातील कथाभागाचा सारांश सांगत; नंतर ते गद्य भाग वाचीत आणि भाऊराव त्यातील पद्यभाग गाऊन दाखवीत. गायनप्रसंगी इंदूरचे विख्यात पखवाजवादक श्री. नाना पानसे आणि त्यांचे चिरंजीव श्री बाळूभय्या पानसे हे आलटून पालटून साथ करीत. राजवाड्यातील हा नाट्यवाचनाचा कार्यक्रम अतिशय यशस्वी ठरल्यामुळे, प्रथम खासगीवाले यांच्या वाड्यात आणि नंतर छावणीत किबेसाहेब यांच्या वाड्यात अण्णासाहेबांना तोच कार्यक्रम पुन्हा करून दाखवावा लागला.

रामराज्यवियोगाच्या तीन अंकांची तालीम झाल्यानंतर मंडळी मुंबईच्या दौऱ्यावर गेली. मात्र त्या नाटकाचा पहिला प्रयोग त्यांनी मुंबईला केला नाही. त्यासाठी त्यांनी मंडळी मुद्दाम पुण्याला आणली. त्यांच्या शाकुंतल व सौभद्र या दोन्ही नाटकांचे पहिले प्रयोग पुणे येथेच झाल्यामुळे या तिसऱ्या प्रयोगाचेही प्रथम दर्शन पुणेकरांनाच प्रथम मिळावे असा काही पुणेकर रसिकांनी प्रेमाचा आग्रह केला होताच. परंतु स्वतः अण्णासाहेबांना पुणेकर रसिकांच्या बाबतीत एक वेगळीच आपुलकी होती. ' पुणे शहर हे विद्वान, रसिक, मार्मिक व योग्य टीकाकारांचे स्थान असल्याने त्यांच्यासमोर पहिले नाटक व्हावे, म्हणजे ते पूर्ण कसास उतरते ' असे त्यांचे अगदी प्रारंभापासूनचे मत होते. आणि त्यालाच अनुसरून त्यांनी पुण्यातील आनंदाश्रम नाट्यगृहात रामराज्यवियोग नाटकाचा पहिला प्रयोग दि. २० ऑक्टोबर १८८४ या दिवशी करून दाखविला. पहिल्या प्रयोगात सूत्रधार व दशरथ ( अण्णासाहेब ), नटी व मंथरा ( भाऊराव ), वसिष्ठ ( मोरोबा ), सुमंत ( गोपाळराव दाते ), शंबूक (बळवंतराव मानकामे), विनत ( अण्णासाहेब) आणि उन्नत ( रामभाऊ किंजवडेकर ) अशी पात्रयोजना होती. कैकेयीची भूमिका भास्कर बखले या गायकाला देण्यात आली होती, व देवलांनी तिचे शिक्षणही दिले होते. असे असतानाही अण्णासाहेबांच्या अत्याग्रहामुळे श्री. शंकरराव मुजुमदार यांनाच पहिल्या प्रयोगात कैकेयीची भूमिका करावी लागली. ते गद्य नट असल्याने कैकेयीच्या भूमिकेसाठी रचलेल्या पदांचे गद्य स्वरूपात रूपान्तर करून तो प्रयोग साजरा करण्यात आला.

रामराज्यवियोगाच्या तिसऱ्या अंकाच्या शेवटी कैकेयीच्या मागणीमुळ शोकाकुल झालेला दशरथ मूर्छित होऊन पडतो असा प्रसंग आहे. या ठिकाणी नाटक समाप्त झालेले नाही. अण्णासाहेबांना पुढेही त्याचे लेखन करावयाचे होते. त्या दृष्टीने त्यांनी चौथ्या अंकाला प्रारंभही केला होता. त्या प्रवेशात राम व सीता यांच्यातील काही संवाद व पदे त्यांनी तयारही केली होती. परंतु राम व सीता या भूमिका उत्तम तऱ्हेने करू शकतील अशी अनुरूप मुले नजरेसमोर नसल्याने त्यांचे लेखन स्थगितच झाले; आणि पुढील वर्षीच

त्यांचे देहावसान घडून आल्यामुळे रामराज्यवियोग केव्हाच पूर्ण होऊ शकले नाही! किर्लोस्कर मंडळी त्या नाटकाचे तीनच अंकी प्रयोग शेवटपर्यंत करीत असे.

**रामराज्यवियोग : प्रयोगदर्शन**

हे नाटक अपूर्ण असतानादेखील ते शेवटपर्यंत लोकप्रिय राहिले होते. किर्लोस्कर मंडळीचा गुणी नटसंच आणि त्यांना देवल मास्तरांच्याकडून मिळालेले रसपूर्ण अभिनयाचे शिक्षण यांमुळे त्याचे प्रयोग अत्यंत यशस्वी ठरले. श्री. त्र्यंबकराव साठे यांनी या नाटकाविषयी एक टिपण ठेवलेले आहे, त्यातील काही भाग पुढे दिला आहे--

"नांदी-प्रवेशातील नटीच्या एका पदात

राजा वसंत जणु मृत झाला ।
ग्रीष्म कि तापवि सकल जगाला ।।
जननेत्रा पूरचि आला ।
रडवितो तैसा वर्षे स्वाश्रुजलाला ।।

या पदात, नाटकाच्या पुढील भागातील दशरथ राजाच्या मृत्यूचे सूचक वर्णन आहे. या पदाच्या शेवटच्या चरणातील गायनान्तर्गत प्रेमळ व करुण रसप्रधान सूर कै. भाऊराव कोल्हटकरांनी जे त्या वेळी गायिले त्याचे वर्णन करता येणे शक्यच नाही. द्वितीय अंकामध्ये आरंभीच दासीपुत्र शंबूकाचे पात्र प्रेक्षकांसमोर उभे करून त्या वेळेस ब्राह्मण वर्णाविरुद्ध एका वर्गाने जी टवाळकी सुरू केली होती तिचे व अन्य वर्गांचे मन कलुषित करण्याविषयी इतरत्र जे त्या वेळी प्रयत्न करण्यात येत होते त्याचे शंबूकाच्या भाषणात चित्र आहे. त्याच अंकात कैकेयी (रा. बखले) आणि मंथरा (रा. कोल्हटकर) यांच्या आवाजास व गाण्याच्या ठसकेदारपणास अनुसरून जी पद्यरचना किर्लोस्करांनी केली आहे ती अत्यंत सर्वांगसुंदर अशी झाली आहे. त्यातील कोणतेही पद वरील नट जेव्हा साभिनय व अर्थावर लक्ष ठेवून आपल्या मधुर व जोरदार ठसठशीत गायनाने स्पष्ट शब्दांत गाऊन प्रेक्षकवृंदास तल्लीन करीत, तो

प्रसंग कोठवर वर्णावा ! रा. बखले यांनी 'जो मम नयनचकोरा इंदू' हे पद सुरू करताच सर्व नाटकगृह एकचित्त होऊन जात असे. या पदाचा 'इंदू' हा शेवटचा शब्द तर शरद्ऋतूतील पौर्णिमेच्या चंद्रकिरणांप्रमाणे प्रेक्षकांच्या हृदयात प्रकाश पाडी. मंथरेची या अंकातील सर्वच पद्ये श्री. कोल्हटकर हे आपल्या अर्थपूर्ण वाणीने व पल्लेदार कंठमाधुर्याने म्हणून प्रेक्षकांस तल्लीन करीत. विशेषकरून 'रामासि अनुकूल असती त्यांचे पाडीन दात तरीच खरी मी' या पदातील पहिला चरण उग्र स्वरात, तर शेवटचा 'रामा वन भरता सिंहासन' हा चरण प्रेमळ स्वरात गाऊन आपल्या साभिनय गायनकौशल्याची प्रेक्षकांवर छाप पाडीत.

तिसऱ्या अंकाच्या प्रारंभी राजा दशरथ व वसिष्ठ महर्षी यांचे जे परस्पर भाषण चालू आहे त्यात त्या वेळचे इंदूरचे महाराज व युवराज यांच्यातील संबंधाचे प्रतिबिंब पडले आहे. भरतमुनींच्या नाटयशास्त्राप्रमाणे, रंगभूमीवर मृत्यू दाखवावयाचा नसल्यामुळे दशरथ मूर्च्छित पडतो, येथेच अंकाचा पडदा टाकून भरतमुनींचा नाटकाचा कायदा मोठ्या चातुर्याने पाळला आहे.

या नाटकातील वसिष्ठमहर्षींची भूमिका रा. मोरोबा वाघुलीकर यांजकडे दिली होती. पूर्वीच्या शाकुंतल व सौभद्र नाटकांतील सुंदर व मनोहर राजवेष सोडून शुभ्र दाढी व जटा असा ऋषीचा वेष चढवून रा. वाघुलीकर यांनी उत्कृष्ट गायनाने व अभिनयाने प्रेक्षकांस चकित केले होते. स्वत: अण्णासाहेब या नाटकात दशरथाची भूमिका करीत. दशरथाची निर्भर्त्सना करणारी कैकयी – आणि तिची विविध प्रकारे आळवणी करणारा दशरथ यांच्यातील प्रवेश फार रंगत असे. सत्त्वधीर व वृद्ध राजा आणि चढेल तरुण बायको – यांचा हा संवाद रंगभूमीवर चालू असता ज्याच्या डोळ्यांतून टिपे पडली नाहीत असा प्रेक्षक त्या प्रसंगी नाटकगृहामध्ये एकही दिसत नसे ! चोहोकडे पाहता, स्त्री-पुरुष एकसारखे डोळ्यांस पदर लावून व परस्परांकडे पाहात कवी किर्लोस्करांना धन्यवाद देत. हे प्रसंग पुणे व मुंबईस तर सर्वांनीच अनुभविले आहेत. अंकाच्या शेवटची–

रामराज्या सुमुहूर्त काढियेला ।
तोचि त्याला वनवास हेतु झाला ।।
परममंगल मांडिले कृत्य जेथे ।
अशुभमूर्ती पातली कशी तेथे ।।

ही दिंडी रा. मोरोबा वाघुलीकर अत्यंत शोक-विव्हल स्वरात गात त्या वेळी सर्व श्रोतेही मोठ्या औदासिन्याने नाटकगृहातून बाहेर पडत.

**नवे कण्वऋषी**

रामराज्यवियोग रंगभूमीवर येण्याच्या सुमारासच कण्व आणि कृष्ण या भूमिकांनी रसिकांना वेड लावणारे बाळकोबा नाटेकर आणि अण्णासाहेब यांचे संबंध दुरावले होते. त्यांच्या भूमिका करण्यासाठी गोवे गावातील एक सुरेल गायक श्री. रामचंद्र विठ्ठल किजवडेकर यांना संस्थेत सामील करून घेण्यात आले होते. मात्र शाकुंतलातील बाळकोबांची कण्व ही हातखंडा भूमिका मात्र त्यांना न देता ती अण्णासाहेब स्वतःच करीत असत. मात्र बाळकोबांच्यासारख्या श्रेष्ठ गायकासाठी रचलेली कण्वाची पदे आपल्या बेतशीर गायनाला झेपणारी नाहीत हे ओळखून अण्णासाहेबांनी आपल्यासाठी अगदी सोप्या चालीवरील बाळबोध पदे मुद्दाम तयार केली होती. त्यांचे प्रसंगानुकूल गायन, समयोचित अभिनय, आणि प्रभावी दर्शन यांमुळे अण्णांची कण्वाची भूमिकाही परिणामकारक होत असे. अण्णांनी कण्वाच्या भूमिकेसाठी रचलेली ही दोन्ही तऱ्हेची पदे समग्र किर्लोस्कर ग्रंथात पहावयास मिळतात.

**' रसमूर्ती अभिनव कालिदास '**

पुण्याला रामराज्यवियोग नाटक रंगभूमीवर आणून किर्लोस्कर मंडळी नाशिकला रवाना झाली. नेहमी काशीक्षेत्री वास्तव्य करणारे श्रीमत्परमहंस कृष्णानंदसरस्वती या नावाचे एक सत्पुरुष त्या वेळी सिंहस्थ पर्वणीनिमित्त नाशिक येथे आले होते. काही प्रसंगाने त्यांचा व अण्णासाहेबांचा परिचय घडून आला. अण्णांनी अतिशय आग्रह करून त्या स्वामींना आपले नाट्य-

प्रयोग पाहण्यास बोलावले. त्याप्रमाणे कृष्णानंद सरस्वती व त्यांच्या बरोबरचे अन्य पाच संन्यासी यांनी शाकुंतल, सौभद्र व रामराज्यवियोग या तीनही नाटकांचे प्रयोग पाहिले. कृष्णानंद सरस्वती अत्यंत प्रसन्न झाले आणि त्यांनी अण्णांना पुढीलप्रमाणे पदवीदानयुक्त आशीर्वादपत्र पाठविले--

"आपले स्वकृत संगीत शाकुंतल, संगीत सौभद्र, सं. रामायण (रामराज्य-वियोग) हे तीन प्रयोग पाहून अत्यंत संतुष्ट होऊन तुम्हांस 'रसमूर्ती अभिनव कालिदास' अशी पदवी दिली आहे. आजपासून जेव्हा आम्ही तुम्हांस पत्र लिहू तेव्हा हल्ली दिलेले अभिधानपूर्वक पत्र लिहू......तुमच्या जवळच्या मंडळीपैकी रा. मोरोपंत देव (वाघुलीकर) व रा. भाऊराव कोल्हटकर या उभयतांना 'प्रकृतरसपोषक संगीतकुशल' अशी पदवी दिली आहे .. ..ही आनंदोद्गार पत्रिका दिली आहे."

**इंदूरच्या गमती**

नाशिकच्या छोट्या मुक्कामानंतर मंडळी अमरावती येथे जाण्याच्या तयारीत असताना इंदूर दरबारकडून 'एकदम मंडळीसह निघून यावे' अशी युवराज शिवाजीराव होळकर यांच्या आज्ञेवरून केलेली तार साठे यांच्या हाती पडली. लगेच मंडळी १८८५ च्या जानेवारीत इंदूरला येऊन दाखल झाली या वेळेला किर्लोस्कर मंडळी खास सरकारी निमंत्रणावरून आलेली असल्याने मंडळीची सर्व व्यवस्था दरबारी इतमामाने ठेवण्यात आली होती. स्टेशनजवळील प्रशस्त अशा मुसाफरखान्यात मंडळीच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्याच ठिकाणी नाट्यप्रयोग करण्यासाठी सोयीस्कर असा एक रंगमंच व भव्य मंडप उभारून एक तात्पुरते नाट्यगृहही तयार करण्यात आले. त्यांच्या रक्षणासाठी सरकारी पोलिसांचा रात्रंदिवस पहारा असे. त्याचप्रमाणे मुसाफरखान्याच्या मुख्य दरवाजावर सशस्त्र लष्करी शिपायांचा पहारा केवळ – मंडळी सरकारीरीत्या निमंत्रित आहे, हा बडेजाव मिरविण्यासाठी–ठेवण्यात आला होता. किर्लोस्कर मंडळीचा हा वैभवशाली थाटमाट त्या वेळच्या इंदूरच्या नागरिकांच्या कुतूहलाचा आणि कौतुकाचा विषय झालेला होता.

हिंदुस्थान सरकारचे एक बडे अधिकारी लॉर्ड रॅंडाल्फ चर्चिल हे त्या वेळी इंदूर सरकारचे पाहुणे होते. त्यांच्या करमणुकीसाठी इंदूर दरबारने किर्लोस्कर मंडळीच्या शाकुंतल नाटकाचा (फक्त चौथ्या व पाचव्या अंकाचा) प्रयोग आयोजित केला होता. एका भव्य सुशोभित शामियान्यात रंगमंच तयार करवून हा प्रयोग करविण्यात आला. त्याच दिवशी तुकोजीराव होळकरांचे बंधू निधन पावल्यामुळे राजकुटुंबातील कोणीही उपस्थित राहू शकले नाहीत. परंतु दरबारातील मोठमोठे अधिकारी उपस्थित होते. मराठी न जाणणाऱ्या प्रेक्षकांसाठी शाकुंतल नाटकाच्या चवथ्या व पाचव्या अंकाचे इंग्रजी भाषांन्तर छापवून घेऊन त्या पुस्तिका प्रेक्षकांना वाटण्यात आल्या होत्या.

रामराज्य वियोग नाटकाचे लेखन करताना अण्णासाहेबांच्या मनात इंदूरचे तत्कालीन महाराज व युवराज यांचे चित्र घोळत असल्यामुळे नाटकातही त्या संबंधाचे पडसाद स्पष्टपणे उमटल्याखेरीज राहिले नाहीत. त्या प्रसंगीचे श्री. साठे यांनीच केलेले वर्णन पहा—

" २० जानेवारी १८८५ ला रामराज्यवियोग नाटकाचा पहिला प्रयोग जाहीर झाला. त्या पहिल्या प्रयोगासाठी पुढील रांगेतील मधल्या पाच-सहा खुर्च्यांवर तुकोजीराव महाराजांच्या खास मंडळीपैकी श्री. जिवबादादा बक्षी-प्रभृती अधिकारी येऊन बसलेले पहिल्यानंतर, अण्णासाहेबांचे मित्र जनरल बापूसाहेब रेशीमवाले रंगपटात येऊन अण्णासाहेबांना किंचित चिंताजनक स्वरात म्हणाले, " अण्णासाहेब, आजचे रामराज्यवियोग नाटक मुद्दाम पाहण्यासाठी महाराजांच्या खास बैठकीपैकी काही मडळी ऊ न बसली आहेत. त्यांचा मला संशय येतो. हे लोक कधीही नाटकास येणारे नव्हेत. यावरून ही मंडळी मोठ्या महाराजांनी, या नाटकात त्यांना व युवराजांना उद्देशून काय रचना केली आहे हे पाहून येण्यासाठी पाठविली असावी. " हे ऐकून अण्णासाहेब अगदी बेफिकीरपणे म्हणाले, " बापूसाहेब, आपण चिंता करू नये. आपले महाराज संतापले तर काय करतील ? अण्णा किर्लोस्कराला तोफेच्या तोंडी देतील; परंतु त्यामुळे अण्णाची नाट्यकलेत दिगंत कीर्तीच होईल !" अण्णासाहेबांचे उत्तर ऐकून

रेशीमवाले बाहेर आपल्या जागेवर जाऊन बसले. त्या रात्रीचा प्रयोग नेहमीपेक्षाही उत्कृष्ट झाला. त्या नाटकाच्या तिसऱ्या अंकात दशरथ राजा वसिष्ठ ऋषींना म्हणतो,--

" गुरुजी, पुत्र कर्ते झाले असता त्यांस एकीकडे ठेवून लोभानें आपण राज्यासक्त होणे हे मोठे लाजिरवाणे आहे. कारण त्यापासून मोठे अनर्थ होतात. त्या तशा राजकुमारांना मग

निरुद्योगें आलस्य शिरे वेगें ।
दुष्टसंगें दुर्व्यसन त्यांसि लागे ।।
तरुणपणिं ते संपत्तिमदबलानें ।
नीच कामीं रत होति कीं सुखानें ।।

याकरिता त्यांचे मन अन्य विषयाकडे फार गुंतले नाही तोच त्यांना या राज्यरूप गाड्याच्या धुरीस जुंपून टाकावे......शिवाय या राजलक्ष्मीला वारवधूप्रमाणे जसा तरुण राजा प्रिय होतो तसा वृद्ध आवडत नाही. "

या भाषणातील सूचक उल्लेख ओळखून खाशी मंडळी एकमेकांचे चेहरे न्याहाळू लागली. जनरल रेशीमवालेही चिंतातुर झाले. दुसऱ्या दिवशी शहरातही, विशेषत: मराठी जाणणारांमध्ये तर्क-वितर्क सुरू झाले. परंतु अखेरीस त्यातून अपायकारक असे काहीच घडले नाही. मात्र रामराज्य-वियोगाचे जितके प्रयोग झाले त्या प्रत्येकास महाराजांची काही खास मंडळी तिकिटे काढून उपस्थित राहात.

अण्णासाहेबांचे व युवराजांचे संबंध विशेष लोभाचे असल्यामुळे त्यांनी युवराजांचे गुणवर्णन करून त्यांचे कल्याण इच्छिणारे एक पद लिहिले व रामराज्यवियोगाच्या एका प्रयोगाच्या शेवटी सर्व नटांनी ते भरतवाक्या-प्रमाणे गाऊन दाखविले. ' युवराज शिवाजीस सुखी राख ईश्वरा । दे तुष्टि-पुष्टि राज्यभारसहनिं तत् शिरा ' असे त्या पदाचे ध्रुपद होते युवराज स्वत: नाटकाला आले नाहीत परंतु किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम संपण्याच्या सुमारास त्यांनी अण्णासाहेबांना मुद्दाम बोलावून चांगली बिदागी दिली !

इंदूरच्या मुक्कामात किर्लोस्कर मंडळीच्या कलावंतांचा तेथीलच एका भारतीय कीर्तीच्या मृदंगवादकाबरोबर विशेष संबंध आला. त्याचा निर्देश करणे अवश्य आहे. श्री. नानासाहेब पानसे हे इंदूर दरबारचे खास मृदंग-वादक होते; आणि मृदंग वादनात त्यांचा हात धरणारा कलावंत त्या वेळी साऱ्या भारतात विरळाच होता. गुरव मंडळींनी मृदंग वादनात एक प्रकारे आपले स्वामित्व सिद्ध केले होते. त्या काळातही पानसे यांनी हा लौकिक मिळवला होता. ती कला शिकताना त्यांनी दाखवलेले नैपुण्य पाहून त्यांच्या गुरव जातीच्या उस्तादाने त्यांना अधिक विद्या देण्याचे नाकारले. तेव्हा त्यांनी कुदवसिंग नावाच्या बजवय्याची शागिर्दी पत्करून मृदंगविद्या हस्तगत केली. तुकोजीरावांच्या आश्रयाला असताना त्यांचे व अण्णासाहेबांचे एवढे सौहार्द जुळले होते की साऱ्या हिंदुस्थानात अजोड मृदंगवादक म्हणून प्रसिद्ध असलेला तो कलावंत केवळ अण्णासाहेबांवरील प्रेमामुळे अनेक वेळा त्यांच्या नाटकाच्या साथीस मोठ्या हौसेने उपस्थित राही. अण्णांच्याविषयी बोलताना ते व्यवस्थापक साठे यांना म्हणत, 'आमचे आश्रयदाते जरी महाराज होळकर असले तरी अण्णासाहेबांना मी मृदंगवादन जितके मनमुराद ऐकवले आहे तितके त्या अन्नदात्यांनीदेखील ऐकिले नाही." त्यांनी नृत्यकलाही चांगली आत्मसात् केली होती. इंदूरास ज्या वेळी सौभद्र नाटकाचा प्रयोग होई त्या वेळी दुसऱ्या अंकातील रुक्मिणीच्या महालात दोन दासी नृत्य-गायनाचा छोटासा कार्यक्रम करीत. बाळा मानकामे आणि भास्कर बखले हे दोघेजण त्यात भूमिका करीत. त्यांना नृत्याची तालीम देण्याचे काम नानासाहेब पानशांनी मोठ्या उत्साहाने केले होते.

### भोजराजाच्या नगरीत

इंदूर येथे नाट्यप्रयोग चालू असताना धारचे अधिपती आनंदराव पवार यांनी आपला एक खास अधिकारी अण्णासाहेबांच्या भेटीला पाठवून किर्लोस्कर मंडळीला धार येथे येण्याचे निमंत्रण दिले. त्यानुसार दि. १९ फेब्रुवारी १८८५ या दिवशी किर्लोस्कर मंडळी धारानगरीत येऊन दाखल झाली. तेथे आल्यानंतर एका क्षुल्लक प्रसंगाचे निमित्त होऊन किर्लोस्कर मंडळीला आपला मुक्काम निष्कारण लांबवावा लागला.

धारला गेल्यावर एक दिवशी भाऊराव, मोरोबा, भास्करबुवा इत्यादीं नटमंडळी तेथील महाकालीच्या मंदिरात दर्शनासाठी गेली होती. महाकवी कालिदासावर येथेच कालिमातेने अनुग्रह केला अशी आख्यायिका आहे. मंदिरात गेल्यावर तेथील शान्त वातावरणाने व देवीच्या दर्शनाने भास्कर बुवांच्या संगीत विद्येला आवाहन मिळून ते मोठ्या भक्तिभावाने व तन्मय-तेने ' नमामि महिषासुरमर्दिनी ' या पदाने देवीला आळवू लागले. सर्वच मंडळी भास्करबुवांच्या गायनात रंगून गेलेली असल्यामुळे त्या वेळी तेथे दर्शनासाठी आलेल्या एका अनोळखी गृहस्थाकडे त्यांनी फारसे लक्ष दिले नाही. ते गृहस्थ धारच्या राजेसाहेबांचे त्यांच्या दत्तकपूर्व घराण्यातील बंधू होते. वरील मंडळींचे त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्यांचा मानभंग होऊन ते अतिशय रुष्ट झाले. मंदिराच्या द्वाररक्षकाला तर त्यांनी तेथल्या तेथे बडतर्फ केल. नटवर्गाने मुजरा न करण्याचा रीतिरिवाज न पाळल्या-मुळे धार येथे आलेल्या किर्लोस्कर मंडळीला बरेच दिवस दरबारकडून निमंत्रणच गेले नाही. अखेरीस त्या बाबतीत खुलासा झाल्यानंतर ५ मार्च १८८५ ला परवार राजांच्या उपस्थितीत सौभद्र नाटकाचा प्रयोग झाला. नाटकाचे भरतवाक्य झाल्यावर सर्व नटांनी, अण्णासाहेबांनी रचलेले —

आनंदाचा कंद असा आनंदराय नृपती ।
धारानगरीत नांदे कृती ।।

हे स्तुतिपर पद गाऊन राजेसाहेबांना साग्रसंगीत मुजरा केला. त्यानंतर प्रसन्न झालेल्या महाराजांनी आपल्या राजवाड्यातही किर्लोस्कर मंडळीच्या तीनही नाटकांचे खास प्रयोग करविले आणि नंतर मंडळीची सत्कारपूर्वक पाठवणी केली.

त्यानंतर अमरावती, अकोला, नागपूर असे मुक्काम करीत व तेथील नाट्यरसिकांना आपल्या तीनही नाटकांचा आस्वाद देऊन मंडळी जुलै १८८५ मध्ये परत पुणे येथे आली. अमरावतीला लो. टिळकांचे सुहृद, रसिकाग्रणी दादासाहेब खापर्डे व मोरोपंत जोशी, अकोला येथे भागवत बंधू, नागपूरला गोपाळराव भिडे या स्थानिक प्रतिष्ठित मंडळींचे उत्तम सहकार्य मिळाल्यामुळे मंडळीचे हे सर्वही मुक्काम फार यशस्वी झाले.

**बाळकोबा नाटेकरांचे पुनरागमन**

किर्लोस्कर मंडळीच्या नटसंचात या वेळी बाळकोबा नाटेकर नव्हते. त्यांच्या अनुपस्थितीत सर्व नाटके व्यवस्थित होत होती आणि त्यांना लोकाश्रयही चांगला मिळत होता. तथापि पुण्या-मुंबईच्या रसिकांवर बाळकोबांच्या कण्व आणि कृष्ण या दोन भूमिकांची एवढी जबरदस्त मोहिनी पडली होती की त्या भूमिका इतर नटांनी केलेल्या पाहण्यास ते नाखूष होते. किर्लोस्कर मंडळी ऑक्टोबर १८८४ मध्ये मुंबई मुक्कामी होती, त्या वेळी तर तेथील पन्नास रसिकांनी आपल्या सह्यांचे एक विस्तृत पत्र अण्णासाहेबांना पाठवून 'बाळा नाटेकर यांस आपणापासून दूर करू नये; आणि त्यांस आपल्या नाटकात परत आणण्याचा प्रयत्न काही तरी तडजोड करून करावा ' अशी विनंती केली होती. परंतु त्या वेळी ती विनंती अण्णांना मान्य करता आली नाही कारण, बाळकोबा म्हणजे गुलाबाच्या फुलांप्रमाणे वास घेण्यापुरतेच सुखावह आहेत अशी अण्णासाहेबांची खात्री झाली होती.* या वेळेला मात्र त्यांनी, रसिकांची उत्कंठा विचारात घेऊन पुण्याला आल्यानंतर बाळकोबांना परत संस्थेत आणण्यासंबंधी खटपट सुरू केली. बाळकोबांनी, दरमहा दोनशे रुपये पगार मिळावा अशी अट घातली. ही त्यांची इच्छा कळताच अण्णासाहेब स्वत: त्यांच्या घरी गेले आणि त्यांची अट मान्य असल्याचे सांगून त्यांना आपल्याबरोबर घेऊनच नाट्यगृहात आले सौभद्राचा प्रयोग जाहीर झालेला होता, आणि नाट्यगृहातील प्रेक्षक नाटक सुरू होण्याची वाट पहात होते. बाळकोबा नाट्यगृहात आल्याबरोबर अण्णासाहेबांनी मॅनेजर साठ्यांना पुढीलप्रमाणे जाहीर प्रकटन करण्यास सांगितले, "आमच्या संगीत सरस्वतीच्या अंगावरील एक दागिना बाजूस पडून होता तो आज तिच्या अंगावर घालण्यात येत आहे. म्हणजे, श्री. बाळकोबा नाटेकर आज मंडळीस मिळाले असून ते आजच्या सौभद्रामध्ये नारद व कृष्ण या भूमिका करतील " साठ्यांनी ही बातमी जाहीर केल्याबरोबर प्रेक्षकांनी आनंदोद्भव नाट्यगृहाचे तिन्ही मजले १० मिनिटे टाळ्यांचा कडकडाट करून दणाणून टाकले. !

---

* मुजुमदारकृत अण्णासाहेब किर्लोस्कर चरित्र, पृ. १५२.

अण्णासाहेबांच्या शिस्तप्रिय स्वभावाचाही या प्रसंगाने चांगला प्रत्यय येतो. किर्लोस्कर मंडळीची जी नवी घटना सर्वांनुमते मान्य करण्यात आली तदनुसार श्री. गुळवे यांना संस्थेचे सन्माननीय व्यवस्थापक ( General manager ) म्हणून ठरविण्यात आले होते. बाळकोबांना जो दोनशे रुपये पगार ठरविला होता त्यासाठी गुळवे यांची संमती मिळणे अवश्य होते म्हणून सौभद्र नाटकाचा प्रयोग संपल्याबरोबर अण्णासाहेब तसेच पहाटे गुळवे यांच्या घरी गेले आणि बाळकोबांच्या पगारास त्यांनी संमती द्यावी अशी त्यांना विनंती केली. अण्णासाहेबांची ही काटेकोर व्यवहारदक्षता पाहून गुळवे यांना गहिवरून आले. अण्णांच्या वागण्याची तारीफ करीत त्यांनी अण्णासाहेबांनी पुढे केलेल्या निर्णयाला आपली औपचारिक मान्यता दिली.

### सरकारी सासुरवास

याच सुमारास नगरपालिका आणि सरकार या दोघांकडून नाट्यव्यवसाया-वर काही जाचक निर्बंध घालण्यात आले. पुणे नगरपालिकेचे त्या वेळचे सेक्रेटरी श्री. नरसोपंत गोडबोले यांच्या आज्ञेवरून पुण्यातील सर्व नाटक-गृहांची पाहणी करण्यात आली आणि प्रत्येक नाट्यगृहात किती प्रेक्षकांना प्रवेश द्यावा याची संख्या नियमित करण्यात आली. या निर्बंधामुळे किर्लोस्कर मंडळीला नाइलाजाने आपल्या नाटकांचे दर दीडपटीने वाढवावे लागले. त्या वाढीने मंडळीच्या उत्पन्नात येणारी संभाव्य तूट भरून निघाली खरी परंतु प्रेक्षक मात्र दरवाढीच्या बोजामुळे नाराज झाले. याच वेळी पोलीस अधिकाऱ्यांनी नाट्यप्रयोग रात्री १॥ वाजता संपला पाहिजे असा नियम जारी केल्यामुळे पहाटेपर्यंत चालणाऱ्या नाटकातील अनेक पदांची काटछाट करणे अपरिहार्य होऊन बसले.

### आधुनिक रंगभूमीच्या सूत्रधाराचे भरतवाक्य

ऑक्टोबर १८८५ पासून अण्णासाहेबांची प्रकृती एकदम खचल्यासारखी झाली. नाट्यसंस्थेचा व्याप आणि गावोगावचे दौरे यासाठी होणाऱ्या

अविरत परिश्रमाने आणि त्यातच जडलेल्या मधुमेहाने त्यांचा धिप्पाड देहही आतून हळूहळू पोखरत होता. ७ ऑक्टोबर १८८५ ला रामराज्य-वियोग नाटकाचा प्रयोग होता. त्या प्रयोगातील दशरथाची भूमिका ही अण्णासाहेबांची रंगभूमीवरील अखेरची भूमिका. प्रयोग संपल्यानंतर ते रंगपटात आले त्या वेळी त्यांना विलक्षण थकवा आला होता. तशा परिस्थितीत त्यांना आपल्या जन्मभूमीचे दर्शन घेण्याची अनिवार तळमळ लागली.

मधुमेहाची व्यथा, रोज नक्त सुरू केल्यामुळे पडणारे रोजचे उपवास, अशा स्थितीत त्यांनी गुर्लहोसूरसारख्या खेडेगावी न जाता प्रकृतीला जरा आराम पडेतो पुण्यासच राहावे असा त्यांचे परममित्र डॉ. गर्दे, श्री. गुळवे यांनी परोपरीने आग्रह केला. परंतु त्यांचे न ऐकता, हट्टाने, 'मी माझ्या जन्मभूमीस गेलो म्हणजे मला एकदम बरं वाटेल!' असे म्हणून त्यांनी पुण्याहून प्रयाण केले व ते हुबळीला आले. त्या दिवशी अमावास्या असल्यामुळे त्या दिवशी पुढे प्रयाण न करता अण्णासाहेब आपले हुबळी येथील बालमित्र श्री. खंडो कृष्ण गर्दे यांच्याकडे राहिले आणि दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ ऑक्टोबरला ते गुर्लहोसूरला पोचले. तेथे गेल्यावर प्रकृती थोडीशी सुधारत चालल्यासारखे वाटले. परंतु त्या वेळी प्रकृतीचे अस्वास्थ्य असतानाही यल्लम्मा देवीच्या दर्शनासाठी डोंगरावर जाऊन गार पाण्याने स्नान केल्या-मुळे त्यांना अर्धांगवायूचा झटका आला आणि त्यांतच दि. २ नोव्हेंबर १८८५ या दिवशी या आधुनिक मराठी रंगभूमीच्या जनकाचे जन्मभूमीच्या मांडीवरच प्राणोत्क्रमण झाले!

## पुनर्घटना

अण्णासाहेबांनी जन्मग्रामाकडे प्रयाण केल्यानंतर किर्लोस्कर मंडळीनेही विश्रांतीसाठी दोन महिन्यांची सुट्टी घेतली. बहुतेक नटवर्ग आपापल्या गावी निघून गेलेला होता. पगारदार नोकरांचे निम्मे चालू पगार होते. संस्थेचे सारे सामान रास्तापेठेत भाड्याची जागा घेऊन तेथे ठेवण्यात आले होते. हा सर्व खर्च नियमानुसार संस्थेच्या राखीव निधीतून करण्यात येत होता.

४...

अण्णासाहेबांच्या निधनाचे वृत्त ऐकून श्री. गुळवे यांनी श्री. साठे यांच्याकडून मोरोबा, भाऊराव आदि प्रमुख मंडळींना तारा करून बोलावून घेतले. सर्वजण जमल्यानंतर किर्लोस्कर मंडळीच्या भावी परिस्थितीबद्दल विचारविनिमय सुरू झाला. अण्णांच्या दुःखद निधनाबद्दल मंडळीच्या समाचारासाठी आणि सांत्वनासाठी येणारी विविध थरांतील स्नेही मंडळी "किर्लोस्कर मंडळी चालू राहिली पाहिजे," अशीच इच्छा प्रदर्शित करीत. दुखवट्याची पत्रे पाठविणारे परगावचे हितचिंतकही "बाकी मंडळीने अण्णासाहेबांचे उदाहरण पुढे ठेवून धंदा चालविल्यास अण्णांच्या श्रमांचे सार्थक व त्यांस भूषण होणार आहे," असा अभिप्राय व्यक्त करीत. सर्व परिस्थितीचा विचार केल्यानंतर किर्लोस्कर मंडळी पूर्ववत चालू ठेवण्याचा सर्वांनी निर्णय ठरविला. श्री. साठे यांच्या मनात अण्णासाहेबांच्याविषयी अत्यंत आदरभाव असल्यामुळे त्यांच्या निधनानंतर अवघ्या चोवीस दिवसांनी, त्यांनी किर्लोस्कर मंडळीत एका गादीवर अण्णासाहेबांच्या प्रतिमेची स्थापना केली. त्या गादीसमोर संस्थेतील नटवर्ग नित्य नेमाने पंचपदी म्हणत. नाटकांच्या तालमीही अण्णासाहेबांच्या देखरेखीखालीच चालत. केवळ किर्लोस्कर मंडळीच्याच नव्हे तर मराठी रंगभूमीच्या इतिहासातील गंधर्व, शिवराज, बलवंत अशा प्रथम श्रेणीच्या नाटक मंडळ्यांचे अण्णासाहेबांची गादी हे एक श्रद्धास्थान झाले होते. कारण या सर्व नाट्यसंस्था अण्णासाहेबांच्या परंपरेतून निर्माण झाल्या होत्या. सर्वांच्या मनात या जनकाबद्दल पराकाष्ठेची श्रद्धा असल्याने या मंडळ्यांनीही आपापल्या संस्थेच्या बिऱ्हाडी अण्णांच्या प्रतिमेची स्थापना केली होती. रंगभूमीवर प्रवेश करणारे नट प्रथम अण्णांचा आशीर्वाद घेऊनच प्रेक्षकांसमोर येत.

संस्थेच्या उत्पन्नांतील अण्णासाहेबांचा वांटा काळानेच कमी केल्यामुळे पुन्हां एकदा वांटणीचे प्रमाण ठरविण्यात आले. अण्णांच्याऐवजी त्यांच्या पत्नी सावित्रीबाई किर्लोस्कर यांना उत्पन्नापैकी २॥ आण्यांचा वाटा मिळावा ही नव्या वाटणीमधील अत्यंत महत्त्वाची बाब होती. ती धरून इतरांचे हिस्से पुढीलप्रमाणे होते—

० – ४ – ६ मोरोबा वाघुलीकर
० – ४ – ६ भाऊराव कोल्हटकर
० – ३ – ० रामभाऊ किजवडेकर
० – २ – ६ सावित्रीबाई किर्लोस्कर
० – १ – ० राखीव निधी
० – ० – ६ गुड कॉंडक्ट निधी

रु. १ – ० – ० एकूण.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ५८९५८ दि:
क्रमांक २०५५७ नों: दि:

### तीर्थरूपांची भविष्यवाणी

अण्णासाहेबांच्या हयातीत त्यांच्या वडिलांना किर्लोस्कर नाटक मंडळीची नाटके पाहण्याचा कधीच योग आला नाही. त्यांच्या निधनानंतर मात्र डिसेंबर १८८५ मध्ये किर्लोस्कर मंडळीच्या चालकांनी मुद्दाम आपला एक मनुष्य गुर्लहोसूर येथे पाठवून अण्णासाहेबांचे वडील श्री. पांडुरंगरावतात्या किर्लोस्कर यांना अगत्यपूर्वक पुण्याला बोलावून घेतले. मंडळीच्या बिऱ्हाडी आल्यानंतर ज्या दालनात अण्णासाहेबांची पुष्पहारमंडित तसबीर ठेवली होती तेथे तात्या आले. अण्णांची प्रतिमा पाहिल्याबरोबर त्यांना दुःखाचा एकदम उमाळा आला. परंतु तो आंवरून अण्णांच्या छायाचित्राकडे पहात ते उद्‌गारले, " अण्णा, महाराष्ट्र भाषा जिवंत आहे तोपर्यंत तुम्ही जिवंत राहणार ! आम्ही मात्र मेलों ! " तात्यांच्या या उद्‌गारांत केवढे अमृतसत्य भरले होते ! अण्णांच्या सहकाऱ्यांना उद्देशून ते म्हणाले, " अण्णांचा वियोग जसा मला दुःसह आहे तसाच तुम्हा सर्वांनाही तो दुःसह होणार हे मी जाणतो. तथापि नाउमेद होऊ नका. संगीत मंडळी चालू ठेवा. ईश्वर तुम्हांस सुयश देईल असा मी आशीर्वाद देतो."

अण्णासाहेबांच्या निधनानंतर महिन्याभरातच किर्लोस्कर मंडळीने आपल्या नव्या जीवनाला पुनरपि प्रारंभ केला. दि. ५ डिसेंबर १८८५ या दिवशी पुण्याच्या आर्यभूषण नाटकगृहात अण्णांच्या पहिल्या शाकुंतल नाटकाने मंडळीच्या नव्या संसाराची वाटचाल सुरू झाली. प्रयोगाच्या वेळी अण्णासाहेबांच्या वडिलांना मोठ्या आदराने पहिल्या रांगेत बसविण्यात

आले. केसरीचे संपादक श्री. गोपाळराव आगरकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात, "अण्णासाहेबांचा विचार मंडळीसह विलायतेस जाण्याचा होता, तो त्यांचे मंडळीनी किर्लोस्कर संगीत मंडळी चालू ठेवून तडीस न्यावा!" असे सांगून मंडळींच्या नव्या कारकीर्दीचे स्वागत केले. श्री. गणेश जनार्दन आगाशे यांनी अण्णासाहेबांना वाहिलेली पद्यरूप श्रद्धांजलि याच वेळी गाऊन दाखविण्यात आली—

'नमितो आधी शिवसुत मग ती बलवत् गुरुची पदकमले ।
जन्म जये संगीत नाटका कविवर्ये दिधले ॥'

यानंतर शाकुंतल नाटकाचा प्रयोग झाला. अण्णांच्या भूमिका श्री. किंजवडेकर यांच्याकडे सोपविण्यात आल्या होत्या. या प्रयोगानंतर शाकुंतल नाटकाचे आणखी दोन व सौभद्र नाटकाचे दोन प्रयोग करून त्या पाचही प्रयोगांचे, खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न (१८०० रु.) अण्णासाहेबांचे वडील पांडुरंगरावतात्या यांना अर्पण करण्यात आले.

## १८८६ ते १८८८

१८८६ च्या जानेवारीमध्ये मंडळीच्या नटसंचात दोन बदल झाले. अण्णासाहेबांनी २०० रु. पगार कबूल करून परत आणलेले बाळकोबा नाटेकर पुन्हा त्यांची लहर फिरल्यामुळे किर्लोस्कर मंडळी सोडून गेले होते. अण्णांच्या नंतर त्यांनी पुन्हा मंडळीत प्रवेश केला. मात्र त्या वेळीं त्यांना १५० रु. पगारावरच संतुष्ट रहावे लागले. श्री. गोविंद गणेश धारप यांना दुय्यम स्त्री-भूमिका करण्यासाठी दरमहा ५० रु. पगारावर घेण्यात आले. याप्रमाणे नटसंचाची व्यवस्थित जुळवाजुळव करून किर्लोस्कर मंडळी दौऱ्यावर निघाली; आणि सोलापूर, बार्शी, नगर, बेळगाव, कोल्हापूर, सातारा, पुणे, मुंबई आणि पुन्हां पुणे-मुंबई असे मुक्काम एकामागून एक घेत १८८७ च्या अखेरीला परत स्वस्थानीं आली. मंडळीचा यापुढील दौरा हा महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता तिने उत्तर हिंदुस्थानांतील, जेथे मराठी भाषिक मोठ्या संख्येने आहेत अशा ग्वाल्हेर, काशी व इंदूर अशा तीन ठिकाणी आपले नाट्यप्रयोग करून दाखवले. यानिमित्ताने मंडळीतील नट-वर्गाला

सहकुटुंब काशीयात्रेचे पुण्य मिळाले ही गोष्ट खरी परंतु अपेक्षेपेक्षा द्रव्यलाभ (विशेषत: ग्वाल्हेर व काशी या दोन ठिकाणी) फार कमी झाला. ग्वाल्हेरला तर शाकुंतल नाटकाच्या एका प्रयोगाला फक्त ४४ रुपये उत्पन्न झाले. त्या दिवशीच्या डायरीत, 'इतके कमी उत्पन्न कंपनीला कधीच झाले नव्हते' अशी श्री. साठे यांना कबूली द्यावी लागली. ग्वाल्हेरच्या शिंदे महाराजांनी मंडळीला सरकारी खेळाबद्दल जी बिदागी दिली तेवढेच विशेष उत्पन्न मंडळीला मिळाले.

काशीचा बहुसंख्य प्रेक्षकवर्ग अ-मराठी असल्याने तो नाटक पहाण्यापेक्षा त्यातील संगीत ऐकण्याच्या हेतूनेच येत असे. परंतु त्यालाही नाट्य-संगीताची विशेष गोडी वाटली नाही. मोरोबा व भाऊराव यांनी आपल्या मधुर गायनाने नाट्यरसिकांना झुलविले असतानाही काशीच्या प्रेक्षकांना मात्र ते शास्त्रीय नियमांना बाजूला ठेवणारे परंतु रसपूर्ण असे गोड गायन रिझवूं शकले नाही. बाळकोबा नाटेकर हे मात्र खरे गवई असल्यामुळे फक्त त्यांच्याच गायनाविषयी काशीचे प्रेक्षक अनुकूल अभिप्राय व्यक्त करीत. उत्तर हिंदुस्थानचा चार महिन्यांचा दौरा पूर्ण करून मंडळी १८८८ च्या सुरुवातीला पुण्याला परतली.

**नवे नाटक– नवे नाटककार**

किर्लोस्कर मंडळीच्या स्थापनेपासून एकट्या अण्णासाहेब किर्लोस्करांचीच नाटके मंडळी करीत असे. शाकुंतल, सौभद्र आणि (अपूर्ण राहिलेले) रामराज्यवियोग या अडीच नाटकांच्या बळावर किर्लोस्कर मंडळीने मराठी रसिकांना श्रेष्ठ प्रकारच्या करमणुकीचा आनंद दिला. परंतु एवढा दीर्घ-कालपर्यंत तीच तीच नाटके पाहणाऱ्या प्रेक्षकांना थोडी नाविन्याची भूक निर्माण झाली तर ते स्वाभाविकच होते. प्रेक्षकांची ही प्रतिक्रिया हळूहळू चालकांच्याही कानांवर गेली आणि त्याचा परिणाम होऊन १८८८ च्या मध्यापासून नवीन नाटक मिळविण्यासंबंधी विचार सुरू झाला. अण्णा-साहेबांच्या नाटकपरंपरेला जुळतील अशी नाटके लिहिण्याची कलाचातुरी असणारे देवल हे एकच नाटककार चालकांच्या नजरेसमोर होते. तेव्हा

मंडळीतील सर्वांनी श्री. गुळवे यांना पत्र पाठवून देवल मास्तरांच्याकडून मंडळीसाठी नवीन नाटक मिळविण्याची सूचना करण्यात आली. त्याप्रमाणे देवलांची संमती मिळून त्यांनी किर्लोस्कर मंडळीसाठी कालिदासाच्या विक्रमोर्वशीयम् या नाटकाचे रूपान्तर करून देण्याचे ठरविले.

देवलांचे नाटक रंगभूमीवर येण्याच्या वाटाघाटी सुरू झाल्याबरोबर किर्लोस्कर मंडळीचे नायक श्री. मोरोबा वाघुलीकर यांच्याही मनात चलबिचल सुरू झाली. कारण 'प्रमुख भूमिका करायची ती अण्णांच्याच नाटकातून' अशी त्यांच्या मनाची एक धारणा झाली होती. त्यामुळे, नवीन नाटके किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर येण्याचा रंग दिसू लागल्याबरोबर मोरोबांनीही किर्लोस्कर मंडळीतून निवृत्त होण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. परंतु इतर मंडळींनी थोडी समजावणी केल्यामुळे त्यांनी आपला विचार प्रत्यक्षात आणण्याचा विशेष आग्रह धरला नाही. त्यांच्या मतपरिवर्तनामुळे मंडळीचा कार्यक्रम पूर्ववत चालू राहिला.

**विक्रमोर्वशीय**

विक्रमोर्वशीय नाटकाच्या निमित्ताने प्रथमच किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर देवलमास्तर नाटककार या भूमिकेत उभे राहिले. तत्पूर्वी त्यांनी गद्य व संगीत नाटके लिहिलेली असली तरी अण्णासाहेबांनंतरच त्यांना किर्लोस्कर मंडळीच्या नाटककाराचा सन्मान प्राप्त झाला. योगायोगाची गोष्ट अशी, अण्णासाहेबांनी कालिदासकृत शाकुंतलाचा मराठी अनुवाद करून संगीत रंगभूमीवर प्रवेश केला, आणि त्यांच्याच अनुकरणाने म्हणा किंवा अन्य कारणाने म्हणा– देवलही कालिदासाच्याच दुसऱ्या नाटयकृतीला मराठी भाषेचा वेष चढवून किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर आले. अण्णासाहेब हे त्यांचे गुरूच असल्याने त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून देवलांनी कविकुलगुरूच्या नाटयकृतीला मराठी रसिकांसमोर सादर केले.

किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम बार्शी येथे असताना स्वत: देवलांनी नाटकाच्या तालमी घेतल्या; आणि पंढरपूरच्या मुक्कामात विक्रमोर्वशीय

नाटकाचा पहिला प्रयोग दि. २० मार्च १८८९ ला करण्यात आला. त्यात पुढीलप्रमाणे पात्रयोजना होती—

**पुरूरवा**– मोरोबा वाघुलीकर
**उर्वशी**– भाऊराव कोल्हटकर
**मैत्रेय**– काशीनाथपंत परचुरे
**राणी**– गोविंदराव सोरटी
**कंचुकी**– रामभाऊ किजवडेकर

विक्रमोर्वशीय नाटक आणण्याच्या काळातच दुय्यम स्त्री–भूमिका करणाऱ्या भास्कर बखले* या मुलाचा आवाज फुटल्यामुळे त्याने संस्थेबाहेर पडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्याच्याकडे कोणतीच भूमिका सोपविण्यात आली नाही.

कालिदासाचीच नाट्यकृती, किर्लोस्करांच्या परंपरेतीलच देवलांसारखे नाटककार, आणि मोरोबा – भाऊराव यांच्यासारखे श्रेष्ठ गायक असूनसुद्धा विक्रमोर्वशीय नाटक यशस्वी झाले नाही. त्याच्या पहिल्या प्रयोगाबाबत, ' विक्रमोर्वशीय नाटकाचा प्रयोग बरा झाला; रंगावा तसा रंगला नाही. ' असाच शेरा साठे यांना द्यावा लागला; आणि पुढेही विक्रमोर्वशीय नाटकाला विशेष रंग भरला नाही. शाकुंतल नाटकापेक्षा विक्रमोर्वशीयाची योग्यता मुळातच कमी होती हे तर त्याच्या अयशस्वितेचे एक कारण होतेच, परंतु शाकुंतल नाटकात अत्यंत मन:पूर्वक भूमिका करणारा किर्लोस्कर मंडळीचा प्रमुख नटवर्गही या नाटकाच्याबाबतीत विशेष उत्साही नव्हता. श्री. साठे यांच्या मते मोरोबा व भाऊराव हे दोघेही या नाटकाबाबत थोडे उदासीन होते. या सुमारास भाऊरावांच्या मनात स्त्री-भूमिकांतून निवृत्त

---

* याच भास्कराने, किर्लोस्कर मंडळीतून बाहेर पडल्यानंतर बडोद्याला जाऊन संगीतविद्या मिळविण्यासाठी अविश्रान्त परिश्रम करून, निरनिराळ्या खांसाहेबांकडून ती विद्या हस्तगत केली. आणि तोच मुलगा आपल्या असामान्य गायकीने ' गायनाचार्य भास्करबुवा बखले ' या नावाने सर्वप्रसिद्ध झाला.

होण्याचा विचार घोळत होता; त्यामुळे ते पुढे पुढे आपली उर्वशीची भूमिका संस्थेतील दुसरे एक गायक नट श्री. कृष्णराव गोरे यांना करायला सांगत. मोरोबांना तर अण्णासाहेबांच्या नाटकाशिवाय इतरांच्या नाटकांतून भूमिका करणे मनापासून आवडत नव्हते. त्यामुळे त्यांची भूमिका त्यांच्या पूर्वीच्या दुष्यंत–अर्जुन या भूमिकांसारखी कधीच रंगली नाही. त्यांच्या मनोवृत्तीचा आणखी एक विशेष म्हणजे श्री. गोरे ज्या वेळी उर्वशीच्या भूमिकेत असत त्या प्रयोगात मोरोबा अगदीच नाराज असत. एकंदरीने पाहता देवलांचे हे नाटक किर्लोस्कर मंडळीला लाभदायक झाले नाही. या नाटकाच्या सर्व-साधारण हक्काबद्दल किर्लोस्कर मंडळीने नाटककार देवलांना पांचशे रुपये दिले.

### व्यवस्थापक साठे यांची निवृत्ति

१८८४ पासून किर्लोस्कर मंडळीचा कारभार अत्यंत दक्षतेने पाहणारे व्यवस्थापक श्री. त्र्यंबकराव साठे यांनी १८९० मध्ये आपल्या जागेचे त्यागपत्र दिले. त्यांनी किर्लोस्कर मंडळीतच रहावे यासाठी भाऊराव कोल्हट-करांनी पुष्कळ प्रयत्न केले, परंतु साठे यांचा मंडळी सोडण्याचा निश्चय कायम असल्याने किर्लोस्कर मंडळीने त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला. साठ्यांच्या निवृत्तीमुळे किर्लोस्कर मंडळीच्या कारभारात मोठीच उणीव निर्माण झाली. त्यांच्यासारखा नेकीचा व कर्तबगार व्यवस्थापक ताबडतोब उपलब्ध होणे कठीणच होते. त्यांच्यानंतर श्री. रामचंद्र प्रसाद जोशी या गृहस्थांची मंडळीचे व्यवस्थापक म्हणून नेमणूक करण्यात आली. ते नाट्य-संस्थेच्या कारभाराबाबत अननुभवी असले तरी भाऊरावांच्यासारखा, मंडळीच्या कारभारावर चौफेर नजर ठेवणारा दक्ष मालक असल्यामुळे पुढील काळातही किर्लोस्कर मंडळीची वाटचाल सुरळीतपणे चालू राहिली.

### किर्लोस्कर मंडळीची समाप्ति ?

परंतु कारभाराची घडी विस्कटली नाही तरी नटवर्गाच्या बाबतीत जी परिस्थिती निर्माण झालेली होती त्यामुळे महाराष्ट्राची ही आद्य नाट्यसंस्था त्याच सुमारास विराम पावते की काय अशी शंका निर्माण झाली.

भाऊरावांचे वय यावेळी २५ वर्षांचेच होते. तथापि त्या वेळीही ते स्त्रीपार्ट सोडण्याचा विचार करू लागले. त्यांच्यासारखा अलौकिक सौंदर्याचा व तेजस्वी आवाजाचा गायक नट मिळाला तर किर्लोस्कर मंडळी त्याला दरमहा ५०० रु. पगार देण्यासही तयार होती. तशी वृत्तपत्रात जाहिरातही देण्यात आली होती. परंतु नायिकेच्या जागी अनुरूप नट मिळण्याच्या प्रयत्नाला यश न आल्यामुळे एकतर मंडळीने लांब मुदतीची सुटी घ्यावी किंवा सरळ संस्थेची सांगता करून टाकावी असे भाऊरावांचे मनोगत प्रकट होऊं लागले. संस्थेतील सर्व नटही वागण्याच्या बाबतीत जरा ढिलेपणा दाखवू लागल्यामुळे संस्था कशीबशी चालू ठेवण्यापेक्षा ती सरळ बंद ठेवावी, आणि तिच्या कारभाराची आवराआवर करण्यासाठी मिरज नगरपालिकेत नोकरी करणाऱ्या साठ्यांनाच बोलावून घ्यावे असे मनाशी ठरवून भाऊरावांनी साठ्यांना पत्र पाठविले. त्यात ते लिहितात, "कंपनी लवकर मोडणार, ती मोडू नये अशा, बद्दल आपण जे लिहिले आहे ते खरे आहे. परंतु ती चालावी कशी हे मात्र विचार करून पाहिले म्हणजे सहज समजणार आहे...दिवसे दिवस किंजवडेकर यांची प्रकृती फार अशक्त होत चालली आणि आवाज फार बिघडू लागला. नाटेकर कसे आहेत हे आपणांस माहीत आहेच. आबासाहेब (मोरोबा) मुंबई दाखवून पुरे करावे असे रोज म्हणत असतातच. ... तेव्हा जेथे सोने वेचले तेथे गोवऱ्या वेंचणे हे बरे नाही असे वाटते... लोकांना जी पहिल्याने करमणूक होत असे ती होत नाही असे आम्हांलाच वाटू लागले आहे. तेव्हा झांकलेली मूठ आहे तोंपर्यंतच तिची व्यवस्था लावणे हेच थोडेसे शहाणपणाचे आहे असे मला वाटते......मुंबईस जाऊन तेथे महिनाभर काढून पुण्यास यावे आणि मंडळीस मोठी सुटी द्यावी असा बेत आहे. नंतर सर्व मंडळीच्या नशिबाचा जोर झाल्यास एखादा छावा मिळाल्यास दुसरे काम करणे आहे. ...तर माझी तुम्हांस एवढीच सूचना व विनंती आहे की जसा प्रारंभ गोड झाला त्याप्रमाणे शेवटही गोड व्हावा व तो तुम्ही सर्वत्रांनी मिळून करावा. आता शेवटचा भपका मुंबई-पुणे या ठिकाणी चांगला झाला पाहिजे एवढीच माझी शेवटची इच्छा आहे."

### भाऊरावांची लोकप्रियता

१८९१ च्या उत्तरार्धात, दुसऱ्या योग्य पात्राच्या अभावी मंडळी लवकरच कायमची विश्रांती घेणार अशा उद्देशाने मंडळीने मुंबई-पुणे येथे आपले शेवटचे खेळ जाहीर केले. त्या वेळी वृत्तपत्रातून व खासगी रीतीनें जे मतप्रदर्शन झाले ते पाहण्यासारखे आहे. नेटिव्ह ओपिनियन पत्रात एकाने लिहिले, "अपरिहार्य नैसर्गिक अडचणीमुळे या मंडळीतील एक अद्वितीय पात्र आपल्या भूमिकेस अननुरूप होत चालले आहे. सबब मंडळीस तत्सदृश्य दुसरे पात्र मिळेतो पर्यंत विश्रांति घ्यावी लागत आहे ही मोठी खेदाची गोष्ट आहे. परंतु इलाज नाही. ही उणीव लवकरच भरून येईल अशी आशा बाळगून मनाचे समाधान केले पाहिजे. ( दि. ४ ऑक्टोबर १८९१ )". एका रसिकाने खुद्द किर्लोस्कर मंडळीच्या चालकांना पत्र लिहून कळविले कीं, " बायकांचे सोंग साधणे महाकर्म कठीण आहे. ते भावड्यास पूर्ण साधले आहे. सबब त्यास नाटकातून जाऊ देऊ नये व त्यानेही तूर्त जाण्याची इच्छा करू नये. ( रंगभूमी, दि. ८ मे १९१२)" ज्ञानप्रकाशने लिहिले, "किर्लोस्कर मंडळीने गेल्या शनिवारी संगीत सौभद्र नाटकाचा प्रयोग करून दाखवला. या मंडळीची या शहरास शेवटची भेट असल्यामुळे गायनलुब्ध रसिकांची गर्दी फार झाली होती... अर्जुन, सुभद्रा या पात्रांनी गेले शनिवारी बहार केली. त्यातूनहि सुभद्रेच्या मधुर गायनाने तर प्रेक्षकसमूह सारखा डुलत होता. या पात्रासारखे गुण-संपन्न पात्र या मंडळीस मिळणे मोठे कठीण आहे. (दि. ९ नोव्हेंबर १८९१)"

### पुरुष भूमिकेत पदार्पण

भाऊरावांच्या पत्राप्रमाणे साठे तीन महिन्यांची रजा घेऊन किर्लोस्कर मंडळीत आले. ते आल्यावर भाऊरावप्रभृती नटवर्ग आणि मंडळीचे हितचिंतक यांच्याबरोबर मंडळीचे भवितव्यासंबंधी खल सुरूं झाला. साठे व मंडळीचे जुने स्नेही श्री. म. चिं. आपटेवकील, श्री. गणपतराव किर्लोस्कर, डॉ. अण्णा कुंटे या सर्वांच्या मते भाऊरावांनी नाटय-व्यवसायातून निवृत्त होऊं नये असेच होते. पुरुषभूमिका करणारे मोरोबा आता वयपरत्वे थकत चालले होते. रसिकवर्गाने आपला कौल दिलाच

होता. तेव्हा भाऊरावांनी पुरुष भूमिकेत प्रवेश करून नाट्यसेवा व किर्लोस्कर मंडळी या दोन्ही गोष्टी चालू ठेवाव्या असाच सर्वांनी सल्ला दिला. याच सुमारास कृष्णराव गोरे या नावाचे एक अस्खलित वाणीचे व मधुर आवाजाचे गायक मंडळीत येऊन दाखल झाले होते. तेव्हा भाऊरावांनी हळूहळू पुरुष भूमिका करण्याचे ठरवून किर्लोस्कर मंडळी बंद ठेवण्याचा विचार मनातून काढून टाकला. फक्त सुभद्रेसारख्या महत्त्वाच्या स्त्री-भूमिका स्वतः करून इतर भूमिकांची जबाबदारी श्री. गोरे यांच्यावर सोपवून त्यांनी नवीन नाटकांतून स्वतःच मुख्य नायकाच्या जागी उभे राहण्याची तयारी केली. यापूर्वी ते कण्वाची भूमिका क्वचित करीत असत. परंतु यापुढे मात्र नवीन नाटकांत स्त्री–भूमिका करावयाची नाही असा त्यांनी निर्धार केला.

**शापसंभ्रम**

दहा वर्षे सतत स्त्री-भूमिकांत वावरणाऱ्या नटाला एकदम प्रमुख पुरुष-भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणे हे थोडे अवघडच होते. परंतु भाऊरावांच्या रंगावताराचा बेमालूम कायापालट करण्याची कामगिरी त्यांचे नाट्यगुरू श्री. देवलमास्तर यांनी उत्तम तऱ्हेने पार पाडली. त्यातून या नव्या भूमिकेसाठी देवलांचेच नवे नाटक शापसंभ्रम या वेळी तयार झाल्यामुळे भाऊरावांचे पुरुष भूमिकेतील रूपान्तरही अत्यंत यशस्वी ठरले. शापसंभ्रम नाटकाचे वाचन करण्याची कामगिरी श्री. साठे (गद्यभाग) आणि भाऊराव ( पदे ) यांनी केली. त्यानंतर नाटकाची मुख्य पात्रयोजना पुढीलप्रमाणे निश्चित झाली–

**पुंडरीक** – भाऊराव कोल्हटकर

**महाश्वेता** – चिंतोबा दिवेकर (गुरव)

**कपिंजल** – नारायणराव दडपे

**कादंबरी** – कृष्णराव गोरे.

भाऊरावांच्या पुरुषभूमिकेत तत्पूर्वीच्या स्त्री-भूमिकेचे कोणतेही विशेष प्रकट होऊ नयेत यासाठी देवलांनी अतिशय परिश्रम घेतले.

मंडळीतील प्रमुख नट श्री. मोरोबा वाघुलीकर यांनी वयोमानामुळ नवीन नाटकात भूमिका करण्याचे सोडून दिले होते. दुसरे लोकप्रिय गायक श्री. बाळकोबा नाटेकर यांच्या धरसोडीच्या स्वभावामुळे भाऊराव वगैरे मंडळी नाराज होती. ते या सुमारास मंडळीतून बाहेर जाण्याच्या विचारात असल्यामुळे त्यांच्याकडे शापसंभ्रममधील कोणतीही भूमिका देण्यात आली नाही. तशातून त्यांच्या आवाजातही कांही दोष निर्माण झाल्यामुळे शापसंभ्रम रंगभूमीवर आल्यानंतर थोड्याच दिवसांनी बाळकोबांनी किर्लोस्कर मंडळीचा कायमचा निरोप घेतला. त्यांच्या भूमिका पूर्वीपासूनच श्री. किंजवडेकर हे करीत असल्यामुळे बाळकोबांच्या जाण्यामुळे मंडळीच्या नाट्यप्रयोगात (फारशी) उणीव निर्माण झाली नाही.

शापसंभ्रम नाटकाला होळकर सरकारने ८०० रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविले होते. बाणभट्टाच्या कादंबरीतील पराकाष्ठेच्या गुंतागुंतीच्या रचनेतून देवलांनी शक्य तेवढे सुटसुटीत संविधानक निवडून घेतले होते आणि त्याला आपल्या अत्यंत रसाळ पद्यरचनेचा साज चढविला होता. भाऊरावांच्यासारखा तेजःपुंज कान्तीचा देखणा पुंडरीक पाहूनच प्रेक्षक हरखून जात. त्यांचे दिव्य गायन ही तर या नाटकात विशेष शोभणारी बाब होती. असे असूनही दुपदरी व क्लिष्ट कथेमुळे शापसंभ्रम नाटकाला प्रारंभी अपेक्षेप्रमाणे लोकप्रियता मिळाली नाही. अण्णासाहेबांच्या नाटकांच्या मानाने विक्रमोर्वशीय तर केव्हाच मागे पडले होते, परंतु हे देवलांचे दुसरे नाटकही अयशस्वी ठरते की काय अशी शंका निर्माण झाली. देवलांच्याही ते ध्यानात आले आणि मंडळीचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांनी आपले, यापूर्वीचे ललितकलोत्सव मंडळीने रंगभूमीवर आणलेले मृच्छकटिक नाटक किर्लोस्कर मंडळीला मोफत देण्याचे ठरवून तसे मंडळीलाही कळविले. परंतु हळूहळू शापसंभ्रम नाटक लोकप्रिय झाल्यामुळे त्याला चांगले उत्पन्न होऊ लागले. त्या नाटकाबद्दल किर्लोस्कर मंडळीने नाटककार देवलांना एक हजार रुपये देऊन त्याचे सर्वसाधारण हक्क मिळवले. हे नाटक बसविल्यानंतर किर्लोस्कर मंडळी इंदूरला गेली. त्या वेळी शिवाजीराव होळकरांनी देवलांना भेटीला बोलावून त्यांनी इंदूर दरबारची नोकरी पत्करावी असा आग्रह केला.

परंतु देवलांनी महाराजांची ही सूचना साभार नाकारली. देवलांनी मिळव-लेल्या पारितोषिकाबद्दल सन्मान म्हणून त्यांना दसऱ्याच्या मिरवणुकीत हत्तीवर बसवून मिरविण्यात आले !

**नव्या सूत्रधाराचे आगमन**

याच वेळेला किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत एक अतिशय महत्त्वाची घटना घडून आली. भाऊराव संस्थेत येण्यापूर्वी आणि नंतरही श्री. शंकरराव मुजुमदार हे नट या नात्याने मंडळीतील एक घटक होते. परंतु ज्या वेळी साठ्यांची व्यवस्थापक म्हणून अण्णासाहेबांनी निवड केली त्या वेळी ती जागा आपल्याला मिळावी अशी मुजुमदारांची मनीषा होती. तथापि गुळवे यांनी साठ्यांचा पुरस्कार केल्यामुळे त्यांना तेव्हा निराश व्हावे लागले होते. या वेळी मात्र देवलमास्तरांच्यामार्फत खटपट करून त्यांनी व्यवस्थापकाची जागा मिळवली. शंकरराव आपल्या रुबाबदारपणामुळे बाहेर लोकांवर छाप पाडीत हे खरे असले तरी पैशाचा व्यवहार व एकंदर कारभाराचे धोरण भाऊरावांच्याच इच्छेने ठरत असे. १८९३ च्या ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्ये त्यांनी पुणे मुक्कामी मंडळीचा कारभार पाहण्यास सुरवात केली. काल-चक्राचा गमतीचा योगायोग असा की ज्या देवलमास्तरांच्या पाठिंब्याच्या बळावर मुजुमदार किर्लोस्कर मंडळीचे व्यवस्थापक झाले त्या देवलमास्तरांनी पुढे किर्लोस्कर मंडळीचा संबंध जो कायमचा सोडून दिला, त्या घटनेला मुजुमदारांचा स्वभावच प्रामुख्याने कारणीभूत झाला होता !

**मृच्छकटिक**

शापसंभ्रम जोरात चालल्यामुळे त्या वेळीच किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर येणारे मृच्छकटिक १८९५ मध्ये रंगभूमीवर आले. नेहमीप्रमाणे देवलांनीच आपल्या नाटकाच्या तालमी घेतल्या होत्या. त्यातील पात्रयोजना पुढीलप्रमाणे होती–

**चारुदत्त** – भाऊराव कोल्हटकर
**वसंतसेना** – चिंतोबा गुरव
**शकार** – शंकरराव मुजुमदार
**मैत्रेय** – काशीनाथपंत परचुरे
**चेट व कर्णपूरक** – नारायणराव दडपे

देवलांचे हे रंगतदार नाटक प्रारंभापासूनच यशस्वी झाले. शापसंभ्रम, मधील पुंडरीकाच्या भूमिकेमुळे पुरुष भूमिकेत रुळलेल्या भाऊरावांनी चारुदत्ताची भूमिका सहज लोकप्रिय करून दाखविली.

**रुचिपालट**

अण्णासाहेबांच्या निधनानंतर किर्लोस्कर मंडळीने देवलांची विक्रमोर्वशीय शापसंभ्रम आणि मृच्छकटिक ही नाटके रंगभूमीवर आणली; आणि त्यापैकी नंतरची दोन्ही प्रेक्षकांनाही पसंत पडली. तथापि देवल हे अण्णांचेच चेले असल्यामुळे, त्यांच्या नाटकांची संविधानके भिन्न भिन्न असली तरी नाट्यरचनापद्धती आणि संगीतयोजना या बाबतीत त्या नाटकांवर अण्णासाहेबांच्या नाटकांचाच ठसा उमटलेला होता. पदांच्या चालींच्या बाबतींत तर देवलांनी अण्णांच्या तिन्ही नाटकांतील चालींची फार मोठ्या प्रमाणावर उसनवारी केलेली होती. त्यामुळे शब्द फक्त वेगळे पण चाली मात्र त्याच असा प्रकार त्यांच्या नाट्य–संगीताच्या बाबतीत पुष्कळ झाला होता. १८८० पासून पंधरा वर्षेपर्यंत एकाच पद्धतीची नाटके पाहणाऱ्या आणि एकाच तऱ्हेचे संगीत ऐकणाऱ्या प्रेक्षकांना कथानक, संगीत, वातावरण या बाबतींत काही नाविन्याची उत्सुकता निर्माण झाली तर ते योग्यच होते. किर्लोस्कर मंडळीच्या चालकांनाही या गोष्टीची जाणीव असल्यामुळे नव्या नाटककाराचा शोध सुरू झाला. परंतु तसा कोणी नाटककार न मिळाल्यामुळे उत्तम नाटकास बक्षीस देण्याचे किर्लोस्कर मंडळीतर्फे प्रकट करण्यात येऊन उदयोन्मुख नाटककारांच्या प्रतिभेला आवाहन करण्यात आले. त्या प्रकटनानुसार मंडळीकडे आलेल्या नाटकांतून श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी लिहिलेले वीरतनय हे नाटक पसंत करण्यात आले.

**वीरतनय**

कोल्हटकर हे खरे टीकाकार, परंतु एका नाट्यप्रसंगाने ते नाटककार झाले. माधवराव पाटणकरांच्या विक्रमशशिकला नाटकाबद्दल त्यांनी विविधज्ञान-

विस्तार मासिकात जो जहरी टीकालेख लिहिला होता तो वाचून संतप्त झालेल्या पाटणकरांनी ' टीकाकाराने स्वतः एक तरी नाटक लिहून दाखवावे ' असे त्यांचे नाटक चालू असताना भर नाट्यगृहात आव्हान दिले. कोल्हटकरांनी ते स्वीकारून वीरतनय नाटकाच्या लेखनाला वेगाने प्रारंभ केला. किर्लोस्कर मंडळीने नवीन नाटकासाठी दिलेली जाहिरात वाचून त्यांनी आपले नाट्यलेखन झपाट्याने पूर्ण करून नाटकाचे हस्तलिखित पाठवून दिले. पहिला एक अंक पदासह व शेवटच्या अंकातील शेवटचा प्रवेश भाऊरावांनी ऐकला आणि नाटक पुरे करून पाठवा असे सांगितले. त्याप्रमाणे कोल्हटकरांनी केले. भाऊरावादि मंडळींना ते आवडल्यामुळे त्याचा रंगभूमीवरील प्रवेश सुकर झाला. किर्लोस्करी संप्रदायापेक्षा वेगळ्या धर्तीचे आणि स्वतंत्र कथानक, शब्दनिष्ठ कोटीबाज विनोद आणि पारशी रंगभूमीच्या अनुकरणाने स्वीकारलेल्या नवीन उडत्या चाली ही त्या नाटकाची नाविन्यपूर्ण वैशिष्ट्ये पाहून किर्लोस्कर मंडळीने ते मोठ्या उत्साहाने रंगभूमीवर आणण्याचे ठरविले. मूळ नाटक दुःखपर्यवसायी होते; परंतु संस्कृत नाट्यशास्त्राच्या दंडकाप्रमाणे लिहिलेली सुखान्त नाटके करण्याचे वळण पडलेल्या किर्लोस्कर मंडळीने वीरतनय नाटकही सुखपर्यवसायी करण्याची सूचना केली व कोल्हटकरांनीही ती लगेच अमलात आणली. किर्लोस्कर मंडळीनेही नाटक नव्या धर्तीचे असल्यामुळे जुनी वेषभूषा बाजूला ठेवून 'पुरुष-पात्रांना केसाचे बावऱ्याचे विग, बाजूला पंखासारख्या सुटलेल्या भागाचे फीत लावलेले मखमलीचे कोट, इंग्लिश ब्रीचिससारख्या गुडघ्यापर्यंत पोकळ अशा मखमालीच्या अर्ध्या तुमानी, स्टॉकिंग व जरीचे चढाव, डोक्याला पटके " † असा नवा थाट सजवला होता. भूमिकांची वाटणी पुढीलप्रमाणे होती.

**शूरसेन** – भाऊराव कोल्हटकर.
**वीरसेन** – नारायणराव दडपे.
**शालिनी** – कृष्णराव गोरे.
**शुंभसेन** – चिंतोबा दिवेकर.
**प्रकोप** – किंजवडेकर.
**मालिनी** – गणपतराव बोडस.
**बकुल** – बाबू गाडे.

† कै. गणपतराव बोडसकृत माझी भूमिका, पृ. ४९.

गणपतराव बोडस याच वेळेला गोवा संगीत मंडळी सोडून किर्लोस्कर मंडळीत सामील झाले होते. ते गाणारे असल्याने त्यांना दुय्यम परंतु संगीत स्त्री-भूमिका देण्यात आली होती. किर्लोस्कर मंडळीचा मुक्काम अहमदनगर येथे असताना मे १८९६ मध्ये, तेथील आनंदनिधान नाटकगृहात वीरतनय नाटकाचा पहिला प्रयोग झाला. त्यातील विविध नाविन्याचे प्रेक्षकांनी चांगले स्वागत केले खरे, परंतु किर्लोस्कर-देवलांची रसाळ नाटके पाहण्याची सवय झालेल्या काहीं प्रेक्षकांना कोल्हटकरांच्या नाटकातील चमत्कृतीने भरलेले कथानक, पदांच्या उडत्या चाली, आणि त्यातील पदांची क्लिष्टता या गोष्टी पसंत पडल्या नाहीत. साठे मिरज येथे असताना किर्लोस्कर मंडळीच्या तेथील मुक्कामात त्यांना वीरतनय नाटक पाहण्याचा योग आला. त्याबद्दल लिहिताना त्यांनी पुढीलप्रमाणे नोंद केली– " (दि. २० जानेवारी १८९७) रात्रौ वीरतनय नाटक साग्र पाहिले. त्यात रस नाही. साधारण आहे."

वीरतनय नाटक रंगभूमीवर येऊन त्यातील पुरुष-भूमिका लोकांच्या पसंतीला उतरल्यानंतर भाऊरावांनी स्त्री-भूमिकेतून पूर्णपणे निवृत्त होण्याचा बेत केला. १८९३ नंतर ते शकुंतला, सुभद्रा व मंथरा एवढ्याच त्यांच्या अत्यंत लोकप्रिय असलेल्या भूमिका करीत असत. आता त्याही अन्य नटाकडे सोपविण्याचा त्यांनी विचार केला. त्या वेळी मंडळी मुंबई येथे होती. शहरात प्लेगची धामधूम सुरू असल्यामुळे मंडळीने एका धनाढ्य नाखव्याकडे आपल्या प्रयोगाची व्यवस्था सोपविली होती. १९ नाट्यप्रयोगांबद्दल नाखव्याने किर्लोस्कर मंडळीला साडेदहा हजार रुपये द्यायचे असा तो करार होता. त्याच्या आग्रहामुळे स्त्री-भूमिका सोडण्याचा आपला विचार भाऊरावांनी एक वर्ष पुढे ढकलला. कारण नवी नाटके रंगभूमीवर येऊन ती लाभदायक झाली तरीसुद्धा अण्णासाहेबांची नाटके आणि त्यांतील भाऊरावांच्या स्त्री-भूमिका पाहण्यासाठीच प्रेक्षकांची तोबा गर्दी उसळत असे. १८९७ नंतर मात्र त्यांनी स्त्री-भूमिकांचा पूर्णपणे त्याग केला. किर्लोस्कर मंडळी त्यांवेळी मिरजेला होती. मिरजेचे अधिपती बाळासाहेब पटवर्धन

यांचा किर्लोस्कर मंडळीवर अतिशय लोभ असल्यामुळे त्यांच्या इच्छेसाठी भाऊरावांनी रामराज्यवियोगातील मंथरेची भूमिका केली होती. तीच त्यांची शेवटची स्त्री-भूमिका.

### मोरोबा वाघुलीकरांची निवृत्ती

भाऊरावांनी पुरुष भूमिकेत प्रवेश केल्यानंतर ते पूर्वीच्या ज्या नाटकांतून स्त्री-भूमिका करीत त्याच नाटकात मोरोबा आपल्या नायकाच्या भूमिका करीत. १८९३ नंतरच्या नवीन नाटकातून त्यांनी कोणतीही भूमिका स्वीकारली नाही. १८८० पासून निवृत्त होण्यापर्यंतच्या अठरा वर्षाच्या दीर्घ काळात त्यांनी फक्त दुष्यंत, अर्जुन, वसिष्ठ आणि पुरूरवा या चारच भूमिका सातत्याने केल्या. नवीन नाटकांपैकी फक्त शापसंभ्रम नाटकात ते क्वचित प्रसंगी हौसेने सूत्रधाराची भूमिका करीत. भाऊराव स्त्री–भूमिकांतून पूर्णपणे निवृत्त झाल्यानंतर मोरोबांनी किर्लोस्कर मंडळीतून निवृत्त होण्याचे ठरविले.

मोरोबांच्या निवृत्तीमुळे भाऊरावांचे नाट्यजीवन काही काळ तरी अत्यंत उदास झाले. कारण जवळजवळ १६ वर्षे एकाच संस्थेत एकदिलाने भूमिका केल्यामुळे त्या दोघांत गाढ बंधुप्रेम निर्माण झाले होते. मोरोबांनी मंडळी सोडू नये असा त्यांनी पुष्कळ प्रयत्न केला, परंतु मोरोबांनी आपला विचार बदलला नाही. भागीदारीतून ते मुक्त होणारच होते. मंडळीच्या सामानावरही त्यांचा हक्क होता. परंतु सामानाच्या किमतीबद्दल त्यांना किती रक्कम द्यावी ' अशी विचारणा केल्यावर मोरोबांनी,* ' सामान कंपनी चालवील त्याचे. मला त्याबद्दल काही नको.' असे निरपेक्षभावाने सांगितले. तरीसुद्धा त्यांनी किर्लोस्कर मंडळीची अठरा वर्षे जी अविस्मरणीय सेवा केली होती त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना मंडळीच्या वार्षिक नफ्यातून, निवृत्तिवेतन म्हणून एक आण्याची भागी देण्याचे ठरले. अण्णासाहेबांच्या तसबिरीसमोर फारकतीचा कागद ठेवून मोरोबा व भाऊराव यांनी त्यावर स्वाक्षऱ्या केल्या. गहिवरल्या अंतःकरणाने सर्व मंडळीचा निरोप

---

* कै. बोडसकृत माझी भूमिका, पृ. ६०, ६४

...५

घेऊन मोरोबा 'येतो' असा एकच शब्द उच्चारून मंडळीतून बाहेर पडले. त्यांच्या प्रयाणामुळे उरलेली मंडळी इतकी कष्टी झाली होती की त्यानंतर दोन-तीन तासपर्यंत कोणी कोणाशी बोलू शकले नाहीत. भाऊराव तर मोरोबांच्या आठवणीने अनेक वेळा रात्री घळाघळा रडत असत. मोरोबा आपल्या गांवी गेल्यानंतर त्यांना भाऊरावांनी जे पहिले पत्र पाठविले ते मोठे हृदयस्पर्शी आहे. त्यात ते लिहितात, "आपण व आम्ही मिळोन कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांचे पश्चात आज सुमारे बारा वर्षे सुनियंत्रित रीतीने चालविलेली मंडळी आपण आता सोडून गेला आहा, त्याबद्दल आम्हांस अतिशय वाईट वाटत आहे. आणखी काही दिवस आपण मंडळीत राहिला असता तर आम्हांला फार मोठा फायदा झाला असता. परंतु आपले उतारवय झाल्यामुळे ईश्वरसेवेत काल घालविण्याचा जो आपण स्तुत्य विचार मनात आणला त्याचे आड येण्याची आमची इच्छा नाही. परंतु आपले खरे दैवत अण्णासाहेब हे होत. तरी त्यांना आपण विसरून ईशस्तवन करणे कधीही स्तुत्य होणार नाही. आपला एकमेकांचा फार दिवसांचा स्नेह व एकमेकांवर परस्परांचे प्रेम हे लक्षात घेतले म्हणजे आपण आजपर्यंत केलेल्या परिश्रमांचा अंशतः तरी मोबदला देण्याचे आमचे कर्तव्यकर्म आहे असे आम्ही समजतो...आपण ईशस्तवनातसुद्धा कै. अण्णासाहेबांचे स्मरण व त्यांच्या संस्थेची उत्तरोत्तर बढती होऊन ती दीर्घायुषी होण्याची प्रार्थना करण्यास विसरू नये ही विनंती." (दि. ७ नोव्हेंबर १८९७)

मोरोबांच्या प्रयाणामुळे भाऊराव व रामभाऊ किंजवडेकर असे मंडळीचे दोघेच भागीदार झाले. त्या वेळी ठरलेली वांटणी पुढीलप्रमाणे–

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ०–६–६ | भाऊराव कोल्हटकर |
| ०–३–६ | किंजवडेकर |
| ०–१–० | मोरोबा ( निवृत्तिवेतन म्हणून ) |
| ०–२–६ | सावित्रीबाई किर्लोस्कर |
| ०–१–६ | राखीव निधी. |
| ०–१–० | गुड कांडक्ट निधी. |
| रु. १–०–० | |

मोरोबांच्या नंतर काही काळ शाकुंतल, सौभद्र व रामराज्यवियोग ही अण्णांची नाटके मागे पडली. भाऊरावांच्या नव्या नाटकातील पुंडरीक, चारुदत्त, शूरसेन या भूमिका लोकाभिरुचीला मान्य झालेल्या असल्या तरी मोरोबांनी गाजवलेल्या दुष्यंत, अर्जुन इत्यादी भूमिका करून त्या नाटकांना नवीन संचात रंगभूमीवर यशस्वी करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसत नाही. सौभद्रात अर्जुनाऐवजी कृष्णाची भूमिका करून ( वर्धा येथे १८९८ मध्ये ) त्यांनी त्या नाटकाचे काही प्रयोग केले परंतु ते पूर्वीसारखे रसिकांना रिझवू शकले नाहीत. जुन्या नाटकांच्या मागासलेपणामुळे शापसंभ्रम, मृच्छकटिक व वीरतनय या नाटकांच्या आधारावरच किर्लोस्कर मंडळीचा प्रपंच चालू होता.

१८९८ मध्ये मंडळी बडोद्याला गेली. भाऊराव जोपावेतो स्त्री-भूमिका करीत होते तोपर्यंत त्यांनी आपल्या नाट्यसंस्थेला बडोद्याला केव्हाच नेले नाही. कारण त्यांची कुटुंबीय मंडळी बडोद्यालाच होती; आणि आपल्या पत्नीने आपली स्त्री-भूमिका पहावयाची नाही असा त्या दोघांचा संकेत ठरलेला होता. पुढे पुरुषभूमिका पाहण्याचे स्वातंत्र्य दिले असताही भाऊरावांच्या पत्नीने त्यांची एकही भूमिका पाहिली नाही. आपल्या दैवी सौंदर्याने साऱ्या रसिकांना वर्षानुवर्षे मोहिनी घालणाऱ्या कलावंताची भूमिका त्याच्या सहधर्मचारिणीला मात्र पाहता येऊ नये हा विचित्र दैवयोग त्या काळच्या सामाजिक विचारावर चांगला प्रकाश टाकणारा आहे.

बडोद्याला गेल्यानंतर मंडळीच्या नित्याच्या प्रयोगानंतर आमंत्रणानुसार तीन सरकारी प्रयोग झाले. त्याबद्दल नियमाप्रमाणे बिदागीही मिळाली. मराठी रसिकांनी ज्याला अनेक वर्षे आपल्या हृदयात सर्वश्रेष्ठ स्थान दिले होते त्या भाऊरावांचा त्यांच्या जन्मभूमीत विशेष गौरव होईल अशी जी काहीजणांची अपेक्षा होती ती मात्र फोल ठरली. गुणीजनांचा बहुमान करण्याबद्दल बडोदा संस्थानची विशेष ख्याती होती. परंतु त्याच संस्थानाचा प्रजाजन असलेल्या भाऊरावांच्या वाट्याला मात्र तो योग आला नाही. ' पिकते तिथे विकत नाही ' हेच वचन तिथे सार्थ ठरले !

वीरतनय नाटकाच्या यशामुळे कोल्हटकरांचा नाट्यविषयक उत्साह वृद्धिंगत होऊन त्यांनी लवकरच आपले पुढील मूकनायक हे नाटकही लिहून काढले आणि किर्लोस्कर मंडळीच्या भाऊरावादी नटांसमोर त्याचे वाचनही केले. भाऊरावांनी नाटकाची वाहवा केली परंतु नाटक लगेच स्वीकारून ते रंगभूमीवर आणण्याच्या बाबतीत भाऊरावांनी विशेष उत्साह दाखविला नाही.* कारण त्याच सुमारास देवलांच्या शारदा नाटकाच्या लेखनास प्रारंभ झाला होता. नाटक लिहून झालेले नव्हते, परंतु त्यातील बरीचशी पदे देवलांनी पूर्वीच तयार करून ठेवली होती व ती किर्लोस्कर मंडळीतील नटांच्या कानांवरही पडलेली होती.

मूकनायक संपूर्ण तयार झालेले होते आणि मंडळीचा मुक्काम नागपूरला होता तोपर्यंत शारदा नाटकाचे दोनच अंक लिहून झालेले होते, तरीसुद्धा शारदेलाच अग्रहक्क मिळून त्याच्या तालमीचा मुहूर्त पुढील धुळ्याच्या मुक्कामात झाला. भाऊरावांनी प्रमुख भूमिका करण्याएवढे भाग्य मूकनायकाच्या कपाळी नसावे; कारण भाऊरावांच्या मृत्यूनंतरच किर्लोस्कर मंडळीने मूकनायक नाटक १९०१ मध्ये रंगभूमीवर आणले. किर्लोस्कर मंडळीचे नाट्यशिक्षक आणि नाटककार या दोन्ही दृष्टींनी कोल्हटकरांच्यापेक्षा देवलांचे किर्लोस्कर मंडळीतील स्थान श्रेष्ठ व आदराचे होते. परंतु मूकनायक बाजूला ठेवून शारदेला प्रथम क्रमांक देताना केवळ देवलांच्या पूर्वलौकिकाचाच भाग नव्हता. त्यापेक्षाही भाऊरावांचा रंगभूमीविषयक जो सुजाण दृष्टिकोण होता तोही शारदा प्रथम रंगभूमीवर येण्यास कारणीभूत झाला असावा. भाऊराव केवळ जुन्या परंपरेलाच चिकटून बसणारे नव्हते. त्यांची दृष्टी नव्या काळाबरोबर पुढे झेप घेणारी होती. त्या प्रगतिपर विचारसरणीमुळेच सनातनी वृत्तीच्या रसिकांना धक्का देणारे कोल्हटकरांसारख्या अनोळखी नाटककाराचे नाटक त्यांनी मोठ्या धाडसाने रंगभूमीवर आधीच आणले होते व यशस्वी करून दाखविले होते. ‘ मूकनायक ’ नाटक कलागुणांनी संपन्न होते हे निर्विवाद; परंतु शारदा नाट्यगुणांच्या दृष्टीने श्रेष्ठ

* माझी भूमिका, पृ. ६४.

नाटचकृति असून ती किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर येण्यात रंगभूमीवरील एका नव्या युगाची नांदी म्हणण्यासारखे होते. १८८० पासून १८९८ पर्यंत किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवर एकही सामाजिक नाटक आले नव्हते. देव–गंधर्व–अप्सरा–राजे–राण्या याच वातावरणात किर्लोस्कर मंडळी होती. मृच्छकटिक थोडेसे वास्तववादी असले तरी पूर्णतया नव्हते. त्यामुळेच किर्लोस्कर मंडळीच्या रंगभूमीवरील शारदा नाटकाचे अवतरण ही एक अभूतपूर्व घटना होती. या सर्व गोष्टीमुळेच मूकनायकाऐवजी शारदा नाटकाला अग्रक्रम देणाऱ्या भाऊरावांच्या सुजाण कलावृत्तीचे कौतुक वाटल्याशिवाय राहात नाही.

देवलांनी दिग्दर्शित केलेल्या शारदा नाटकाचा (पहिल्या तीन अंकांचा) प्रयोग इंदूर येथे दि. १३ जानेवारी १८९९ या दिवशी झाला. नगरला चार अंकी प्रयोग होऊन संपूर्ण पाच अंकी नाटकाचा पहिला प्रयोग सोलापूर मुक्कामी झाला. त्यातील प्रमुख पात्रयोजना पुढीलप्रमाणे होती—

**कोदंड** – भाऊराव कोल्हटकर
**सूत्रधार व कांचनभट** – नारायणराव दडपे
**भुजंगनाथ** – नारायणबुवा मिरजकर
**शारदा** – रामा डवरी
**नटी व इंदिराकाकू** – कृष्णराव गोरे
**वल्लरी** – कृष्णा दिवेकर

शारदा नाटकाने रंगभूमीवर आल्यानंतर जी अलोट लोकप्रियता मिळवली त्याचे गणपतराव बोडसांच्या एकाच वाक्यात सार* सांगायचे म्हणजे, “शारदा नाटकासारखे सर्वांगीण यश त्यानंतर कोणत्याही दुसऱ्या नाटकाला लाभले नाही.”

समकालीन लोकमताचे दिग्दर्शन म्हणून ‘इंदुप्रकाश’ या त्या काळच्या प्रसिद्ध पत्रातील उतारा पुढे दिला आहे. शारदा नाटकासारखे प्रभावी सामाजिक नाटक तयार होऊन ते किर्लोस्कर मंडळीसारख्या प्रथम श्रेणीच्या

---

* माझी भूमिका, पृ. ७१

नाट्यसंस्थेने रंगभूमीवर आणण्यामध्ये केवढे क्रान्तिकारक कार्य घडून आले होते याचे वर्णन करताना 'इंदुप्रकाश' मधील लेखक लिहितो---

– "In spite of its modest programme, therefore, we think that the शारदा marks an important event in the history not only of our dramatic Marathi literature such as it is, but also of social reform; and we hope that it will find a prominant place in the annual review which the apostle of social reform – the (now late lamented) Hon. Mr. Justice Ranade will take of the years progress at the ensuing National Social Conference. In this connection, it would be unjust to ignore the claims of the Kirloskar Sangit Dramatic Company who put the शारदा on the stage. Surely it is a happy combination that such an epoch-making drama should be produced on the stage by such a popular and renowned band of singers and actors as the Kirloskar Sangit Dramatic Company."

शारदा नाटकाच्या बाबतीत घडलेली एक पडद्यामागची मनोरंजक घटना* नमूद करण्यासारखी आहे. देवलांच्या हरिपूर क्षेत्राजवळ श्रीमंत तात्यासाहेब सांगलीकर या नावाचे गणपतिभक्त होते. शारदा नाटकातील काही घटना आणि हेरंब महाल, श्रीमंत, जय धुंडिराज, पाऊणशे वयमान इत्यादी शब्दांचा उपयोग पाहून काही राजनिष्ठ मंडळींनी सांगलीकरांच्या मनात असे भरवून दिले की शारदा नाटक आपल्यालाच उद्देशून लिहिलेले आहे; आणि नाटककार देवलांविरुद्ध अब्रुनुकसानीचा दावा करता येईल. सांगलीकर हे समंजस व विचारी असल्यामुळे त्यांनी सांगलीचे त्या वेळचे न्यायाधीश श्री. अनंतराव पाटकर यांचा सल्ला विचारला. श्री. पाटकरांनी मुंबईचे प्रसिद्ध सॉलीसिटर्स कॅप्टन आणि वैद्य यांच्याशी चर्चा केली. त्यातून निष्कर्ष

---

* सह्याद्रि, नोव्हेंबर १९५३, (डॉ. ब. र्‍यं. साठे यांचा लेख).

असा निघाला की ‘ हे नाटक आक्षेपार्ह नाही व त्याविरुद्ध सांगलीकरांना काहीएक करता येणार नाही. ’ सांगलीकरांनीही नंतर देवलांच्याविरुद्ध किंवा शारदा नाटकाविरुद्ध कोणताही आक्षेप घेतला नाही. शारदा नाटकाचे प्रयोग सांगलीला निर्वेधपणे होत राहिले.

**संगीतसूर्याचा अस्त**

पुण्या–मुंबईच्या प्रेक्षकांना शारदा नाटकाने भारून टाकल्यानंतर ग्वाल्हेरच्या महाराजांच्या निमंत्रणावरून किर्लोस्कर मंडळी ग्वाल्हेरला गेली. तेथे नित्याप्रमाणे सार्वजनिक व सरकारी प्रयोग झाले. शिंदे सरकारांनी किर्लोस्कर मंडळीचा राजेशाही पाहुणचार करून अखेरीस चांगली बिदागीही दिली. आर्थिक दृष्टीने व लौकिक यशाच्या दृष्टीने ग्वाल्हेरचा मुक्काम फायदेशीर ठरला खरा परंतु याच मुक्कामात भाऊरावांच्या प्रकृतीची चिंता उत्पन्न झाली. डॉक्टरांनी त्यांना संपूर्ण विश्रान्ती घेण्याचा सल्ला दिला. मंडळी ग्वाल्हेरहून पुण्याला आली. पुणेकर रसिकांच्या आग्रहासाठी शारदा नाटकाचे तीन प्रयोग करण्यात आले. भाऊरावांना दिवसेदिवस रंगभूमीवर उभे राहणेही अशक्यप्राय होऊ लागल्यामुळे मंडळीने काही दिवस सुटी घेण्याचे ठरविले. १७ मार्च १९०० या दिवशीच्या शारदा नाटकात भाऊरावांनी आपली कोदंडाची भूमिका केली होती. तेच त्यांचे रंगभूमीवरील अखेरचे पदार्पण.

प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठी भाऊराव एकीकडे सर्व प्रकारचे औषधोपचार करून घेत होते आणि त्याच वेळेला आपल्यादेखत किर्लोस्कर मंडळी पुन्हा चालू कशी होईल याची खटपट करीत होते. मुजुमदार वगैरे मंडळीही किर्लोस्कर मंडळीला शोभेल अशा नायकाच्या शोधात होतीच. या सर्वांच्या प्रयत्नांना यश येऊन लो. टिळकांच्या लॉ क्लासमध्ये शिक्षण घेणारे, अनुरूप बांधा आणि गोड व चढा आवाज यांची देणगी लाभलेले नानासाहेब जोगळेकर हे तरुण गृहस्थ मंडळीच्या नजरेला आले. सुशिक्षण आणि निसर्गदत्त नाट्यानुकूलता या गोष्टी ध्यानात घेऊन ते किर्लोस्कर मंडळीचे नेतृत्व सांभाळू शकतील अशा विश्वासाने भाऊरावांनी त्यांना किर्लोस्कर

मंडळीच्या नायकाच्या भूमिकेवर आरूढ केले. त्या कामी लो. टिळकांनीही किर्लोस्कर मंडळीविषयीचा जुना स्नेहभाव लक्षात ठेवून जोगळेकरांना किर्लोस्कर मंडळीत जाण्यास प्रोत्साहन दिले. देवलांनी त्यांना कोदंडाची भूमिका शिकवून तयार केले. भाऊरावांनी अंथरुणावर पडल्या-पडल्या कोदंडाच्या पदांच्या चाली सांगितल्या. भाऊरावांना वंदन करूनच जोगळे-करांनी कोदंडाच्या भूमिकेत रंगभूमीवर प्रवेश केला. आपल्या वारसदाराची भूमिका पाहण्यासाठी भाऊराव आजारी असतानाही मुद्दाम नाट्यगृहात उपस्थित राहिले होते. नाटकाचा एक अंक पाहिल्यावर 'ठीक आहे. आशा-जनक आहे' असे समाधानाचे उद्गार काढून भाऊराव घरी गेले. किंबहुना प्रतिदिनी खचत चाललेल्या त्यांच्या क्षीणबल शरीराने नवा नायक उभा राहण्याचे पाहण्याचाच ध्यास धरला होता. किर्लोस्कर मंडळीच्या उज्ज्वल भविष्यकाळाची ग्वाही देणारा क्षण अनुभवल्यानंतर भाऊरावांचा रोगजर्जर देह फार काळ तग धरू शकला नाही. अण्णासाहेब पटवर्धनांसारख्या धन्वंतऱ्याचे उपचारही विफल होऊन १४ फेब्रुवारी १९०१ या दिवशी पहाटे एक वाजता मराठी रंगभूमीवर सतत अठरा वर्षे तळपलेला हा संगीतसूर्य कायमचा अस्ताला गेला. "त्या दिवशी भाऊराव पडद्यात गेले नाहीत तर संगीत कमलातील मकरंद आटला, गायनलोलुप जनांचे आरामस्थल नाहीसे झाले, व नाट्यकलेची रंगदेवता कायमची अदृश्य झाली" * त्या दिवशी मराठी रंगभूमीच्या इतिहासातील उषःकालाची प्रभा लुप्त झाली !

• • •

---

* भाऊरावांचे मुजुमदारकृत चरित्र, पृ. ७१.

# किर्लोस्कर मंडळी : कला व व्यवसाय

## नाटचकलेला प्रतिष्ठा

अण्णासाहेब किर्लोस्करांनी मराठी रंगभूमीच्या इतिहासात एक मोठे युग-परिवर्तन घडवून आणले, ही त्यांची असामान्य कामगिरी आता एक-मताने मान्य झालेली आहे. नाटचकलेच्या दृष्टीने त्यांनी किर्लोस्कर-मंडळीचे प्रयोग करून दाखविताना ज्या वैशिष्टयांचा समावेश करून रंगभूमीला प्रगतिपथावर नेली ती तर कौतुकास्पद आहेतच परंतु, नाटचकलेला त्यांनी जो सामाजिक दर्जा मिळवून दिला त्याबद्दल नाटचव्यवसायाने अण्णासाहेबांचे सदैव कृतज्ञ असले पाहिजे. त्यापूर्वीच्या नाटक मंडळयांचे स्वरूप पाहिले म्हणजे नट आणि समाजातील प्रतिष्ठित उच्चभ्रू लोक यांचे संबंध अहि-नकुलवत होते असे म्हणता येणार नाही. परंतु सरकारी नोकरी करणाऱ्या, पदवीधरांचे, आणि प्राध्यापकांचे साहाय्य संपादन करणाऱ्या, आणि अनेक विद्वानांचे मार्गदर्शन मिळवणाऱ्या अण्णासाहेबांच्या शाकुंतल नाटकाचा थाट पाहणाऱ्या प्रेक्षकांची तत्क्षणीच खात्री पटली की अण्णांनी नवयुग

प्रस्थापनेचे कार्य घडवून आणलेले आहे. नाट्यलेखन, नाट्यदिग्दर्शन आणि नाट्यप्रयोग या तीनही अवस्थांत अण्णांनी समाजातील अग्रगण्य मंडळींचे सहकार्य संपादन केले आणि किर्लोस्कर मंडळीलाच नव्हे तर साऱ्या मराठी नाट्यव्यवसायाला गौरवाचे स्थान मिळवून दिले. त्या काळी जे अन्य नाटककार होते त्यांच्या तुलनेने अण्णांना हे जे असामान्य यश मिळाले त्याचे कारण सांगताना श्री. कृष्णाजी आबाजी गुरुजी * आपल्या 'नाट्यकलेची स्थित्यंतरे' या उत्कृष्ट लेखमालेत लिहितात, "अण्णा गुणी तर खरेच पण त्यांस त्या वेळी वैभव मानले गेलेल्या सरकारी नोकरी पेशाचे, त्यातून रेव्हेन्यू कमिशनरसारख्या बड्या ऑफिसच्या शिक्क्याने, आणि कॉलेजच्या मोर्तबाने सजलेल्या लोकांचे चांगले पाठबळ असल्यामुळे, व अण्णांची वृत्ती केवळ सवंग करमणुकीकरिता अथवा हौसेकरिता आहे; इतर धंदेवाल्या नाटक मंडळ्यांप्रमाणे पोट भरण्याकरिता नाही अशी लोकांची भावना असल्यामुळे अण्णासाहेब हे त्रिलोकेकर–डोंगरे प्रभृती नाटककारांस मागे सारून आपण पुढे सरले."

अण्णांची सुविद्य स्नेही मंडळी † त्यांना प्रत्यक्ष नाटकाच्या वेळी कसे साहाय्य करीत याचे वर्णन करताना साठे लिहितात, "नाटक सुरू होण्यापूर्वी एक तास सुप्रसिद्ध हायकोर्ट वकील महादेव चिमणाजी आपटे हे आपल्या पाच–सहा मित्रांसह थेटरवर हजर असत; त्यांच्याबरोबर गणपतराव किर्लोस्कर, बाळासाहेब चौबळ, विनायक महादेव पंडित, गंगाराम बापसोबा रेळे अशी वकील मंडळी असत व दरवाजावर उभे राहून तिकिटे तपासणे, प्रेक्षकांना जागेवर बसवणे ही कामे मोठ्या हौसेने करीत.. .या मंडळींना दरवाजावर पाहिल्यानंतर फुकटे आल्या पावली मुकाट्याने परत जात. आठ आणे दराच्या पिटच्या दरवाजावर गडबड होण्याचा संभव जास्त, तेथे गणपतराव किर्लोस्कर व चौबळ ही मजबूत जोडी हजर असे. ही सर्व थोर माणसे केवळ अण्णांच्यावरील प्रेमामुळे प्रत्येक प्रयोगास तिकिटे काढून हजर असत." या सर्व साहाय्याबद्दल साठे अभिमानाने म्हणत, "केवढी मोठी माणसे माझ्या मदतीस असत. नाटकधंद्यात हे वैभव मीच उपभोगले." नाटकधंद्यासारखा त्या वेळचा

---

* रंगभूमी, वर्ष ५, अंक ५–६, दि. २८-१२-१९१२

† मौज, दिवाळी अंक, १९४८

जनर्निद्य असा पेशा पत्करल्यामुळेच साठ्यांना हे भाग्य लाभले. परंतु प्रारंभी अण्णाच्या संस्थेत जाण्यास चांगली घरंदाज व सुशिक्षित माणसेही बिचकत असत. किर्लोस्कर कारखान्यांचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे बंधू श्री. रामूअण्णा किर्लोस्कर यांचे या बाबतीतले उदाहरण पाहण्यासारखे आहे. ते स्वत: या बाबतीत लिहितात, † "अण्णा किर्लोस्कर कलादगीस आले असता (१८८२) त्यांनी आपल्या नाटक कंपनीचा मी व्यवस्थापक झाल्यास दरमहा १०० रु. पगार देईन असे मला सांगितले. त्या वेळी माझा पगार २५ रु. होता. परंतु तत्कालीन अनुकूल व प्रतिकूल सर्व गोष्टींचा विचार करून मी ती नोकरी नाकारली...त्यावेळी मी अगदी तरुण असल्याने नाटक कंपनीत गेलो असतो तर व्यसनाधीन होण्याचा संभव होता तो टळला." नव्या विचारसरणीच्या माणसांची जर ही शंकाकुल मन:स्थिती तर ह. भ. प. नारायणबुवा फलटणकर यांच्यासारख्या सनातनी परंपरेतील कीर्तनकारांनी लोकापवादाच्या भीतीने अण्णासाहेबांचे आग्रहाचे निमंत्रणही नाकारल्याबद्दल नवल वाटण्याचे काहीच कारण नाही. परंतु अण्णासाहेबांच्या कर्तृत्वाने नट आणि नाट्यव्यवसाय या दोघांनाही समाजजीवनात हळूहळू परंतु निश्चितपणे मानाचे स्थान प्राप्त होऊ लागले. भाऊराव कोल्हटकरांच्या मृत्युलेखात केसरीकारांनी, 'नाटकाच्या धंद्यास किर्लोस्कर यांनी प्रतिष्ठित, नवे व मनोरंजकरूप आणले' या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केलेला आहे (दि. १९ फेब्रुवारी १९०१).

अण्णांच्या लौकिकामुळे किर्लोस्कर मंडळीतील नटांनाही अन्य व्यवसायांतील नागरिकांप्रमाणेच सामाजिक मान्यता मिळू लागली. गणपतराव बोडस लिहितात त्याप्रमाणे 'मानसिक घाण पूर्ण कमी झाली नव्हती तरी नामशेष होण्याच्या मार्गाला लागली होती.' त्या बाबतीतला स्वत:चाच एक अनुभव सांगताना गणपतराव लिहितात, "किर्लोस्कर मंडळीत मी गेल्यानंतर एकदा पुण्यास कंपनी असताना मी लहानपणी ज्या गोळे यांच्याकडे जेवायला जात असे त्या गोळ्यांच्या घरी गेलो. माझी भेट झाल्यावर गोळे मंडळींनी माझ्याबद्दल कसलाही तिरस्कार दाखवला नाही. कंपनीबद्दल,

---

† शतायुषी रामुअण्णा किर्लोस्कर, पृ. ८४.

नाटकाबद्दल, माझ्या कामाबद्दल मला हकीकती विचारल्या. मी त्या रंगात यऊन सांगत होतो, तोच अण्णासाहेब गोळे अचानक येऊन माझ्यामागे उभे राहिले. त्यांना पाहाताच मी पळ काढण्यास प्रवृत्त झालो. पण त्यांनी, 'अरे गणपती बैस बैस. नाटकात गेला असलास तरी तू किर्लोस्करांच्या कंपनीत आहेस. काही हरकत नाही. नाटक कंपनी असली तरी ती किर्लोस्कर कंपनी आहे' असे हसून म्हणून किर्लोस्कर कंपनीबद्दल असलेला आपला आदर त्यांनी व्यक्त केला."

अण्णांची नाटके लोकांना इतकी आवडली होती. ती सजवण्यासाठी खानदानी कुटुंबातील मंडळी आपणहून साहाय्य करीत. अण्णांचे एक स्नेही श्रीमंत दाभोळकर हे सौभद्रातील रुक्मिणीच्या तुलसीवृंदावनाच्या पूजेसाठी आपल्या घरातला चांदीचा भव्य देव्हारा आणि चांदीचीच पूजेची उपकरणी कारकुनाबरोबर पाठवून देत आणि प्रयोग झाल्यावर घेऊन जात. अण्णांच्या रंगभूमीला मराठी मंडळीनी शृंगारावे हे योग्यच होते परंतु अ-मराठी भाषिकांनीसुद्धा अण्णांच्या नाटकांची सजावट करावी हे केवढे नवल? सेंट झेवियर कॉलिजमधील भाषापंडित फादर ऱ्होडाक्स हे संस्कृत जाणणारे होते. मित्रांच्या आग्रहामुळे ते एकदा किर्लोस्कर मंडळीचे शाकुंतल बघायला गेले; आणि त्यांना ते इतके आवडले की ते स्वतःच्या व स्नेहीमंडळीच्या बागेतील फुले, वृक्षांच्या फांद्या व पाने यांचा भला मोठा भारा आपल्या फैटणीतून थिएटरमध्ये घेऊन जात व स्वतः दोन तास शकुंतलेच्या लतामंडपाची मांडणी करीत.

मंडळीच्या प्रत्यक मुक्कामात गावातील रसिकांचे उत्तम सहकार्य मिळावे यासाठी नाट्यप्रयोगाच्या जाहिरातीत (विशेषतः हस्तपत्रकातून ) स्थानीय मान्यवर व्यक्तींच्या सह्या घेण्याची किर्लोस्कर मंडळीची पद्धत होती, आणि त्या बाबतीत मंडळीला आपली म्हणणारे अनेक सद्‌गृहस्थ आपली स्वाक्षरी छापण्यास आनंदाने परवानगी देत. पुण्याच्या हस्तपत्रकावर गोपाळराव

आगरकर, डॉ. गर्दे; मुंबईला म. चि. आपटे, चौबळ; डॉ. अण्णा कुंटे; अमरावतीला दादासाहेब खापर्डे; नाशिकला ल. मो. ऊर्फ अण्णासाहेब देशपांडे आणि बापूजी महिपत खारकर इत्यादी मंडळींच्या सह्या असत.

### किर्लोस्कर मंडळी व संस्थानिक

महाराष्ट्रातील विद्वज्जनांप्रमाणेच मराठी संस्थानिकांनीही अण्णासाहेब, भाऊराव आणि त्यांची किर्लोस्कर मंडळी यांना आपल्या स्वतःच्या कुटुंबातील एका घटकाप्रमाणेच नेहमी वागविलेले आहे. इंदूरचे शिवाजीराव (बाळासाहेब) यांचे व अण्णांचे संबंध किती लोभाचे होते याचा निर्देश पूर्वी केलेलाच आहे. १८८५ पासून अण्णासाहेब व भाऊराव यांना होळकर सरकारने अनुक्रमे द. म. ६५ रु. व ३५ रु. अशा कायम नोकऱ्या दिल्या होत्या. या नोकऱ्या म्हणजे वर्षासनेच होती. कारण या दोघांनी होळकर सरकारची नोकरी कधीच केली नाही. त्यांच्या प्रमाणेच धारचे आनंदराव पवार, मिरजेचे बाळासाहेब पटवर्धन, ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे, बाळासाहेब कुरूंदवाडकर, या संस्थानिकांना किर्लोस्कर मंडळी व तिची नाटके यांच्याविषयी आत्मीयता असल्याने या अधिपतींच्याकडून किर्लोस्कर मंडळीला खास मनुष्य पाठवून निमंत्रण देण्यात येई; सरकारी पाहुण म्हणून मंडळींचा ऐषारामी पाहुणचार होई. खास राजकुटुंबातील व्यक्ती व प्रमुख अधिकारी यांच्यासाठी सरकारी वाड्यातच नाट्यगृह उभारून तेथे नाट्यप्रयोग होत. आणि मंडळीच्या प्रयाणाच्या वेळी चांगली बिदागी मिळे. काही वेळा भरजरी पोषाख, सुवर्णालंकार यांचीही देणगी मिळे. मंडळीच्या अडचणीच्या वेळीही या मंडळींचे साहाय्य मिळत असे अण्णासाहेबांच्या मृत्यूनंतर होळकर सरकारने त्यांच्या पत्नीसाठी एक हजार रुपये पाठवून दिले होते. १८९१ मध्ये किर्लोस्कर मंडळी बंद करण्याचा भाऊराव विचार करीत होते त्या वेळी मंडळीच्या सामान-सुमानाची आवरा-आवर करून सर्व देणीघेणी मिटवण्यासाठी भाऊरावांच्या विनंतीवरून मिरजेच्या अधिपतींनी श्री. साठे यांना तीन महिन्यांची रजा देऊन पाठवून दिले होते. कोल्हापूरच्या शाहू छत्रपतींचाहि असाच लोभ होता. मिरज व कोल्हापूर येथे सरकारी नाट्य-

गृहे बांधण्यात आली त्या वेळी त्यांचे उद्घाटन करण्याचा मान दोन्ही अधिपतींनी किर्लोस्कर मंडळीला दिला होता. शाहू छत्रपतींच्याविषयी अशी एक आठवण सांगतात की, किर्लोस्कर मंडळीच्या शारदा नाटकाचा प्रयोग चालू असतानाच नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांचा खून झाला. त्या वेळी मंडळीला काही उपद्रव होऊ नये म्हणून 'या वेळी माझे काही साहाय्य पाहिजे असेल तर कळवा ' असा निरोप देऊन शाहू छत्रपतींनी आपला विश्वासातील एक गृहस्थ नाशिकला पाठविले होते.

सार्वजनिक नाट्यगृहात 'खास सरकारी' म्हणून जे प्रयोग होत त्या-वेळचा थाट मोठा मजेशीर असे. त्याचे वर्णन करताना डॉ. ब. त्र्यं. साठे लिहितात, "सरकारी वेळ असला म्हणजे थिएटरच्या बाजूचे रस्ते, पटांगणे वगैरे सकाळपासून नगरपालिकेचा नोकरवर्ग स्वच्छ करू लागे. त्या रात्री त्या बाजूचे सर्व म्युनिसिपल कंदील हटकून लागत. भाडोत्री टांगेवालेसुद्धा पांढऱ्या कुडत्यावर काळी जाकिटे चढवीत. मॅनेजर कोरा किंवा परीटघडीचा जरीचा रुमाल डोक्यास बांधून ठाकठीक पोषाखात आपल्या हस्तकांसह आठ वाजल्यापासून हजर होत. थिएटरमध्ये जाळण्यासाठी धूपाचे सँक्शन डबल होत असे. मग सरकारस्वारी येईल तशी खेळाला सुरुवात होई. काही बड्या संस्थानांत आगमन-सूचक बॅंड, बिगूल वाजवत असत. सर्व प्रेक्षक खडी ताजीम देत. मग सरकारस्वारी स्थानापन्न होई. राजघराण्यातील स्त्रियांची बसण्याची व्यवस्था माडीवरील गॅलरीत असे. चिकाचे जाळीदार पडदे लावून जागा करीत. लहान वयाच्या राजकन्या खाली पुरुष मंडळीत राजेसाहेबांजवळ खुर्च्यांवर बसत. आपापल्या दर्जाप्रमाणे अधिकारी मंडळीही स्थानापन्न होई. राजेसाहेबांनी मागे वळून पाहताच नजरानजर साधण्यासाठी निरनिराळे कोन साधून बसलेली मंडळी पटापट नमस्कार व मुजरे करीत. मग एखाद्या खास व्यक्तीला महाराज आपल्याजवळ बसण्यास बोलावीत. ......(मात्र) त्या काळांत गुप्त पोलिसाचा तांडा खुर्च्या फुकट अडवीत नसे. लोकनियुक्त मंत्र्यांपेक्षा ते लोकप्रिय राजे जास्त निर्भय वागत. "†

† धनुर्धारी, दिवाळी अंक, १९५३

### सयाजीरावांचे नियंत्रित नाट्य-प्रेक्षण

गंधर्व मंडळीचे व्यवस्थापक असता साठ्यांना सयाजीराव गायकवाड यांच्या शिस्तप्रिय नाट्यास्वादाचा वेगळाच अनुभव आला. सरकारी प्रयोगाला स्वत: सयाजीराव, राणीसाहेब आणि अन्य मंडळी उपस्थित राहात. परंतु पद आवडले तरी 'वन्समोअर' तर नाहीच परंतु, टाळ्या वाजविण्याचाही दरबारी मंडळींना धाक वाटे; कारण स्वत: सयाजीराव अत्यंत तटस्थपणे नाट्यप्रयोग पहात. सौभद्राच्या एका प्रयोगाला ही सर्व मंडळी-अगदी निर्विकार पद्धतीने नाट्यप्रयोग पहात होती. परंतु त्यामुळे नटवर्ग अत्यंत निरुत्साही झाला. शेवटी तिसऱ्या अंकानंतर साठ्यांनी सयाजी-रावांजवळ जाऊन त्यांना विनंती केली की, "आपणास कोणते पद्य विशेष आवडले तर ते संगीत पात्रास समजत नाही. अशा काही प्रसंगी आपण टाळी दिली तर त्या पात्रांना पद्य म्हणण्यास उत्साह वाटून ते पद ते पुन्हा म्हणतील." सयाजीराव म्हणाले," जे पद मला विशेष आवडेल त्या पदास मी टाळी देईन, परंतु ते पद मात्र पुन्हा म्हणू नये. कारण त्यामुळे कथानकाच्या ओघाचा बेरंग होतो, चित्तवृत्ती विस्कळित होते आणि जागरणही वाढते." महाराज टाळ्या देऊ लागल्यामुळे चौथ्या अंकास रंग चढू लागला. चौथा अंक संपल्यावर साठ्यांनी परत त्यांना विनंती केली की, "आपल्या पाठीमागे दरबारी मंडळी बसली आहेत, त्यांच्या मनातून टाळी देण्याचे असल्यास त्यांस संकोच होत असावा" महाराजांनी आपले कारभारी शिरगावकर यांना आज्ञा केली की, "मॅनेजर सुचवितात तशी सर्वांस टाळी देण्यास परवानगी असावी. मात्र गाणारानें पदाची पुनरावृत्ती करू नये." या सूचनेमुळे उत्साहित झालेल्या दरबारी मंडळींनी पाचव्या अंकाला नाट्यगृह टाळ्यांच्या गर्जनेने दणाणून टाकले! राणीसाहेबांनी साठ्यांना बोलावून सांगितले की, "जे पद आम्हांस आवडेल त्या प्रसंगी आम्ही टाळी देणार नाही; परंतु उत्तेजनार्थ विजेची घंटी वाजवू."

### किर्लोस्कर मंडळी व संगीत.

मराठी रंगभूमीने खानदानी संगीताची आवड निर्माण करून ते संगीत घरोघर पोचविले हे श्रेय आता कोणीही नाकबूल करीत नाही आणि या

श्रेयाचे पहिले मानकरी अण्णासाहेब किर्लोस्कर हेच आहेत. अण्णांच्या संगीताचा प्रभाव किती पडला होता हे सांगताना 'केसरी' ने लिहिले, " अण्णांच्या नाटकांनी संगीताचे आलाप पोरासोरांच्या तोंडी बसून जाऊन लोकांच्या गायनसंबंधी रुचीत व परीक्षेत पुष्कळ सुधारणा झाली आहे. (दि. १७।११।१८८५)." विविधज्ञानविस्तार मासिकानेही 'गायनकलेच्या पुनरुज्जीवनास अण्णांनी आपल्या संगीत नाटकांनी उत्तेजन दिले यात भ्रान्ती नाही' असा अभिप्राय व्यक्त केला होता. हे संगीत केवळ रंगभूमीवरच लोकप्रिय झाले असे नाही गवयांच्या खासगी बैठकीत, सनईवाले, सारंगीवाले व पेटीवाले यांच्या वादनप्रसंगी, इतकेच नव्हे तर कीर्तन अथवा मेजवानी यांच्या प्रसंगीही अण्णांची पदे वाजविण्याचा व म्हणून दाखविण्याचा आग्रह होऊ लागला ! † अण्णांच्या कामगिरीचे वर्णन करताना तात्याबा पुणेकर आपल्या पोवाड्यात म्हणतात –

" बलवंत कवी गुणवंत अंत कसा थोडक्यात झाला ।
गेला संगीतकुसुमझेला ।।
कशि गाण्याची चटक लाविली । सर्वांशी ।
होती कठिण कला परि सुलभ केली । सर्वांसी ।
नवी केली चाल संगीताची ।
झाली राळ इतर नाटकांची ।
गेली किंमत नायकिणींची ।
गाती सुस्वर पदे अण्णांची ।।

या सर्वप्रिय झालेल्या संगीताच्या शृंगारात अण्णासाहेबांनी कीर्तनातील लोकप्रिय जाती व मात्रावृत्ते, लावणी वाङ्मयातील ढंगदार चाली, हिंदुस्तानी संगीतातील चीजा, आणि कर्नाटकी चाली, अशा चार वैशिष्ट्यांचा समन्वय केलेला होता. मात्र संगीत कोणत्याही प्रकारचे असले तरी ते नाट्यपोषकच असले पाहिजे ही त्यांनी मनाशी पक्की खूणगाठ बांधून ठेवली होती. आणि ज्यांच्याकरवी हे संगीत रसिकांना ऐकायला मिळणार त्या नटांच्या

---

† आ. वि. कुलकर्णीकृत, मराठी रंगभूमी, पृ ९७–९८.

गायकीची वैशिष्टयेही अण्णांनी लक्षात ठेवली होती. 'बाळकोबा नाटेकरांच्या पदांत अनुनासिकांवर जास्त भर, गवई ढंगाला अनुकूल चाली, मोरोबांना ईकाराची तान घेण्यासारख्या जागा, लावणीढंगाला भरपूर वाव अशी त्यांनी आपल्या नाटकांतून योजना केलेली आहे. बाळकोबांसाठी तयार केलेली पदे आपल्याला झेपणार नाहीत हे ओळखून त्यांनी स्वत:साठी साध्या चालींवरील पदे तयार केली.

ही पदे गाताना नाट्यावर संगीताचा वरचष्मा होणार नाही हे किर्लोस्कर मंडळीचे प्रारंभापासूनचे धोरण होते. त्यासंबंधीची आठवण देताना श्री. साठे लिहितात, " संगीताचे मर्मज्ञ कै. केरूनाना छत्रे हे मोरोबा व बाळकोबा यांना सांगत, 'गवयाचे ढंग, गवयाच्या भराऱ्या व ताना यांवर जोर देऊ नका. गायनकलेचा रसभंग न होऊ देता गायन हे भाषण समजून रसिक प्रेक्षकांस भाषणाचे रहस्य पटेल असे गात जा; म्हणजे अर्थहानी होणार नाही. रसभंग होणार नाही आणि तुमच्या मधुर गाण्याने प्रेक्षकही तल्लीन होतील' ते दोघे ज्या वेळी तानांच्या ललकाऱ्यांत गुरफटले जात त्या वेळी अर्थाची रस-हानी कशी होते, साध्या सुस्वर गायनाने रसपोषण कसे खुलते हे त्यांना केरूनाना समजावून सांगत. हा नानांचा उपदेश मोरोबा व बाळकोबा यांनी शेवटपर्यंत पाळला. बाळकोबा काही पदांत मात्र ठरीव जागी विजेसारखी चमक आपल्या मधुर आवाजाने दाखवीत त्या वेळी प्रेक्षक टाळ्यांच्या निनादाने नाटकगृह दणाणून टाकीत. भाऊरावांनीही हाच तानांचा नियम सांभाळला होता...एखाद्या पदाला वन्समोअर मिळाला म्हणजे भाऊराव त्या पदाचे फक्त शेवटचे कडवे म्हणत आणि जास्त वन्समोअरही घेत नसत" किर्लोस्करी संगीत मनमुराद ऐकलेले गणपतराव बोडस † त्याचे वैशिष्टय सांगताना लिहितात, " किर्लोस्करी संगीताचे वळण पहिल्यापासून शास्त्रीय गाण्यापेक्षा गाणे गोड गायचे असे असल्यामुळे आणि त्याला वळण देणारा बाळकोबा नाटेकरासारखा सर्वरंगी कलावंत लाभल्यामुळे संगीत म्हणजे गोड गाणे हेच समीकरण ठरले!"

---

† माझी भूमिका, पृ. ४३.

६...

अण्णासाहेब व त्यांचे पट्टशिष्य देवल या दोघांच्या संगीतमय नाटकांनीच किर्लोस्कर मंडळीचा १९०० पर्यंतचा इतिहास प्रामुख्याने घडवलेला असल्या-मुळे किर्लोस्करांच्या रंगभूमीवर केवळ संगीताचाच उत्कर्ष झाला, अभिनय-कला उपेक्षिली गेली असा काही जणांचा गैर समज झालेला आहे, त्याचा थोडक्यात परामर्श घेणे अवश्य आहे.

संपूर्ण गद्य अशा नाटकात अभिनयाच्या सूक्ष्म आविष्कारासाठी जेवढा वाव असतो तेवढा संगीत नाटकांत मिळणे शक्य नसते. त्यातूनही खाडिलकर गडकऱ्यांच्या नाटकांत गद्य भागाला जेवढे स्थान व महत्त्व आहे तेवढे किर्लोस्कर–देवलांच्या नाटकांत नाही. त्यांच्या नाटकांतील गद्य व पद्य यांतील प्रमाण अगदी भिन्न स्वरूपाचे आहे. खाडिलकरांनी आपल्या नाटकांत संगी-ताला महत्त्वाचे स्थान दिलेले असले तरी त्यांच्या संगीत नाटकांतून गद्य भूमिकांनाही प्राधान्य लाभलेले आहे. किंबहुना त्यांनी आपल्या संगीत भूमिकांसाठीही संगीताशी अविभाज्य आणि नाट्याला आवश्यक अशा गद्य भागाची जोड दिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या संगीत नाटकांतील प्रमुख भूमिका करणारे कलावंत जर अभिनयकुशल नसतील तर ती नाटके रसि-काला शंभर टक्के समाधान देऊ शकत नाहीत, हा नित्याचा अनुभव आहे. किर्लोस्कर–परंपरेतील नाटके ही ऑपेरासारखी पूर्णांशाने संगीत नसली तरी त्यांतील संवाद हे जवळजवळ संगीतमयच असतात असे म्हणावयास हरकत नाही. प्रथम गद्य भाग लिहून नंतर त्यात पदे समाविष्ट करावयाची असा प्रकार त्यात नाही. त्यांतील नाट्यप्रसंग, घडलेल्या प्रसंगांचे निवेदन, भावी घटनांचे सूचन, मनातील भावना–विचार इत्यादी सर्व गोष्टींच्या प्रकटना-साठी किर्लोस्कर–देवल संगीताचाच उपयोग करतात असे दिसून येते. त्यामुळे ज्या ठिकाणी गद्याचाच वापर करणे योग्य अशा ठिकाणीही साकी, दिंडी, कटाव यांच्यासारखी धावती वृत्ते योजलेली दृष्टीस पडतात. अनेक ठिकाणी तर एवढी गद्यप्रायता आलेली आहे की त्याला काव्य म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. एखाद–दुसऱ्या ओळीची जी गद्य वाक्ये किर्लोस्कर-देवलांच्या नाटकांतून दिसतात ती मागच्या–पुढच्या संगीताला जोडणारा

दुवा एवढ्याचसाठी आहेत. भावनाविष्काराची सूक्ष्मता, गुंतागुंत किंवा संघर्ष हे सारे संगीतातच व्यक्त झालेले आहेत. यामुळे, खाडिलकर–गडकऱ्यांच्या नाटकांतील अनेक स्वगते, गद्य नाटकांतील स्वगताप्रमाणे रसिकांचे आकर्षण ठरली, तसा प्रकार किर्लोस्कर–देवलांच्या नाटकांत झाला नाही.

या दोन संगीत परंपरेतील नाटकांच्या वर्गातील ही मूलभूत वेगळिक दुर्लक्षिल्यामुळेच 'किर्लोस्कर मंडळीतील नट अभिनयाकडे लक्ष देत नव्हते' अशा प्रकारची विधाने काही जाणत्या मंडळींनीही केलेली आहेत. उदाहरणादाखल पुढील दोन अभिप्राय पहा – अमरावतीचे रसिकवर. श्री. दादासाहेब खापर्डे † किर्लोस्कर मंडळीच्या एका प्रयोगाबद्दल आपला अभिप्राय रोजनिशीत नोंदवून ठेवताना म्हणतात, "कालच्या रात्रीचा खेळ साधारणतः चांगला होता. किर्लोस्कर कंपनीची अभिनयासंबंधी कधीच फारशी ख्याती नव्हती आणि त्यासंबंधात त्यांची विशेष सुधारणाही झालेली नाही गाण्यावरच त्यांचा भर आहे, आणि त्यात ते प्रवीण आहेत (दि. ६ फेब्रु. १९०१)." किर्लोस्कर मंडळीची नाटके ज्यांना पहावयास मिळाली नाहीत. ते आजचे नाट्य–समीक्षक प्रा. बनहट्टी● यांचाही, असाच ग्रह झालेला आहे. ते म्हणतात, " (किर्लोस्करांच्या) संगीत रंगभूमीमुळे अभिनयकला अर्धपोटीच राहिली. भावनांच्या सूक्ष्म छटा, बदलते मनोविकार चेहऱ्यावर दाखविण्याच्या कामी भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर हे विख्यात नटसुद्धा कमजोरच होते...त्यांची जी काय प्रशंसा व्हायची ती गाण्यासाठी; अभिनयासाठी फार क्वचित."

किर्लोस्कर परंपरेतील संगीत नाटकांचे स्वरूप बारकाईने पाहणाऱ्या आणि त्या नाटकांसंबंधीचे तत्कालीन टीकाकारांचे अभिप्राय नजरेखाली

---

† त्यांचे मूळ शब्द असे– 'Kirloskar Company had never any great reputation for acting and they have not much improved in this respect. Singing is and has been their strong point and in it they are good."

● मराठी नाट्यकला आणि नाट्यवाङ्मय, पृ. ९९.

चालणाऱ्या आजच्या अभ्यासकाला मात्र खापर्डे किंवा बनहट्टी यांच्या शब्दांतून सूचित होणाऱ्या चित्रापेक्षा वेगळेच चित्र दिसते. संगीतयोजना करताना अण्णासाहेबांची दृष्टी ते अधिकाधिक रंगतदार कसे होईल हीच होती, आणि म्हणूनच निरनिराळ्या संगीतप्रणालींचा त्यांनी आपल्या नाटकांत कलात्मक समन्वय करून दाखवला. त्या संगीताचा रंगभूमीवर आविष्कार करताना केरूनाना छत्र्यांच्यासारख्या विदग्ध रसिकांनी किर्लोस्कर मंडळीतील प्रमुख नटांना रसपूर्ण गायनाची दृष्टी दिली. त्यामुळे किर्लोस्कर-प्रणीत संगीतावर संस्कार झाले ते भावनाविलासाचे; स्वरविलासाचे नव्हेत. त्यामुळे प्रारंभापासून हे संगीत नाट्यानुकूल पद्धतीने राबविले गेले.

या संगीत नटांना अभिनयशिक्षण देण्याची कामगिरी नाट्याचार्य देवल यांनी पार पाडली. अण्णासाहेबांचे रामराज्यवियोग नाटक बसू लागले तेंव्हापासून विक्रमोर्वशीय, शापसंभ्रम, मृच्छकटिक आणि शारदा ही देवलांची चारही नाटके त्यांच्याच मार्गदर्शनाने रंगभूमीवर आली. पुरुष व स्त्री या दोन्ही भूमिका अत्यंत उत्कृष्ट शिकवण्याबाबत देवल त्या काळातील पहिल्या श्रेणीचे अभिनय शिक्षक होते, आणि म्हणूनच त्यांच्या तालमींत तयार झालेल्या गायक नटांनी नाटकांतील पदे म्हणताना विविध रसांचा अविस्मरणीय आविष्कार करून दाखवला.

रामराज्यवियोग नाटकाचे रसग्रहण करताना भाऊरावादि नटमंडळी रसोत्कट गायनाचा कसा प्रभावी आविष्कार करीत त्याचा प्रत्यय साठ्यांच्या वर्णनावरून कोणालाही घेता येईल. त्या नाटकातील मंथरेच्या भूमिकेचे वर्णन करताना कै. आ. वि. कुलकर्णी ‡ लिहितात, "या नाटकाची सर्व मदार काय ती मंथरेच्या करामतीवर होती. ही भूमिका रा. भाऊराव हे करीत असत, व ती करताना आपल्या सुस्वर गाण्याने व अभिनयाने लोकांस ते असे काही मोहित करीत की सर्वांच्या तोंडून 'धन्य धन्य' असे म्हणवून

‡ मराठी रंगभूमी, पृ. १०१.

घेत." कै. गोविंदराव टेंबेही ● भाऊरावांच्या भूमिकेबद्दल लिहितात, "भाऊराव 'माझ्या मनिचे' सारख्या पदांतील आर्त स्वरांनी श्रोत्यांची हृदये सद्गदित करीत...त्यांच्या भाषणातही जरूर ते मार्दव व काठिण्य दिसून येई. गद्य प्रांतात वीर व करुण रसावर नटसम्राट गणपतराव जोशींनी जसे प्रभुत्व मिळवले होते तसेच भाऊरावानी संगीत क्षेत्रात वीर व करुणरस वश केलेले होते. त्यांचे अनेक वर्षे प्रत्यंतर पाहणारे कै. गणपतराव बोडस ‡ लिहितात, "वीररसाची आणि करुणरसाची त्यांची पदे रंगभूमीवर इतकी उत्तम वठत की वीररसाच्या पद्यगायनाबरोबर स्फुरण व करुणरसाच्या पद्यगायनाबरोबर दुःखाचे उसासे थिएटरमध्ये निर्माण होत. सुभद्रेची करुणरसात्मक पदे व मंथरेची वीररसात्मक पदे त्यांनी म्हणताना ऐकले म्हणजे सुभद्रेची गोड पदे म्हणणारे ते हेच का भाऊराव असा ऐकणाराला भ्रम उत्पन्न होई......पद म्हणताना भाऊराव मूर्तिमंत रस उभा करीत. पदातल्या शब्दांचे उच्चार स्पष्ट असत व शब्दांची ओढाताण न कळतच क्वचितच त्यांच्याकडून होई."

१८८२ पासून १८९९ पर्यंत भाऊराव कोल्हटकर हीच किर्लोस्कर मंडळीची प्राणभूत शक्ती असल्याने आणि त्यांचे गायन हे किर्लोस्कर--देवलांच्या नाटकांचे एक प्रमुख आकर्षण असल्यामुळे त्यांच्या रसात्मक गायनाचा थोडया विस्ताराने उल्लेख केला. परंतु देवलांच्या सुशिक्षणामुळे तयार झालेले किर्लोस्कर मंडळीतील अन्य कलावंतही याच नाटयानुकूल संगीत-परंपरेचे भोक्ते होते.

स्वतः अण्णासाहेब किर्लोस्करांच्या शाङ्‌र्गरव (शाकुंतल), बलराम (सौभद्र) आणि दशरथ (रामराज्यवियोग) या तीनही भूमिका अतिशय परिणामकारक होत. बाळकोबा नाटेकरांच्या भूमिकांबद्दल, किर्लोस्कर मंडळीतील एक नट कै. गोविंदराव सोरटी * यांनी आपला अभिप्राय नमूद करताना "बाळकोबा गायनाइतकेच अभिनयातही वाकबगार होते. नारद, कृष्ण,

---

● सह्याद्रि, दिवाळी अंक. १९५३.

‡ माझी भूमिका, पृ. ४४–४५.

* साप्ताहिक शिलेदार, दि. ३ नोव्हें. १९५१

आणि कण्व या भूमिका त्यांच्यानंतर पुन्हा कोणीही केव्हाही तशा वठवू शकला नाही." बाळकोबांनी कण्वाच्या भूमिकेतील 'परक्याचे धन कन्या यासाकीला इतकी हृदयस्पर्शी चाल लावली होती की संगीताचे दर्दी त्याची अजूनही आठवण काढतात. "बाळकोबांनी 'गेली लाडकी मम दुहिता' या चरणाच्या वेळी प्रेक्षकांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहविले आहेत," असे खुद्द साठ्यांचेच उद्गार आहेत. शारदा नाटकातील भुजंगनाथ आणि वल्लरी यांच्या भूमिकांबाबत कै. आ. वि. कुलकर्णी † लिहितात, "भुजंगनाथाची भूमिका रा. नारायणबुवा मिरजकर हे घेत असून आपल्या मधुर गाण्याने ते लोकांना चांगले रिझवू लागलेच पण याहीपेक्षा अभिनयाची छाप त्यांनी जास्त पाडली...वल्लरीचे काम करणारा मुलगा म्हातारा इतुका न अवघे पाउणशे वयमान हे पद्य म्हणताना अभिनयाबद्दल सारख्या टाळ्यावर टाळ्या घेतो."

किर्लोस्कर मंडळीतील नटांचे लक्ष केवळ संगीताच्या बाजूवरच केन्द्रित झालेले नसून अभिनयाच्या दृष्टीनेही ते तेवढेच जागरूक होते आणि त्यांचे संगीतही त्यांनी रसपरिपोषाच्या हेतूनेच योजिले होते असे या निरनिराळ्या समकालीन लोकांच्या विधानांवरून स्पष्ट होत आहे.

**प्रयोगाची सजावट**

त्या काळची वेषभूषा, रंगभूषा, पडदे इत्यादींसंबंधी साठ्यांनी एके ठिकाणी छोटेसे टिपण करून ठेवले आहे. त्यात ते म्हणतात, "शाकुंतल नाटकाचा पहिला प्रयोग झाला त्या वेळी दृश्य पूर्वीचेच होते. परंतु त्या वेळच्या पार्शी नाटक मंडळ्यांनी पाश्चात्य पद्धतीने आपली रंगभूमी सजवलेली पाहून किर्लोस्कर मंडळीनेही तेच धोरण हळूहळू स्वीकारले. ड्रॉपचा पडदा बेळगाव येथील एक शिक्षक श्री. भाऊराव फडके यांच्याकडून तयार करून घेण्यात आला. त्या पडद्यावर त्यांनी कुरुंदवाड येथील नदीवरील घाट, त्यावरील इमारत, तेथून गावात जाण्याचा प्रशस्त राजमार्ग,

---

* मराठी रंगभूमी, पृ. १२७.

दुतर्फा उभी असलेली चिंचेची झाडे असे दृश्य चित्रित केलेले होते. त्या काळच्या पाश्चात्य पद्धतीच्या पडद्यावर समुद्र, आगबोटी, त्यांतून उतरणारी साहेब-मडमांची जोडपी, आणि त्यांच्या बरोबर डोक्यावर सामानाचे बोजे घेतलेले काळे हमाल असे चित्र रंगवलेले असे. पूर्वी रंगभूमीवर लता, पल्लव, ाडे हीदेखील कार्डबोर्डवर रंगवून उभी करीत. हळूहळू त्या जागी खऱ्या फुलांच्या कुंडया येऊ लागल्या.

पुरुष पात्रांचे पोषाख इंदूर, ग्वाल्हेर येथील मराठी संस्थानिकांच्या पोषाखाच्या धर्तीवर असत. त्यात भरजरी मंदील, अंगरखा, दुपेटा यांचा समावेश असे. शकुंतला आणि तिच्या सख्या यांना ऋषि-आश्रमातील कन्यांचा वेष देताना सर्वांगावर पुष्प–भूषणे चढवीत. स्त्री-वेषधारी नट, जुन्या तऱ्हेची स्मश्रू करून त्यावर केसांचा टोप घालून तो बारीक दोऱ्यांनी खच्चून आवळीत. (त्याचा परिणाम–काही नटांना वांत्या होणे –असा होई.) पुरुष-पात्रांच्या काळया पांढऱ्या दाढीमिशा, कल्ले व स्त्री–पात्रांचे केशकलाप हे सर्वच स्वदेशी वाखाच्या तंतूचे होते. नंतर केशकलाप माणसांच्या केसांचे व दाढी–मिशा गंगावनाचे बनवू लागले. पुढे पारशी नाटक मंडळयांच्या अनुकरणाने निरनिराळया प्रकारचे केसांचे ‘ विगज् ’ (टोप) मराठी नाटक मंडळयांतहि शिरले. जुन्या नाटक मंडळया पौराणिक नाटकांतून रावण, त्राटिका यांसारखी पात्रे प्रवेश करताना राळ उडवून प्रेक्षकांस चकित करीत असत. तो राळेचा वास प्रेक्षकांसही उत्तेजक वाटे. किर्लोस्कर मंडळीने त्या राळेच्याऐवजी दर प्रयोगाच्या आरंभी ऊद व धूप यांचा धूर प्रथम रंगभूमी-वर व नंतर नाटकगृहात सोडण्याची प्रथा सुरू केली, तीही प्रेक्षकांना संतोषकारक होई.”

**त्या वेळची नाटयगृहे**

किर्लोस्कर मंडळीच्या व्यवस्थापकीय सेवेत त्यांना इंदूर–ग्वाल्हेरपासून हुबळी–धारवाडपर्यंत अनेक गावी हिंडावे लागले. त्या वेळी पुणे, मुंबई व सातारा या तीनच ठिकाणी पक्की नाटयगृहे होती. नाटयगृहांच्या अभावा-

मुळे एका ठिकाणचा मुक्काम हालण्यापूर्वीच स्टेज–मॅनेजरला पुढच्या मुक्कामाच्या गावी पाठवून कच्चे नाटकगृह (मंडपवजा) बांधवून घेण्याची तजवीज करावी लागे. ही नाटकगृहे वेळू व तट्टयांचे मांडव घालून तयार करण्यात येत. प्रेक्षकांना बसण्यासाठी जमीन, बाके आणि खुर्च्या असे वर्ग असत. त्यासाठी खुर्च्या, बाके टाकण्यासाठी देवदारी खोकी, पिंपे इत्यादी वस्तू भाड्याने आणीत. त्या वेळी हुबळी, बेळगाव, सोलापूर वगैरे शहरी या वस्तू भाड्याने पुरविणे हा एक धंदाच झालेला होता. हेच लोक अनेक वेळा नाटकगृहाचा मांडव घालून देण्याचा मक्ता घेत. ज्या वेळी नाटकमंडळी स्वतःच असे कच्चे नाटकगृह उभारी त्यावेळी मुक्काम हालविण्याच्या वेळी मंडप उतरवून ठेवताना भाड्याने आणलेले, गोळा केलेले, किंवा नगरपालिकेतून मागून आणलेले खुर्च्या, खोकी, स्टुले इत्यादी सामान ज्याचे त्यास परत करणे हा एक मोठाच उद्योग असे.

या मंडपांच्या उभारणीसाठी उघड्या पटांगणापेक्षा राजे–रजवाड्यांचे किंवा सरदार–जहागिरदारांचे विस्तृत व भव्य वाडे घेत असत. इंदूर, ग्वाल्हेर येथील मुक्कामात सरकारी खर्चानेच सरकारी वाड्यांतून नाटकमंडळ्यांसाठी तात्पुरते नाटकगृह तयार करून देत. अन्यत्र नाटक मंडळ्यांना स्वतः ते काम करावे लागे. साठे यांच्या रोजनिश्यात त्याचप्रमाणे गणपतराव बोड-सांच्या आत्मचरित्रात याचे अनेक निर्देश आढळतात. ‘ग्वाल्हेरला आंग्रे यांच्या वाड्यात स्पेशल थिएटर बांधून आंग्रेसाहेबांनी तीन प्रयोग केले,’ ‘पंढरपूरला रुक्मिणीमंदिरालगत आपटे, यांच्या वाड्यात मंडप देऊन त्यात प्रयोग सुरू झाले,’ ‘बेळगावला नारायणस्वामीचे कारखान्यात उसांचा शैदा घालून थिएटर तयार झाले’ इत्यादी नाशिकला राजेबहाद्दरांच्या वाड्यात, तर कल्याणला सुभेदारांच्या वाड्यात मंडप उभारणी होई. अशा कच्च्या नाट्यगृहांना ‘किर्लोस्कर संगीत नाटकगृह’ असे नाव देण्यात येई. यामुळे नाट्यप्रयोग करण्यासाठी अल्पावधीत सोय होई हे खरे, परंतु त्यात अड-चणीही असत. विशेषतः अग्नीची व वळवाच्या पावसाची भीती असे. पावसामुळे खेळ बंद ठेवणे किंवा अर्धवट झालेला खेळ रद्द करावा लागणे असे प्रसंग अनेकदा निर्माण होत.

पुण्या-मुंबईच्या मुक्कामात ठरीव भाडे देण्याचा करार करून बयाणा म्हणून काही रक्कम व्यवस्थापकाच्या हातावर ठेवली म्हणजे हा पुढचा त्रास वाचत असे. लहान गावात, त्याचप्रमाणे शहरात शनिवार-रविवार खेरीज अन्य दिवशी भाडे माफक असे. मुंबईला गेईटी थिएटरात गॅसची व्यवस्था होती व त्याचा भरपूर प्रकाश पडे. मात्र त्यासाठी नेहमीच्या भाड्याशिवाय अधिक पैसे द्यावे लागत. साठ्यांच्या लेखनात यासंबंधीचे उल्लेख आढळतात ते असे –

(१) पुणे–आर्यभूषण नाटकगृह शनिवारी १०० रु. स भाड्याने पारशाकडून ठरवून घेतले. (दि. २२–९–८५).

(२) मुंबई–गेईटी थिएटर ५० रु. भाड्याने घेतले. ५ रु. फ्रामजी दादाभाई यास बयाणा म्हणून दिले. (दि. ६–१०–८४).

२५–१०–८४ ते २२–१०–८४ (५ शनवार व ५ बुधवार) उक्ते ६०० रु. भाडे ठरविले.

गेईटी थिएटर गॅसशिवाय ३० रु. भाड्याने ठरविले (दि. २७–१–८७).

नॉव्हेल्टी थिएटर ५० रु. नाटकगृह भाडे, ५ खेळांसाठी करार, गॅस अंगावर. (दि. १२–१०–८७).

गेईटी, ८–११–८७, ते ७–१२–८७ एक महिन्यासाठी ८०० रु. स ठरविले.

रिपन थिएटर २१ नोव्हें. ते २८ डिसें. (५ बुधवार व ५ शनवार) ६८० रु. भाड्याने ठरविले.

नाटकाच्या दरासंबंधी साठ्यांनी दोन ठिकाणी माहिती दिली आहे. दि. ५–६–८४ च्या नोंदीत पुढीलप्रमाणे उल्लेख आहे–'कल्याण–नाटकाची तिकिटे तयार केली. रिझर्व्ह–२ रु., खुर्ची १॥ रु., बाक १ रु., व जमीन

८ आणे. दि. ६ मे ८९ च्या धारवाड येथील नोंदीमध्ये तिकीटे व त्यांची संख्या यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे–

| | | |
|---|---|---|
| खुर्ची | २ रु. | ५० जागा |
| बाक | १॥ रु. | ५० जागा |
| बाक | ।॥। रु. | ३० जागा |
| पीट | ।॥ रु. | १५० जागा |
| माडी | १ रु. | ७५ जागा. |

विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या प्रयोगाला निम्मे दर असत. किर्लोस्कर मंडळीने कोल्हापूरला सैनिकांसाठी एक प्रयोग केला त्या वेळीही (दि. १२-८-८६) तिकिटांचे दर नेहमीपेक्षा निम्म्यानेच ठेवल्याचा एक उल्लेख सापडतो. पुढे गंधर्व मंडळीच्या बडोदे येथील मुक्कामात 'मिलिटरी लष्करी लोकांसाठी अर्ध्या दराचे मानापमान नाटक झाले' असाही आणखी एक उल्लेख साठ्यांनी करून ठेवलेला आहे. सैनिकी लोकांसाठी जसे प्रयोग होत तसेच केवळ इंग्रज प्रेक्षकांसाठीही प्रयोग क्वचित केला जाई. त्यांपैकी एक उल्लेख मोठा गंमतीदार आहे. किर्लोस्कर मंडळी अकोला येथे असताना मंडळीचे स्नेही आणि तेथील शास्त्रखात्याचे डायरेक्टर श्री. श्रीराम भिकाजी जठार यांनी आपल्या बंगल्यावर खास मंडप उभारून युरोपियन अधिकाऱ्यांना सपत्नीक निमंत्रणे देऊन सौभद्राचा एक प्रयोग करविला. मंडळीने त्या नाटकाचे २, ४ व ५ हे तीन अंक करून दाखविले. सुभद्रेच्या भूमिकेतील भाऊरावांची मूर्ती पाहणाऱ्या युरोपियन स्त्रियांची ती स्त्रीच असावी अशी समजूत झाली. तेव्हा त्यांची खात्री करण्यासाठी श्री. जठारांनी भाऊरावांना स्त्री-वेष उतरवून त्यांच्यासमोर आणले; तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटले !

### किर्लोस्कर मंडळीतील नटवर्गाची नीतिमत्ता आणि दानत

आपल्या सहा वर्षांच्या व्यवस्थापकीय जीवनात साठ्यांना किर्लोस्कर मंडळीतील नटवर्गाच्या गैरवर्तणुकीचे जे थोडेफार अनुभव आले त्याचाही

त्यांनी काही ठिकाणी, अत्यंत त्रोटक असा उल्लेख केलेला आहे. त्यातील नावे वगळून काही उल्लेख पुढे दिले आहेत.

दि. ८-८-८१. पुण्यास गुळ वेयास कार्ड लिहिले त्यात ... च्या लबाडी-विषयी लिहिले आहे.–

दि. २४-११-८५ आज रात्री घरी ११ वाजता ... यांनी देवल यांचे विरुद्ध ... च्या तारेत फार वाईट निंदा केली. ती ऐकून मनास फार वाईट वाटले.

दि. २५–११–८५. ...नी गैरवर्तन केले.

दि. २३–६–८५ ... हे तिघे रात्री ११ वाजताच्या सुमारास ड्रिंकेड (Drunked) होऊन बोडके रस्त्यातून घरापर्यंत येऊन परत गेले. हे कृत्य वाईट केले.

दि. २४–५–८६. ...was a drunked at night.

दि. १७–७–८६. ...यांनी अमर्याद भांडण केले.

दि. ६–३–८९. ...यास निपाणीकरामार्फत, तुम्ही आपले माणूस येथे ठेवू नका, अशी ताकीद – समज दिली.

या नोंदींवरून एक गोष्ट स्पष्ट होते की किर्लोस्कर मंडळीतील काही नट मंडळींचे आचरण हे प्रचलित नीतिनियमांना सोडून होत असे. नाटकासारख्या राजस धंद्यात शिरल्यानंतर ज्या काही 'गुणां'ची बाधा व्हायची त्यापासून सर्वथैव अलिप्त राहणे हे या नटांनाही शक्य झाले नाही. † परंतु ही व्यसने जडलेली असली तरीदेखील हे नट कलावंत या दृष्टीने आदर्श होते. केवळ त्यांच्या कलागुणांमुळे नव्हे तर सामाजिक दृष्टीनेही त्यांच्या श्रेष्ठ मानसिक ठेवणीचे कौतुक करावेसे वाटते. या मंडळीचे खासगी जीवन हे निर्व्यसनी

---

† त्या वेळच्या नटांना निरनिराळ्या व्यसनांची माहिती देण्याचे कार्य समाजातील काही सुशिक्षित व प्रतिष्ठित स्नेह्यांनीच केले असे स्पष्ट मत श्री. सोरटी (शिलेदार दि. ३-११-५१) श्री. वि. ना. कोठीवाले (लोकसत्ता, दिवाळीं अंक १९५३) आणि श्री. नानासाहेब चापेकर (स्मृतिधन. पृ. १९४) यांनी व्यक्त केलेले आहे. तेही या संदर्भात ध्यानात ठेवले पाहिजे.

राहू शकले नाही तरी आपल्या दोषांचा आपल्या कलोपासनेवर कोणताही अनिष्ट परिणाम होणार नाही याविषयी ही नटमंडळी विलक्षण जागरूक व निग्रही होती हे त्यांनी जी लोकोत्तर नाट्यसेवा केली त्यावरून सहज दिसून येण्यासारखे आहे. या सर्वांचे मूळ या नटांच्या त्रिविध निष्ठांमध्ये आहे. कलेविषयी निष्ठा, संस्थेविषयी निष्ठा, आणि समाजाविषयी निष्ठा ही त्यांची तीन श्रद्धास्थाने होती.

किर्लोस्कर मंडळीतील नट आपापल्या भूमिका करताना आपल्या उणीवा कलोपासनेच्या आड येणार नाहीत याची सदैव काळजी घेत असत, हे एक भाऊरावांचे उदाहरण पाहिले म्हणजे लक्षात येईल. त्यासंबंधी गणपत राव बोडस卐 लिहितात, " ( भाऊरावांचे ) कोणतेही व्यसन धंद्याच्या व कर्तव्याच्या आड कधीही आले नाही. नाटकाच्या दिवशी तर एकादशीप्रमाणे वागत. मिताहार व जरूरीपुरतेच भाषण करीत. ते नेहमी म्हणत की "ज्या कलेवर हे माझं सर्व चाललं आहे तिची सेवा आठवड्यातून दोन दिवस पवित्रपणानं केली पाहिजे." शेषासनी नावाची त्या काळातील एक देखणी गणिका भाऊरावांच्या रूपगुणांवर लुब्ध झालेली होती. भाऊरावांना घेऊन स्वतंत्र नाटक मंडळी काढावी अशी तिची इच्छा होती. त्यासाठी ती सर्व तयारी करून भाऊरावांनी यावे म्हणून पुण्याला तीन दिवस धरणे धरून बसली होती. परंतु भाऊरावांनी तिला निग्रहपूर्वक उत्तर दिले, ● "तुझा-माझा स्नेह असला तरी मी पागल बनून माझ्या कर्तव्याला आणि लौकिकाला मुकायला तयार नाही. किर्लोस्कर कंपनीशिवाय मी कुठेही दिसणार नाही हे पक्के लक्षात ठेव."

---

卐 माझी भूमिका, पृ. ११४–११५.

● हीच आठवण सांगताना डॉ. ब. त्र्यं. साठे लिहितात, "वीस हजारांच्या दागिन्यांचा डबा पायाशी ठेवून ती रूपगर्विता भाऊरावांना म्हणाली, "मी स्वतंत्र कंपनी काढते. तुम्ही दुष्यंत, मी शकुंतला होऊ-भाऊराव, हो म्हणा !" भाऊराव म्हणाले, "शेषा, ते शक्य नाही. रंग-भूमीवर भाऊ दिसेल तो अण्णांच्याच !" (मौज, दि. २५–१०–५०).

भाऊरावांचे सहकारी मोरोबा वाघुलीकर यांचीही किर्लोस्कर मंडळीविषयी अशीच भावना असल्यामुळे किर्लोस्कर मंडळीतून निवृत्त होताना त्यांनी भागीदारीच्या मोबदल्यात मंडळीच्या मालमत्तेचा यत्किंचितही लोभ धरला नाही. नाटेकरांच्यासारखा एखादा अपवाद सोडला तर किर्लोस्कर मंडळीविषयीची जाज्वल्य निष्ठा हा त्या संस्थेतील नटांचा स्थायीभावच झालेला होता असे दिसून येते. त्यामुळेच किर्लोस्कर मंडळीतून बाहेर पडणारा नट वार्धक्यामुळे किंवा मृत्यूमुळेच बाहेर पडे. अन्य प्रलोभनाला बळी पडून मंडळी सोडणारे नट १९०१ पर्यंतच्या काळात तरी दिसणार नाहीत. भाऊराव व मोरोबा या दोघांनी किर्लोस्कर मंडळीची प्रत्येकी १८ वर्षे सातत्याने सेवा केली. अन्य नट व संस्थेतील इतर सेवकही वर्षानुवर्षे किर्लोस्कर मंडळीत राहूनच आपापली कामे करीत होते. श्री. शंकरराव मुजुमदारांनी रंगभूमी मासिकाच्या एका अंकात● दीर्घकाळ किर्लोस्कर मंडळीची सेवा करणाऱ्या मंडळींची एक यादी प्रसिद्ध केली होती. त्यावरून असे दिसते की, काशीनाथपंत परचुरे (३४ वर्षे), चिंतोबा दिवेकर (२४ वष), बाबू गाडे (२६ वर्षे), व्यं. भडसावळे (३१ वर्षे), शं. ना. कडू (२१ वष), कृ. वि. दिवेकर (१७ वर्षे); असे निष्ठावंत सेवक किर्लोस्कर मंडळीला लाभले होते.

ही मंडळी कोणत्याही क्षुल्लक कारणाने संस्था सोडून जाणार नाहीत अशीच दैनंदिन जीवनाची देखभाल साठ्यांच्या कारभारपद्धतीने आणि अण्णा-भाऊराव यांच्या उदार वागण्याने केली जात असे. राहाण्याची, जेवणा-खाण्याची, औषधोपचारांची इतकी चोख व्यवस्था किर्लोस्कर मंडळीने केलेली होती की तिच्या प्रपंचाला एखाद्या संस्थानिकाच्या राजविलासी जीवनाचे ऐश्वर्य प्राप्त झाल्यासारखे वाटत असे. सुग्रास भोजन, नियमित पगार, आजारीपणात वैद्यकीय मदत, वर्षअखेर गुड कॉंडक्ट ( good conduct ) निधीतून मिळणारी बक्षिसी, या सुखसोयीमुळे एकदा संस्थेत प्रविष्ट झालेला नट सहसा बाहेर जात नसे. एखाद्या भागीदारांवर

● वर्ष ६, अंक ११-१२.

आकस्मिकपणे मृत्यूचा घाला पडला तर त्याच्या पत्नीला पेन्शन म्हणून काही रक्कम नियमितपणे पोचविली जाई हे सौ. सावित्रीबाई किर्लोस्कर आणि पुढे सौ. जोगळेकर ( नानासाहेब जोगळेकरांच्या पत्नी ) यांच्या उदाहरणांवरून दिसून येते. मोरोबांनाही दीर्घकाल पेन्शन मिळत असे. त्याचप्रमाणे दुसरे एक नट श्री. निपाणीकर यांनाही पेन्शनचा लाभ मिळाला होता. कुटुंबियांमध्ये जाऊन राहण्यासाठी नटांना वर्षातून एक किंवा दोन महिने सुटी दिली जाई; आणि त्या मुदतीत निम्मा पगार मिळे. सुटीच्या काळात ज्यांची घरी जाण्याची सोय नसे त्यांच्या राहाण्याची व जेवणाची व्यवस्था संस्थेच्या खर्चाने होई.

संस्थेकडून मिळणाऱ्या या विविध सवलतींमुळे नटमंडळीही किर्लोस्कर मंडळी हे आपले घर अशाच आपुलकीने वागत. लहान-सहान भूमिकाही ते हौसेने करीत. स्वत: अण्णासाहेब शाकुंतलाच्या पहिल्या अंकात सूत्रधार व वैखानस, दुसऱ्या अंकात सेनापती व ऋषिकुमार, चौथ्या व पाचव्या अंकांत शाङ्‌र्गरव, पाचव्या व सहाव्या अंकांत कंचुकी आणि सातव्या अंकात मारीच इतक्या भूमिका करीत. बाळकोबा नाटेकरही पारिपार्श्वक, सारथी, शिष्य, कण्व, कंचुकी आणि मातली इतक्या भूमिका करीत. भाऊराव पुरूषभूमिका करू लागल्यानंतर सौभद्र व शारदा नाटकांत हौसेने पारिपार्श्वकाच्या वेषात उभे राहात. या वृत्तीमुळे नाटकाला नांदीपासूनच रंग भरत असे, आणि त्याचबरोबर लहान-भूमिकांसाठी स्वतंत्र नटांची गरज नसल्याने नटांची खोगीरभरतीही होत नसे.

कलेविषयी निष्ठा आणि संस्थेविषयीची आत्मीयता या बरोबरच समाजाविषयीची कर्तव्यबुद्धी हा किर्लोस्करी परंपरेचा विशेष होता. नाट्यप्रयोगात कोणतीही कुचराई न करणे आणि त्याचे व्यथार्थ प्रकटन करणे या गोष्टीविषयी तर ते दक्ष होतेच. परंतु अन्य सामाजिक घटकांप्रमाणे नाट्यसंस्थेवरही काही सामाजिक जबाबदारी आहे ही जाणीव अण्णासाहेब किर्लोस्करांनी अगदी प्रारंभापासून ठेवलेली होती. मराठी रंगभूमीच्या पुढील

इतिहासात नाटक मंडळयांनी सामाजिक संस्थांच्या मदतीसाठी आपले नाटचप्रयोग देऊन अक्षरशः लाखो रुपये मिळवून दिले. या उपयुक्त परंपरेचे जनक अण्णासाहेब किर्लोस्कर हेच आहेत. किर्लोस्कर मंडळीची नाटके १८८० च्या ऑक्टोबरपासून सुरू झाली; आणि लगेच १८८१ मध्ये अण्णासाहेबांनी, नेटिव्ह जनरल लायब्ररीचा ग्रंथसंग्रह भस्मसात झाला होता म्हणून तिला आपल्या उत्पन्नातून मदत दिली. सार्वजनिककाकांच्या स्मारकासाठीही तशीच मदत केली. १८८२ मध्ये कोल्हापूरचे बर्वे–प्रकरण निर्माण होऊन टिळक–आगरकरांवर खटला सुरू झाला, तेव्हा अण्णासाहेबांनी शाकुंतल नाटकाचा एक प्रयोग करून ४०० रु. दिले. त्या वेळी टिळकप्रभृती मंडळींच्याकडे आर्य-भूषण छापखान्याचे चालकत्व असल्यामुळे त्यास निरंतर साहाय्य होण्याच्या हेतूने अण्णांनी आपल्या शाकुंतल व सौभद्र या दोन्ही नाटकांच्या प्रकाशनाचे हक्क आर्यभूषणला दिले. 'ही पुस्तके सदर मंडळीस मी शेत म्हणून दिली आहेत,' असे ते म्हणत असत. ही धमार्थ खेळांची परंपरा किर्लोस्कर मंडळीने पुढेही नेहमी चालू ठेवली. १९०० च्या सुमारास गुजराथमध्ये मोठा दुष्काळ पडला त्या वेळी किर्लोस्कर मंडळीने वीरतनय नाटकाचा प्रयोग करून जमा झालेले २७०० रु. दुष्काळ फंडाला दिले. या प्रथेचे श्रेय अण्णांना देताना कृ. आ. गुरुजी म्हणतात, "स्मारक अथवा संकटात असलेल्या लोकोपयोगी गृहस्थास मदत करण्याचा परिपाठ अण्णांच्या वेळेपासून पडला असे म्हणण्यापेक्षा अण्णांनीच हा परिपीठ पाडला असे म्हणणे मला प्रशस्त दिसते."

• • •

# किर्लोस्कर मंडळी व लोकाश्रय

किर्लोस्कर मंडळीमध्ये व्यवस्थापकाची सूत्रे हाती घेतल्यापासून प्रत्येक गोष्टीचा हिशेब ठेवण्याची अत्यंत उपयुक्त अशी सवय साठे यांनी लावून घेतलेली होती. त्यामध्ये प्रत्येक नाटकाच्या उत्पन्नाची रक्कमही ते आपल्या दैनंदिनीमध्ये नोंदवून ठेवीत. अर्थात अन्य व्यापात असले म्हणजे प्रयोगाचे उत्पन्न लिहून ठेवण्याचे राहून जाई. तथापि असे काही प्रयोग वगळता पुष्कळच प्रयोगांच्या उत्पन्नाची माहिती साठ्यांच्या लेखनातून मिळते. प्रत्येक नाटकाचे एकूण प्रयोग, त्यांना मिळणाऱ्या लोकाश्रयाचा चढउतार, गावोगावच्या उत्पन्नातून दिसून येणारे बदल, अशा अनेक गोष्टींची या नोंदीवरून कल्पना येते. त्या काळातील नाट्यप्रयोगांच्या पाहणीसाठी साठ्यांच्या जवळील ही माहिती अतिशय उपयोगी पडणारी आहे. या माहितीची रोजच्या रोज नोंद झालेली असल्याने तिची विश्वसनीयता वादातीत आहे.

या दैनंदिन उत्पन्नांचे सर्व उल्लेख एकत्र दर्शविणारा तक्ता पुढे जोडला आहे; त्यावरून अनेक प्रकारचे मनोरंजक निष्कर्ष अभ्यासकाला काढता

येतात. या सर्व नोंदी १८८४ ते १८९० या सहा वर्षांतील आहेत. या काळात शाकुंतल, सौभद्र व रामराज्यवियोग हीच अण्णासाहेबांची तीन नाटके किर्लोस्कर मंडळी करीत असे. १८८९ मध्ये रंगभूमीवर आलेले देवलांचे विक्रमोर्वशीय नाटक हा एकच अपवाद म्हणावा लागेल. या सहा वर्षांत किर्लोस्कर मंडळीने एकूण ३७० नाटचप्रयोग रसिकांना करून दाखविले. म्हणजे प्रत्येक वर्षाला साधारण ६०–६२ प्रयोग होतात. त्या वेळी दर आठवडचाला बुधवारी व शनिवारी असे दोनच नियमित प्रयोग होत. वार्षिक सुटी, मुख्य नटांच्या आजारीपणासारखी नैमित्तिक कारणे यामुळे प्रयोगांची संख्या कमी होई. या ३७० प्रयोगांत किर्लोस्कर मंडळीने शाकुंतलाचे १३३, सौभद्राचे १४५, रामराज्यवियोगाचे ८१ आणि विक्रमोर्वशीयाचे ११ प्रयोग केले. सौभद्राची लोकप्रियता ‡ त्या काळातही शाकुंतलापेक्षा अधिक असल्याचे यावरून दिसून येते. सौभद्राचे काही प्रयोग तर केवळ स्त्रियांसाठीच करावे लागत. शाकुंतल नाटकाबाबत एक गमतीची गोष्ट म्हणजे ते नाटक एकूण आठ प्रकारांनी रंगभूमीवर करून दाखविले जाई. ते प्रकार पुढीलप्रमाणे–(१) अंक १ ते ७, (२) अंक १ ते ४, (३) अंक ४ ते ७, (४) अंक १, ३, ४, ५, ७, (५) अंक १, ३ ते ७, (६) अंक १ ते ५, (७) अंक ४, ५, ७, आणि (८) अंक ३ ते ७. या आठ प्रकारांपैकी पहिले चार प्रकार नेहमी चालू असत, दुसऱ्या चार प्रकारचे प्रयोग क्वचित प्रसंगीच झालेले आहेत. एकाच दिवशी साग्र

---

‡ स्वतः अण्णासाहेब मात्र शाकुंतलापेक्षा सौभद्राची योग्यता कमीच ठरवित. सौभद्राचे प्रयोग सुरू झाल्यानंतर त्याला मिळणारा विपुल लोकाश्रय पाहून 'हे नाटक लवकरच १ लक्षावर आश्रय देणार!' असे ते मोरोबांना म्हणत; आणि ते त्यांचे शब्दही लवकरच खरे झाले. परंतु त्या यशामुळे चढून न जाता अण्णासाहेब विनयाने म्हणत, "जोपर्यंत संगीत शाकुंतलापेक्षा संगीत सोभद्रास अधिक लोकाश्रय मिळत राहील तोपर्यंत कविकुलगुरुचे शाकुंतलातील नाटचचातुर्य लोकास अजून समजायचेच आहे असे मी म्हणतो."

शाकुंतल करणे म्हणजे नटांच्या परिश्रमांची व प्रेक्षकांच्या सहनशीलतेचीही कसोटी असल्यामुळे शाकुंतल नाटक दोन भागांत करून दाखविण्याचा प्रघात सुरू झाला. पहिल्या दिवशी १ ते ४ अंक व दुसऱ्या दिवशी ४ ते ७ अंक अशी पद्धत सुरू झाली. तथापि प्रत्येक गावी लोकाग्रहास्तव साग्र संगीत शाकुंतलाचाही एखाद-दुसरा प्रयोग करून दाखविला जात असे. शाकुंतल नाटकात दुष्यंताच्या भूमिकेलाच ( चौथ्या अंकाचा अपवाद सोडून ) सर्व नाटकभर स्थान असल्यामुळे त्याच भूमिकेला वाव असलेले २ व ६ हे अंक वगळून १, ३, ४, ५ व ७ असा प्रयोग अनेक वेळा केला जाई ! ● हे निरनिराळे सर्व प्रकार मिळून शाकुंतल नाटकाचे एकूण १३३ प्रयोग झाले. त्यात साग्र संगीत शाकुंतलाचे (१ ते ७ अंकाचे) ४१ प्रयोग झाले. १८८९ मध्ये रंगभूमीवर आलेल्या विक्रमोर्वशीय नाटकाचे पुढील एक वर्षाच्या काळात फक्त ११ प्रयोग झाले.

ज्या प्रयोगांचे उत्पन्न साठ्यांनी आपल्या रोजनिशांतून नोंदून ठेवलेले आहे त्यावरून पुढील गोष्टी ध्यानात येतात. शाकुंतल नाटकाच्या ६२ प्रयोगांना रु. २१४१४–१–९ एवढे उत्पन्न मिळाले, म्हणजे प्रत्येक प्रयोगाचे

---

● नाटकात दुष्यंताचेच काम सारखे असल्यामुळे आणि त्याचे आत्मगत विचार व मित्राबरोबरचा संवाद यांत पुष्कळ वेळ जात असल्यामुळे शाकुंतलाचा प्रयोग कंटाळवाणा होई अशी टीका 'मराठी रंगभूमी' या पुस्तकातही कै. कुलकर्णी यांनी केलेली आहे. (पृ. ९९). शाकुंतल नाटकाची ही दीर्घता तर कमी व्हावी परंतु त्यातील महत्त्वाची सर्व स्थळ नाटकात यावीत साठी इचलकरंजीचे रसिक अधिपती कै. बाबासाहेब घोरपडे यांनी ४ तासांत प्रयोग संपेल अशी शाकुंतल नाटकाची रंगावृत्ती करून देणारास १०० रु. चे पारितोषिक देऊ केले होते. त्या आवृत्तीमध्ये अण्णासाहेबांच्या पदांचा समावेश करण्यास संमती देण्यात आली होती.

(रंगभूमी, वर्ष ५ अंक ३, दि. २८–७–१९१२)

सरासरी उत्पन्न सुमारे ३४५ रु. मिळाले. सौभद्र नाटकाच्या ७१ प्रयोगांचे उत्पन्न रु. २७६२३–६–६ इतके झाले, म्हणजे प्रत्येक प्रयोगाचे सरासरी उत्पन्न ३९० रु. मिळाले. रामराज्यवियोगाच्या ४१ प्रयोगांचे उत्पन्न रु. १०३८३–१–० इतके झाले. म्हणजे प्रत्येक प्रयोगास सरासरी उत्पन्न २५५ रु. झाले. विक्रमोर्वशीय नाटकाच्या ज्या सहा प्रयोगांचे उत्पन्न नमूद झालेले आहे त्यावरून प्रत्येक प्रयोगाचे सरासरी उत्पन्न २८० रु. मिळाले. पुणे व मुंबई येथील रसिकांचा किर्लोस्कर मंडळीच्या नाटकांवर विशेष लोभ असल्याने तेथील प्रयोगांना नेहमीच चांगले उत्पन्न होई. त्याचप्रमाणे इंदूर, कोल्हापूरसारखी संस्थाने व बेळगावसारखी शहरे या ठिकाणीही किर्लोस्कर मंडळीला चांगला लोकाश्रय मिळाल्याचे दिसते. याउलट नगर, बार्शी, अकोला, ग्वाल्हेर असे काही मुक्काम अर्थप्राप्तीच्या दृष्टीने फारच निराशाजनक झालेले दिसतात. सौभद्र नाटकाचे उत्पन्न शहराच्या कुवतीप्रमाणे ४०० पासून ८०० पर्यंत कमीजास्त झालेले आहे तर रामराज्यवियोगाचे ४०० च्या पुढे बहुधा केव्हाच गेलेले नाही. शाकुंतलाच्या ७ अंकी प्रयोगाचे उत्पन्न ७–८ शेपर्यंतही होत असे, परंतु त्याच नाटकाचा चार अंकी प्रयोग असेल तर उत्पन्नाचा आकडा तीन–चारशेपर्यंतही घसरे.

पुणे व मुंबई येथील रसिकांच्या उदार आश्रयामुळे सर्वांत अधिक प्रयोग याच गावांत झालेले आहेत. त्यातहि पुण्याने आघाडी मारलेली आहे. या सहा वर्षांत किर्लोस्कर मंडळीचे पुण्याला ७१ तर मुंबईला ५७ प्रयोग झाले. त्या खालोखाल कोल्हापूर (३१), इंदूर (२४), सोलापूर व मिरज (प्रत्येकी २०), बेळगाव (१९) अशी प्रयोगसंख्या आढळून येते. नागपूर, अकोला, बार्शी, पंढरपूर, सातारा, नाशिक इ. मुक्कामांचा क्रम त्यानंतर येतो. मिरज हे छोटेसे संस्थान असले तरी तेथील अधिपती बाळासाहेब पटवर्धन यांचे व किर्लोस्कर मंडळीचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे असल्यामुळे तेथे २० प्रयोग झालेले दिसतात. तेथे राजाश्रयाचा विशेष लाभ होई.

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# १८८४ ते १८९० या काळातील किर्लोस्कर मंडळीच्या नाट्यप्रयोगांना मिळालेला लोकाश्रय

## १८८४

| नाटक | स्थळ | दिनांक | उत्पन्न |
|---|---|---|---|
| शाकुंतल | पनवेल | २१ मे | ( खासगी प्रयोग ) |
| शाकुंतल ( अंक ५ ते ७ ) | ,, | २८ मे | |
| सौभद्र ( अक २ ते ५ ) | ,, | ३१ मे | |
| सौभद्र ( अंक १ ते ३ ) | ,, | २ जून | ( सरकारी शाळेतील मुलांकरिता ) |
| सौभद्र | कल्याण | ७ जून | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | ११ जून | १९८– ८– ६ |
| शाकुंतल ● ( अंक ५ ते ७) | ,, | १४ जून | ७४– ०– ३ |
| रामराज्यवियोग | ,, | ४ सप्टें. | (रंगीत तालीम) |
| रामराज्यवियोग | ,, | २८ सप्टें. | ( ,, ) |
| सौभद्र | मुंबई | १४ ऑक्टो | |
| सौभद्र | ,, | १६ ऑक्टो. | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | पुणे | १८ ऑक्टो. | |
| रामराज्यवियोग | पुणे | २० ऑक्टो. | (पहिला जाहीर प्रयोग) |
| सौभद्र ( अंक १ ते ५ ) | पुणे | २२ ऑक्टो. | २२६–१३ –६ |
| शाकुंतल (अंक १–४) | मुंबई | २५ ऑक्टो. | |

● पावसामुळे कमी उत्पन्न.

| | | |
|---|---|---|
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | मुंबई | २९ ऑक्टो. |
| सौभद्र | ,, | १ नोव्हें. |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | ५ नोव्हें. |
| रामराज्यवियोग | ,, | ८ नोव्हें. |
| सौभद्र | ,, | १२ नोव्हें. |
| ● शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २१ नोव्हें. |
| रामराज्यवियोग | ,, | २२ नोव्हें. |
| सौभद्र | नाशिक | १० डिसें. |
| शाकुंतल ( अंक १ ते ५) | ,, | १३ डिसें. |
| शाकुंतल (अंक ४ ते ७ ) | ,, | १७ डिसें. |
| सौभद्र | ,, | २० डिसें. |
| रामराज्यवियोग | ,, | २४ डिसे. |
| शाकुंतल (अंक १,३,४,५७) | ,, | २५ डिसें |
| रामराज्यवियोग | ,, | २७ डिसें. |
| सौभद्र | ,, | २९ डिसें. |
| रामराज्यवियोग | ,, | ३१ डिसें. |

१८८५

| | | |
|---|---|---|
| शाकुंतल ( अंक१ ते ७) | नाशिक | २ जाने. |
| * शाकुंतल (अंक ४ व ५) | इंदूर | १२ जाने. |
| सौभद्र | ,, | १७ जाने. |
| रामराज्यवियोग | ,, | २१ जाने. |

---

● या खेळाचे उत्पन्न ( ४०० रु. ) कै. केरूनाना छत्रे-स्मारकासाठी देण्यात आले.

* व्हिक्टोरीया राणीचे प्रतिनिधी लॉर्ड रँडाल्फ चर्चिल यांच्या करमणुकीसाठी.

| | | | |
|---|---|---|---|
| शाकुंतल (अंक १ ते ४) | इंदूर | २४ जाने. | |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | २८ जाने. | १८३– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ३१ जाने. | २१२– ८– ० |
| सौभद्र | ,, | ४ फेब्रु. | २४०–१२– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ७ फेब्रु. | ५०१– ०– ० |
| ✦ रामराज्यवियोग | ,, | ११ फेब्रु. | १४०–१२– ० |
| सौभद्र | ,, | १४ फेब्रु. | १५९– ०– ० |
| सौभद्र | धार | २५ फेब्रु. | (२५०रु. चा मक्ता) |
| सौभद्र | ,, | ५ मार्च | (पवारराजे यांच्यासाठी) |
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | ,, | ७ मार्च | (२०० रु. चा मक्ता) |
| रामराज्यवियोग | ,, | १० मार्च | |
| रामराज्यवियोग | ,, | ११ मार्च | २००– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १२ मार्च | |
| शाकुंतल (अंक ५ ते ७) | ,, | १३ मार्च | |
| सौभद्र | उमरावती | २८ मार्च | २१४– ८– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४ ) | ,, | १ एप्रिल | १८१– ४– ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | ४ एप्रिल | ४६१– ७– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ८ एप्रिल | |
| सौभद्र | ,, | ११ एप्रिल | ६४०– ७– ० |
| शाकुंतल (अंक १,३, ४,५,७) | ,, | १५ एप्रिल | |
| रामराज्यवियोग | ,, | १८ एप्रिल | |
| शाकुंतल ( अंक ४ ते ७) | नागपूर | २ मे | ३८०– ४– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ६ मे | |
| शाकुंतल | ,, | १६ मे | |
| सौभद्र | अकोला | ६ जून | ४०९– ०– ० |

✦ केवळ विद्यार्थ्यांसाठी प्रयोग.

| | | | |
|---|---|---|---|
| शाकुंतल (अंक १ ते ४) | अकोला | १० जून | ६५- ०- ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | १३ जून | |
| रामराज्यवियोग | ,, | १७ जून | |
| सौभद्र | ,, | २० जून | १९१- २- ० |
| ● रामराज्यवियोग | ,, | २४ जून | ६७ -१०- ० |
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | ,, | २७ जून | |
| ✦ सौभद्र ( अंक २, ४, ५) | ,, | २९ जून | |
| सौभद्र | पुणे | ११ जुलै | ७२१-१२- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १८ जुलै | |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | २५ जुलै | |
| सौभद्र | ,, | २९ जुलै | ७३८- ६- ० |
| रामराज्यवियोग | ,, | १ ऑगस्ट | ६४९- ०- ० |
| सौभद्र | ,, | ५ ऑगस्ट | ६९२- ०- ० |
| शाकुंतल (साग्र) | ,, | ८ ऑगस्ट | |
| सौभद्र | मुंबई | १३ ऑगस्ट | |
| † शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १५ ऑगस्ट | |
| ‡ सौभद्र | ,, | १९ ऑगस्ट | |
| सौभद्र | ,, | २२ ऑगस्ट | ८००- ७- ६ |
| रामराज्यवियोग | ,, | २४ ऑगस्ट | ३३५-१२- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | २६ ऑगस्ट | १२९- ४- ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | २९ ऑगस्ट | |

● केवळ विद्यार्थ्यांसाठी प्रयोग.

✦ युरोपियन लोकांसाठी खास प्रयोग

† 'पावसामुळे खेळ रद्द करून गेईटीमध्ये पारसी लोकांचा खेळ पाहण्यास गेलो.'

‡ मोरोबांचा आवाज बसला म्हणून पैसे परत केले.

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | मुंबई | २ सप्टेंबर | |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | „ | ५ सप्टें. | |
| ✦ सौभद्र | „ | ९ सप्टें. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | „ | ११ सप्टें. | १०४४– ०– ० |
| | | | ( गेईटी थिएटरात ) |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | पुणे | २८ सप्टें. | |
| सौभद्र | „ | ३० सप्टें. | ७६५–१२– ० |
| सौभद्र | „ | ३ ऑक्टो. | |
| रामराज्यवियोग | „ | ७ ऑक्टो. | ३४१– ०– ० |
| ● शाकुंतल (अंक १ ते ४) | „ | ५ डिसें. | २९१– ८– ० |
| शाकुंतल ( अंक ४ ते ७) | „ | ९ डिसें. | |
| सौभद्र | „ | १२ डिसें. | ५१६– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | „ | १९ डिसें. | |
| सौभद्र | „ | २६ डिसें. | ७०७– ४– ० |

## १८८६

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | सोलापूर | १७ जाने. | ५४८–१३– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | „ | २० जाने. | |
| शाकुंतल (अंक ४ ते ७ ) | „ | २३ जाने. | ३२७–१५– ६ |
| सौभद्र | „ | २७ जाने. | ३७४–११– ० |
| शाकुंतल (अंक १,३,४,५,७) | „ | ३० जाने. | |
| सौभद्र | „ | ३ फेब्रु. | ३५२– ०– ० |
| रामराज्यवियोग | „ | ६ फेब्रु. | |

---

✦ केवळ स्त्रियांसाठी प्रयोग.

● अण्णासाहेब किर्लोस्करांच्या निधनानंतरचा पहिला खेळ.

| | | | |
|---|---|---|---|
| ● शाकुंतल (अंक १ ते ७) | सोलापूर | २० फेब्रु. | ४५५– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | बार्शी | २७ फेब्रु. | ५२८–१०– ० |
| शाकुंतल ( अंक ४ ते ७) | ,, | ३ मार्च | १७६–८ – ० |
| रामराज्यवियोग | ,, | ६ मार्च | |
| सौभद्र | ,, | २७ मार्च | ५८२– ४– ० |
| शाकुंतल (अंक १,३ ते ७) | ,, | ३१ मार्च | ३११– ४– ० |
| सौभद्र | ,, | ३ एप्रिल | ४२०– ०– ० |
| सौभद्र | नगर | १० एप्रिल | २९३– ७– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १४ एप्रिल | १११–१२– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १७ एप्रिल | १०१– ८– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २४ एप्रिल | २४५– ८– ० |
| सौभद्र | ,, | १ मे | २३८– ८– ० |
| सौभद्र | बळगांव | १५ मे | ५०४– ८– ० |
| ✦ शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १९ मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | २२ मे | ३५१– ०– ० |
| * शाकुंतल (अंक ४ ते ७) | बेळगांव | २६ मे | १६०– ३– ६ |
| रामराज्यवियोग | ,, | २९ मे | ३३०– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ३१ मे | |
| सौभद्र | ,, | २ जून | ४६५– ८– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | ५ जून | ३६१– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ९ जून | १४८– ४– ० |

● 'नाटेकराशिवाय, प्रयोग चांगला जाहला.'

✦ 'पावसामुळे खेळ रहित जाहला. '

* ' खेळ बरा जाहला. '

| | | | |
|---|---|---|---|
| ● सौभद्र | बेळगाव | १२ जून | ५६३– ८– ० |
| ✦ शाकुंतल (अंक१ते७) | ,, | १९ जून | ५६३– ८– ० |
| सौभद्र | कोल्हापूर | १० जुलै | ६९४– ८– ० |
| शाकुंतल ( अंक१ ते ४ ) | ,, | १४ जुलै | १३०– ४- ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | १७ जुलै | |
| रामराज्यवियोग | ,, | २१ जुलै | ३४४– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ३१ जुलै | ७८६– ८– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ७ ऑगस्ट | |
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | ,, | ११ ऑगस्ट | ( सरकारी टाउन हॉलमध्ये ) |
| सौभद्र | ,, | १४ ऑगस्ट | |
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | ,, | २१ ऑगस्ट | ७१४– ०– ० |
| † रामराज्यवियोग | ,, | ८ सप्टें. | |
| शाकुंतल ( अंक १ ते ५) | ,, | ११ सप्टें. | |
| शाकुंतल (अंक १,३,४,५,७) | ,, | १८ सप्टें. | |
| x शाकुंतल ( अंक ४ ते ७) | ,, | २५ सप्टें. | |
| रामराज्यवियोग | ,, | २ ऑक्टो. | |
| सौभद्र | ,, | ९ ऑक्टो. | |
| रामराज्यवियोग | ,, | ११ ऑक्टो. | (सरकार वाड्यात) |
| सौभद्र (अंक १ ते ३) | सातारा | २० ऑक्टो. | |
| सौभद्र ( अंक ३ ते ५) | ,, | २४ ऑक्टो. | |
| रामराज्यवियोग | ,, | ३० ऑक्टो. | |
| सौभद्र | ,, | ६ नोव्हें. | |

● 'खेळ चांगला जाहला.'

✦ 'रात्री वन्समोअर फार जाले'

† नाटेकर वसिष्ठ होणार.'

x ' भाऊराव कण्व जाले होते.'

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | पुणे | २० नोव्हें. | ८४३– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | २४ नोव्हें. | |
| शाकुंतल ( अंक ४ ते ७) | ,, | २७ नोव्हें. | |
| सौभद्र | ,, | १ डिसें. | |
| रामराज्यवियोग | ,, | ४ डिसें. | |
| शाकुंतल (अंक१ ते ७) | ,, | ११ डिसें. | ७६१–१२– ० |
| सौभद्र | ,, | १८ डिसें. | |
| रामराज्यवियोग | ,, | २५ डिसें. | |
| सौभद्र | , | २९ डिसें. | |

## १८८७

| | | | |
|---|---|---|---|
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | मुंबई | १ जाने. | |
| सौभद्र | ,, | ८ जाने | |
| शाकुंतल (अंक१,३,४,५,७) | ,, | १२ जाने. | |
| रामराज्यवियोग | ,, | १५ जाने. | ६१०–१२– ० |
| सौभद्र | ,, | १९ जाने. | ८३८–१२– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २२ जाने. | ८८६– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २९ जाने. | ४७९– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २ फेब्रु. | |
| सौभद्र | मुंबई | ५ फेब्रु. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ८ फेब्रु. | |
| ● सौभद्र | ,, | ११ फेब्रु. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १५ फेब्रु. | |
| सौभद्र | ,, | १८ फेब्रु. | |
| सौभद्र | सोलापूर | २६ फेब्रु. | |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | २ मार्च | |

● केवळ स्त्रियासाठी

| | | | |
|---|---|---|---|
| शाकुंतल | सोलापूर | ८ मार्च | |
| रामराज्यवियोग | ,, | १२ मार्च | ३२९– ४– ० |
| शाकुंतल ( अंक १ ते ७) | ,, | १६ मार्च | ३२५– ०– ० |
| ✦ रामराज्यवियोग | ,, | १९ मार्च | १६६– ४– ० |
| सौभद्र | ,, | २६ मार्च | |
| सौभद्र | पुणे | २ एप्रिल | ४०१– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ९ एप्रिल | ३५१– ०– ० |
| शाकुंतल (अंक १, ३, ४, ५, ७) | ,, | १६ एप्रिल | ३४१– ०– ० |
| रामराज्यवियोग | पुणे | ३० एप्रिल | १५१– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ७ मे | |
| सौभद्र | ,, | ११ मे | ४१९–१४– ० |
| रामराज्यवियोग | ,, | १४ मे | ३२६– ८– ० |
| सौभद्र | ,, | १८ मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २१ मे | |
| सौभद्र | ,, | २५ मे | |
| रामराज्यवियोग | ,, | २८ मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ४ जून | |
| रामराज्यवियोग | ,, | ११ जून | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १५ जून | |
| सौभद्र | ,, | १८ जून | ३७२– ०– ० |
| ● सौभद्र | ,, | २ जुलै | |
| रामराज्यवियोग | मुंबई | २१ ऑक्टो. | ३४९– ४– ० (नॉव्हेल्टी) |
| *शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | २५ ऑक्टो. | २२९– ०– ० |

✦ 'केवळ विद्यार्थ्यांसाठी.'

● 'फार गर्दी जाहली.'

* 'नाटकराशिवाय.'

| | | | |
|---|---|---|---|
| शाकुंतल (अंक ३ ते ७) | मुंबई | २८ ऑक्टो. | ९७- ८- ० |
| सौभद्र | ,, | १ नोव्हें. | ४७९- ८- ० |
| सौभद्र | ,, | ५ नोव्हें | २४४- ०- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ९ नोव्हें. | ३२२- ४- ० |
| रामराज्यवियोग | ,, | १२ नोव्हें. | |
| सौभद | ,, | १६ नोव्हें. | ५३७-१२- ० |
| शाकुंतल (अंक १, ३, ४, ५, ७) | ,, | १९ नोव्हें. | ३७६- ४- ० |
| सौभद्र | ,, | २३ नोव्हें. | |
| रामराज्यवियोग | ,, | २६ नोव्हें. | |
| सौभद्र | ,, | ३० नोव्हें. | |
| सौभद्र | ,, | ३ डिसें. | |
| सौभद्र | ,, | १० डिसें. | |
| सौभद्र | ,, | १३ डिसें. | |

१८८८

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | ग्वाल्हेर | १० जाने. | १३८- ८- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १४ जाने. | १६२- ०- ० |
| शाकुंतल | ,, | १८ जाने. | ८५९- ०- ० |
| रामराज्यवियोग | ,, | २१ जाने. | १४०-१२- ० |
| 卐 सौभद्र | ,, | २५ जाने. | |
| सौभद्र | ,, | २७ जाने. | ९२- ४- ० |
| ✦ शाकुंतल | ,, | १ फ़ेब्रु. | ४४- ८- ० |
| शाकुंतल (अंक ४, ५, ७) | ,, | ४ फेब्रु. | |
| ● सौभद्र | ,, | ८ फेब्रु. | (सरकारी प्रयोग) |

卐 'पावसामुळे बंद ठेवले.'

✦ इतके कमी उत्पन्न कंपनीस कधीच झाले नव्हते.'

● या खेळाबद्दल ५०० रु. बिदागी आणि शालजोडी, पागोटे या वस्तू मिळाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | ग्वाल्हेर | ११ फेब्रु. | १४४– ८– ० |
| सौभद्र | काशी | २२ फेब्रु. | १६१– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | २५ फेब्रु. | २११–१२– ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | २८ फेब्रु. | ११८– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | ३ मार्च | ८५–१४– ० |
| सौभद्र | ,, | ५ मार्च | ७२–१४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १० मार्च | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १२ मार्च | |
| रामराज्यवियोग | ,, | १७ मार्च | |
| शाकुंतल (अंक१,३,४,५,७,) | ,, | २२ मार्च | |
| सौभद्र | ,, | २४ मार्च | |
| सौभद्र | इंदूर | ३१ मार्च | ३१९– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | ४ एप्रिल | |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | ७ एप्रिल | |
| रामराज्यवियोग | , | ११ एप्रिल | ३५५– ०– ० |
| सौभद्र | ,, | १४ एप्रिल | ३०३–१५– ० |
| शाकुंतल (अंक १,३,४,५,७) | ,, | १८ एप्रिल | |
| रामराज्यवियोग | ,, | २१ एप्रिल | २६६– ०– ० |
| सौभद्र | ,, | २५ एप्रिल | २९०– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २८ एप्रिल | |
| रामराज्यवियोग | ,, | २ मे | २०३–११– ० |
| सौभद्र | ,, | ५ मे | ३३७– ०– ० |
| सौभद्र | ,, | ७ मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १० मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १२ मे | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | पुणे | २६ मे | ३३१– ६– ० |

| | | | |
|---|---|---|---|
| ● शाकुंतल (अंक ४ ते ७) | पुणे | ३० मे | |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | २ जून | |
| सौभद्र | | ६ जून | |
| रामराज्यवियोग | ,, | ९ जून | २२१-१०- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १३ जून | २००- ०- ० |
| सौभद्र | ,, | १६ जून | ३३३-१२- ६ |
| रामराज्यवियोग | ,, | २० जून | १६७-१२- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २३ जून | ४५०- ०- ० |
| सौभद्र | ,, | २७ जून | २८६- ०- ० |
| रामराज्यवियोग | ,, | ३० जून | २१९- ०- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ४ जुलै | |
| सौभद्र | ,, | ७ जुलै | |
| रामराज्यवियोग | ,, | ११ जुलै | |
| सौभद्र | ,, | १४ जुलै | ३६९- ४- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १८ जुलै | |
| सौभद्र | ,, | २१ जुलै | |
| सौभद्र | कोल्हापूर | २८ जुलै | |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १ ऑगस्ट | १३६- ०- ० |
| रामराज्यवियोग | ,, | ११ ऑगस्ट | |
| सौभद्र | ,, | २२ ऑगस्ट | |
| रामराज्यवियोग | ,, | २५ ऑगस्ट | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | | |
| सौभद्र | ,, | १ सप्टें. | |
| रामराज्यवियोग | ,, | ५ सप्टें. | २०१-१२- ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | ८ सप्टें. | १८६- ८- ० |
| सौभद्र | ,, | १२ सप्टें. | १४५-१२- ० |

● 'मोरोबांची गाडी लेट आल्याने प्रयोग बंद ठेवला.'

| | | | |
|---|---|---|---|
| रामराज्यवियोग | कोल्हापूर | १५ सप्टें. | २३५– ०– ० |
| सौभद्र | ,, | २६ सप्टें. | |
| सौभद्र | ,, | २७ सप्टें. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २९ सप्टें. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १ ऑक्टो. | ( राजाराम कॉलेजात प्रयोग ) |

## १८८९

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | पुणे | १९ जाने. | २६६– २– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | २३ जाने. | १००–१२– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २६ जाने. | २१४–१४– ० |
| सौभद्र | ,, | ३० जाने. | २३४–१०– ० |
| सौभद्र | ,, | २ फेब्रु. | |
| सौभद्र | बार्शी | ९ फेब्रु. | ४०३– ४– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १३ फेब्रु. | २०१–१२– ० |
| रामराज्यवियोग | ,, | १६ फेब्रु. | ३०८– १– ० |
| सौभद्र | ,, | २० फेब्रु. | ३०२– ६– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २३ फेब्रु. | ३९५– ८– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २७ फेब्रु. | १९४– ४– ० |
| सौभद्र | ,, | २ मार्च | ४०१– ४– ० |
| सौभद्र | पंढरपूर | ९ मार्च | ४३६– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १३ मार्च | २२०– ८– ० |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | १५ मार्च | ८८– ०– ० |
| सौभद्र | ,, | २० मार्च | २४२– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २३ मार्च | १०३– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | पंढरपूर | २७ मार्च | ३४०–१२– ० |



८...

| | | | |
|---|---|---|---|
| ● विक्रमोर्वशीय | पंढरपूर | ३० मार्च | १५७– ०– ० (पहिला प्रयोग) |
| सौभद्र | सोलापूर | ६ एप्रिल | ३७१–१२– ० |
| विक्रमोर्वशीय | ,, | ८ एप्रिल | ११२– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | १० एप्रिल | २०८–१२– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | १३ एप्रिल | ४६३–१२– ० |
| सौभद्र | हुबळी | २० एप्रिल | ५६४– ४– ० |
| ‡ रामराज्यवियोग | ,, | २४ एप्रिल | |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | २७ एप्रिल | ६८४– ८– ० |
| सौभद्र | ,, | १ मे | २५१– ०– ० |
| विक्रमोर्वशीय | ,, | ४ मे | |
| रामराज्यवियोग | ,, | ८ मे | १४६– ८– ० |
| शाकुंतल (अंक ३ ते ७) | ,, | ११ मे | ३८९– ८– ० |
| सौभद्र | ,, | १५ मे | १८१– ८– ० |
| सौभद्र | धारवाड | २२ मे | २२५– ४– ० |
| रामराज्यवियोग | हुबळी | २५ मे | ११०– ०– ० |
| शाकुंतल (अंक १, ३, ५) | ,, | १ जून | |
| सौभद्र | बेळगाव | ८ जून | |
| विक्रमोर्वशीय (अंक १ ते ५) | ,, | २२ जून | |
| सौभद्र | ,, | २६ जून | ४५२– ८– ० |
| रामराज्यवियोग | ,, | २९ जून | ३२५– ०– ० |
| सौभद्र | पुणे | १० जुलै | |
| रामराज्यवियोग | बेळगाव | १७ जुलै | २६२– ०– ० |
| सौभद्र | ,, | २० जुलै | ४६३– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २४ जुलै | ५०६– ०– ० |

● ‘प्रयोग बरा झाला परंतु रंगावा तसा रंगला नाही.’

‡ ‘१२ वाजता पाऊस आल्यामुळे तिसरा अंक बंद करून नाटक रद्द केले.

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | मिरज | ३ ऑगस्ट | |
| विक्रमोर्वशीय (अंक १ ते ५) | पुणे | १० ऑगस्ट | |
| सौभद्र | मिरज | १४ ऑगस्ट | |
| रामराज्यवियोग | ,, | १७ ऑगस्ट | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २१ ऑगस्ट | ३९९–१२– ० |
| विक्रमोर्वशीय (अंक १ ते ५) | ,, | २४ ऑगस्ट | २९९– १– ० |
| रामराज्यवियोग | मिरज | २८ ऑगस्ट | २३६– ०– ० |
| सौभद्र | ,, | ३१ ऑगस्ट | ४५१–१२– ० |
| शाकुंतल (अंक १, ३, ४, ५, ७) | पुणे | ४ सप्टें. | |
| सौभद्र | ,, | ९ सप्टें. | |
| रामराज्यवियोग | मिरज | ११ सप्टें. | ( राजे मिरज यांच्यासाठी ) |
| सौभद्र | ,, | १४ सप्टें. | |
| विक्रमोर्वशीय | ,, | १७ सप्टें. | |
| सौभद्र | ,, | १९ सप्टे. | |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | २१ सप्टें. | ३१३– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | २८ सप्टें. | ( राजे मिरज यांच्यासाठी ) |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १ ऑक्टो. | |
| सौभद्र | ,, | ३ ऑक्टो. | |
| सौभद्र | ,, | ५ ऑक्टो. | २२१– ५– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | ७ ऑक्टो. | ( राजे मिरज यांच्यासाठी ) |
| शाकुंतल (अंक ४ ते ७) | ,, | ९ ऑक्टोबर | ,, |
| सौभद्र | सातारा | २६ ऑक्टो. | २८७–१२– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | ३० ऑक्टो. | २७८– ०– ० |
| रामराज्यवियोग | सातारा | २ नोव्हें. | |

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | मिरज | ६ नोव्हें. | |
| सौभद्र | सातारा | १६ नोव्हें. | ३६०- ०- ० |
| रामराज्यवियोग | ,, | २० नोव्हे. | १७६-१२- ० |
| सौभद्र | ,, | २३ नोव्हें. | |
| सौभद्र | मुंबई | ३० नोव्हें. | |
| सौभद्र | ,, | ७ डिसें. | ४४१- ४- ० |
| विक्रमोर्वशीय | ,, | २१ डिसें. | |
| सौभद्र | ,, | २५ डिसें. | |

## १८९०

| | | | |
|---|---|---|---|
| रामराज्यवियोग | मुंबई | १ जाने. | |
| सौभद्र | ,, | ४ जाने. | |
| सौभद्र | जळगाव | ११ जाने. | ४३७- ८- ० |
| शाकुंतल | ,, | १५ जाने. | ४४५- ०- ० |
| रामराज्यवियोग | ,, | १८ जाने. | ४०८- ०- ० |
| सौभद्र | ,, | २२ जाने. | १९७- ०- ० |
| सौभद्र | ,, | ८ फेब्रु. | ३४२- ०- ० |
| सौभद्र | नागपूर | १५ फेब्रु. | २४७- ८- ० |
| ✦ शाकुंतल (अंक १ ते ४) | ,, | १९ फेब्रु. | |
| रामराज्यवियोग | ,, | २२ फेब्रु. | २२२- ०- ० |
| विक्रमोर्वशीय | ,, | २६ फेब्रु. | १७६-१२- ० |
| शाकुंतल (अंक १, ३, ४, ५) | ,, | १ मार्च | ६८३-११- ६ |

✦ 'रात्री ९ वाजेपर्यंत एकही तिकीट विकले नसल्यामुळे नाटक बंद राहिले'.

| | | | |
|---|---|---|---|
| सौभद्र | नागपूर | ५ मार्च | ३१३– ४– ० |
| विक्रमोर्वशीय | ,, | ८ मार्च | ४०६– ०– ० |
| रामराज्यवियोग | ,, | १२ मार्च | १८४– ०– ० |
| शाकुंतल (अंक १ ते ७) | ,, | १५ मार्च | |
| ● रामराज्यवियोग | ,, | १९ मार्च | ३५१–१३– ० |
| सौभद्र | ,, | २२ मार्च | २९७–१२– ० |
| सौभद्र | उमरावती | २९ मार्च | |
| रामराज्यवियोग | ,, | २ एप्रिल | |
| शाकुंतल (अंक १ ते ५) | ,, | ५ एप्रिल | |
| सौभद्र | ,, | ९ एप्रिल | |
| विक्रमोर्वशीय | ,, | १२ एप्रिल | ५३७– ०– ० |

● 'गोरक्षण व विदर्भ फंड यांच्या मदतीसाठी. निम्मे दराने हा खेळ झाला'.

● ● ●

## श्री. रामचंद्र त्र्यंबक साठे यांनी लिहिलेल्या आठवणी.

तीर्थरूप त्र्यं. ना. साठे यांचे वडील नोकरीत नव्हते. पितामह, मोरेश्वर दाजीसाहेब पुणे जिल्ह्यात मामलेदार होते. प्रपितामह लक्ष्मण गुजराथेत नडियाद येथे मामलेदार होते व स्वतः वडील जमखंडीस मामलेदार होते असे आमचे घराणेच मामलेदारांचे होते. आमच्या घराण्यातील बहुतेक सर्व मंडळी सुदृढ, सुंदर, हिशेबी व दीर्घायुषी होती. त्यांच्या पणजी श्री. सरस्वतीबाई ह्या एकशेआठ (१०८) वर्षांच्या होऊन ईशनामस्मरण करताना कैलासवासी झाल्या. आजोबा दाजीसाहेब पुण्यास हातावर पार्थिव पूजा करताना हर ओम्, हर ओम् म्हणत कैलासवासी झाले.

तीर्थरूपही त्यांचे वयाचे पंचाहत्तरावे वर्षी खालापुरास घरी स्नान करुन प्राणायाम करताना " प्राणायामे कुंभक करुनी सेवित विलयाला ' असे ईश्वरचरणी विलीन झाले. ते नेहमी म्हणत, " विना दैन्येन जीवनम् अनायासं मरणं " तसेच झाले. ईशकृपा ! त्यांचे शेवटचे इच्छेप्रमाणे ( दृष्टांताप्रमाणे ! ) त्यांचे स्मरणार्थ आम्ही खालापुरास आमचे घराशेजारी एक सीमेंट कॉंक्रीटचे मजबूत, छोटेसे पण सुंदर श्रीविठ्ठलरखुमाईचे मंदिर बांधले आहे.

ती. साठे यांचे कुटुंब :–त्यांच्या पत्नी सौ. पार्वतीबाई ह्या गुळसुंद्याच्या निदसुरे घराण्यातील. त्या फार सालस होत्या. त्यांस किर्लोस्कर संगीत

मंडळीत सर्वजण 'माई' म्हणत. किर्लोस्करांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई कंपनीतच राहात. त्यांस वहिनी म्हणत. म्हणून ते एक जुन्या तऱ्हेचे एकत्र कुटुंबच वाटे. कै. ती. साठे यांस तीन पुत्र–( १ ) मोरेश्वर. बालपणी किर्लोस्कर संगीत कंपनीत अण्णासाहेबांचे मांडीवर खेळत. त्यास काही दिवस शाकुंतलात सर्वदमनाचे (भरत) काम दिले होते. ते उत्तम करीत. ते पुढ मिरजेचे डॉ. वॉनलेस ह्यांचे मेडिकल क्लासमध्ये शिकून डॉक्टर, नेत्र-तज्ज्ञ झाले त्या वेळी त्यांनी नटवर्य श्री. गणपतराव बोडस यांस, 'हाउ टु मेकअप्' ह्या इंग्रजी पुस्तकाचे सुरस भाषांतर करून दिले. त्याचा गणपत-रावजी यांस फार उपयोग झाला.

द्वितीय चिरंजीव डॉ. बलवंत एम. बी.बी. एस्. हे मुंबईस मेडिकल प्रॅक्टिशनर होते. ते उत्तम लेखक होते. ते मराठी रंगभूमीचे फार अभिमानी होते. त्यांनीही पुष्कळ लिखाण सह्याद्री वगैरे मासिकांतून केले आहे. हेच तीर्थरूपांचे चरित्र व आठवणी लिहिणार होते. पण १९६० मध्ये लवकर कालवश झाले. त्यांचा मृत्युलेख केसरीत योग्य प्रकारे आला होता. कै. तात्यासाहेब केळकरांचे प्रेरणेने कै. तीर्थरूपांनी ज्या आठवणी लिहून ठेवल्या होत्या, त्या मी व बलवंतराव कै. केळकरांचेकडे घेऊन गेलो होतो. तेव्हा ते म्हणाले होते, " लवकर छापण्याची तयारी करा. मी प्रस्तावना तर लिहीनच, पण यशोदा प्राइज फंडातून बक्षीसही देईन." पण ते राहून गेले.

## किर्लोस्कर संगीत मंडळी

श्री. बलवंत पांडुरंग तथा अण्णासाहेब यांच्या आठवणी कै. ती. साठे यांचे पहिले सेक्रेटरी यांनी मला पुष्कळ वेळा सांगितल्या आहेत. अण्णा-साहेबांची देहयष्टी उंच, भरदार, भव्य व रुबाबदार होती. डोळे टपोरे, हुकमी, करारी असून ते बुद्धिवान होते. त्यांचा पोषाख व उंची अंगरखा, पागोटे, धोतर, उपरणे व कानात मोत्याची भिगबाळी असे.

त्यांचे अंगी तीन गुण प्रकर्षाने होते.

(१) उत्तम कवी, संगीतनाट्य लेखक, (२) उत्तम नाट्याभिनय शिक्षक, (३) उत्तम नट होते.

पुण्याचे नाटय संमेलनाचे अध्यक्ष साहित्यसम्राट न. चिं. केळकर सहज बोलून गेले की, अण्णासाहेब उत्तम कवी होते. ते स्वतः उत्तम नट होते किंवा नाही ही शंका आहे. मोठे रुबाबदार गृहस्थ म्हणून काही भूमिका करीत असावे. ह्या नाटय संमेलनास मी उपस्थित होतो. ती. साठे येथे नव्हते. ते पुण्यास आल्यावर मी त्यांस ही हकीकत सांगितली. तेव्हा ते मला श्री. तात्यासाहेब केळकरांकडे घेऊन गेले. ती. साठे यांनी श्री. केळकरांस विचारले की तुम्ही कै. अण्णासाहेबांचेबद्दल ते उत्तम 'नट' होते की नाही ह्याबद्दल शंका नाटयसंमेलनाचे अध्यक्षीय भाषणात प्रदर्शित केलीत, असे हा माझा मुलगा (मी) सांगतो, हे खरे काय ? श्री. तात्यासाहेब म्हणाले, 'खरे आहे.' त्यावर ती. साठे यांनी विचारले की, "आपण अण्णासाहेबांचे एखादे तरी रंगभूमीवरील सोंग (काम) पाहिले आहे काय ?" श्री. केळकरांनी उत्तर दिले नाही. मग ती. साठे म्हणाले, "मग आपण हे विधान कसे केले ? श्री. तात्यासाहेब गुळमुळीतपणे म्हणाले, 'अहो अंदाजाने!' तेव्हा ती. साठे म्हणाले, "अहो मी अण्णासाहेबांचा पहिला व्यवस्थापक, येवढेच नसून त्यांचेबरोबर स्टेजवर सुमंताची भूमिका त्यांचे नाटयशिक्षणाने करणारा व तुमचाही चांगला स्नेही, म्हणून मला विचारून तरी हे विधान करणे योग्य होते असे मला वाटते." श्री. तात्यासाहेबांनी ही चूक प्रांजलपणे कबूल केली व ह्याच वेळी ती. साठे यांस आत्मचरित्र आठवणीचे रूपाने लिहिण्यास सूचना केली व तुम्ही ते लिहा, मी त्यावर प्रस्तावना लिहीन असे म्हणाले. ह्या प्रेरणेने त्यांनी आठवणी, टिपणे, त्यांचे ५० वर्षांचे डायऱ्यांचे साहाय्याने लिहिण्यास प्रारंभ केला. परंतु त्यांचे दोघांचे हयातीत हे काम पूर्ण झाले नाही. श्री. तात्यासाहेबांना शेवटी ती. साठे यांचा मृत्युलेख लिहिण्याचा प्रसंग आला. अशाच प्रकारचा (गैरसमज) विनोद-रूपाने श्री. गडकरी यांनी भावबंधनात घातला आहे, तो असा. पूर्वी अण्णा किर्लोस्करांचे सोंग फार भव्य दिसत असे. तुम्ही पाहिले आहे काय? 'नाही ना ? मग अण्णांचा हा एक एक दंड! (साभिनय) हा प्रकार ती. साठे यांनी ऐकल्यावर गडकरी मास्तरांस घरी बोलावून

त्यांची खूप हजेरी घेतली. श्री. अण्णासाहेबांबद्दल थट्टेनेसुद्धा कोणी अनुदार उद्गार काढल्यास त्यांस ते खपत नसे.

श्री. अण्णासाहेबांच्या फार आग्रहाने ती. साठे अण्णासाहेब असेपर्यंत रामराज्य वियोगात सुमंत मंत्र्याची भूमिका करीत असत. अण्णासाहेब म्हणत कीं, तुम्ही माझ्या ह्या किर्लोस्कर संगीत मंडळीचे व्यवस्थापक म्हणजे माझ्या ह्या राज्याचे जसे मुख्य मंत्रीच आहात, तसेच रामराज्यवियोगात ह्या दशरथ राजाचे सुमंत मंत्री म्हणून काम करणेची माझी आज्ञा तुम्ही पाळा. तुम्हांस तुमचे रूप, आवाजास अनुरूप अशीच भूमिका मी लिहिली आहे.

ती. साठे यांस अगदी तरुणपणापासून गावचे उत्सवात नाटकात कामे करणे, दिग्दर्शन करणे, देवळांत सुश्राव्य संगीत कथा करणे, हा छंद होता. आमचे लहानपणी त्यांनी आम्हांस ओवीबद्ध रामायण, महाभारत दासबोध वगैरे पोथ्या सुश्राव्य वाचनाने ऐकवल्या आहेत. ते शरीराने मध्यम उंचीचे, गौरवर्ण, शरीर स्थूलपण बांधेसूद, उत्तम पोहणारे, जोर नमस्कार व्यायामप्रेमी, बंदुकीने निशाण मारणारे, धिटाईने, सर्प मारणारे होते. त्यांचा चेहरा रुबाबदार, मोठ्या मिशा, टपोरे पाणीदार व भेदक डोळे, स्वभावानें थोडे तापट, करारी, पण अंतरी अत्यंत प्रेमळ. उत्तम हिशेबी, हा तर त्यांचा स्थाईभाव होता.

नाटकमंडळ्या कशा असाव्या हा त्यांचा निबंध फार गाजला. यात त्यांनी आदर्श नाटक मंडळ्याविशेषत: कला व व्यापारी पद्धतीवर कशा असाव्या हे नमूद केले आहे. कै. अण्णासाहेब गुळवे यांचे मृत्युपत्राचा मसुदा, कै भाऊरावांचे मृत्युपत्राचा मसुदा व स्वत:चे मृत्युपत्राचा मसुदा त्यांनी हिशेबी आदर्श केला आहे.

## कै. किर्लोस्करांच्या कांही आठवणी

एकदा कै. गुळवे यांचा मुनीम किर्लोस्कर संगीत मंडळीने उसनवार नेलेली रक्कम परत मागणेस रीतीप्रमाणे आला. अण्णासाहेब समोरच बसलेले होते. त्यांनी तो निरोप ऐकल्यावर ते संतप्त झाले व ती. साठे यांस

मोठ्याने हाक मारून स्वतःचे हातातील "सिंहमुखी सोन्याचा तोडा' झटकन काढून साठे यांचे हाती देवून म्हणाले, 'साठे, हा तोडा सावकार गुळवे यांस देवून आमचे त्यांस देणे चुकते करा.' त्यावर साठे नम्रतेने म्हणाले, "हा निरोप गुळवे यास आवडणार नाही." त्यावर अण्णासाहेब रागाने म्हणाले, "जा, असाच निरोप त्यास सांगा." त्यावर नाइलाज म्हणून साठे यांनी गुळवे यांचेकडे जाऊन अत्यंत नम्रतेने भीत भीत (कारण गुळवेही तशीच उग्रव्यक्ती होती.) निरोप सांगितला. त्यावर गुळवे यांनी तोडा परत करून उलट उत्तर म्हणून निरोप सांगितला, 'साठे, तुमचे कविराज (अण्णा) फारच रागावलेले दिसतात. म्हणून त्यास माझा असा निरोप सांगा की, पुन्हा रक्कम उसनी लागल्यास ती फेडण्यास आपल्या दुसऱ्या हातात आणखी एखादा सोन्याचा तोडा आहे काय!" हा जबाब ऐकून (साठे यांना हा उलट निरोप सांगताना फार अवघड गेले.) किर्लोस्कर कवी अगदी स्तब्ध बसले. नंतर त्यांनी श्री. गुळवे यांची समक्ष भेट घेतली व पुन्हा दोघांची दिलजमाई झाली.

कंपनीचा मुक्काम दर गावाहून हालताना रुपये एक हजार रोख गुळवे यांचे पेढीवर जमा करण्याची वहिवाट होती. क्वचित प्रसंगी त्यातून रक्कम उसनी आणावी लागे. अण्णासाहेबांस अशी शंका आली की, ह्या रकमेवर आपणास व्याज का मिळू नये! म्हणून त्यांनी तसा निरोप साठे यांचेबरोबर गुळवे यांस पाठविला. त्यावर, गुळवे यांचे उत्तर, "साठे तुमच्या कविराजांना सांगा की तुम्ही जे रुपये एक हजार ठेव म्हणून ठेवता त्यावर बिब्याच्या खुणा करून पाठवा. म्हणजे तुम्हांस वरचेवर पुनःपुनः रकमा मागवाव्या लागतात तेव्हा तेच खुणेचे रुपये तुम्हांस मी परत देईन. ह्या तुमच्या अडचणीसाठीच मी ती रक्कम वापरीत नाही, बाजूला ठेवतो. माझेपाशी माझे धंद्यासाठी पुष्कळ भांडवल आहे. व तुम्हांस लागते तेव्हा ती रक्कम व अधिक लागली तरी देतो. त्याचे व्याज घेत नाही, म्हणून व्याज देत नाही."

एकदा श्री. अण्णासाहेबांच्या सौभाग्यवती सावित्रीवहिनी यांनी एक नवे चांदीचे ताट करवून आणून पंक्तीत अण्णासाहेबासमोर मांडले. हे पाहांताच अण्णासाहेबांनी ते ताट बाजूला सारले व म्हणाले, "मी मंडळीचे सगळ्या

पंक्तीस सर्वांना चांदीची ताटे करीन, तेव्हा मी स्वतः सर्वांसह चांदीचे ताटात भोजन करीन. " असे ते महत्त्वाकांक्षी होते. त्यांचे किर्लोस्कर संगीत मंडळी मध्ये भोजनाचा बेत फार सुग्रास होता. सणावारी उंची पक्वान्ने असत. इंदोर, ग्वाल्हेरकडे गेले की मुद्दाम तेथील वाकबगार आचारी बोलावून पक्वान्न रस्से वगैरे, करवून स्वतःचे आचाऱ्यास ते शिकवून घेत. ह्या कंपनीचे भोजनाची कीर्ति राजे सरदार लोकांतही पसरली होती. तसे भोजन पुढे गंधर्व मंडळीतही काही वर्षे होते.

संगीत सौभद्रास फार गर्दी होऊं लागली. उत्पन्नही शाकुंतलापेक्षा जास्त होई तेव्हा किर्लोस्कर म्हणत " शाकुंतल सर्वोत्कृष्ट आहे. परंतु लोकांस ते समजत नाही. समजून घेतले पाहिजे. शाकुंतलात जेव्हा अण्णासाहेब स्वतः कण्वाची भूमिका करीत (बाळकोबा रुसले की ) तेव्हा शकुंतलेला निरोप देण्याचे वेळी कण्वमहर्षी स्नान करून अग्नीभोवती प्रदक्षिणा घालताहेत. तेव्हा अण्णासाहेब रंगपटातील स्नानगृहात डोक्यावर थंड पाण्याची घागर ओतून घेऊन अंग न पुसता तसेच पाणी निथळत रंगभूमीवर येऊन अग्नीस प्रदक्षिणा घालीत त्या ऋषिचे भूमिकेत तन्मय होऊन अगदी रंगून जात, व ' जाते की मम शकुंतलाही आजचि पतिसदना, हे पद म्हणत तेव्हा प्रेक्षकातील रसज्ञ गहिवरत असत.

एकदा सौभद्र नाटकास अलोट गर्दी झाली होती. त्या वेळी ती. साठे यांजवर थिएटरचे दरवाजे बंद करून गर्दी थोपविण्याचा प्रसंग येऊन त्यांनी तसे करण्यास सुरू करताच रंगमंचावर सूत्रधाराचे वेषात अण्णासाहेब पूर्ण-पणे उल्हसित होऊन उभे असतानाच तेथूनच मोठ्याने ओरडून म्हणाले, " साठे, त्या रसिक लोकास मागेलोटू नका. ते ह्या अण्णा किर्लोस्कराची कला लुटण्यास आले आहेत. ती त्यास मन सोक्त लुटू द्या. माझेपाशी कला अमाप आहे. फक्त थिएटरात जागा कमी आहे. म्हणून त्या लोकांस रंगमंचावर माझे दोन्ही बाजूंस (हात करून) मावतील तेवढे दाटीवाटीने बसवा. बाकीचे विंगमध्ये उभे करा " असे म्हणून त्यांनी हर्षभराने लोकांचे स्वागत केले व नाटक बहारीने रंगवून सर्व लोकांस संतुष्ट केले. नटांना प्रवेशाचे वेळी बरीच अडचण झाली, परंतु रंगदेवतेच्या आज्ञेने त्यांनी ती सोसली.

**नाटककार देवल :–** श्री. गोविंद बल्लाळ देवल यांस मी प्रत्यक्ष पुष्कळ वेळा पाहिले आहे. त्यांच्याशी संभाषणही केले. ते कुंदगोळास आमचे घरी १९०५ चे सुमारास एक महिना पाहुणे होते. मिरजेस १९१२–१३ साली वरचेवर येऊन आमचे घरी राहात. तेही अण्णासाहेबांप्रमाणे ( १ ) उत्तम कवी, (२) उत्तम नाट्यशिक्षक, (३) उत्तम नट होते. त्यांचे कवित्व प्रसिद्धच आहे. नाट्यशिक्षक म्हणून गणपतरावांसारख्या नटवर्यांनी आपल्या आत्मचरित्रात गौरवाने नमूद केलेच आहे.

मिरजेस आमचे घरी देवल पाहुणे असले की श्री. गणपतराव बोडस, श्री. चिंतोबा गुरव हे नेहमी येऊन श्री. देवलांचे पायांवर डोके ठेवून नमस्कार करून त्यांचे समोर बसत, व त्यांच्या नाट्याभिनयाच्या गोष्टी चालत. ते चिंतोबास एकदा म्हणाले, " चिंतू, तुला मी गणूपेक्षाही अधिक अभिनयविद्या दिली आहे. परंतु तुझे रूप शरीरसौष्ठव अनुकूल नसल्यामुळे तू गणूपेक्षा स्टेजवर मागे पडलास. "

श्री. गडकरी मास्तरही देवलांकडे येत. त्यांसही नाटक कसे असावे, नटांना ते रंगविण्यास कसे सोईचे असावे, स्टेजवर काय दाखवावे, काय दाखवू नये वगैरे माहिती देताना मी ऐकले आहे.

श्री. देवल व ती. साठे सुमारे पंचवीस ते तीस वयाचे असताना इतके एकासारखे एक दिसत की ती. साठे यांसच देवल समजून कित्येक लोक नाट्यरचना अभिनयाबद्दल बोलत, व देवल यांस साठे समजून नमस्कार करून किर्लोस्कर संगीत मंडळीचे पुढील प्रोग्रॅमसंबंधी चौकशी करीत. त्या वेळी दोघेही प्रथम काही वेळ मौन पाळून मग आपण कोण ते सांगत. मग बराच हंशा पिकत असे. त्या काळी दोघांचेही पोषाक अंगरखा, पगडी, एकासारखे एक, शिवाय चेहेरेपट्टी, मिशा, वर्ण, उंची, स्थूलपणा यांतही विलक्षण साम्य दिसत असे.

**भाऊराव कोल्हटकर :–** नाट्यरत्न श्री. भाऊराव कोल्हटकर यांस मी त्यांचे अस्ताचलापूर्वी थोडे दिवस पाहिले होते. तो प्रसंग असा सुमारे १८९० मध्ये ते मिरजेचे संस्थानचे दवाखान्यात स्वतंत्र खोली घेऊन औषधोपचारासाठी राहिले होते. खोलीत व्हरांड्यात हिंडत फिरत असत. त्या

वेळी ती. साठे त्यांस वरचेवर भेटण्यास जात, तेव्हा मला बरोबर घेऊन जात. त्या वेळी माझे वय सहा वर्षांचे होते. त्या वेळी भाऊराव मला जवळ घेऊन बसले व म्हणाले, " साठे, हा तुमचा मुलगा रामभाऊ फार देखणा आहे. ह्याचा आवाज जर गायनानुकूल मधुर निघाला तर त्यास मी अगत्याने किर्लोस्कर संगीत मंडळीत नेईन व मी स्वतः त्यास नाट्य-गायनाभिनय शिक्षण देऊन प्रतिभाऊराव करीन. " हे मला चांगले आठवते. हे माझे लहानपणी घडले, परंतु ती. साठे यांनी व माझ्या मातोश्रींनी कौतुकाने वरचेवर सांगितल्यामुळे माझे चांगले ध्यानात राहिले आहे. पण पुढे दुर्दैवाने भाऊराव कैलासवासी झाले व माझाही आवाज गायनानुकूल झाला नाही. असो. भाऊरावांचा व माझे वडील ती. साठे यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा स्नेह-संबंध होता. ते जवळ जवळ समवयस्क होते. ती. साठे यांनी किर्लोस्कर संगीत कंपनी सोडून मिरजेचे म्युनिसिपल सेक्रेटरी म्हणून जाण्यास भाऊराव फार नाखूष होते. म्हणून ते ती. साठे यांस वरचेवर बोलावून घेऊन कंपनीत राहून घेत, सल्लामसलत घेत, कंपनीचे हिशेब त्यांचेकडून तपासून ऑडिट करून घेत. भाऊरावांचे रूप-वर्णन ती. साठे करीत तेव्हा म्हणत की, परमेश्वराने स्त्री-वेषास अत्यंत अनुकूल, सुंदर, सुकुमार रूप-संपदा देऊनच त्यांस जन्मास घातले होते. अभिनयकौशल्य देवलांकडून उत्तम संपादिले होते. तसेच कंपनीचे हिशेबावर व व्यवस्थेवर लक्ष ठेवण्याचा गुण त्यांनी ती. साठे यांचा उचलला होता. आवाज व गायन तर अत्यंत मधुर होते व पुढे तर पुरूष पार्टीस जरूर असा मोठा पल्लेदार आवाज होता. त्यांचे गाण्याची एक जुन्या फोनोग्रॅमची बांगडी बडोद्यास होती. ती गंधर्व मंडळीत आणून जुन्या मशीनवर लाऊन वाजविली. त्या वेळी बालगंधर्व राहित जोडून उभे राले, व म्हणाले की, " हा आवाज गायन केवळ स्वर्गीय आहे. " भाऊरावांनी स्त्री-वेषात हळदी-कुंकू घेतले, ही आख्यायिका खरी नाही, असे माझे वडील सांगत. त्यांच्या सौभाग्यवतीही आमचे घरी वरचेवर येत असत. त्यांनी भाऊरावांची कोणतीच भूमिका पाहिली नाही, हे खरे आहे. परंतु पुरूषपार्ट केलेला सौभाग्यवतीस दाखविण्यास ते तसेच एकदा घरी गेले होते. स्त्रीपार्ट मात्र त्यांनी पाहू नये अशी त्यांची इच्छा होती. भाऊरावांनी ती साठे यांचे सल्ल्याने मृत्युपत्र करून व्यवस्था केली होती. म्हणून त्यांचेनंतर त्यांचे पत्नीस

योगक्षेमास पुरेसे द्रव्य होते; व काही रक्कम व्याजी ठेवून ट्रस्ट करून बडोद्यास भाऊरावांचे नावे शिष्यवृत्ती ठेविली. भाऊराव प्रथम मिरजेस आजारी झाले तेव्हा मिरजेचे सुप्रख्यात डॉ. वानलेस ह्यांचा व ती. साठे यांचा फार स्नेह. म्हणून ती. साठे भाऊरावांस घेऊन त्यांस दाखविण्यास गेले व म्हणाले, की "ह्या ख्यातनाम व अत्यंत लोकप्रिय संगीत नटास आपण बरे करा, त्यासाठी लागेल तेवढा खर्च आम्ही करू." तेव्हा डॉक्टरांनी त्यांची संपूर्ण तपासणी केली व यांचा रोग असाध्य आहे, असे निराशाजनक खेदाने उत्तर दिले. म्हणून ते पुण्यास जाऊन वैद्यांचे औषध घेऊ लागले. प्रथम थोडे बरे वाटले तेव्हा ते थोडे गाऊन पाहू लागले, व म्हणत, "जर माझा आवाज पूर्ववत राहीला तर भाऊराव म्हणून जगण्यात मला आनंद आहे. नाही तर मरणच बरे. त्यांचा केवळ (३९) एकूणचाळीसावे तरुण उमेदीचे वयात अंत झाला. १४–२–१९०१ ला हा नाट्यसूर्यास्त झाला. पुण्याचे इचलकरंजीकरांचे वाड्यातील जागा शनिवारवाड्याचे दुर्दैवी नारायण दरवाजासमोरचे भागात होती. ती. साठे यांनी मला दाखविली होती. त्यावर गणपतरावांनी ही पुन्हा दाखविली होती. आता त्या जागेचे रूपांतर झाले आहे.

**श्री. मोरो बापूजी वाघूलीकर** :–किर्लोस्कर संगीत मंडळीचे प्रमुख पुरुषवेष (हीरो) भूमिका करणारे. ह्याची उंची पूर्ण, सुंदर. मोठे टपोरे डोळे, गौरवर्ण व भव्य आकृती दुष्यंत राजाचे कामास अत्यंत शोभणारी, राजबिंडी अशी होती. आवाज मोठा पल्लेदार दमदार असून गायनपटु होते. वाणी वाईची मराठी शुद्ध होती. त्यांस मी त्यांचे वृद्धापकाळी मुंबईस १९०४ साली किर्लोस्कर संगीत मंडळीचे शाकुंतल नाटकाचे वेळीं प्रथम पाहिले. ती. साठे यांनी माझी व माझे भावंडांची त्यांस ओळख करून दिली. ते पुढच्या रांगेतील खुर्चीवर बसले होते. त्या वेळी दुष्यंताची भूमिका श्री. नानासाहेब जोगळेकर करीत होते. ती पाहून ते फार खूष झाले व म्हणाले, मीही असाच झुलत होतो. मी नानासाहेबांस काम शिकविले. तेही ते उत्तम करीत आहेत. अण्णासाहेबांचे पुण्याईने "त्यांचे रंगभूमीस अत्यंत योग्य असा प्रमुख नट (हीरो) मिळाला. म्हणून मला फार समाधान व आनंद वाटत आहे."

**श्री. बाळकोबा नाटेकर** :–किर्लोस्कर संगीत मंडळीचे शास्त्रीय संगीत गायक, सतारवादक व अभिनयकुशल नट होते. ते नारदाचे भूमिकेत विग-

मधुनच पहिले पद सतारीवर वाजवीत. (" राधाधर मधु मिलिंद "). मग हे पद रंगभूमीवर प्रवेश केल्यावर मधुर कंठाने म्हणत. अण्णासाहेब म्हणत की, " बाळकोबा गाऊ लागले की आपले काळीज काढून त्यांचे पुढे ठेवावे." एकदा तर आपले हातातील सोन्याचा तोडा ते रुसले म्हणून त्यांचे हाती घालून समजूत घालून त्यास परत बोलावून आणले होते. तेच अण्णासाहेब म्हणत की बाळकोबा उगीच रुसला व वितंडवाद घालू लागला की तळ-पायाचा आग मस्तकाला जाते. मी त्यास पाहिले नव्हते परंतु मी शुक्रवार पेठेत व्ही. टी. आय्. टेक्निकल स्कूलसमोर रहात असे. येथून जवळच गाडीखाना चौक आहे. तेथे एक बाळंतिणीचे हॉस्पिटल होते. तेथे बाळकोबांची कन्या मुख्य नर्स होती. त्यांचे नाव श्री. जानकीबाई. त्या आमचे वडील आले की त्यांस भेटण्यास येउन काका म्हणून नमस्कार करीत. तेव्हा ती. साठे म्हणत, ह्या जानकीबाईला जर मिशा लावल्या तर ती थेट बाळकोबा दिसेल. इतके तिचे तिच्या वडिलांचे चेहऱ्याशी साम्य आहे. बाळकोबा म्हातारपणी पुण्याचे ट्रेनिंग कॉलेजमध्ये गायन शिक्षक होते.

**श्री. भास्करबुवा बखले** :–सुप्रसिद्ध गवई होण्यापूर्वी अगदी तरुण वयात किर्लोस्कर संगीत मंडळीत होते. त्यांचा आवाज गोड होता, म्हणून त्यांस प्रथम किरकोळ कामे व नंतर अण्णासाहेबांनी त्यांस रामराज्यवियोगात कैकईचे काम दिले होते. काही वर्षांनंतर त्यांचा आवाज फुटला. तेव्हा भाऊरावांनी रंगभूमीशिवाय दुसरे काम करण्यास सांगितले. तेव्हा ती. साठे यांनी त्यांची गायनकलेची आवड, तळमळ जाणून घेऊन त्यांस कंपनी सोडून सुप्रसिद्ध गवयाकडे राहून ती कला शिकण्याचा सल्ला दिला, व बडोद्यास त्यांची सोयही करून दिली. पुढे भास्करबुवांनी आपल्या हिंमतीवर मोठाले गुरु केले, कष्ट केले व ती शास्त्रीय गायनविद्या आत्मसात केली व प्रसिद्धी पावले. ते ती. साठे यांस नेहमी भेटत व कृतज्ञता मानीत. ती. साठे म्हणत की, भास्करबोवांनी शास्त्रीय गायनविद्या पूर्ण संपादन केली परंतु त्यांचा पूर्वीचा गोड आवाज मात्र परत आला नाही.

किर्लोस्कर संगीत मंडळीत आणखी बरेच उत्तम नट होते. त्यांच्या आठवणी ती. साठे सांगत असत. त्यांतील बहुतेक मी पाहिले आहेत.

श्री. दडपे, बलराम, कपिंजल वगैरे भूमिका करीत. काशिनाथपंत परचुरे हे मैत्रेयाची भूमिका. श्री. चिंतोबा स्त्रीवेष (महाश्वेता), पुढे पुरुषवेष (श्रीमंत वगैरे) सर्वजण उत्तम करीत. गोविंदराव निपाणकर स्टेज मॅनेजर व श्रीकृष्णाप्पा प्रथम आचारी व पुढे पुजारी. ह्या दोघांस पुढे कंपनीने पेन्शन दिले होते. पेन्शनरच्या यादीत आणखी तीन नावे शंकररावांनी नमूद केली. ही गोष्ट आमचे तीर्थरूपांस मान्य नव्हती. ती नावे श्री. सावित्रीबाई किर्लोस्कर, श्री. सीताबाई कोल्हटकर, श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर ह्या मालकिणी होत्या. त्यांनी आपले हिस्से बहुतेक सोडले होते.

**संस्थान** मिरज :–म्युनिसिपल सेक्रेटरींचे कामाचा चार्ज ता. १९ एप्रिल १८९० रोजी ती. साठे यांनी घेतला. त्या वेळचे स्टेट कारभारी श्री. कल्याण सिताराम चित्रे यांनी ती. साठे यांस बरोबर घेऊन त्यांच्या गाडीतून सर्व शहर दाखविले. नंतर श्री बाळासाहेब संस्थानचे राजे यांनी ती. साठे यांस शहरात हिंडून कामाची तपासणी करण्यास एक भरीव रबराची तीन चाकांची ट्रायसिकल दिली. (आधुनिक बायसिकल ही त्या काळी उपलब्ध नव्हतीच.) म्हणून त्यांस 'पायगाडीचे साठे' असेच लोक म्हणत. त्यांनी त्या काळी सतत आठ वर्षे, बत्तीस वर्षांचे वयाचे उमेदीचे कालात, अत्यंत परिश्रमपूर्वक व चोख जमा-खर्चाचे म्युनिसिपालिटीचे हिशेब ठेवून नोकरांचे पगार व कामाची बिले वेळचेवेळी देऊन शहराची उत्तम सुधारणा, आरोग्यासाठी स्वच्छता, शुद्ध पाणी, दिवे, चांगले रस्ते, गटारे, हौद पाण्यासाठी, व मुंबईचे राणीचे बागेचे धर्तीवर छोटीशी सुंदर बाग प्राणीसंग्रहालय, लायब्ररी व टाउन हॉल तयार केला. त्या वेळचे मिरजेस नुकतेच आलेले सुविख्यात डॉ. वॉनलेस ह्यांचा स्नेह संपादन केला. त्यांचे सल्ल्याने त्यावेळचे भयंकर प्लेगचे साथीचे रोगाचे प्रतिबंधासाठी इनॉक्युलेशन घरे स्वच्छ, डिसइन् फेक्ट करणे, रेल्वे स्टेशनसमोर क्वरंटीन बांधून त्या संसर्गजन्य रोगाचा धोका पत्करून बहुमोल कार्य केले. डॉ. वॉनलेस यांस मिशन हॉस्पिटल स्थापण्यास सहाय्य केले. तेथे मेडिकल क्लास निघाला होता, आता त्याचे मेडिकल कॉलेजात रूपांतर झाले आहे.

श्री. बाळासाहेब राजे यांनी एक नवीन नाटकगृह बांधण्याचे ठरविले. तेव्हा किर्लोस्कर संगीत मंडळीसाठी त्या काळी गावोगावी थिएटरे नव्हती.

म्हणून मंडप घालून रंगमंच उभारण्याचा ती. साठे यांस अनुभव होता व मुंबईस थोडी पण उत्तम थिएटरे झाली होती, त्यांची चांगली माहिती होती. म्हणून श्रीमंतानी या थिएटरचे देखरेख व सोई पाहून बांधून घेणेचे कामावर नेमणूक केली. हे काम ती. साठे यांनी उत्तम केले. ह्या थिएटरची वैशिष्टये— चारही बाजूंनी खूप मोकळी जागा, हवा खेळण्यास, माणसांची व वाहनांची हवी तवढी गर्दी मावण्यास सोईचे रस्ते, प्रेक्षकांस बसण्यास आराम व हवेशीर जागा, कोठूनही दिसेल, आवाज घुमणार नाही, उत्तम ऐकू येईल असे, रंगमंचात प्रशस्त बागा, लाकडी स्टेजखाली तळघरातून एकदम वर स्प्रिंगने नट वर येईल, तसेच स्टेजवर सारवट गाडी खरोखरीची खरे बैल जोडलेली सहज आत येऊन बाहेर जाईल अशी व्यवस्था. श्रीमंतांनी पुष्कळ वेळा मृच्छकटिकातील वसंतसेनेस बसून येण्यास आपली सारवट गाडी दिली होती. अशा सोईचे उत्तम थिएटर त्याकाळी त्या प्रांतात हे पहिलेच होते. ह्या ती. साठे यांचे कामगिरीवर श्रीमंतांनी खूष होऊन थिएटरचे उद्घाटनाचे प्रसंगी त्यांस एक चांदीचे घड्याळ ( पॉकेट वॉच आणि चेन ) त्यांचे नाव घालून बक्षीस दिले. सत्तर वर्षे झाली, ते घड्याळ अजून आहे, व थिएटरचा फोटोही आहे. मिरज हे मध्यवर्ती संस्थान, रेल्वेचे जंक्शन, हवापाणी उत्तम, व श्री. बाळासाहेब अत्यंत आदरातिथ्यशील म्हणून पुण्या-मुंबईचे विद्वान, पुढारी, प्रोफेसर्स तसेच संस्थानिक, राजे-महाराजे, सरदार वरचेवर पाहुणे येत. नाटक कंपन्या येत. त्यांची व्यवस्था, स्वागत करण्याचे (सरबराई) काम ती. साठे यांचेकडेच असे. त्यामुळे त्यांच्या ह्या लोकांत फार ओळखी झाल्या होत्या. एकदा पुण्याचे केसरीचे नामजोशी आले होते, व त्यांचेसह ती. साठे यांनी रेल्वे स्टेशनचे रिफ्रेशमेंट रूममध्ये चहा घेतला, असा संशय घेऊन त्यांचेवर 'ग्रामण्य' घातले. ती. साठे यांचे म्हणणे "मी चहा घेतला नाही. घेतला हा आरोप खोटा आहे. तुम्ही ज्या ब्रह्मवृंदांनी मजवर खोटा आरोप घेतला आहे, त्या तुमचेपैकी चार पुढाऱ्यांनी मजबरोबर यावे, मी तुमच्यासमोर चहा घेतो, मग मजवर ग्रामण्य घाला!" हा तंटा तीन वर्षे चालला. आमचे घरी कोणी मिरजेचा वेदमूर्ती येत नसे. हरिपुरचे आणावे लागत. नापितही रेल्वेस्टेशनचा येत असे. असा बराच त्रास झाला. नंतर श्रीमंतांपुढे सर्व वाटाघाटी

श्री. दडपे, बलराम, कपिंजल वगैरे भूमिका करीत. काशिनाथपंत परचुरे हे मैत्रेयाची भूमिका. श्री. चिंतोबा स्त्रीवेष (महाश्वेता), पुढे पुरुषवेष (श्रीमंत वगैरे) सर्वजण उत्तम करीत. गोविंदराव निपाणकर स्टेज मॅनेजर व श्रीकृष्णाप्पा प्रथम आचारी व पुढे पुजारी. ह्या दोघांस पुढे कंपनीने पेन्शन दिले होते. पेन्शनरच्या यादीत आणखी तीन नावे शंकररावांनी नमूद केली. ही गोष्ट आमचे तीर्थरूपांस मान्य नव्हती. ती नावे श्री. सावित्रीबाई किर्लोस्कर, श्री. सीताबाई कोल्हटकर, श्री. लक्ष्मीबाई जोगळेकर ह्या मालकिणी होत्या. त्यांनी आपले हिस्से बहुतेक सोडले होते.

**संस्थान** मिरज :–म्युनिसिपल सेक्रेटरींचे कामाचा चार्ज ता. १९ एप्रिल १८९० रोजी ती. साठे यांनी घेतला. त्या वेळचे स्टेट कारभारी श्री. कल्याण सिताराम चित्रे यांनी ती. साठे यांस बरोबर घेऊन त्यांच्या गाडीतून सर्व शहर दाखविले. नंतर श्री बाळासाहेब संस्थानचे राजे यांनी ती. साठे यांस शहरात हिंडून कामाची तपासणी करण्यास एक भरीव रबराची तीन चाकांची ट्रायसिकल दिली. (आधुनिक बायसिकल ही त्या काळी उपलब्ध नव्हतीच.) म्हणून त्यांस 'पायगाडीचे साठे' असेच लोक म्हणत. त्यांनी त्या काळी सतत आठ वर्षे, बत्तीस वर्षांचे वयाचे उमेदीचे कालात, अत्यंत परिश्रमपूर्वक व चोख जमा-खर्चाचे म्युनिसिपालिटीचे हिशेब ठेवून नोकरांचे पगार व कामाची बिले वेळचेवेळी देऊन शहराची उत्तम सुधारणा, आरोग्यासाठी स्वच्छता, शुद्ध पाणी, दिवे, चांगले रस्ते, गटारे, हौद पाण्यासाठी, व मुंबईचे राणीचे बागेचे धर्तीवर छोटीशी सुंदर बाग प्राणीसंग्रहालय, लायब्ररी व टाउन हॉल तयार केला. त्या वेळचे मिरजेस नुकतेच आलेले सुविख्यात डॉ. वॉनलेस ह्यांचा स्नेह संपादन केला. त्यांचे सल्ल्याने त्यावेळचे भयंकर प्लेगचे साथीचे रोगाचे प्रतिबंधासाठी इनॉक्युलेशन घरे स्वच्छ, डिसइन्फेक्ट करणे, रेल्वे स्टेशनसमोर क्वरंटीन बांधून त्या संसर्गजन्य रोगाचा धोका पत्करून बहुमोल कार्य केले. डॉ. वॉनलेस यांस मिशन हॉस्पिटल स्थापण्यास सहाय्य केले. तेथे मेडिकल क्लास निघाला होता, आता त्याचे मेडिकल कॉलेजात रूपांतर झाले आहे.

श्री. बाळासाहेब राजे यांनी एक नवीन नाटकगृह बांधण्याचे ठरविले. तेव्हा किर्लोस्कर संगीत मंडळींसाठी त्या काळी गावोगावी थिएटरे नव्हती.

म्हणून मंडप घालून रंगमंच उभारण्याचा ती. साठे यांस अनुभव होता व मुंबईस थोडी पण उत्तम थिएटरे झाली होती, त्यांची चांगली माहिती होती. म्हणून श्रीमंतानी या थिएटरचे देखरेख व सोई पाहून बांधून घेणेचे कामावर नेमणूक केली. हे काम ती. साठे यांनी उत्तम केले. ह्या थिएटरची वैशिष्टये– चारही बाजूंनी खूप मोकळी जागा, हवा खेळण्यास, माणसांची व वाहनांची हवी तवढी गर्दी मावण्यास सोईचे रस्ते, प्रेक्षकांस बसण्यास आराम व हवेशीर जागा, कोठूनही दिसेल, आवाज घुमणार नाही, उत्तम ऐकू येईल असे, रंगमंचात प्रशस्त बागा, लाकडी स्टेजखाली तळघरातून एकदम वर स्प्रिंगने नट वर येईल, तसेच स्टेजवर सारवट गाडी खरोखरीची खरे बैल जोडलेली सहज आत येऊन बाहेर जाईल अशी व्यवस्था. श्रीमंतांनी पुष्कळ वेळा मृच्छकटिकातील वसंतसेनेस बसून येण्यास आपली सारवट गाडी दिली होती. अशा सोईचे उत्तम थिएटर त्याकाळी त्या प्रांतात हे पहिलेच होते. ह्या ती. साठे यांचे कामगिरीवर श्रीमंतांनी खूष होऊन थिएटरचे उद्‌-घाटनाचे प्रसंगी त्यांस एक चांदीचे घडयाळ ( पॉकेट वॉच आणि चेन ) त्यांचे नाव घालून बक्षीस दिले. सत्तर वर्षे झाली, ते घडयाळ अजून आहे, व थिएटरचा फोटोही आहे. मिरज हे मध्यवर्ती संस्थान, रेल्वेचे जंक्शन, हवापाणी उत्तम, व श्री. बाळासाहेब अत्यंत आदरातिथ्यशील म्हणून पुण्या-मुंबईचे विद्वान, पुढारी, प्रोफेसर्स तसेच संस्थानिक, राजे–महाराजे, सरदार वरचेवर पाहुणे येत. नाटक कंपन्या येत. त्यांची व्यवस्था, स्वागत करण्याचे (सरबराई) काम ती. साठे यांचेकडेच असे. त्यामुळे त्यांच्या ह्या लोकांत फार ओळखी झाल्या होत्या. एकदा पुण्याचे केसरीचे नामजोशी आले होते, व त्यांचेसह ती. साठे यांनी रेल्वे स्टेशनचे रिफ्रेशमेंट रूममध्ये चहा घेतला, असा संशय घेऊन त्यांचेवर ‘ ग्रामण्य ’ घातले. ती. साठे यांचे म्हणणे “ मी चहा घेतला नाही. घेतला हा आरोप खोटा आहे. तुम्ही ज्या ब्रह्मवृंदांनी मजवर खोटा आरोप घेतला आहे, त्या तुमचेपैकी चार पुढाऱ्यांनी मजबरोबर यावे, मी तुमच्यासमोर चहा घेतो, मग मजवर ग्रामण्य घाला ! ” हा तंटा तीन वर्षे चालला. आमचे घरी कोणी मिरजेचा वेदमूर्ती येत नसे. हरिपुरचे आणावे लागत. नापितही रेल्वेस्टेशनचा येत असे. असा बराच त्रास झाला. नंतर श्रीमंतांपुढे सर्व वाटाघाटी



९...

होऊन ब्रह्मवृंदांनी हे ग्रामण्य बिनशर्त मागे घेतले. श्रीमंतांचे वाड्यात ती. साठे यांस पंक्तीस घेऊन भोजन समारंभ झाला, इतकेच नव्हे, तर श्रीमंतांचे उपाध्याय वेदमूर्ती श्रीपाद दीक्षित वाटवे, यांनीं आपल्या कन्येचा आमचे मामांचेबरोबर विवाह करून दिला. अशा प्रकारे हे ग्रामण्य प्रकरण संपले.

मिरज हायस्कूलचे त्या वेळचे सुप्रसिद्ध शिक्षक श्री. कानेटकर, गोगटे व सुप्रसिद्ध इतिहास संशोधक व कवी श्री. वासुदेवशास्त्री खरे हे वडिलांचे स्नेही व माझे शिक्षक होते. त्यापैकी संस्कृतचे शिक्षक वासुदेवशास्त्री यांनी शिवसंभव नाटक लिहिले. त्या वेळी ते ती. साठे यांचेकडे येऊन नाट्य-रचना स्टेज व नट ह्यांचे दृष्टीने सोईची कशी असावी वगैरे विषयावर चर्चा करून सल्ला घेत. नंतर ते नाटक तयार होऊन कोल्हापूरचे स्टेजवर इतके गाजले की ह्या नाटकाचे प्रयोगाचे वेळी शिवछत्रपतींचा जन्म होऊन त्यास पाळण्यात घालून बारशाचे समारंभाचे स्टेजवरील देखाव्याचे ( सीन ) वेळीं श्री. शाहूछत्रपती महाराजांनी उठून उभे राहून राजेशाही मुजरा केला. सर्व प्रेक्षक उभे राहून मुजरा करून मग टाळयांचा कडकडाट झाला. हे वृत्त सर्व वर्तमानपत्रांतून मोठ्या अक्षरांनी छापून आले. नाटकाचा दर्जा व बोल-बाला वाढला. परंतु ह्या नाटकात प्रचलित इंग्रज सरकारविरुद्ध काही आहे काय ? अशी चौकशी सुरू झाली व त्याच सुमारास श्री. शाहू छत्रपती महाराजांचे सेक्रेटरींची शास्त्रीबोवांस तार आली की ह्या नाटकाचे संबंधात तुम्ही महाराजांस भेटण्यास मिरज स्टेशनवर या. तेव्हा शास्त्रीबुवा फारच चिंतातुर होऊन ती. साठे यांचेकडे आले. तेव्हा ती. साठे म्हणाले, काही भऊ नका, महाराजांची माझी चांगली ओळख आहे. मी तुमचेबरोबर येईन. त्याप्रमाणे ते शास्त्रीबोवास घेऊन महाराजांस भेटले. महाराजांनी विचारले, "तुमचे नाटकात इंग्रज सरकारविरुद्ध काही आहे काय ?" तेव्हा ती. साठे यांनी माहिती दिली (कारण शास्त्रीबोवा महाराजांस पाहूनच घाबरले होते. ) की, हे नाटक शुद्ध ऐतिहासिक सत्यकथेवर आधारलेले आहे. ह्यात हल्लीचे इंग्रज सरकार विरुद्ध काही नाही. अशी महाराजांची खात्री पटल्यावर महाराजच स्वत: मुंबईचे गव्हर्नर साहेबांस भेटले. व त्यांनीच ह्या नाटकात आपल्या सरकारविरुद्ध काही नाही अशी खात्री दिली व म्हणाले, " शिवाजी महाराजांचे आम्ही वंशज, म्हणून त्यांचे बारशाचा प्रसंगाचा सीन

पाहून मी मानाचा मुजरा केला ! ह्यामुळे ह्या नाटकावर बंदी पडण्याचा वगैरे प्रसंग टळला. मिरजेचे राज श्री. बाळासाहेब यांची ती. साठे यांच्यावर शेवटपर्यंत कृपा होती.

**रामभाऊ कुंदगोळकर** (हे पुढे सवाई गंधर्व झाले.) यांचे हे लहान असतानाच आमचेकडे नेहमी गाणे होत असे. एकदा त्यांचे गाणे जुन्या तऱ्हेच्या बांगडी टाईप फोनोग्राफवर श्री. काशीनाथपंत छत्रे या सर्कस मालकांनी ध्वनिमुद्रित करून घेतले. तो प्रसंग मला चांगला आठवतो. आम्हा मुलास चूप बसण्यासाठी ती. साठे नाकापुढ बोट धरून एकसारखें दटावून सांगत होते. श्री. रामभाऊंची पुढे जेव्हा जेव्हा माझी भेट होई तेव्हा तेव्हा ते ही आठवण देत असत.

**विष्णु पागनीस** :–हे लहानपणी जमखंडीकरांकड गाणे म्हणून श्रीमंतांची करमणूक करणारा मुलगा म्हणून त्यांचे पदरी होता. त्यांची ओळख श्री. भाऊसाहेबांचा मुक्काम कुंदगोळला एक महिना होता म्हणून झाली. तो नित्य आमचे घरी येऊन गाणी म्हणे. आवाज गोड व मुलगा देखणा होता. पुढे तोच प्रभात कंपनीचे तुकाराम फिलममध्ये तुकारामाची भूमिका उत्तम करणारा सिनेनट झाला.

**श्री. नारायण महाराज** :–बालपणी कुंदगोळचे जहागीरदारांकडे शागीर्द होते. ते, मी व आमचे बंधु एकत्र खेळत असू. ते केडगावचे नारायण महाराज झाल्यावर आम्ही ती. साठे यांचेबरोबर गेलो होतो. त्यांनी त्यांचे आश्रमात आमचे चांगले आदरातिथ्य केले.

**श्री. गणपतराव बोडस** :–आम्ही सर्व मंडळी डिसेंबर १९०४ चे मुंबईचे मोठे प्रदर्शन पहाणेस गेलो होतो. किर्लोस्कर संगीत मंडळीतच उतरलो होतो. श्री. गणपतराव अगदी तरुण, सुंदर, हातांत सोन्याची सलकडी, चांगली कामे करणारे हुशार असे दिसले. म्हणून ती. साठे यांच्या मनात त्यांचे मेव्हणीची मुलगी चि. द्वारका इचा त्यांच्याशी विवाह करून द्यावा असे आले. म्हणून त्यांनी त्यांचे गुरुवर्य देवल व मालक नानासाहेब यास माहिती विचारली. तेव्हा दोघेही म्हणाले " गणू हा मुलगा चांगला होतकरू नट आहे. निर्व्यसनी व हिशेबी आहे. खुशाल मुलगी द्या. " नंतर त्यांनी गणपतरावांस समोर

होऊन ब्रह्मवृंदांनी हे ग्रामण्य बिनशर्त मागे घेतले. श्रीमंतांचे वाड्यात ती. साठे यांस पंक्तीस घेऊन भोजन समारंभ झाला, इतकेच नव्हे, तर श्रीमंतांचे उपाध्याय वेदमूर्ती श्रीपाद दीक्षित वाटवे, यांनी आपल्या कन्येचा आमचे मामांचेबरोबर विवाह करून दिला. अशा प्रकारे हे ग्रामण्य प्रकरण संपले.

मिरज हायस्कूलचे त्या वेळचे सुप्रसिद्ध शिक्षक श्री. कानेटकर, गोगटे व सुप्रसिद्ध इतिहास संशोधक व कवी श्री. वासुदेवशास्त्री खरे हे वडिलांचे स्नेही व माझे शिक्षक होते. त्यापैकी संस्कृतचे शिक्षक वासुदेवशास्त्री यांनी शिवसंभव नाटक लिहिले. त्या वेळी ते ती. साठे यांचेकडे येऊन नाट्य-रचना स्टेज व नट ह्यांचे दृष्टीने सोईची कशी असावी वगैरे विषयावर चर्चा करून सल्ला घेत. नंतर ते नाटक तयार होऊन कोल्हापूरचे स्टेजवर इतके गाजले की ह्या नाटकाचे प्रयोगाचे वेळी शिवछत्रपतींचा जन्म होऊन त्यास पाळण्यात घालून बारशाचे समारंभाचे स्टेजवरील देखाव्याचे ( सीन ) वेळीं श्री. शाहूछत्रपती महाराजांनी उठून उभे राहून राजेशाही मुजरा केला. सर्व प्रेक्षक उभे राहून मुजरा करून मग टाळ्यांचा कडकडाट झाला. हे वृत्त सर्व वर्तमानपत्रांतून मोठ्या अक्षरांनी छापून आले. नाटकाचा दर्जा व बोल-बाला वाढला. परंतु ह्या नाटकात प्रचलित इंग्रज सरकारविरुद्ध काही आहे काय ? अशी चौकशी सुरू झाली व त्याच सुमारास श्री. शाहू छत्रपती महाराजांचे सेक्रेटरींची शास्त्रीबोवांस तार आली की ह्या नाटकाचे संबंधात तुम्ही महाराजांस भेटण्यास मिरज स्टेशनवर या. तेव्हा शास्त्रीबुवा फारच चिंतातुर होऊन ती. साठे यांचेकडे आले. तेव्हा ती. साठे म्हणाले, काही भऊ नका, महाराजांची माझी चांगली ओळख आहे. मी तुमचेबरोबर येईन. त्याप्रमाणे ते शास्त्रीबोवास घेऊन महाराजांस भेटले. महाराजांनी विचारले, "तुमचे नाटकात इंग्रज सरकारविरुद्ध काही आहे काय ?" तेव्हा ती. साठे यांनी माहिती दिली (कारण शास्त्रीबोवा महाराजांस पाहूनच घाबरले होते. ) की, हे नाटक शुद्ध ऐतिहासिक सत्यकथेवर आधारलेले आहे. ह्यात हल्लीचे इंग्रज सरकार विरुद्ध काही नाही. अशी महाराजांची खात्री पटल्यावर महाराजच स्वतः मुंबईचे गव्हर्नर साहेबांस भेटले. व त्यांनीच ह्या नाटकात आपल्या सरकारविरुद्ध काही नाही अशी खात्री दिली व म्हणाले, "शिवाजी महाराजांचे आम्ही वंशज, म्हणून त्यांचे बारशाचा प्रसंगाचा सीन

पाहून मी मानाचा मुजरा केला ! ह्यामुळे ह्या नाटकावर बंदी पडण्याचा वगैरे प्रसंग टळला. मिरजेचे राज श्री. बाळासाहेब यांची ती. साठे यांच्यावर शेवटपर्यंत कृपा होती.

**रामभाऊ कुंदगोळकर** (हे पुढे सवाई गंधर्व झाले.) यांचे हे लहान असतानाच आमचेकडे नेहमी गाणे होत असे. एकदा त्यांचे गाणे जुन्या तऱ्हेच्या बांगडी टाईप फोनोग्राफवर श्री. काशीनाथपंत छत्रे या सर्कस मालकांनी ध्वनिमुद्रित करून घेतले. तो प्रसंग मला चांगला आठवतो. आम्हा मुलास चूप बसण्यासाठी ती. साठे नाकापुढ बोट धरून एकसारखें दटावून सांगत होते. श्री. रामभाऊंची पुढे जेव्हा जेव्हा माझी भेट होई तेव्हा तेव्हा ते ही आठवण देत असत.

**विष्णु पागनीस** :–हे लहानपणी जमखंडीकरांकड गाणे म्हणून श्रीमंतांची करमणूक करणारा मुलगा म्हणून त्यांचे पदरी होता. त्यांची ओळख श्री. भाऊसाहेबांचा मुक्काम कुंदगोळला एक महिना होता म्हणून झाली. तो नित्य आमचे घरी येऊन गाणी म्हणे. आवाज गोड व मुलगा देखणा होता. पुढे तोच प्रभात कंपनीचे तुकाराम फिलममध्ये तुकारामाची भूमिका उत्तम करणारा सिनेनट झाला.

**श्री. नारायण महाराज** :–बालपणी कुंदगोळचे जहागीरदारांकडे शागीर्द होते. ते, मी व आमचे बंधु एकत्र खेळत असू. ते केडगावचे नारायण महाराज झाल्यावर आम्ही ती. साठे यांचेबरोबर गेलो होतो. त्यांनी त्यांचे आश्रमात आमचे चांगले आदरातिथ्य केले.

**श्री. गणपतराव बोडस** :–आम्ही सर्व मंडळी डिसेंबर १९०४ चे मुंबईचे मोठे प्रदर्शन पहाणेस गेलो होतो. किर्लोस्कर संगीत मंडळीतच उतरलो होतो. श्री. गणपतराव अगदी तरुण, सुंदर, हातांत सोन्याची सलकडी, चांगली कामे करणारे हुशार असे दिसले. म्हणून ती. साठे यांच्या मनात त्यांचे मेव्हणीची मुलगी चि. द्वारका इचा त्यांच्याशी विवाह करून द्यावा असे आले. म्हणून त्यांनी त्यांचे गुरुवर्य देवल व मालक नानासाहेब यास माहिती विचारली. तेव्हा दोघेही म्हणाले " गणू हा मुलगा चांगला होतकरू नट आहे. निर्व्यसनी व हिशेबी आहे. खुशाल मुलगी द्या. " नंतर त्यांनी गणपतरावांस समोर

बोलावून बजावले, "आम्ही तुझी शिफारस लग्नासाठी केली आहे. नीट वाग, साठे यांच्याशी गाठ आहे." तो विवाह झाला, परंतु दोन वर्षांनीच ती आमची मावसबहीण बाळंतपणात निधन पावली. परंतु आमचे कुटुंबाशी जो त्यांचा ऋणानुबंध झाला तो शेवटपर्यंत कायम राहिला ते नेहमी व्यवहारात ती. साठे यांचे सल्ल्याने वागत. सारखा दोघांचा पत्रव्यवहार चालू असे.

१९०६ साली ती. साठे यांची बदली सावळगी तालुक्यावर मामलेदार म्हणून व नंतर जमखंडीस पोलिस प्रमुख म्हणून झाली. त्या वेळी ते सुपरिटेंडटचा पोषाक रोज पांढरा सूट, वर बॅजेस व समारंभाचे वेळी जरीचे काम केलेला सेरिमोनियल ड्रेस, संस्थानी कूला कॅप, कमरेला तलवार हा पोषाख व मोठ्या मिशा फार शोभून दिसत. कारण नेपथ्य विद्या त्यांनी पूर्वी किर्लोस्कर संगीत मंडळीत आत्मसात केली होती. ह्यामुळे श्रीमंत भाऊसाहेब जमखंडी-करांची त्यांचेवर फार मर्जी होती. शिवाय त्यांचे काम व्यवस्था, जमाखर्च ठेवण्याचे नैपुण्य उत्तम होते म्हणून विवाह, पुत्रोत्सव वगैरे दरबारी कामाची व्यवस्था त्यांचेवर सोपविण्यात येई इतकेच नाही तर ते संस्थानी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर कुंदगोळचे नाडगिरांचे कारभारी व नंतर गंधर्व मंडळीचे मॅनेजर झाल्यावर एकदा रंगपटात त्यांस चहाचे आमंत्रण असताना श्री. भाऊसाहेबांनी गंधर्व, टेंबे, बोडस, या तीनही मालकांस समोर बोलावून सांगितले, साठे हे चांगले व्यवस्थापक आहेत. त्यांस सोडू नका.

गंधर्व मंडळीचे मॅनेजर असतांना ती. साठे यांनी वर्षाचे शेवटी उत्पन्नातून मालकाना त्यांचे आणेवारीने नफा देऊन पेणचे धारप सावकारांचे सर्व कर्ज चुकते करण्याची योजना करून रक्कम तयार ठेवून धारप पितापुत्रांस कंपनीत मेजवानी देऊन पानसुपारी केली. यावेळी रक्कम त्यांचेपुढें ठेवून कर्जरोखा रद्द करण्याची विनंती केली. तेव्हा गंधर्व बोलले की, 'धारपांचं कर्ज आम्हांस लाभलं आहे ते थोडंसं वहीवर असूदे.' हे बोल ती. साठे यांस आवडले नाहीत. ते म्हणाले, 'कर्ज कधी ठेवू नये; उलट कंपनीची रोख रक्कम एक हजार. ठेव म्हणून श्री. धारपांचे पेढीवर ठेवावी. अशी रक्कम किर्लोस्कर संगीत मंडळीची श्री. गुळवे यांचे पेढीवर ठेव म्हणून आहे. परंतु हा सरळ हिशेबी सल्ला श्री. नारायणरावांस

समजला नाही. पुढे काय झाले ते सर्वश्रुत आहेच. अशा प्रकारे गंधर्व नाटक मंडळीचा कारभार उत्तम प्रकारे हिशोबाची सर्व व्यवस्थेची घडी योग्य प्रकारे बसवून ठरविल्याप्रमाणे कंपनी सोडण्याची तयारी करून नगर मुक्कामी कंपनीचे सर्व इस्टेटीची यादी, रोख शिल्लक, रंगपटातील सर्व सामान, मौल्यवान कपडे, दागिने, सीनसीनरी, घरची भांडीकुंडी, बिछायत-सर्व वस्तूंची यादी करून ते सर्व मालकांपैकी श्री. गणपतरावांचे हवाली करून त्यांची सही घेतली व कंपनीचा समाधानाने निरोप घेतला, तेव्हा कंपनीनेही त्यांस मेजवानी देऊन पानसुपारी केली. त्या प्रसंगी एक सुंदर चांदीची चहादाणी गंधर्व नाटक मंडळीने ती. साठे यांस भेट म्हणून दिली (सन १९१४). ती भेट आमचे घरी अजून आहे.

गंधर्व, टेंबे, बोडस ह्या तीनही मालकांची माझी जेव्हा भेट होत असे तेव्हा तेव्हा ते ती. साठे यांचे कर्तबगारीबद्दल फार प्रशंसा करीत. ह्या तिघांची व मास्टर कृष्णराव, रानडे, पंढरपूरकरबुवा वगैरे नटांच्या रंग-भूमीवरील भूमिका त्यांचे गुणामुळे, व देवल मास्तरांचे नाटयशिक्षणामुळे उत्तम होऊन किर्लोस्करांची परंपरा चालू आहे. असे ती. साठे म्हणत. मी प्रत्यक्ष पहात होतो. हा रंगभूमीच्या वैभवाचा माध्यान काल होता. अशी ती. साठे यांनी रंगभूमीचे उषःकालापासून माध्यान्हापर्यंत सेवा केली.

१९२८ मध्ये राजे घाटगे यांच्या नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर ती. साठे यांनी कोठेच नोकरी केली नाही. ते आम्हा त्रिवर्ग चिरंजीवांकडे अधूनमधून आनंदाने राहत. खालापुरास स्वगृही थोडे चि. डॉ. मोरेश्वर यांचेकडे राहात. धाकटे चि. डॉ. बलवंतराव रेल्वेत डॉक्टर होते, त्यांचेबरोबर फर्स्टक्लासने त्यांनी पुन्हा सर्व हिंदुस्थानचा प्रवास व तीर्थयात्रा आमचे मातोश्रींसह यथासांग केल्या.

पुण्यात ते माझे घरी फार दिवस राहात. पुण्यास सभांना, वसंत व्याख्यान मालेस वगैरे माझेबरोबर येत. सिनेमा पाहण्यास येत. अयोध्येचा राजा हा सिनेमा संगीत नाटकाचे धर्तीवरचा गोविंदराव टेंबे व दुर्गा खोटे यांनी काम केलेला त्यांना आवडला होता. ते म्हणत, एकदा नटाला काय द्यावयाचे ती रक्कम ठरवून काम करवून घेतले म्हणजे मग त्याचे पुन्हा आर्जव करण्याची,

जशी बाळकोबाचे आर्जव वरचेवर करण्याची किर्लोस्करांचेवर पाळी येई, तशी आता आवश्यकता नाही. नवीन धर्तीवर निघालेल्या कंपन्यांचे नाटकास जात, तेव्हा पदवीधर स्टेजवर नट म्हणून काम करताना पाहून त्या प्रगतीचा संतोष मानीत, व म्हणत, 'अजून मॅनेजरचे कामावर जोपर्यंत बी. कॉम्. अगर इकॉनॉमिक्स अकाउंटन्सीचा ग्रॅज्युएट येत नाही तोपर्यंत नाटक कंपन्या पूर्ण यशस्वी होणार नाहीत.'

बुधवार पेठेत पंपूशेट सुगंधीचे दुकानी त्यांची सायंकाळी बैठक असे. तेथे जुने नवे नट जमत. फार गप्पा चालत. त्याच वेळी त्यांनी सौभद्र नाटकाचे नव्या आवृत्तीवर प्रस्तावना सचित्र लिहून त्यावर नामदार सर महादेव चौबळ यांचा इंग्रजी पत्ररूपाने अभिप्राय घेऊन छापला आहे.

**दि. १७ एप्रिल १९३४ च्या केसरीच्या अंकातील कै. ती. साठे यांचा मृत्युलेख**—श्री. त्र्यंबक नारायण साठे, राहणार खालापूर, यांना ता. १३ रोजी काळजाची क्रिया बंद पडून देवाज्ञा झाली. हे कळविण्यास आम्हांस अत्यंत वाईट वाटते. रा. साठे यांची कामगिरी तीन निरनिराळ्या पेशांत झाली. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी प्रथमच संगीत नाटक मंडळी काढून नाट्यकला विद्येचे जे कार्य केले त्यात रा. साठे यांचे त्यांना सहकारित्व लाभले.

नाट्यव्यवसाय सोडल्यावर त्यांनी जमखंडी संस्थानात मामलतदारीच्या जागी व अज्ञानांच्या इस्टेटीचे पालनकर्ते म्हणून चांगल्या प्रकारे नोकरी केली. पण याहीपेक्षा सार्वजनिक हितदृष्ट्या त्यांची कामगिरी म्हटली म्हणजे कुलाबा जिल्ह्यातील इनामदारांतर्फे सरकारशी भांडून इनामी जमिनीतील जंगलतोडीच्या प्रश्नासंबंधाने त्यांनी न्याय मिळवून घेतला ही होय. रा. साठे हे पूर्ण राष्टीय वृत्तीचे असून, महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षाचे सार्वजनिक दृष्टीने ऋणानुबंधी होते.

पुणे येथील बुधवार पेठेतील किर्लोस्कर थिएटर हे सुमारे १९०९–१९१० साली जुन्या माणकेश्वर यांच्या वाड्या या बखळीत त्याचे त्या वेळचे मालक श्री. टापरे यांच्याकडून ती जागा तीस वर्षांच्या 'लीज'ने घेऊन बांधले. 'लीज'चा करार (१) तीस वर्षांचा लीज. (२) रुपये तीस हजार

खर्च किर्लोस्कर संगीत मंडळीने करून, दोन मजली थिएटर बांधणे. तीस वर्षे कंपनीने भाडे घेणे. (३) तीस वर्षांनंतर इमारतीचे रुपये तीस हजार रोख देऊन टापरे यांनी थिएटर व जागा परत घेणे. (४) ह्या थिएटरला यावच्चंद्र दिवाकरौ "किर्लोस्कर थिएटर" हे नाव राहू देणे. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांची रंगीत तसबीर तैलचित्र स्टेजच्या कमानीवर कायम ठेवणे. कालिदासांचा श्लोक, – संसारालेख्य भांडारं पश्चेदं रंगमंदिरं ।। कायम ठेवणे इत्यादी. पण आता त्याचे रूपान्तर काय झाले आहे पहा–' वसंत टॉकीज. '–नांव गेले–तैलचित्र गेलें. कालाय तस्मै नमः ! ह्या प्रकारचा करार व व्यवहारास ती. साठे यांचा तीव्र विरोध होता. त्यांचे म्हणणे, किर्लोस्करांचे स्मारक अवश्य करावे. परंतु ते कर्ज काढून नाही, तर कंपनीचे शिलकेतून व टप्प्याटप्प्याने. प्रथम मध्यवर्ती वस्तीत मोकळी मोठी जागा खरेदी करणे त्या वेळी शक्य होते. 'लीज' नको. नंतर स्वतःची इमारत मिरजेच्या थिएटरप्रमाणे हवेशीर व सोइस्कर बांधावी. पण ते ऐकले नाही. हा करार कोल्हापुरास श्री. अक्कासाहेबांच्या विवाहप्रसंगी किर्लोस्कर संगीत मंडळीस आमंत्रण होते म्हणून तेथे केला. परंतु पहिले सेक्रेटरी श्री. साठे, जमखंडी संस्थानात मामलेदार आहेत. ते ह्या करारास अडथळा आणतील, म्हणून हा करार पन्हाळ्यावर जाऊन केला. ती. साठे कोल्हापुरात निमंत्रित होतेच. त्यांस ही हकीगत मागाहून कळली. नंतर त्यांनी निषेध केलाच, परंतु किर्लोस्करांचे स्मारक म्हणून शंकररावांच्या या मागणीप्रमाणे शंभर रुपये वर्गणी मात्र दिली. अशी थोडक्यात हकीगत आहे. त्या वेळी ' हिंदू पंच ' वर्तमानपत्रात एक व्यंगचित्र व खालील श्लोक आला होता.—

गेले नाना फडणीस भानू । त्यांचे जागी चिं. ग. भानू ।।
पूर्वीचे ते माणकेश्वर । त्यांचे जागी मुजूमदार ।।
पूर्वीच्या दुर्वासा दिधले । शान्ती हे सदन ।।

येथे पाच संस्था होत्या. (१) थिएटर, (२) रंगभूमी मासिक ऑफिस, (३) किर्लोस्कर प्रिंटिंग प्रेस, (४) दुर्वास शांतिसदन हॉटेल, (५) किर्लोस्कर नाट्य-चित्र-ग्रंथसंग्रहालय. ह्या जुन्या तऱ्हेच्या सुरूच्या

नक्षीचे खांब, कमानी, व छत असलेल्या दिवाणखान्यात श्री. शं. बा. मुजुमदार मोठ्या थाटाने बसलेले मी पाहिले आहेत.

**ती. साठे यानी सांगितलेली पुणे शहराची एक विशेष आठवण:** ज्या रात्री पुण्याचे पेशव्यांचे बुधवार वाड्यास व नंतर विश्रामबाग वाड्यास आग लागली त्या रात्री ती. साठे पुण्यास गुळवे यांचे घरी होते. ते केरूनाना छत्रे वगैरे मंडळी डोक्यावरील पगडीस उपरणी बांधून आग पाहण्यास गेले. त्या वेळी आगीचे बंब, नळ वगैरे साधने नसल्यामुळे हौदाचे पाण्याने आग आटोक्यात आली नाही. बुधवारवाडा सबंध जळाला. मधला भाग पाडून टाकल्यामुळे फरासखाना हा भाग वाचला. नंतर विश्रामबाग वाड्याचे आगीकडे ते गेले. त्याचेही पुढले दोन चौक जळाले. मागील चौक प्रयत्नाने वाचला. त्यात हायस्कूल होते. म्हणून नंतर हेड मास्तर श्री. महादेव मोरेश्वर कुंटे हे वाडा पुन्हा बांधण्याचे कामासाठी वर्गणी जमा करण्यास हिंडू लागले. तेव्हा ते यादी घेऊन श्री. गुळवे यांचेकडे आले, व म्हणाले की, या यादीत मोठी रक्कम रुपये पाचशे श्रीमंत इंदोरचे राजे होळकर यांनी दिली आहे. तेवढी तुम्ही द्या. त्याप्रमाणे गुळवे यांनी रुपये पाचशे दिले. सबंध पूर्ववत बांधून झाल्यावर काही रक्कम शिलक राहिली तेव्हा वाड्याचे दर्शनी भागावर एक 'मेघडंबरी' बांधण्याचे ठरले. 'र्वी नव्हती, म्हणून नानावाड्यातील 'मेघडंबरी' पाहुन त्याप्रमाणे ह्या वाड्यावर बांधली. नंतर बऱ्याच वर्षांनी हा वाडा, म्युनिसिपालिटीने सरकार कडून एक लाख रुपये किंमतीस विकत घेतला. तेव्हा ही मेघडंबरी दुरुस्त करावी लागली. ते काम मी म्युनिसिपल मेकॅनिकल इंजिनीयर म्हणून माझेकडे दिले होते. ते काम मी करीत असताना ती. साठे पुणे येथे माझेकडे आले होते. तेव्हा त्यांनी मला ही हकीगत समक्ष सांगितली.

श्री. गणपतराव बोडस यांचा श्री. बालगंधर्व यांचेशी श्री. बाळासाहेब पंडित-तेव्हाचे गंधर्व नाटक मंडळी मॅनेजर-यांचेमुळे मतभेद झाल्यामुळे श्री. गणपतराव आपली मालकी हिश्याची रक्कम घेऊन गंधर्व मंडळीतून बाहेर पडल्यावर काही वर्षांनी पुन्हा दोनदा गंधर्व नाटक मंडळीत येऊन राहिले होते. त्या दोनही प्रसंगी ती. साठे यांनी श्री. नारायणरावांस मुद्दाम भेटून

पुढीलप्रमाणे योग्य सल्ला दिला, " नारायणराव, तुम्ही श्री. गणपतरावांस तुमचे कंपनीत अवश्य बोलावून घ्या. मी त्यांचा निरोप घेऊन त्यांचेतर्फे वशिला लावण्यास आलो नाही. तर काल तुमचे नाटक पाहिले, त्यात स्टेजवर तुमच्याबरोबर नट म्हणून श्री. गणपतराव उभे नसल्यामुळे, तुमच्या रंगभूमीवर फार मोठी पोकळी (उणीव) स्पष्ट दिसते. येवढेच नाही, तर तुमचा सर्व नटसंच, त्यास रोजची आवश्यक असलेली योग्य ती तालीम नसल्यामुळे त्यांचा दर्जा कमी झाल्याचे चांगलेच जाणवते. म्हणून तुम्ही श्री. गणपतराव यांस जरूर बोलावून घ्या." त्यानंतर नारायण-रावांनी श्री. गणपतरावांस मोठ्या पगारावर बोलावून आणले. त्यामुळे त्यांची नाटके सुधारून चांगली होऊ लागली, परंतु पुन्हा त्यांचा बेबनाव झाला. पुन्हा गणपतराव गेले. पुन्हा बोलावले, ते पुन्हा आले व पुन्हा बेबनाव होऊन गेले. तेव्हा ती. साठे म्हणाले, " हे त्या कंपनीचे दुर्दैव होय!"

गंधर्व नाटक मंडळी पुण्यास आली की श्री. नारायणराव एखादा दिवस माझे घरी येऊन राहत असत. तसे ते आले असताना श्री. यशवंतराव कुलकर्णी ( केसरी ऑफिसचे ) माझे घरी आले. व गप्पा सुरू झाल्या. तेव्हा श्री. यशवंतराव मोठ्या कळकळीने मला म्हणाले, " भाऊसाहेब, तुम्ही तरी नारायणरावांस सांगा की कंपनीचे जमाखर्चाकडे वरचेवर लक्ष द्या. " तेव्हा मी हंसून विनोदाने म्हणालो, " अहो, ह्यांनी ( नारायणरावांनी ) माझ्या बापाचे ( ती. साठे ) ऐकले नाही. ते माझे काय ऐकणार ? " तेव्हा नारायणराव ' अरे देवा देवा ' असे म्हणत हात जोडून हासले.

**श्री. देवलांचे नाट्याभिनय शिक्षण.**—देवल म्हणत की नट जितका अधिक सुशिक्षित, गोड आवाज, सुंदर व रूपवंत तितका तो नाट्यशिक्षण घेण्यास अधिक लायक. उदाहरणार्थ, श्री. नानासाहेब जोगळेकर. हे सुशिक्षित वकील, उत्तम आवाज, भव्य, सुंदर रूपसंपन्न असल्यामुळे पूर्वीच्या नटांपेक्षा नाट्यशिक्षण ग्रहण करण्यास अधिक योग्य होते

**श्री. देवलांचे नाट्यशिक्षणापैकी एक सत्यकथा:** त्यांनी मृच्छकटिकमधील कर्णपूरकाचे कामाची तालीम दिली तेव्हा त्या नटाला प्रथम ती योग्य तऱ्हने चांगली तोंडपाठ करण्यास लावून मग एकदोनदा म्हणून घेऊन,

नंतर त्यास माडीच्या जिन्यावरून चढण्याच्या खेपा त्यास दम लागेपर्यंत करवून घेऊन नंतर लगेच ते भाषण म्हणण्यास सांगितले. मग त्याने ' लोखंडी गज मारून मोठ्या मेहनतीने व हिमतीने त्या मत्त हत्तीस हटवून त्या यतीस सोडविले ' ते भाषण त्या दम लागलेल्या स्थितीत म्हटल्यावर अगदी योग्य प्रकारे झाले. हे त्यांचे शिक्षणातील कौशल्य होय.

• • •

# कै. भाऊराव कोल्हटकरांचे मृत्युपत्र

(जन्म : ९ मार्च १८६३   मृत्यु : १३ फेब्रुवारी १९०१)

मुक्काम मिरज : ता. ९-११-१९००

मी, लक्ष्मण बापूजी ऊर्फ भाऊराव कोल्हटकर, राहणार बडोदे, हल्ली मुक्काम मिरज, संस्थान मिरज. माझ्या पश्चात माझ्या मालमत्तेची कशी व्यवस्था ठरवावी त्यासंबंधी मी आज मृत्युपत्र माझ्या समजुतीप्रमाणे व स्वसंतोषाने करीत आहे, ते खाली लिहिलेल्याप्रमाणे.

हल्ली मजपाशी जमीन, सोने, रुपे, वस्त्रप्रावर्ण, वगैरे जे स्थावर जंगम इस्टेट आहे, ते सर्व माझ्या कष्टार्जित व स्वसंपादित असे आहे. त्याजवर कोणाचा हक्कसंबंध नाही. त्याची व्यवस्था खाली लिहिल्याप्रमाणे.

खाली लिहिल्याप्रमाणे रकमांचा धर्मादाय खर्च करावा.

१. "किर्लोस्कर संगीत मंडळी" नावाची नाटक मंडळी मी व रामचंद्र विठ्ठल किजवडेकर यांनी चालविली होती. परंतु माझ्या प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळे मी सदर कंपनी रामचंद्र विठ्ठल किजवडेकर यांच्या स्वाधीन काही शर्तीने केली आहे. त्या शर्तीचे पत्र रा. किजवडेकर यांनी मला तारीख सहा सप्टेंबर एकोणीसशे (६-९-१९००) रोजी लिहून दिलेले आहे. त्यातील कलम दोन ह्यात लिहिल्याप्रमाणे

एकंदर सामानाच्या किमतीवर माझा साडे सहा आण्यांचा हक्क आहे त्याची किमत (रु ९०३–१४–६) नऊशे तीन रुपये साडेचौदा आणे ठरली असून ती रामचंद्र विठ्ठल किजवडेकर यांनी मला देणेची आहे. ही रक्कम त्यांजकडे सदर पत्रात लिहिल्याप्रमाणे सहा महिने मुदतीने ठेवली आहे. सदरची रक्कम धर्मादाय खर्च व्हावी.

२. मुंबई बँकेच्या पुणे येथील शाखेत तारीख सहा एप्रिल एकोणीसशे, इसवी रोजी हिशोबानंतर रु. ४४८ असून एक हजार (१०००) रुपये मी भरले आहेत. त्याचाही धर्मादाय खाती खर्च व्हावा. सदरप्रमाणे पोट कलम १–२ यातील रकमांचा धर्मादाय खर्च कशा पद्धतीने करावा त्यासंबंधीची व्यवस्था डॉ. गणेश कृष्ण गरदे, राहणार पुणे; रा. रा. जनार्दन रघुनाथ जोशी, राहणार हुबळी; रा. रा त्र्यंबक नारायण साठे, राहणार खालापूर, हल्ली राहणार कुंदगोळ, या त्रिवर्गास नेमिले आहे. त्यांनी आपल्या पसंती-प्रमाणे व्यवस्था बहुमताने ठरवून तशी तजवीज करावी.

३. बडोदे येथे बाबाशाही शिक्क्यावर एकवीसशे रुपये रकमेस बारा आणे व्याजाच्या कराराने एक जमीन गहाण ठेविली आहे. तिचे व्याज आमच्या मातोश्री गं. भागीरथीबाई कोल्हटकर यांनी त्यांच्या हयातीपर्यंत घ्यावे. ही जमीन परत जावून रक्कम मोकळी झाल्यास ती पुन्हा सुव्यवस्थेने व्याजी लावून तिचे व्याजही अगर जे उत्पन्न येईल ते सर्व आमच्या मातोश्रीने घ्यावे. मातोश्रींच्या पश्चात सदर रक्कम अगर सदर रकमेस जी जिंदगी मातोश्रीने केली असेल, ती समभाग आमचे बंधू अप्पाराव व चि. गणपती यांनी विभागून घ्यावयाची आहे.

४. बडोदे संस्थानात एक जमीन पुरुषोत्तम ब्राह्मण यांची सहाशे (६००) रुपये बाबाशाही रकमेस गहाण ठेविली आहे. ही रक्कम आम्ही स्वतःची दिली असून जमीन तीर्थरूप राजश्री अप्पाराव आमचे बंधू ह्यांचे नावे सरकारी हिशोबी दाखल आहे. ही जमीन, अगर जमीन विकली जाईल तर सदरची रक्कम सव्याज परत येईल ती

आमची बहीण चि. सौ. कृष्णाबाई भ्रतार शंकर वासुदेव करंदीकर यांस द्यावी. सदर व्यवस्था चि. कृष्णाबाईच्या चोळी-बांगडीकरिता म्हणून दिली आहे.

५. माझे कुटुंब आहे सर्स्वतीबाई कोल्हटकर यास स्वत: लिहिल्या-प्रमाणे स्थावर जंगम मिळावी. (१) पुणे येथे पोष्टाचे सेव्हिंग बँकेत हिशोब नं. २७९३ चे बुकात माझे नावे जी रक्कम शिल्लक असेल ती सर्व–

(२) पुणे येथील सेव्हिंग बँकेचे बुकात हिशेब नं. ८८४९ यात सौ. सर्स्वतीबाई यांचे नावे जी रक्कम शिल्लक असेल ती सर्व रक्कम, मौज रहाटणी; तालुका हवेली, जिल्हा पुणे येथे जी जमीन आम्ही खरेदी केली आहे; ती सर्व जमीन अगर सदर जमीन विक्री करून येईल ती सर्व किंमत–

(३) माझे स्वत:चे सर्व सोने, मोती, जवाहीर वगैरेचे दागिन, रुप्याची भांडी, वस्त्रप्रावर्ण इतर आमचे सर्व सामान जे काही असेल ते सर्व–

(४) सौभाग्यवती सर्स्वतीबाई कोल्हटकर यांचे अंगावर व त्यांज-पाशी जे सोन्यामोत्याचे वगैरेचे दागीने असतील ते सर्व व रोख रक्कम जी असेल ती सर्व–

(५) आडीच हजार रुपये ( २५०० ) रोख कर्जाऊ मागून त्या-वेळेस देण्याचे शर्तीने हुबळी येथील राहणार रा. रा. गोपाळ अनाजी सुळे, रा. रा. जनार्दन रघुनाथ जोशी व रा. रा. त्र्यंबक बगाराम घोरपडे यांस देऊन त्यांची पावती ता. ४ माहे ऑक्टोबर १९०० रोजी लिहून घेतली आहे. व सदर रकमेचे व्याज दरमहा दर शेकडा एक रुपया प्रमाणे ठरविलेले आहे. सदरची रक्कम सव्याज जी येणे असेल ती सर्व सदर कलम १ ते ६ म्हणजे पोटकलमात जी इस्टेट लिहिली आहे, त्याशिवाय जी आमची स्थावर जंगम जिंदगी सदर कलमात लिहिणे राहिली असेल ती सर्व मिळून कलम चारप्रमाणे

पोट कलम १ ते ६ यात जी जिंदगी लिहिली आहे ती सर्व माझे पश्चात सौ. सर्स्वतीबाई कोल्हटकर यांची आहे. त्याजवर दुसरे कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध नाही.

ह्या मिळकतीची रीतीप्रमाणे सौ. सर्स्वतीबाई यांनी आपल्या हयातीपर्यंत आपल्या निर्वाहाकडे, धर्मादायाकडे, तीर्थयात्रांकडे त्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे पाहिजे तसा खर्च करावा. सौ. सर्स्वतीबाई यांनी वर सांगितलेल्या रीतीने उपभोग घेतल्यानंतर त्यांचे पश्चात जर काही जिंदगी स्थावर अगर जंगम राहिली तर ती आमचे दोन बंधू ती. आप्पाराव व चि. रा. गणपतराव यांनी समभाग वाटून घ्यावयाची आहे. सौ. सर्स्वतीबाई ह्या आपल्या हयातीपर्यंत सदर जिंदगीची पाहिजे ती व्यवस्था करण्यास पूर्ण मुखत्यार आहेत. येणे-प्रमाणे कलम १ ते ४ त्यातील पोट कलमासह लिहिलेले मृत्यूपत्र मी आपल्या अक्कल हुशारीने व स्वसंतोषाने केले आहे. सदरहू मृत्यु-पत्राच्या दोन प्रती केल्या आहेत. प्रमाणे एक प्रत आम्ही आपले स्वतःचे जवळ ठेविली आहे. व दुसरी प्रत रा. रा. त्र्यंबक नारायण साठे, हल्ली राहणार कुंदगोळ यांजपाशीं ठेवली आहे. मुक्काम मिरज, ता. ९ नऊ माहे नोव्हेंबर सन एकोणीसशे १९००.

**दस्तूर, त्र्यंबक नारायण साठे. सही, लक्ष्मण बापूजी कोल्हटकर**

दा. क. १६५८८
REFBK-0016588

## आमचीं कांहीं प्रकाशनें

१ ओतेहो – म. म. द. वा. पोतदार ४=००
२ कांहीं मोहरा कांहीं मोती – न. वि. गाडगीळ ७=५०
३ बँका व त्यांचे कारभार – चिं. नि. जोग १२=५०
४ विदेश विनिमय – वसंत पटवर्धन २०=००
५ मरणमाळेचा पडदा – व. शां. देसाई १२=००
६ माझी भूमिका – गणपतराव बोडस १५=००
७ सप्रेम नमस्कार – अ. ह. लिमये ३=००
८ शिवनेरीच्या नौबती – यशवंतराव चव्हाण ४=५०
९ फ्रेंच राज्यक्रांति – न. चिं. केळकर ४=००
१० नाबाद एकोण नव्वद – रँगलर परांजपे ८=००
११ खंदक मोहरे घर – कर्नल पंडित ४=००
१२ मराठी व्याकरण – प्र. न. जोशी – ५=००
१३ निबंध शास्त्र व कला – " " ३=००
१४ मराठी रंगभूमि – आ. कि. कुलकर्णी ४=००
१५ शासन – ऋतुकथा – श्री. के. देवधर ४=००
१६ शेजाऱ्यांची बायको – सौ. मोहिनी निमकर ३=५०
१७ संस्कार मंदिर (२री आ.) शं. कृ. क्षीरसागर ३=००
१८ मेरी मॅक्लि ओड बधून – सौ. सुशीला लिमये १=२५

# क्वीन्स बुक स्टॉल : पुणें २



राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
नुक्रम ........ दि: ........
मांक ........ नोंद दि: ........